## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६८८
निर्णय दिनांकः ०३-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. विठ्ठल तुळशीराम माने,<br>रा.नागराळ, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, उमरगा,जि. उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, उस्मानाबाद | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील फेटाळल्यामुळे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केल्याचे नमूद केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०३.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील गट विकास अधिकारी ते पंचायत समितीतील सर्व कर्मचाऱ्यांच्या वडिलोपार्जित व अपिलार्थीने अर्ज करण्याच्या दिनांकाच्या वेळी अस्तित्त्वात असलेल्या मालमत्ता, जमिनजुमला, इमारत,

दागदागिने, रोख रक्कम, बँकेतील गुंतवणूक व इतर स्थावर व जंगम मालमत्तेविषयी माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८(ञ) नुसार माहिती देण्याचे नाकारले. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०८.०७.२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी घेतलेल्या भूमिकेशी सहमती दर्शवून अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८(ञ) नुसार माहिती देण्याचे नाकारले, असे आयोगास अवगत केले.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या स्थावर व जंगम मालमत्तेची माहिती मागविली आहे. तथापि ही माहिती उघड झ ाल्यास नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होणार आहे, हे त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेले नाही व तसेच या मुद्यावर तोंडी खुलासा करण्यासाठी देखील ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली

माहिती ही निश्चितपणे कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधितांशी काहीही संबंध नसलेली, अशाप्रकारची आहे. मात्र ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ (१) (ञ) च्या तरतुदीचा भंग होऊन संबंधितांच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता निर्माण होऊ शकेल, अशा वैयक्तिक तपशीलासंबंधाची माहिती असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती अपिलार्थीस उघड केल्याने वर नमूद केल्याप्रमाणे कोणतेही व्यापक जनहित साध्य होईल, असे आयोगास वाटत नाही व यासंदर्भातील कोणताही युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. अशाप्रकारच्या विषयावर या खंडपीठाने वेळोवेळी सार्वजनिक प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मालमत्तेचा तपशील उघड करणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने योग्य होणार नाही, अशाप्रकारची भूमिका घेतली आहे, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विठ्ठल तुळशीराम माने, रा.नागराळ, पो.गुंजोटी, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, उमरगा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६८९
निर्णय दिनांक: ०३-११-२००९

१. श्री. विठ्ठल तुळशीराम माने, : अपिलार्थी
रा.नागराळ, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका पोलीस प्रमुख,
पोलीस ठाणे, उमरगा,जि.उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा पोलीस प्रमुख,
पोलीस मुख्यालय,उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय पोलीस अधिकारी,
उमरगा,जि. उस्मानाबाद.
जन अपिलीय अधिकारी : पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले की, त्यांना तालुका पोलीस प्रमुख, उमरगा यांनी माहिती नाकारल्यामुळे आणि जिल्हा पोलीस प्रमुख यांनी त्यांचे प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व त्यांनी संबंधितांच्या वैयक्तिक मालमत्तेच्या संदर्भात त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे तालुका पोलीस प्रमुख,पोलीस स्टेशन,उमरगा येथील पोलीस प्रमुखापासून ते

पोलीस शिपायापर्यंतच्या प्रत्येक  कर्मचारी/अधिकाऱ्यांच्या वडिलोपार्जित व अपिलार्थीने अर्ज करण्याच्या दिनांकाच्या वेळी अस्तित्त्वात असलेल्या मालमत्ता, जमिनजुमला, इमारत, दागदागिने, रोख रक्कम, बँकेतील गुंतवणूक व इतर स्थावर व जंगम मालमत्तेविषयी माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १०.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये योग्य तो पत्ता न दिल्यामुळे व त्यांना माहिती कोणत्या कारणाकरिता पाहिजे आहे आणि कोणत्या गुन्हयाची माहिती हवी आहे, हे स्पष्ट केले नसल्याने अपिलार्थीस माहिती नाकारली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.०९.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळले. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही व्यापक जनहिताशी संबंधित नसल्यामुळे नाकारली असल्याचे आयोगास स्पष्ट केले.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीने उमरगा तालुक्यातील पोलीस स्टेशनमधील तालुका पोलीस प्रमुख ते त्यांच्या हाताखालील शिपायापर्यंतच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या मालमत्तेचा तपशील या प्रकरणी मागितला आहे. मात्र ही माहिती उघड करुन देण्यासाठी ते नेमके कोणते व्यापक जनहित साध्य करणार आहेत, याचा

कोणताही उल्लेख त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेला नाही. एवढेच नव्हेतर त्यांची भूमिका स्पष्ट करण्यासाठी ते आयोगासमोर आज सुनावणीस उपस्थित नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ती उघड केल्याने सर्व संबंधितांच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप तर होईलच, परंतु कोणतेही व्यापक जनहित साध्य होणार नाही आणि अशी माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८(१)(ञ) चा भंग होण्याची आयोगास खात्री पटल्यामुळे, अपिलार्थीने आयोगाकडे केलेली विनंती आयोगास मान्य करता येणार नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२४.०९.२००८ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेला निर्णय हा स्वयंस्पष्ट आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या आयोगाकडील विचाराधीन अपील अर्जावर वेगळयाने अभिप्राय व्यक्त करण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

प्रसंगावशात या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १०.०८.२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिलेला प्रतिसाद पाहता त्यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज मूळात वाचला आहे किंवा कसे अशी आयोगास शंका येत आहे. त्यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले सदर पत्र अपिलार्थीस माहिती देण्याऐवजी त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाच व कर्तव्यपरायणतेचा अभाव जास्त स्पष्ट करत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी असे, त्यांना सूचित करण्यात येत आहे.

## आदेश

१.अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०३-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विठ्ठल तुळशीराम माने,रा.नागराळ, पो.गुंजोटी, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरगा,जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६९०
निर्णय दिनांक: ०३-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री.शेख वहाबोद्दीन शेख करीमोद्दीन,<br>रा.तळेगाव, ता.उमरी, जि.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि कार्यालय,<br>उमरी, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,उमरी<br>जि.नांदेड. | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१०.०७.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.११.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेतल्यामुळे व परिणामी ते आवश्यक त्या माहितीपासून वंचित राहिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर आयोगाने दंडात्मक कारवाई करण्याची आणि अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १०.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील उमरी तालुक्यातील सन १९९० ते २००८ पर्यंत ज्या शेतकऱ्यांना फळबाग योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या अनुदानासंदर्भातील काही माहिती ३ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही. संबंधितांनी आपले लेखी युक्तिवाद आयोगास सादर केले आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामधील केलेल्या विनंतीशी सुसंगत लेखी युक्तिवाद सादर केला आहे.

तालुका कृषि अधिकारी, उमरी कार्यालयाने संबंधित जन अपिलीय अधिकारी दि. २९.१०.२००९ रोजी बदली होऊन कार्यमुक्त झाले असल्याचे व सध्या त्यांचा पदभार ज्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे आहे ते आजारी असल्याचे आयोगास कळविले आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितली आहे. त्यातील मुद्दा क्र. १ द्वारे अपिलार्थीने, "या योजनेची तपशीलवार

माहिती" अशी माहिती मागविली आहे. जी पूर्णपणे मोघम आहे. मात्र अपिलार्थीस या योजनेतील निश्चित कोणत्या मुद्यावर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे ते मुद्दे त्यांनी अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ मध्ये स्पष्ट केले आहेत. या मुद्यांच्या संदर्भात देखील अपिलार्थीने "तपशीलवार माहिती" अशा स्वरुपाची माहिती मागविली आहे. परंतु तपशीलवार म्हणजे नेमका कोणता तपशील, याचा कुठलाही उल्लेख त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अथवा लेखी युक्तिवादामध्ये केलेला नाही. त्यामुळे आता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ च्या संदर्भातील, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये स्पष्ट केलेल्या मुद्यांवरच उपलब्ध असलेली माहिती, एवढीच माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता विनामूल्य देणे भाग आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भातील वर स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत आयुक्त (कृषि) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. आयुक्त (कृषि) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.शेख वहाबोद्दीन शेख करीमोद्दीन,रा.तळेगाव, ता.उमरी, जि.नांदेड-४३१ ८०७.

२. जन माहिती अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,उमरी, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,उमरी जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य शिवाजीनगर, पुणे-०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६९१
निर्णय दिनांकः ०३-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री.जयराम सिध्देश्वर कंचलीवार,<br>रा.किनवट, जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी,<br>ग्रामपंचायत, गोकुंदा,<br>ता.किनवट,जि.नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, किनवट,<br>जि.नांदेड. | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत, गोकुंदा, ता.किनवट,
जि.नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन सुध्दा त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायत, गोकुंदा अंतर्गत असलेल्या स.नं. ४८-मालमत्ता क्र. १५३६, स.नं.५०-मालमत्ता क्र. १५३०, स.नं. ४९-मालमत्ता क्र.१५३१, स.नं.९६-९७-मालमत्ता क्र. १५३५, स.नं.६८ व ८७ - मालमत्ता क्र.१५५९ इत्यादी मालमत्तेसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड पोस्टाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीअंतर्गत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.११.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर निर्णय दिला किंवा कसे, हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय झाला असल्याचे परंतु या निर्णयाची प्रत त्यांच्याकडे सध्या उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दि. ३०.१०.२००८ रोजी विनामूल्य पुरविली असून या पृष्ठयर्थ त्यांनी एक पत्र आयोगास सादर केले आहे. अपिलार्थीची त्यांच्या मूळ अर्जावर असलेली सही व जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे अपिलार्थीस माहिती दिल्यापृष्ठयर्थ सादर केलेल्या पुराव्याच्या कागदपत्रावरील अपिलार्थीची कथित

पोचपावतीवरील स्वाक्षरी याचे अवलोकन करता या दोनही स्वाक्षऱ्यांमध्ये आयोगास फरक आढळून आला. यासंदर्भात आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी हे स्वतः कधी माहिती स्वीकारीत नाहीत, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या प्रतिनिधीस ही माहिती दिली आहे व त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या पुराव्यावरील सही अपिलार्थीची नसून अपिलार्थीच्या प्रतिनिधीची आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड टपालाद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अपिलार्थीस न देता अपिलार्थीच्या प्रतिनिधीस दि. ३०.१०.२००८ रोजी व्यक्तिशः हस्तांतरित केलेली आहे. जरी या कथित प्रतिनिधीने ही माहिती अपिलार्थीस दिली असली तरी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर अपिलार्थीने यानंतर दि. २६.११.२००८ रोजी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये किंवा त्यानंतर कोणतेही अभिप्राय व्यक्त केलेले नाहीत अथवा यासंदर्भात कोणताही तोंडी युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती मागितली असता अपिलार्थीच्या प्रतिनिधीस जन माहिती अधिकारी यांनी व्यक्तिशः माहिती हस्तांतरित करण्यामध्ये माहिती देण्याव्यतिरिक्त जन माहिती अधिकारी यांचे इतर एखादे प्रयोजन असावे, असे आयोगास वाटत नाही. कारण अपिलार्थीच्या प्रतिनिधीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीचे प्राधिकारपत्र देखील जन माहिती अधिकाऱ्यास त्यावेळी (दि. ३०.१०.२००८ रोजी) सादर केलेले नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रतिनिधीमार्फत पाठविलेली कथित माहिती प्राप्त झाली नसावी, असे अनुमान काढण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत

आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दि.२१.०७.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याची आयोगास खात्री पटली आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. श्रीमंगले (सध्या माहूर पंचायत समिती,जि.नांदेड येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जयराम सिध्देश्वर कंचलीवार,कृष्णा गारमेंटस्, मेन रोड किनवट, ता.किनवट, जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, गोकुंदा, ता.किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६९२
निर्णय दिनांक ०३/११/२००९

१ श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,
नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,
नांदेड

**निर्णय**

श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०३.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०६.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १०० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅंड रोड, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, देवगीरी विश्रामगृह, नांदेड
३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, देवगीरी विश्रामगृह, नांदेड

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६९४
निर्णय दिनांक ०३/११/२००९

१ श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
लागवड अधिकारी,
सामाजिक वनीकरण विभाग, भोकर तालुका
सामाजिक वनीकरण कार्यालय, भोकर, जि. नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
सामाजिक वनीकरण कार्यालय, नांदेड

**निर्णय**

श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ११.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १३.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ६१ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅंड रोड, नांदेड.
२) जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, भोकर तालुका सामाजिक वनीकरण कार्यालय, भोकर, ता.भोकर, जि.नांदेड.
३) जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण कार्यालय, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८२२
निर्णय दिनांक ०३/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री.शे.शमसुद्दीन शे. चिरागोद्दीन,<br>रा.यावल, जि.जळगांव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ प्रशासक,<br>श्री.व्यंकटेश नागरी सहकारी पतसंस्था मर्या. यावल,<br>ता.यावल, जि.जळगांव. | : | प्रतिवादी |
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक,<br>सहकारी संस्था, यावल, जि.जळगांव | : | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २३.०५.२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक ०७.०२.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा प्रशासक, श्री.व्यंकटेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था, यावल यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक १४.०३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलासंदर्भात सहायक निबंधक, सहकारी संस्था, यावल यांनी त्यांच्या

दि. २२.०३.२००७ रोजीच्या पत्राव्दारे संबंधित पतसंस्थेचे अध्यक्ष / व्यवस्थापक यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आठ दिवसाच्या आत त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस अग्रेषित करुन संस्थेकडून माहिती प्राप्त होताच त्यांना ती पुरविण्यात येईल असे आश्वासित केले. तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण गैरहजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे ते प्राधिकरण म्हणजे प्रशासक, श्री. व्यंकटेश नागरी सहकारी पतसंस्था मर्या. हे आहे. या संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेला पुढील निर्णय विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते.

मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २८२२ /०७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.शे. शमसुद्दीन शे. चिरागोद्दीन, खीर्नीपुरा, खल्लावाडा, यावल, ता.यावल, जि.जळगांव.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासक, श्री.व्यंकटेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, यावल, ता.यावल, जि.जळगांव.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, यावल, जि.जळगांव.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६८१

निर्णय दिनांक ०३-११-२००९

१ श्री. किरण माणिकराव यादव, : अपिलार्थी
रा. आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अध्यक्ष / सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा व
स्वच्छता समिती, ग्रामपंचायत कार्यालय, सराटी,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप विभागीय अभियंता,
जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग,
तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून टाळाटाळ केली, त्यांच्या माहिती अर्जाची दखल घेतली नाही, त्यांना माहिती दिली नाही, असे नमूद करुन त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही व्हावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे अध्यक्ष / सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, ग्रामपंचायत कार्यालय, सराटी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे भारत निर्माण योजनेअंतर्गत सराटी नळ पाणीपुरवठा योजनेसंबंधी काही माहिती एकूण दहा मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधितांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार उप विभागीय अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक ०४-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर उप विभागीय अभियंता (जि.प.) पाणीपुरवठा उपविभाग तुळजापूर यांनी दिनांक १४-१०-२००८ रोजी निर्णय देऊन "अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील पत्राव्दारे केलेले आरोप मान्य करणे योग्य ठरते म्हणून संबंधितांच्या विरुध्द योग्य कार्यवाही होणे उचित वाटते" असा निर्णय दिला. तथापि यानंतरही अपिलार्थीस संबंधितांकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी करता असे आढळून आले आहे की, मूळात अपिलार्थीने माहिती अधिकारी समजून ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे ते प्राधिकरण हे सार्वजनिक प्राधिकरण नाही. अपिलार्थीने या प्राधिकरणाकडे मागणी केलेली माहिती ही एका विशिष्ट योजनेसंबंधात असून या योजनेची वैशिष्ट्ये अशी आहेत की, ही योजना संबंधित गावाच्या ग्रामस्थांच्या सहकार्याने पार पाडावयाची असून ही योजना पार पाडण्याकरिता ग्रामस्थांकडून १० टक्के लोकवर्गणी गोळा करुन उर्वरित निधी शासनाने

पुरवावयाचा आहे . या पाणीपुरवठा योजनेशी संबंधित समितीस उप अभियंता यांनी केवळ तांत्रिक मार्गदर्शन करावयाचे आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठीची सर्व कामे या पाणीपुरवठा योजनेसाठी गठीत केलेल्या संबंधीत ग्रामस्थामधून निवड केलेल्या ग्रामस्थांच्या समितीने त्यांच्या पातळीवर पार पाडावयाची आहेत. ही समिती संबंधित गावाच्या ग्रामस्थांनी निवडून दिलेल्या लोकांची बनवलेली असते व या समितीचे अध्यक्ष / सचिव हे सर्व खाजगी व्यक्ती असतात आणि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही संपूर्णपणे या समितीस शासनाकडून काही अंशी प्राप्त होणा-या निधीशी निगडीत आहे. अशा प्रकारे होणा-या कामाच्या संदर्भात, आयोगाने पूर्वी निर्णय देऊन पाणीपुरवठा खात्याच्या सचिवांना, अशा प्रकारची माहिती, समितीच्या कार्यालयाशी समांतर अशा सार्वजनिक प्राधिकरणाकडे ग्रामपंचायतीकडे उपलब्ध करुन ठेवावी असे सुचविले आहे. त्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी त्यांचे आदेश क्रमांक जिपउ/जलस्व/आस्था/३६०/०९, दिनांक ०१-०६-२००९ अन्वये अशा प्रकारच्या योजनेच्या कामाकरिता संबंधित गावाचे ग्रामसेवक यांना माहिती अधिकारी म्हणून व त्या तालुक्याचे गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून नेमले आहे. अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधित प्रथम अर्ज व प्रथम अपील अर्ज यांची तपासणी करता ते दोनही अर्ज अपिलार्थीने अशा प्राधिकरणाकडे केले आहेत की, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी म्हणून कोणत्याही प्रकारे संबोधता येणार नाही, हे पाहता अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, अद्यापही त्यांना या माहितीची आवश्यकता असल्यास त्यांनी ग्रामसेवक, ग्रामपंचायत, सराटी यांच्याकडे प्रथम अर्ज करावा व त्यांच्याकडे माहिती मागावी व या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांच्याकडे आवश्यकतेप्रमाणे करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, विशेषतः अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे ते प्राधिकरण हे सार्वजनिक प्राधिकरण नसल्यामुळे, या प्राधिकरणास माहिती

देण्याचे आदेश आयोग देऊ शकत नाही, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. किरण माणिकराव यादव, रा. आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष / सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, ग्रामपंचायत कार्यालय, सराटी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६८२

निर्णय दिनांक ०३-११-२००९

१ श्री. किरण माणिकराव यादव, : अपिलार्थी
रा. आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अध्यक्ष / सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा व
स्वच्छता समिती, ग्रामपंचायत कार्यालय,
बोरमनतांडा जळकोट, तालुका तुळजापूर, जिल्हा
उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप विभागीय अभियंता,
जिल्हा परिषद, पाणीपुरवठा उपविभाग, तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास जाणुन बुजून टाळाटाळ केली, अर्जाची दखल घेतली नाही व मुदत संपली तरी माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १४-०२-२००९ रोजीचे पत्र, सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, ग्रामपंचायत कार्यालय, बोरमण तांडा, तालुका तुळजापूर यांनी आयोगास सादर केले आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे नजरचुकीने व्दितीय अपील दाखल केले असल्याचे नमूद करुन त्यांच्या व्दितीय अपिलाचा विचार करण्यात येऊ नये अशी आयोगास विनंती केली आहे. या पत्राबरोबरच अपिलार्थीने अध्यक्ष / सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, ग्रामपंचायत कार्यालय, बोरमनतांडा जळकोट, तालुका तुळजापूर यांना उद्देशून लिहिलेले पत्र दिले आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने जळकोट पाणीपुरवठा समिती मार्फत त्यांना माहिती मिळाल्याचे त्यांनी कबूल केले आहे. या सर्व बाबी पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील क्रमांक १६८२/२००८, दिनांक ०४-११-२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. किरण माणिकराव यादव, रा. आराधवाडी, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष / सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, ग्रामपंचायत कार्यालय, बोरमनतांडा जळकोट, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, जिल्हा परिषद, पाणीपुरवठा उपविभाग, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६८३

निर्णय दिनांक ०३-११-२००९

१ श्री. रामचंद्र मारुती कांबळे, : अपिलार्थी
वेताळनगर, तुळजापूर, तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अध्यक्ष / सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा व
स्वच्छता समिती, ग्रामपंचायत कार्यालय, देवसिंगा
(तुळ), तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप विभागीय अभियंता,
जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग,
तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाची मुदत संपली तरी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. या अर्जासंदर्भात त्यांनी केलेल्या प्रथम अपील सुनावणीच्या वेळी माहिती अधिकारी गैरहजर राहिले. त्यांचा भ्रष्टाचार उघडकीस येईल असे वाटल्यावरुन ते जाणुनबुजून या सुनावणीसाठी गैरहजर

राहिले. या प्रकरणी त्यांनी कामात कामचुकारपणा केल्यामुळे त्यांना पदमुक्त करावे व त्यांच्यावर शास्ती लादावी व अपिलार्थीस संपूर्ण माहिती द्यावी अशी विनंती अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये शेवटी आयोगास केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे अध्यक्ष / सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, ग्रामपंचायत कार्यालय, देवसिंगा (तुळ) तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे भारत निर्माण योजनेअंतर्गत नळ पाणीपुरवठा व दलित पाणीपुरवठा योजनांसंदर्भात सन २००६ ते दिनांक ०१-०८-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार उप विभागीय अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक ०६-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधित उप विभागीय अभियंता, जिल्हा परिषद, पाणीपुरवठा उपविभाग, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांनी दिनांक १४-१०-२००८ रोजी निर्णय देऊन " अपिलकर्त्याने अपील पत्राव्दारे केलेले आरोप मान्य करणे योग्य ठरते म्हणून संबंधिताविरुध्द योग्य कार्यवाही होणे उचित वाटते " असा निर्णय दिला. तथापि या नंतरही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, अपिलीय अधिकारी व संबंधित समितीचे अध्यक्ष/ सचिव यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी करता असे आढळून आले आहे की, मूळात अपिलार्थीने माहिती अधिकारी समजून ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे ते प्राधिकरण हे सार्वजनिक प्राधिकरण नाही. अपिलार्थीने या प्राधिकरणाकडे मागणी केलेली माहिती ही एका विशिष्ट योजनांसंबंधात असून या योजनेची वैशिष्ट्ये अशी आहेत की, ही योजना संबंधित गावाच्या ग्रामस्थांच्या सहकार्याने पार पाडावयाची असून ही योजना पार पाडण्याकरिता ग्रामस्थांकडून १० टक्के लोकवर्गणी गोळा करुन उर्वरित निधी शासनाने पुरवावयाचा आहे . या पाणीपुरवठा योजनेशी संबंधित समितीस उप अभियंता यांनी केवळ तांत्रिक मार्गदर्शन करावयाचे आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठीची सर्व कामे या पाणीपुरवठा समितीने त्यांच्या पातळीवर पार पाडावयाची आहेत. ही समिती संबंधित गावाच्या ग्रामस्थांनी निवडून दिलेल्या लोकांची बनवलेली असते व या समितीचे अध्यक्ष / सचिव हे सर्व खाजगी व्यक्ती असतात आणि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही संपूर्णपणे या समितीस शासनाच्या होणा-या निधीशी निगडीत आहे. अशा प्रकारे होणा-या कामाच्या संदर्भात, आयोगाने पूर्वी निर्णय देऊन पाणीपुरवठा खात्याच्या सचिवांना, अशा प्रकारची माहिती, समितीच्या कार्यालयाशी समांतर अशा सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध करुन ठेवावी असे सुचविले आहे. त्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी त्यांचे आदेश क्रमांक जिपउ/जलस्व/आस्था/३६०/०९, दिनांक ०१-०६-२००९ अन्वये अशा प्रकारच्या योजनेच्या कामाकरिता संबंधित गावाचे ग्रामसेवक यांना माहिती अधिकारी म्हणून व त्या तालुक्याचे गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून नेमले आहे. अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधित प्रथम अर्ज व प्रथम अपील अर्ज यांची तपासणी करता ते दोनही अर्ज अपिलार्थीने अशा प्राधिकरणाकडे केले आहेत की, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी म्हणून कोणत्याही प्रकारे संबोधता येणार नाही, हे पाहता अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, अद्यापही त्यांना या माहितीची आवश्यकता असल्यास त्यांनी ग्रामसेवक, ग्रामपंचायत, देवसिंगा (तुळ) यांच्याकडे

प्रथम अर्ज करावा व त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार माहिती मागावी, विहीत मुदतीत संबंधितांकडून प्रतिसाद प्राप्त न झाल्यास या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांच्याकडे आवश्यकतेप्रमाणे करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, विशेषतः अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे ते प्राधिकरण हे सार्वजनिक प्राधिकरण नसल्यामुळे, या प्राधिकरणास माहिती देण्याचे आदेश आयोग देऊ शकत नाही, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामचंद्र मारुती कांबळे, वेताळनगर, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष / सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, ग्रामपंचायत कार्यालय, देवसिंगा (तुळ) तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६८४

निर्णय दिनांक ०३-११-२००९

१ श्री. रामचंद्र मारुती कांबळे, : अपिलार्थी
वेताळनगर, तुळजापूर, तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गावसूद,
तालुका जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती,
उस्मानाबाद, तालुका जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून त्यांनी प्रथम अपील केल्यानंतरही माहिती दिली नाही व माहिती अधिकार अधिनियमाची पायमल्ली केली. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी कडक कार्यवाही केली नाही, प्रथम अपिलीय अधिका-यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी, जन माहिती अधिका-यावर दंडात्मक शास्ती लादावी आणि त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित इंदिरा आवास घरकूल योजना, तांडा वस्ती सुधार योजना, ११ वा व १२ वा वित्त आयोग, दलित वस्ती सुधार योजना, संपूर्ण ग्राम रोजगार योजना व यशवंत ग्राम योजना इत्यादीबाबत सन २००० ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती १७ मुद्दयाव्दारे व नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही विस्तृत व व्यापक स्वरुपाची आणि ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती नाजूक असल्यामुळे ही माहिती ग्रामपंचायत कार्यालयाशी संपर्क साधून संबंधितांनी पाहून घ्यावी अशी अपिलार्थीस विनंती केली. तथापि या प्रतिसादावर समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक २९-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती यांनी दिनांक ०१-११-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु त्यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्या कार्यालया-कडील उपलब्ध माहिती दिनांक २५-१०-२००८ रोजी उपलब्ध करुन दिली गेली आहे व प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झाल्याचे अपिलार्थीने त्यांच्याकडील प्रथम अर्जाच्या स्थळप्रतीवर

अभिप्राय दिले आहेत. अपिलार्थीचे असे अभिप्राय असलेले त्यांच्या कार्यालयाचे दिनांक २५-१०-२००८ रोजीचे पत्र त्यांनी आयोगास सादर केले. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, त्यांच्या मूळ अर्जातील वास्तूशास्त्रज्ञांनी मान्य केलेले नकाशे व क्वॉलिटी रिपोर्ट ही माहिती अद्यापपावेतो त्यांच्याकडून अपिलार्थीस द्यावयाची राहिली आहे. अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाची राहिलेली माहिती ते अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वास्तूशास्त्रज्ञांनी मान्य केलेले नकाशे व क्वॉलिटी रिपोर्ट ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देता आली नाही. त्यांनी अपिलार्थीस दिनांक २५-१०-२००८ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अपिलार्थीस दिली आहे. अपिलार्थीने त्यावर समाधान व्यक्त केले आहे. परंतु यानंतर अपिलार्थीने दिनांक २१-११-२००८ रोजी आयोगाकडे त्यांचे व्दितीय अपील नोंदविले आहे. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अद्याप माहिती पुरविणे बाकी आहे व ही माहिती अपिलार्थीस तीस दिवसात पुरविण्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीस ही माहिती या कालावधीमध्ये विनामूल्य पुरविली जाईल असे पहावे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अपूर्ण माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामचंद्र मारुती कांबळे, वेताळनगर, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गावसूद, तालुका जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उस्मानाबाद, तालुका जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६८५

निर्णय दिनांक ०३-११-२००९

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, : अपिलार्थी
माणिकनगर, माणिक चौक, उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औसा,
तालुका औसा, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), लातूर,
जिल्हा लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला नसल्यामुळे व मनीऑर्डरव्दारे पाठविलेले शुल्क माहिती अधिका-याने स्वीकारले नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले

आहे आणि या प्रकरणी माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन केल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक आणि त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय दिला नसल्याने जन अपिलीय अधिकारी यांच्यावर नियमानुसार कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे व तसेच अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य देण्याचे आदेशित करण्याचीही आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित केरोसीन नियतन, गॅस धारक, बोगस कार्ड इत्यादी विषयासंदर्भात सन २००८ या कालावधीतील काही माहिती एकूण पाच मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाने अपेक्षिली असून अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नसल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २२६ इतके शासकीय कोषागारात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-१०-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा न केल्यामुळे अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २२६ इतके शासकीय कोषागारात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न केल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क पुरविण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १५-०७-२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या-कडील दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा आवश्यक तो तपशील देऊन, अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रु. २२६ इतके शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले. तथापि हे शुल्क अपिलार्थीने शासकीय कोषागारात भरले नाही अथवा हे शुल्क अन्य माध्यमाद्वारे भरल्याचा कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केला नाही. त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मनीऑर्डरचा स्वीकार केला नाही असे विधान केले आहे. आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मनीऑर्डरने शुल्क पाठविल्याचा कोणताही पुरावा आयोगास उपलब्ध करुन दिला नाही. त्याचबरोबर आज रोजी सुनावणीच्या वेळी ते असा पुरावा सादर कण्यासाठी उपस्थितही नाहीत. जन अपिलीय अधिकारी हे ही माहिती सशुल्क देण्यास तयार आहेत. अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नसल्याने त्यांना ही माहिती

जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्क भरुन प्राप्त करुन घेणे हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना अनिवार्य आहे. सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून या माहितीपोटीचे शुल्क भरुन त्यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन घ्यावी. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील कागदपत्रावरुन असे आढळून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ०७-१०-२००८ रोजी निर्णय दिलेला आहे. अपिलर्थीने मूळात मनीऑर्डरव्दारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्कही पाठविले नाही, त्यामुळे अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील कोणतेही मुद्दे आयोगास मान्य करता येणार नाहीत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर निर्णय दिलेला आहे त्यामुळे व अधिनियमातील आवश्यक त्या तरतुदी अभावी या प्रकरणी अपिलीय अधिका-यावर कार्यवाही करण्याचे कोणतेही कारण या घटनाक्रमामध्ये आयोगास आढळून येत नाही. या सर्व बाबींचा एकत्रित विचार करता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, माणिकनगर, माणिक चौक, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, औसा,

तालुका औसा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १६८६/२००८ व १६८७/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६८६ व १६८७

निर्णय दिनांक ०३-११-२००९

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, : अपिलार्थी
माणिकनगर, माणिक चौक, उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब,
तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), भूम,
तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

त्रयस्थ पक्ष :
अपील क्रमांक १६८७/२००८

१. श्री. आर. आर. जाजू
२. श्री. पी. एम. यादव
३. श्रीमती शकुंतला कोकाटे
४. श्री. दिलीप जाधव
५. श्री. अच्युत बावळे
६. श्री. नवनाथ शेवडे

**निर्णय**

**<u>अपील क्रमांक १६८६/२००८</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जाच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाची जन माहिती अधिकारी यांनी अंमलबजावणी न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असेही नमूद केले आहे की, त्यांनी माहितीपोटीचे भरलेले शुल्क माहिती अधिका-याने त्यांना परत केले. परंतु त्यांना माहिती न पुरविल्यामुळे त्यांना विचाराधीन अपील आयोगाकडे करणे भाग पडले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे केरोसीन नियतन व कुपन व धान्य संबंधात काही माहिती एकूण पाच मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी २००७ ते २००८ असा असून अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कळंब तालुका केरोसीन नियतन (प्रपत्र अ), मार्च २००७, जुलै ०७, डिसेंबर ०७, मे ०८ व जून ०८ च्या प्रती केरोसीन नियतन ज्या तारखेला प्रसिध्द केले त्याच्या जानेवारी ०७ ते जून ०८ पर्यंतच्या तारखा, अर्धघाऊक विक्रेते दिलीप जाधव यांच्याबाबत जिल्हा पुरवठा विभागास पाठविलेल्या अहवालाची प्रत, त्यांच्या केरोसीन कोट्याबाबत व पर्यायी व्यवस्थेबाबत जिल्हा पुरवठा विभागास पाठविलेल्या अहवालाच्या वरील कालावधीच्या प्रती व संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत बोगस कुपन, बोगस शिक्के, सह्या व्दारे झालेल्या घोटाळा प्रकरणाच्या चौकशी अहवालाची प्रत व या प्रकरणातील स्वस्त धान्य दुकानदारांचे परवाने निलंबीत केलेल्या आदेशांच्या प्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील विनादिनांकाच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १३० इतके भरण्याचे सूचित केले. हे पत्र अपिलार्थीस दिनांक ०२-०८-२००८ रोजी प्राप्त झाल्याचे अभिप्राय अपिलार्थीने नमूद केले आहेत. यानंतर माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१)

च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०८-२००८ रोजी आदेश पारीत करुन अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविण्याचे व अपिलार्थीस शुल्क परत करण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्यास हरकत नाही. उर्वरित ३ मुद्दयांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून चौकशी अहवालाच्या व जिल्हा पुरवठा विभागास पाठविलेल्या अहवालाच्या प्रती मागितल्या आहेत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेला नेमका अहवाल कोणता, त्यामध्ये कोणती माहिती आहे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रथम अपील निर्णयाचे अवलोकन केले असता, त्यांना संबधित जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नसल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ४ व ५ अंशत: यामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून अहवालाच्या प्रती मागितल्या आहेत. ती माहिती उघड केल्याने जर अधिनियमातील कलम ८ (१) च्या तरतुदीस बाधा येत नसेल तर आणि ही माहिती अपिलार्थीस उघड केल्याने अधिनियमातील कलम (८) व (९) च्या तरतुदीचा कोणत्याही कारणामुळे भंग होणार असेल तर ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी ते अधिनियमातील कलम ७ प्रमाणे कार्यवाही करु शकतील.

अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अशा प्रकारे दिली नसेल तर ती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आता आदेशित करण्यात येत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न पुरवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावा-बद्दल जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती-तील वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना, या प्रकरणी, त्यांना आवश्यक वाटल्यास, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अपील क्रमांक १६८७/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या अपिलावरील निर्णयाची अंमलबजावणी केली गेली नसल्यामुळे व अद्यापपावेतो त्यांना

माहिती दिली गेली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील केरोसीन विक्रेत्यांच्या संदर्भात सन २००३ ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण आठ मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती वगळता त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस पुरविण्याकरिता लागणारे शुल्क कळविले. तथापि हा निर्णय मान्य नसल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०९-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहित पुरविली किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अभावी व संबधितांच्या आज रोजीच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी

केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, यापूर्वी जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे माहिती पुरविली नसल्यास, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, माणिकनगर, माणिक चौक, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६९३
निर्णय दिनांक ०३/११/२००९

१ श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नांदेड : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नांदेड

**निर्णय**

श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०३.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०६.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १०० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅड रोड, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, देवगीरी विश्रामगृह, नांदेड
३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, देवगीरी विश्रामगृह, नांदेड

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७०७
निर्णय दिनांक ०४/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.०५.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १३.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ६० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅंड रोड, नांदेड.
२) जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड.
३) जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७०८
निर्णय दिनांक ०४/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>लागवड अधिकारी,<br>सामाजिक वनीकरण विभाग, किनवट तालुका<br>सामाजिक वनीकरण कार्यालय, किनवट, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक,<br>सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड | | |

**निर्णय**

श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ११.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १३.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ६० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅड रोड, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, किनवट तालुका सामाजिक वनीकरण कार्यालय, किनवट, ता.किनवट, जि.नांदेड.
३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८२३
निर्णय दिनांक ०४/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. जिजाबराव निळकंठ पाटील,<br>रा.वरणगांव, ता.भुसावळ, जि.जळगांव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>व्यवस्थापक,<br>दि ऑर्डनन्स फॅक्टरी एप्लॉईज को-ऑप क्रेडिट<br>सोसायटी लि., वरणगांव,ता.भुसावळ, जि.जळगांव | : | प्रतिवादी |
| १ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक,<br>सहकारी संस्था, भुसावळ, जि.जळगांव | : | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १०.०५.२००६ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक १४.११.२००५ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, दि ऑर्डनन्स फॅक्टरी एप्लॉईज को-ऑप क्रेडिट सोसायटी लि. यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था, भुसावळ यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक ३१.०१.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सहायक निबंधक, सहकारी संस्था, भुसावळ यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २८२३ /०७ खारीज करण्यात येत आहे.

**( वि. बा. बोरगे )**

**औरंगाबाद**

**दिनांक : ०४-११-२००९**

**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जिजाबराव निळकंठ पाटील, ति.स. २७८३ / इ.इ.ऑ.नि., वरणगांव, ता.भुसावळ, जि.जळगांव

२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, दि ऑर्डनन्स फॅक्टरी एम्प्लॉईज को-ऑप. सोसायटी लि., वरणगांव, ता.भुसावळ, जि.जळगांव

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, भुसावळ, जि.जळगांव.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२८७

निर्णय दिनांक ०४-११-२००९

१ श्री. राऊतराव रामराव लालुजी, : अपिलार्थी
४३, " पितृछाया ", लालबहादूर शास्त्रीनगर, (भाग्यनगर जवळ), नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सचिव, नांदेड एज्युकेशन सोसायटी, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अध्यक्ष, नांदेड एज्युकेशन सोसायटी, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना बाजू मांडण्याची संधी दिली नसल्याने व व्यापक जनहित साध्य करण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या

अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली व त्यांना आवश्यक असलेल्या प्रतीच्या संदर्भात आवश्यक त्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयाकडे करण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी हजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दिनांक ०३-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर संबंधित संस्थेच्या अध्यक्षांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, अध्यक्ष, नांदेड एज्युकेशन सोसायटी, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अध्यक्ष, नांदेड एज्युकेशन सोसायटी, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०३-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राऊतराव रामराव लालुजी, ४३, " पितृछाया ", लालबहादूर शास्त्रीनगर, (भाग्यनगर जवळ), नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सचिव, नांदेड एज्युकेशन सोसायटी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, नांदेड एज्युकेशन सोसायटी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६९६

निर्णय दिनांक ०४-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. शेख हमीद पिर मोहंम्मद,<br>रा. शरीफ कॉलनी, कटकटगेट, औरंगाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद | : प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्य अग्निशमन अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीच्या आत माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०८-०४-२००८ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणती कार्यवाही केली, याची माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक २९-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीच्या दिनांक ०८-०४-२००८ रोजीच्या अर्जावर त्यांनी केलेली कार्यवाही अपिलार्थीस कळविली आहे. अपिलार्थीने ज्या अनधिकृत बांधकामाबाबत त्यांच्याकडे तक्रार केली होती त्या बांधकामाबाबत नगर रचना विभाग आणि मालमत्ता विभाग यांच्याकडे कार्यवाही प्रलंबीत आहे. नगर रचना विभाग व मालमत्ता विभागास त्यांनी अपिलार्थीच्या अर्जावर कार्यवाही करण्यासाठी दिनांक ०५-११-२००८ रोजीच्या स्मरण पत्राद्वारे सूचित केले होते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मालकीच्या जमिनीवर (सर्वे नंबर ५४ मधील सिटी सर्वे नंबर ११३१५ या भूखंडावर) काही अनधिकृत बांधकाम होत असल्याचे त्यांना आढळून आल्यावरुन त्यांनी हे बांधकाम हटविण्याबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे तक्रार केली होती व हे

बांधकाम बंद करण्याची विनंती जन माहिती अधिकारी यांना केली होती. अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०६-२००८ रोजी प्रथम अर्ज केला त्यावेळी त्यांच्याकडून कोणतीही कार्यवाही अपिलार्थीच्या तक्रार अर्जावर केली गेली नव्हती, त्यामुळे अपिलार्थीच्या तक्रार अर्जावर कोणतीही कार्यवाही झाली नाही, असे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कळविण्यासाठी हरकत होती, असे आयोगास वाटत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. "व्यक्तिशः" माहितीची मागणी केल्यानंतर आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते, त्यामुळे या प्रकरणी त्यांनी हे उत्तरदायित्व योग्य प्रकारे पार पाडले आहे किंवा कसे हे अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या त्यांच्या अर्जासंबंधातील कार्यवाही म्हणजे, अर्जदाराचा अर्ज प्राप्त झाल्यापासून अर्जातील विषयासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी संबंधित प्राधिकरणाकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या विषयावर त्यांच्याकडे अभिलेख्यांमधील टिपणीच्या प्रती, अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास देणे, ही होय. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०३-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाच्या संदर्भात, त्यांनी वेगवेगळ्या प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या व या विषयाशी संबंधित त्यांच्या अभिलेख्यावरील टिपण्याच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली वर स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत अपिलार्थीस व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी याच कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी पूर्वनियोजित वेळी त्यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून माहिती हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख हमीद पिर मोहंम्मद, रा. शरीफ कॉलनी, कटकटगेट, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य अग्निशमन अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६९७

निर्णय दिनांक ०४-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सिध्दार्थ आनंदराव तेंझाड,<br>रा. बाभुळगांव (बु.), तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>जिल्हा परिषद , औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात | : जन माहिती अधिकारी | : | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), जिल्हा परिषद, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला नाही व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ च्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही मुद्दयावरील माहिती त्यांना

अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. ही माहिती त्यांना प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०६-२००८ रोजीचा मूळ अर्ज, जो कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक ०९-०७-२००८ रोजी प्राप्त झाला त्याव्दारे " मौजे बाभुळगांव, तालूका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद येथील भारत निर्माण योजनेअंतर्गत होणा-या कामाच्या संदर्भात" एकूण ९ मुद्दयाव्दारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - विहिरीचे आतापर्यंत किती काम पूर्ण झाले, त्याकरीता आतापर्यंत किती खर्च झालेला आहे, पाईपलाईनसाठी वापरलेले पाईप कोणत्या कंपनीचे आहेत, पाण्याच्या टाकीसाठी कोणत्या प्रकारचे / ग्रेडचे स्टील वापरलेले आहे, सदरील कामासाठी दुसरा हप्ता दिलेला आहे काय, दिलेला असल्यास तो किती रकमेचा व कोणत्या तारखेला दिला आहे, लोकवर्गणीच्या पावतीबुकच्या प्रती, या योजनेसंदर्भात झालेल्या ग्रामसभेची प्रोसिडिंगची नक्कल व सिमेंट कोणत्या कंपनीचे वापरले त्यासाठी झालेला खर्च, वरील सर्व मटेरियलचे व झालेल्या कामाच्या बिलाच्या प्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक ०२-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०९-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती सर्व संबंधीतांकडून प्राप्त करुन घेऊन एकत्रितपणे त्यांना १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्याचे कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ ची माहिती कार्यकारी अभियंता यांनी पुरविली. परंतु उर्वरित

मुद्दयांची माहिती न पुरविल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ वगळता उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती त्यांना हवी असल्याचे स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ९ मधील मटेरियलचे बिल हा भाग वगळता उर्वरित सर्व माहिती त्यांनी त्यांच्याबरोबर आणली आहे. ते ती माहिती अपिलार्थीस विनामूल्य व त्वरीत देण्यास तयार आहेत. कामाच्या मटेरियलच्या बिलाबाबत कार्यकारी अभियंता यांनी असे स्पष्ट केले की, भारत निर्माण योजनेतील ग्रामीण पाणी पूरवठा योजनेअंतर्गत बांधकामासाठी लागणारे सर्व साहित्य खरेदी हे काम पाणी पुरवठा समितीमार्फत करत असतात व खरेदीची सर्व बिले पाणी पुरवठा समितीकडे उपलब्ध असतात. ही माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. तथापि पाणी पुरवठा समितीकडून ही माहिती प्राप्त करुन घेऊन नंतर अपिलार्थीस देण्यासाठी अंदाजे ३० दिवस इतका कालावधी पुरेल.

वरील घटनाक्रम दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने भारत निर्माण योजनेअंतर्गत मौजे बाभूळगांव, तालुका वैजापूर येथे करण्यात येत असलेल्या पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात एकूण ९ मुद्यावर माहिती मागविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सर्वसाधारणपणे सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त होण्यामध्ये कोणतीही अडचण नव्हती. परंतु अपिलार्थीने या योजनेच्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे ही माहिती मागितली आहे. या योजनेचे स्वरुप पाहता ही योजना लोकवर्गणी व शासनाचे आर्थिक अनुदान अशा दोन स्त्रोत्रामधून प्राप्त होणा-या निधीव्दारे, संबंधित ग्रामस्थांनी स्थापन केलेल्या ग्रामीण पाणीपुरवठा समितीव्दारे

पार पाडावयाची असते. ही समिती जिल्हा परिषदेकडून आर्थिक सहाय्य व तांत्रिक मार्गदर्शन घेत असते. या योजनेसंदर्भात अपिलार्थीने ज्या कामांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना माहिती मागितली आहे, अशा प्रकारची माहिती जिल्हा परिषदेच्या कोणत्याही कार्यालयात मूळात सहज उपलब्ध असू शकत नाही. या योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात उपस्थित कार्यकारी अभियंता यांनी आयोगास असे अवगत केले की, या योजनासंबंधात पाणी पुरवठा समितीने सादर केलेले बिल आणि मोजमाप पूस्तिका ही संबंधीत समितीकडे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत ती तपासून परत पाठविली जाते आणि या बिलाची रक्कम मुख्य कार्यकारी अधिका-यांकडून पाणी पुरवठा समितीला दिली जाते. ग्रामीण पाणी पुरवठा समितीची रचना बघितल्यास या समितीचे अध्यक्ष व सचिवासह सर्व सदस्य हे खाजगी व्यक्ती असल्याने ही समिती माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मधील तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण होऊ शकत नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी यांना समितीवर अवलंबून राहावे लागले. अशा परिस्थितीत तोडगा काढण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी, त्यांच्या कार्यक्षेत्रातील अशा स्वरुपाच्या पाणी पुरवठा आणि इतर योजनेच्या संदर्भातील माहितीच्या व्यवस्थापनाकरिता माहिती अधिकारी, सहायक माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कर्मचा-यांची / अधिका-यांची नेमणूक लवकरात लवकर करावी, कारण आयोगाकडे अशा प्रकारच्या पाणी पुरवठ्याच्या माहितीबाबत वेळोवेळी अपिले प्राप्त होत असतात. तसेच या योजनेतील पारदर्शकता स्पष्ट होण्याच्या दृष्टीने देखील या पाणीपुरवठा समित्या कशा प्रकारे काम करत आहेत याची माहिती संबंधित जिल्हा परिषदेकडे, शासकीय निधीचे विश्वस्त या नात्याने त्यांच्याकडे उपलब्ध असणे आयोगास गरजेचे वाटते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ९ मधील " मटेरियलचे बील " या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत

विनामूल्य पुरविण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ९ मधील " मटेरियलचे बील " या मुद्दयावरील सर्व माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सिध्दार्थ आनंदराव तेंझाड, रा. बाभुळगांव (बु.), तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६९८

निर्णय दिनांक ०४-११-२००९

१ श्री. जगन्नाथ सोपानराव तांबे, : अपिलार्थी
मु. पो. नागमठाण, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नागमठाण,
तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर,
तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०६-२००८ रोजी माहितीसाठीचा अर्ज दिला असून त्यांना विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. मात्र दिनांक ०५-०९-२००८ रोजी संबंधित ग्रामसेवक यांनी त्यांना सुविधा कामाचे अंदाजपत्रकाच्या व भारत निर्माण योजनेअंतर्गत पाणीपुरवठा समितीचा ठराव एवढीच माहिती अद्यापपावेतो दिली आहे व उर्वरित माहिती नंतर देतो

म्हणून सांगूनही अद्यापपावेतो अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व त्यांच्या मूळ अर्जातील माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी अशी आयोगास विनंती केली आहे. त्यांनी या अपील अर्जामध्ये आयोगास असेही अवगत केले आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी उशीर लावला आहे आणि तडजोडीची भाषा करणे, माहिती न देणे व माहिती देण्यास उशीर करणे आदि तांत्रिक मुद्दे उपस्थित करुन अपिलार्थीस वेठीस धरुन त्रास दिला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे नागमठाण, तालुका वैजापूर गावातील शासकीय योजनेअंतर्गत चालू असलेल्या कामाच्या संदर्भात एकूण आठ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - बांधकामाचे नांव, अंदाजपत्रके किंमत कोणत्या योजनेतून मंजूर झाली, अंदाजपत्रकाची प्रत व निविदा, काम करणा-याचे नांव, मंजूर निधी, कामाची सद्यःस्थिती, कामावर झालेला खर्च व पुढील मंजूर असलेली कामे परंतु सुरु न झालेली कामे - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती दिनांक ०३-०९-२००८ रोजी पुरविल्याचे आयोगास अवगत केले. तथापि या संदर्भातील पुरावा आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितला असता ते अपिलार्थीस त्यांनी पुरविलेली माहिती आयोगास दाखवू शकले नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ०१-०९-२००८ रोजी अपिलार्थीच्या विनंतीप्रमाणे सुनावणी ठेवली होती, तथापि या सुनावणीसाठी अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने अपिलार्थीच्या अपिलासंदर्भात कोणताही निर्णय होऊ शकला नाही. यानंतर अपिलार्थीने त्यांना उद्देशून दिनांक ०३-०९-२००८ रोजी एक पत्र लिहिले असून या पत्रामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती मिळाली असल्यामुळे यासंदर्भात त्यांची काहीही तक्रार नाही असे लेखी दिले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ अपिलार्थीने त्यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक ०३-०९-२००८ रोजीच्या पत्राची प्रत आयोगास सादर केली आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांची काही तक्रार उरलेली नाही असे लिहून दिले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २३-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या त्यांच्या मूळ अर्जातील माहितीपैकी मुद्दा क्रमांक ८ वगळता उर्वरित मुद्दयांवरील माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ती माहिती अधिनियमातील कलम ७ प्रमाणे देणे अभिप्रेत आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २३-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जावर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ प्रमाणे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद

दिलेला नाही. अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०३-०९-२००८ रोजी माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले आहे. तथापि यासंदर्भात अपिलार्थीस त्यांनी कोणती माहिती पुरविली हे त्यांना आयोगास स्पष्ट करता आले नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने दिनांक २०-०९-२००८ रोजी विचाराधीन अपील सादर केले आहे, त्यामुळे आवश्यक त्या सबळ पुराव्याअभावी जन माहिती अधिकारी यांचा, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-०९-२००८ रोजी संपूर्ण माहिती पुरविली आहे असा युक्तिवाद, आयोग मान्य करत नाही. कारण जर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिली असती तर त्यांना यानंतर उपरोक्त व्दितीय अपील करण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसते. दिनांक ०३-०९-२००८ रोजी अपिलार्थीस एका मुद्दयांवरील माहिती देऊन उर्वरित मुद्यांवरील माहिती नंतर देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आश्वासीत केले, परंतु अपिलार्थीस त्यानंतर कोणतीही माहिती दिली नाही, असे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जात म्हटले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कोणती माहिती दिली हे संबंधित जन माहिती अधिकारी आयोगासमोर सादर करु शकत नाहीत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मोघम माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अद्यापपर्यंत सुरु न झालेल्या कामाची माहिती म्हणजे निश्चित कोणत्या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस अपेक्षित आहे याचा बोध यावरुन होत नाही, त्यामुळे या मुद्दावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अशा परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक ८ वगळता उर्वरित सर्व मुद्दयांवरील संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना

सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्याप्रमाणे जरी त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-०९-२००८ रोजी माहिती पुरविली आहे, हा त्यांचा मुद्दा ग्राह्य धरला तरी, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही हे सत्य शेवटी उरत आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. व्ही. के. सगन, सध्या ग्रामसेवक, ग्रामपंचायत म्हस्की, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद येथे कार्यरत ) यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक ८ वगळता उर्वरित मुद्दयावरील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी (श्री. व्ही. के. सगन, सध्या ग्रामसेवक, ग्रामपंचायत म्हस्की, तालुका वैजापूर जिल्हा औरंगाबाद येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जगन्नाथ सोपानराव तांबे, मु. पो. नागमठाण, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नागमठाण, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६९९

निर्णय दिनांक ०४-११-२००९

१ श्री. गोरखनाथ रामनाथ जावळे, : अपिलार्थी
मु. पो. गिरणीचा मळा, गंगापूर, तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, गंगापूर,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, गंगापूर,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रकल्प अधिकारी, नगर परिषद कार्यालय, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. रामनाथ माधवराव जावळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्याची विनंती आयोगास केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन १९९० ते दि.२६-०५-२००८ या कालावधी-मधील गंगापूर नगरपरिषदेमधील विविध कार्यालयीन कामकाजासंदर्भात एकूण १२ मुद्दयाव्दारे व ८ उप मुद्दयासह काही माहिती मागितली आहे. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या-कडून टपालाव्दारे अपेक्षिली होती. तसेच अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे व यासंदर्भात त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत जोडल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासोबत सादर केलेले दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र हे सन १९९७-९८ च्या सर्वेक्षणानुसार असल्याने ते अवैध असल्याचे कळवून दिनांक १५-०४-२००८ ला मान्यता दिलेल्या नवीन प्रमाणपत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीकडे मागितली व जर हे प्रमाणपत्र त्यांच्याकडे उपलब्ध नसेल तर त्यांनी मागणी केलेल्या माहितीचे शुल्क रुपये ६५,२२४ इतके नगर परिषद, गंगापूर यांच्याकडे भरणा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देता येणार नाही असा निर्णय दिनांक २४-०७-२००८ रोजी दिला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि त्रयस्थ पक्ष गैरहजर आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २३-०६-२००८ रोजीचे पत्र विलंबाने प्राप्त झाले असून त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी तीस दिवसाच्या आत प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास त्यांनी दिनांक २४-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे म्हणजे अधिनियमातील कलम ७ मधील विहित मुदतीत माहिती दिली आहे. नगरपरिषदेचे दिनांक २४-०६-२००८ रोजीचे पत्र घेऊन नगरपरिषदेचा शिपाई अपिलार्थीच्या घरी दोन वेळा गेला असता अपिलार्थी हे त्यांच्या घरी उपलब्ध झाले नाहीत. अंतीमतः अपिलार्थीस हे पत्र त्यांच्या शिपायामार्फत तिस-यांदा पाठविले त्यावेळी त्यांनी अपिलार्थीस ते दिनांक २४-०७-२००८ रोजी हस्तांतरीत केले. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असून अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या अंदाजे ३२००० इतकी असून या माहितीच्या झेरॉक्स प्रती काढण्यासाठी त्यांच्या नगरपरिषदेकडे तेवढे अनुदान नाही. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांच्या वडिलांचे दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र रद्द केल्यासंदर्भात काही माहिती मागितली आहे. याबाबत त्यांच्या वडिलाचे नांव आता दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीमध्ये समाविष्ट करण्याचा प्रस्ताव त्यांनी शासनाकडे सादर केला असून अद्याप शासनाचे याबाबत आदेश प्राप्त होणे बाकी आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या म्हणण्याप्रमाणे जरी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला

तरीही, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे टपालाव्दारे माहिती मागितली होती. त्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती टपालाव्दारे उपलब्ध करुन देणे उचित ठरले असते. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी याप्रमाणे कार्यवाही न करता ते अपिलार्थीची वाट पाहत राहिले व अंतीमतः अपिलार्थीच्या घरातील व्यक्तीस हे पत्र त्यांनी त्यांच्या कार्यालयातील शिपायामार्फत दिनांक २४-०७-२००८ रोजी हस्तांतरित केले.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जावर अशा प्रकारे जन माहिती अधिकारी यांनी चुकीच्या माध्यमाव्दारे प्रतिसाद दिलेला आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय होत आहे. अपिलार्थीस झेरॉक्स प्रतीच्या स्वरुपात ही माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पुरेसे अनुदान जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही, हे पाहता अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या व जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असलेल्या संपूर्ण माहितीची हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून तपासणी करावी व ज्या माहितीच्या प्रती अपिलार्थीस हव्या आहेत त्या जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच त्यांना याच मुदतीत विनामूल्य द्याव्यात. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत तपासणीकरिता विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी आणि या माहितीमधील अपिलार्थीस हव्या असलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती त्यांना याच कालावधीमध्ये विनामूल्य पुरवाव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गोरखनाथ रामनाथ जावळे, मु. पो. गिरणीचा मळा, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, नगर परिषद कार्यालय, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७००

निर्णय दिनांक ०४-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. अर्जून नागोराव सावंत,<br>मु. पो. कुप्पा, तालुका वडवणी, जिल्हा बीड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, वडवणी, तालुका वडवणी,<br>जिल्हा बीड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय कृषि अधिकारी, माजलगांव, तालुका<br>माजलगांव, जिल्हा बीड | : प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड |
| | जन अपिलीय अधिकारी | : तालुका कृषि अधिकारी, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिका-यांना अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती पुरविण्याचे किंवा समक्ष दाखविण्याचे लेखी कळवूनही माहिती अधिका-याने या आदेशाची दखल घेतली नाही, त्यामुळे

अपिलार्थीस माहिती नाकारल्याचे स्पष्ट होत असल्याने त्यांना दंड करावा व शिस्तभंगाची कार्यवाही करुन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील काही दस्तऐवज पाहणी करण्याची विनंती केली होती. अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील रोख किर्द, धनादेश नोंदवही, विविध खरेदीच्या संचिका, दैनंदिन कामाची नोंदवही, नाला बंडींग, शेततळे, मजुरांचे हजेरीपट, कामाचे अंदाजपत्रक, शेती शाळेवर झालेला खर्च, इत्यादी रेकॉड तपासणीकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. अपिलार्थीने अशा प्रकारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील सन २००५ ते २००८ या कालावधीतील दस्तऐवज तपासणी करण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली होती तसेच ही माहिती त्यांना व्यक्तिशः अपेक्षित असल्याचे त्यांनी या अर्जामध्ये नमूद केले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेले संबंधित अभिलेखे त्यांच्याकडे आजही उपलब्ध आहेत. परंतु अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही हे अभिलेखे तपासणीसाठी कधीही उपस्थित झाले नाहीत, त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती तपासणीकरिता उपलब्ध झाली नाही. अपिलार्थीस त्यांनी दिनांक २६-१०-२००९ रोजी खास दुतामार्फत पत्र पाठवून माहिती पाहणी करण्याची विनंती केली असता या पत्राचा त्यांनी स्वीकार केला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील दप्तर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार पाहणी करण्यासाठीची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली होती. अपिलार्थीस ही तपासणी व्यक्तिशः करावयाची होती असा त्यांच्या मूळ अर्जामध्ये उल्लेख आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्याने व विशेषतः त्यांनी ती व्यक्तिशः मागितली असल्याने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पूर्वनियोजित वेळी अभिलेखे तपासणीसाठी उपस्थित राहणे व जन माहिती अधिकारी यांच्याकडून हे अभिलेखे तपासणीसाठी हस्तगत करुन घेण्याची जबाबदारी पूर्णतः अपिलार्थीची होती, परंतु अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये ते या अभिलेख्याची तपासणी करण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित झाले किंवा कसे आणि उपस्थित झाले असल्यास कोणत्या तारखेला ते उपस्थित झाले यासंदर्भातील कोणतीही कागदपत्रे अथवा तत्सम सबळ पुरावा आयोगास सादर केलेला नाही किंवा यासंदर्भात त्यांचे कोणतेही लेखी स्पष्टीकरण दिलेले नाही. एवढेच नव्हेतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खास दूतामार्फत अभिलेखे तपासणी करण्यासंदर्भात पत्र दिले असताना या पत्राचा त्यांनी स्विकार केला

नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जात त्यांनी संदर्भीत केलेली तपासणी त्यांना खरोखरीच करावयाची आहे किंवा कसे याचा आयोगास बोध होत नाही. अशा प्रकारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध न होण्यासाठी अपिलार्थी हे स्वतः जबाबदार असल्याचे दिसून येत आहे, त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अर्जून नागोराव सावंत, मु. पो. कुप्पा, तालुका वडवणी, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७०१

निर्णय दिनांक ०४-११-२००९

१ श्री. वसंत संपतराव मुंडे, : अपिलार्थी
गौरीकुंज, मार्केट, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अधीक्षक अभियंता,
कार्यालय सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता (मार्ग प्रकल्प विभाग),
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिल्याने आणि मूळ माहिती दडविल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, कार्यालय सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित पोलीस बॅरेक्स बांधकामासंदर्भात काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३६५ इतके भरण्याचे सूचित केले. तथापि या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०६-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने रुपये २८० इतक्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०६-२००८ रोजी करुन आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेतली. तथापि ही माहिती चुकीची आहे असे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०९-०६-२००८ रोजी आवश्यक ती माहिती सशुल्क पुरविली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे कळविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती

अधिकारी यांनी त्यांच्या मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांना का उपलब्ध करुन देण्यात आली नाही याचे समर्थन करण्यासाठी आज रोजी जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे मंजूर गजाचे आर. सी. सी. डिझाईनची माहिती जी टेंडरला जोडलेली आहे ही माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली आहे. तथापि अशा प्रकारची कोणतीही माहिती टेंडरला जोडली नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले. यावरुन असे दिसून येते की, ही माहिती वस्तुस्थितीशी सुसंगत असल्याची शक्यता, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलीत पध्दतीचे अवलोकन करता, नाकारता येत नाही. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता फक्त त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती द्यावयाची राहिली असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना ही माहिती अपिलर्थीस आता विनामूल्य पुरवावी लागेल, तसेच अपिलार्थीच्या दिनांक १७-०३-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनंक ०५-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिलेल्या प्रतिसादाचे अवलोकन करता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०५-०४-२००८ रोजीच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या पत्रामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा आवश्यक तो तपशील यामध्ये दिलेला नाही. अशा प्रकारचा तपशील देणे जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे अनिवार्य आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ०५-०४-२००८ रोजी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले पत्र अवैध असल्याचे सिध्द होत आहे. अशा प्रकारे अपिलार्थीस अवैध प्रतिसाद दिल्याने जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीकडून त्यांना पुरविण्यात आलेल्या माहितीपोटीचे जन माहिती अधिकारी यांनी स्वीकृत केलेले शुल्क त्यांना परत करावे लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

<u>**आदेश**</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले संपूर्ण शुल्क त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थीस परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वसंत संपतराव मुंडे, गौरीकुंज, मार्केट, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (मार्ग प्रकल्प विभाग), सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १७०२/२००८ व १७०३/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७०२ व १७०३

निर्णय दिनांक ०४-११-२००९

१ श्री. रामदास रंगनाथ सोले, : अपिलार्थी
मु. पोखरी, पो. क-हेवडगांव, तालुका आष्टी, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय महसूल आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तहसिलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०९-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी या दोनही अपील अर्जाशी संबंधित माहितीसाठीच्या मूळ अर्जातील त्यांनी मागितलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून दिलेली नाही, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत. या प्रकरणी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम

अपिले केली असता त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिलेली नाही. या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या दोनही अपील प्रकरणात अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०४-२००८ रोजीच्या दोन वेगवेगळ्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील माहिती मागितली होती. अपील क्रमांक १७०२/२००८ शी संबंधित मूळ अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे वसूली दाखला क्रमांक ७८६०/२००६ वरील नमूद केलेल्या वसुली दाखल्याप्रमाणे १५ महिन्यात काय कार्यवाही केली ? केली नसल्यास का केली नाही व आपण दप्तर दिरंगाई कायदा २००६ चा भंग केला आहे असे वाटत नाही का ? ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाव्दारे मागितली होती. त्यांच्या अपील क्रमांक १७०३/२००८ शी संबंधित प्रथम अर्जाव्दारे त्यांनी दिनांक २२-०४-२००८ रोजी अर्ज करेपर्यंत त्यांच्या दिनांक २६-०३-२००८ च्या अर्जाबाबत जन माहिती अधिकारी यांना केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. या अर्जामध्ये त्यांनी स्वतःच्या ग्रॅच्युईटीविषयी जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही माहिती मागितल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीच्या या दोनही प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०५-२००८ रोजीच्या एकाच पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४९ इतके शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले. तथापि अशा प्रकारच्या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार विभागीय आयुक्त (महसूल), नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडे दोन स्वतंत्र प्रथम अपिले केली. परंतु संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जांवर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे दोन स्वतंत्र व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०४-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी या दोनही अपील प्रकरणांशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या दोनही अर्जामध्ये त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे. अपिलार्थीस ही माहिती त्या सशुल्क देण्यास तयार आहेत. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, या दोनही प्रकरणी अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २१-०५-२००८ रोजी केलेले कथित प्रथम अपील अर्ज निवासी उपजिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या कार्यालयास प्राप्त झाले नाहीत, त्यामुळे त्यांना अपिलार्थी यांच्या अपील अर्जावर कोणतेही आदेश देता आले नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, या दोनही प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०७-०५-२००८ रोजीच्या एकाच पत्राव्दारे आवश्यक तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४९ इतके चलनाव्दारे भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले होते. परंतु अपिलार्थीने या शुल्काचा भरणा मूळात कधीही केला नसल्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही. तसेच अपिलार्थीने जरी त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये निवासी उपजिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडे दोन स्वतंत्र व्दितीय अपिले दाखल केल्याचे नमूद केले असले तरीही ही अपिले प्रत्यक्षात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पोहोचली किंवा कसे ते आवश्यक त्या कागदपत्राच्या पुराव्याअभावी कळण्यास मार्ग नाही. यासंदर्भात कोणताही पुरावा अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रामध्ये समाविष्ट नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती अर्जदारास

उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करणे हे जसे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे तसेच जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास आवश्यक असलेली माहिती पुरविण्यासंदर्भात त्यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे या शुल्काचा भरणा करणे हे अर्जदाराचे कर्तव्य आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे हे कर्तव्य या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर पार न पाडल्यामुळे त्यांना माहिती अधिकाऱ्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न होण्यासाठी अपिलार्थी हे स्वतःच जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक १७०२/२००८ व १७०३/२००८ फेटाळण्यात येत आहेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामदास रंगनाथ सोले, मु. पोखरी, पो. क-हेवडगांव, तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७०४

निर्णय दिनांक ०४-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. शिवाजी नारायणराव फड,<br>मु. पो. श्रीनगर, विठ्ठल मंदिराच्या पाठीमागे, नांदेड रोड,<br>अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा नांदेड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा प्राचार्य, स्वामी विवेकानंद उच्च माध्यमिक विद्यालय,<br>जानवळ, तालुका चाकूर, जिल्हा लातूर | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती न दिल्याने त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करुन अपिलार्थीस ती माहिती विनामूल्य पुरविण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण चार मुद्दयावर स्वतःच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अपिलार्थीच्या नावे जून १९९२ ते जानेवारी २००८

पर्यंत माहिती अधिका-यांच्या कार्यालयातील संस्था सचिव आदेशाच्या छायांकीत प्रती, १९९२ पासून ते प्रथम अर्ज करेपर्यंत अपिलर्थीच्या शैक्षणिक सेवेसंदर्भात अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात कागदपत्रे जमा केली नाहीत काय याचा लेखी खुलासा, दिनांक २८-०१-२००८ रोजी अपिलार्थीस त्यांच्या मागण्याबाबत १५ दिवसात कार्यवाही करतो असे लेखी देऊन मुदत संपल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही का केली नाही याचा लेखी खुलासा व १९९२ ते २००० पर्यंतच्या उच्च माध्यमिक साठी भरलेल्या जागांच्या जाहिरातीची छायांकीत प्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे संदिग्ध स्वरुपात प्रतिसाद देऊन अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०४-२००८ रोजी सुनावणी घेऊन आदेश पारीत केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी केली व ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या नियुक्तीच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. परंतु त्यांच्या संस्थेमध्ये नियुक्तीचे आदेश संस्थेचे सचिव

काढत असल्याने अपिलार्थीच्या अर्जातील ही संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे. त्यांनी ही माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न केला होता परंतु त्यांना यश आले नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, प्रत्यक्षात शिक्षकाच्या नेमणुकीचे आदेश शालेय शिक्षण समितीचे सचिव या नात्याने प्राचार्याच्या सहीने उपलब्ध करुन दिले जातात त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही प्राचार्याकडे उपलब्ध असावयास हवी.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची कारणे व खुलासा अपेक्षित केला आहे. अशा प्रकारची माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची बाब आहे. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही, मात्र अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे जरी या संस्थेच्या शिक्षकांच्या नेमणुकीसंदर्भातील सर्व कागदपत्रे संस्थेकडे असली तरी नियंत्रणाधिकारी या नात्याने विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन ती जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी संदिग्ध प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर संबंधित शिक्षण संस्थेकडे उपलब्ध होती तर त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज संबंधित संस्थेकडे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे पाठवावयास हवा होता. तथापि अशा प्रकारची कोणतीही आवश्यक ती कार्यवाही त्यांनी केली नाही व केवळ संस्था माहिती देत नाही म्हणून

अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवले आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव सिध्द केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब अध्यक्ष, जय हनुमान ज्ञान प्रसारक मंडळ मोघा मार्फत स्वामी विवेकानंद उच्च माध्यमिक विद्यालय, जानवळ, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांनी या प्रकरणी अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ४ शी संबंधित माहिती, संबंधित शिक्षण संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन ती जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

३. अध्यक्ष, जय हनुमान ज्ञान प्रसारक मंडळ मोघा मार्फत स्वामी विवेकानंद उच्च माध्यमिक विद्यालय, जानवळ, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शिवाजी नारायणराव फड, मु. पो. श्रीनगर, विठ्ठल मंदिराच्या पाठीमागे, नांदेड रोड, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, स्वामी विवेकानंद उच्च माध्यमिक विद्यालय, जानवळ, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अध्यक्ष, जय हनुमान ज्ञान प्रसारक मंडळ मोघा मार्फत स्वामी विवेकानंद उच्च माध्यमिक विद्यालय, जानवळ, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७०५

निर्णय दिनांक ०४-११-२००९

१ श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर, : अपिलार्थी
मु. पो. सताळा (खुर्द), तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
जिल्हा उप निबंधक कार्यालय, सहकारी संस्था, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, लातूर
विभाग, लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, लातूर
जन अपिलीय अधिकारी : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर

त्रयस्थ पक्ष : १. श्री. परांडे
२. श्री. हाके

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, सहकार खात्यातील भ्रष्टाचार निर्मुलनार्थ त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी मुदतपूर्व शासकीय खर्चाने मोफत परंतु अपूर्ण स्वरुपात उपलब्ध करुन दिली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, अपूर्ण

माहिती बुध्दीपूर्वक उपलब्ध करुन देणारे जन माहिती अधिकारी यांच्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी विनाविलंब कार्यवाही करण्याची व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे संबंधितांवर कठोर कार्यवाही करुन अपिलार्थीस झालेल्या आर्थिक व मानसिक त्रासाची नुकसानभरपाई मिळवून देण्याची व्यवस्था करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रमाणित लेखा परीक्षण करुन घेण्यासाठी वाटप संस्थाची यादी व लेखा परीक्षण फी मंजुरीच्या आदेशाची दिनांक ३०-०३-२००७ ते १६-०१-२००८ पर्यंत या कालावधीशी संबंधित सत्यप्रतीत माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०६-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत पूर्ण माहिती स्वखर्चाने देण्याचे माहिती अधिका-यास सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्याच दिवशी पोस्टाने अपिलार्थीस माहिती पुरविली. परंतु अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष गैरहजर आणि जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पूर्णतः पुरविली आहे. मूळात त्यांना दिनांक

३०-०३-२००७ ते १६-०१-२००८ या कालावधीमधील माहिती पुरवावयाची होती. या कालावधीमध्ये लेखा परीक्षक श्री. परांडे आणि श्री. हाके यांनी त्यांच्या कार्यालयाकडे लेखा परीक्षणाची बिले सादर केली होती आणि ती मंजूर झाली होती त्याच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस पुरविल्या आहेत. या दोनही लेखा परीक्षकाकडे एकूण १४ संस्थांचे लेखा परीक्षण करावयाचे काम दिले होते. तथापि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबधित कालावधीमध्ये फक्त सहा संस्थेच्या लेखा परीक्षणाचे काम पूर्ण झाले असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस फक्त सहा संस्थांच्या संदर्भातील माहिती पुरविली. उर्वरित आठ संस्थांच्या फी नोंदणीचे आदेश, अपिलार्थीने ज्या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती त्या कालावधीमध्ये त्यांनी दिले नसल्यामुळे ती माहिती अपिलार्थीस देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्रयस्थ पक्ष श्री. पलांडे आणि श्री. हाके यांच्याकडे १४ सहकारी संस्थांच्या लेखा परीक्षणाचे काम सोपविले असल्याचे माहिती दिली. परंतु परीक्षण फी नोंदण्याचे फक्त सहा लेखा परीक्षण आदेशच त्यांना या कालावधीमध्ये प्राप्त झाले त्यामुळे अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे आणि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हेतूतः अपूर्ण माहिती दिली आहे असा अपिलार्थीचा समज झाला आहे. या मुद्दयावर जन अपिलीय अधिकारी यांनी वरीलप्रमाणे केलेला युक्तिवाद लक्षात घेता असे आढळून येत आहे की, जर श्री. पलांडे आणि हाके यांना एकूण १४ संस्थांचे लेखा परीक्षणाचे आदेश दिले होते तरीही दिनांक ३०-०३-२००७ ते दिनांक १६-१-२००८ या कालावधीमध्ये अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जामध्ये नमूद केलेल्या कालावधीमध्ये सहाच संस्थांचे लेखा परीक्षण पूर्ण झाले होते. सहकार विभागात लेखा परीक्षणाची फी अदा करण्यासंदर्भात अशी पध्दत प्रचलीत आहे की, संबंधित संस्थेचे लेखा परीक्षण पूर्ण झाल्यानंतच लेखा परीक्षणाच्या फी चे बील सक्षम प्राधिकरणाकडे मान्यतेकरिता पाठविले जाते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या कालावधीमध्ये १४ पैकी ६ संस्थेशी संबंधित लेखा परीक्षण

झाले असल्यामुळे त्रयस्थ पक्षाने केवळ सहाच संस्थांच्या परीक्षणाचे बील जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केले असल्यामुळे अपिलार्थीस फक्त सहा संस्थांच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकते. या कालावधीमध्ये उर्वरित आठ संस्थांचे परीक्षणाचे काम चालू असेलही परंतु ते पूर्ण झाले नसल्याने संबंधित लेखा परीक्षकांनी त्यांची बीले जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केली नाहीत त्यामुळे ती मंजूर करण्याचा कोणताही प्रश्न त्या कालावधीमध्ये आला नाही. ही वस्तुस्थिती पाहता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पूर्ण माहिती पुरविली असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपर्यंत कोणती माहिती येणे बाकी आहे हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत माहिती दिली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर, मु. पो. सताळा (खुर्द), तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७०६

निर्णय दिनांक ०४-११-२००९

१ श्री. रविंद्र बापुराव कारके, : अपिलार्थी

कोर्ट - बस स्थानक रोड, स. नं. ८, बीएसएनएल टॉवर

समोर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)

उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता त्यांनी अपिलार्थीस मुदतीच्या आत माहिती न दिल्यामुळे आणि माहिती देण्यासाठी वेळ लावून टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०६-२००८ रोजीचा मूळ अर्ज, जो जन माहिती अधिकारी यांना दिनांक १९-०६-२००८ रोजी प्राप्त झाला, त्याव्दारे त्यांच्या कार्यालयाकडे रोजगार हमी योजनेअंतर्गत केलेल्या गावतलाव / पाझर तलाव व असलेले गावतलाव / पाझर तलावांच्या कामाशी संबंधित मजूर हजेरीपत्रक, मोजमाप पुस्तिका व अंदाजपत्रकामधील शेड्यूल " बी " पत्रकाच्या प्रतीची, दिनांक ०१-०१-२००७ ते १०-०६-२००८ या कालावधीशी संबधित माहिती प्रत्यक्ष / व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०७-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वेळोवेळी उपस्थित राहून ही माहिती प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न केला, तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ही माहिती देण्यासाठी टाळले. जालना जिल्ह्यातील लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभागाने केलेल्या कामामध्ये सर्व संबंधितांनी मोठ्या प्रमाणावर प्रचंड भ्रष्टाचार

केला असून हा भ्रष्टाचार उघडकीस आणण्यासाठी त्यांना या माहितीची आवश्यकता आहे आणि ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी हेतूपुरस्सर टाळाटाळ करत आहेत. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काची कल्पना देणारे जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २०-०६-२००८ रोजीचे पत्र त्यांना त्यांच्या प्रथम अपिलाच्या निर्णयाच्या पाकिटामध्ये दिनांक ०४-०८-२००८ रोजी प्राप्त झाले.

अपिलार्थी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. परंतु ही माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही सकारात्मक प्रतिसाद या संपूर्ण घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर दिलेला नाही. अपिलार्थीने आज आयोगा-समोर त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिल्याचा सबळ पुरावा सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीने व्यक्तिश: माहिती मिळविण्याचे प्रयत्न करुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे व आता अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या-कडून हेतूपुरस्सर टाळले गेले असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती अधिनियमाद्वारे विहीत केलेल्या मुदतीत न पुरवून जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला

असल्याने ते अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस नि:संशयपणे पात्र ठरत आहेत. सबब सचिव (जलसंपदा) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (जलसंपदा) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रविंद्र बापुराव कारके, मुख्य संपादक सा. सुर्योदय कलियुगाचा तथा कायम निमंत्रक सदस्य भाजपा अनु. जाती. मोर्चा महा. प्रदेश मुंबई, कोर्ट - बस स्थानक रोड, स. नं. ८, बीएसएनएल टावर समोर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१००
निर्णय दिनांक ०५/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २९.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १३.१०.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २१.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ६९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅंड रोड, नांदेड.
२) जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड.
३) जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०१
निर्णय दिनांक ०५/११/२००९

१ श्री.भालेराव (भालचंद्र) भिकनराव सोनवणे, : अपिलार्थी
रा. धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षण उपसंचालक,
आयुक्त कार्यालय परिसर, नाशिक रोड, नाशिक

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद, जळगांव

प्रत्यक्षत: जन माहिती अधिकारी : उपशिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद, जळगांव

**निर्णय**

श्री. भालेराव (भालचंद्र) भिकनराव सोनवणे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १०.०९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २०.१२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १०.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ६० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. भालेराव (भालचंद्र) भिकनराव सोनवणे, तेजेश टेलर्सजवळ, टर्निंग पॉईंट क्लासेसजवळ, चितोडरोड, तुळसाबाईनगर, शाळा नं. २८ च्या मागे, धुळे.
२) जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव.
३) जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८३७
निर्णय दिनांक ०५/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>नौनिहाल उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अध्यक्ष,<br>नौनिहाल एज्युकेशन सोसायटी, नांदेड | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २६.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०९.०४.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०७.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री.मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅड रोड, नांदेड.
२) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नौनिहाल उर्दू प्राथमिक शाळा, दुलेशारहेमाननगर, मस्जीद जवळ, खडकपूरा रोड, नांदेड.
३) जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, नौनिहाल एज्युकेशन सोसायटी, सेवा बेड कुशन व गादी घर, राज कॉर्नर, चैतन्यनगर रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७११

निर्णय दिनांक ०५-११-२००९

१ श्री. रवी देवराव बनकर, : अपिलार्थी
संसारनगर, क्रांती चौक पोलीस स्टेशनजवळ,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा आयुक्त, महानगरपालिका कार्यालय,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मालमत्ता अधिकारी, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : उप आयुक्त (सिडको), औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार त्यांच्या पत्रामध्ये नमूद केलेले आदेश दिनांक २२-०५-

१९८५ ची प्रमाणित प्रत अद्यापपावेतो अपिलार्थीस प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे " मौजे मांडकी शिवारातील जमीन गट नंबर ७८ व ७९ सरकारी गायरान जमीन जिल्हाधिकारी यांच्या कोणत्या आदेशान्वये मनपास देण्यात आली त्या आदेशाची प्रत " ही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने, "मालमत्ता विभागातील उपलब्ध अभिलेख्यानुसार तपासणी केली असता सदर आदेशाची प्रत त्यांना आढळून आली नाही, परंतु सदर जागा महानगरपालिकेस शासनाचे आदेश जावक क्रमांक ८५/जमाबंदी/१/३६०, दिनांक २२-०५-८५ अन्वये हस्तांतरीत झाल्याची अभिलेखात नोंद असल्याचे" अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २२-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणता निर्णय दिला हे आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. आज रोजी सुनावणीसाठी उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात नेमके काय झाले याची कोणतीही माहिती नाही व जन अपिलीय अधिकारी आयोगासमोर अनुपस्थित आहेत. अपिलार्थीने प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १०-०९-२००८ रोजीच्या आदेशाविरुध्द आयोगाकडे व्दितीय अपील केल्याचे म्हटले आहे. परंतु दिनांक १०-०९-२००८ रोजीच्या कथित निर्णयाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये

संदर्भीत केलेले दिनांक १०-०९-२००८ रोजीचे आदेश म्हणजे उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना लिहिलेले सुनावणीचे एक पत्र असून त्यावरुन दिनांक १५-०९-२००८ रोजी उप आयुक्तांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी प्रस्तावित केली असल्याचे आढळून येते. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली कथित माहिती ही अपिलार्थीच्या या प्रकरणातील प्रथम अर्जाच्या संदर्भातील नसून ती अपिलार्थीस त्यांनी वेगळया विषयावर आणि वेगळया संदर्भात दिली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना ती अधिनियमातील कलम ७ प्रमाणे अपिलार्थीस देणे भाग आहे. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाच्या माहितीच्या संदर्भात काही माहिती दिनांक १२-०३-२००८ रोजी म्हणजे, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिली आहे. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस ज्या जागेची माहिती मागितली आहे ती जागा शासनाने दिनांक २२-०५-१९८५ च्या आदेशान्वये औरंगाबाद महानगरपालिकेस हस्तांतरीत झाल्याची नोंद असल्याचे अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली माहिती पूर्णतः देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी शासनाचे आदेश जावक क्रमांक ८५/जमाबंदी/१/३६०,

दिनांक २२-०५-८५ ची प्रमाणित प्रत अपिलार्थीस, आवश्यक वाटल्यास संबंधित यंत्रणेकडून प्राप्त करुन घेऊन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रवी देवराव बनकर, संसारनगर, क्रांती चौक पोलीस स्टेशनजवळ, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता अधिकारी, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सिडको), औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७१२

निर्णय दिनांक ०५-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. प्रतापसिंह हिरासिंह चंदेल,<br>' निशांत ', वैभवनगर, जिंतूर रोड, परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती व अपिलीय अधिकारी त्यांच्या दिनांक १६-०३-२००८ व दिनांक १८-०५-२००८ रोजीच्या अर्जाची काहीही दखल घेत नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आवश्यक असलेल्या माहितीच्या संदर्भात असा उल्लेख केला आहे की, त्यांनी दिनांक ०१-१२-२००७ रोजी त्यांची दोन मुले मंगेश व महेश आणि मुलगी नेहा यांचे राजपूत भामटा जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला होता. उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांच्याकडून या अर्जावर केल्या गेलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक आहे. अपिलार्थीने विचाराधीन अपील अर्जाव्दारे आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे " जातीचे प्रमाणपत्र निर्गमित करणे " या विषयावर " राजपूत भामटा " जातीचे प्रमाणपत्र ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी ०१-१२-२००७ पासून असा दर्शविला आहे. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती. अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडूनही कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा दिनांक १६-०३-२००८ रोजीचा मूळ अर्ज व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला दिनांक ११-०५-२००८ रोजीचा अपील अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे मूळात प्राप्त झाले नसल्यामुळे ते अपिलार्थीच्या मूळ व अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही करु शकले नाहीत. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०१-१२-२००७ रोजी केलेल्या अर्जासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस दिनांक १८-१०-२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीने आवश्यक ती कागदपत्रे व त्यांचे आजोबा शासकीय सेवेत असूनही वैधता प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर न केल्यामुळे, अपिलार्थीची त्यांना राजपूत भामटा या जातीचे प्रमाणपत्र देण्याची विनंती नाकारली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत प्रथम अर्ज व प्रथम अपील अर्ज सादर केले आहे. परंतु हे अर्ज त्यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केले असल्याचा कोणताही पुरावा जोडलेला नाही. हे पुरावे सादर करण्यासाठी व जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता अपिलार्थीने ज्या मूळ विषयाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली होती त्या विषयावर उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांनी दिनांक १८-१०-२००८ रोजी, अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज सादर केल्यानंतर, त्यांना निर्णय कळविला असल्यामुळे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली असल्याचे आढळून येत आहे. या सर्व बाबींचा एकत्रित विचार करता अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रतापसिंह हिरासिंह चंदेल, ' निशांत ', वैभवनगर, जिंतूर रोड, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), उपविभाग, परभणी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७१३

निर्णय दिनांक ०५-११-२००९

१ श्री. विजय हिरामण गायकवाड, : अपिलार्थी
रा. महात्मा फुलेनगर, गंगाखेड, तालुका गंगाखेड,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी कार्यालय, पालम,
तालुका पालम, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, पालम, तालुका पालम,
जिल्हा परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, पालम, तालुका पालम,
जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या या प्रकरणी त्यांनी दिनांक १०-०७-२००८ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राअंतर्गत पालम तालुक्यात सन २००७ ते दि. ०५-०६-२००८ पर्यंत रोजगार हमी योजनेअंतर्गत केलेल्या कामाच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - गावाचे नांव, ज्याच्या शेतात काम केली आहेत त्या शेतक-याची नांवे, गट नंबर / शेती सर्वे नंबर, काम केले त्या कामाचे नांव, कामाची मूळ रक्कम, खर्च केलेली रक्कम, शिल्लक रक्कम, काम चालू केल्याचा दिनांक, कामावरील मजुरांचे संपूर्ण पत्ते, मजुरांच्या हजेरीपत्रकाच्या प्रती, त्यांना पेमेंट केले त्या रजिस्टरच्या साक्षांकीत प्रती व मजुरांची मजुरी मागण्याबाबत साप्तहिक अहवालाची प्रत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेता या प्रकरणी अपिलार्थीस दिनांक २०-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे एका पृष्ठाची माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २०-०८-२००८ रोजी एका पृष्ठाची माहिती विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने दिनांक ०५-०६-२००८ रोजी केलेल्या मूळ माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०७-२००८ रोजी अपील केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-०८-२००८ रोजी एका पृष्ठाची माहिती पुरविली. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी उद्देशून लिहिलेल्या दिनांक २०-०८-२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी गट नंबर, सर्वे नंबर, कामाची मूळ रक्कम, काम संपल्याचा दिनांक, मजुरीचा तक्ता, त्यांच्या हजेरीपत्रकाच्या प्रती, मजुरी मागणी पत्राची प्रत या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या पत्रामध्ये कोणतीही माहिती दिली नाही. परंतु या पत्रामध्ये, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयात येऊन पाहून जाण्याचे सूचित केले होते आणि ही माहिती पाहून अपिलार्थीचे जर समाधान झाले नाही तर झेरॉक्स प्रतीचे लागणारे अनुदान मागणी करुन त्यानुसार छायांकीत प्रती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याचे अपिलार्थीस आश्वासीत केले होते. जन माहिती अधिकारी यांनी मूळात अपिलार्थीस दिनांक २०-०८-२००८ रोजी लिहिलेल्या या पत्रातील हस्ताक्षर हे अत्यंत गचाळ असल्याचे, व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देण्यासंदर्भात अधियिमातील कलम १९ (६) मध्ये विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केली नाही. हा सर्व प्रकार पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हेतूपुरस्सर माहिती देण्याचे टाळले असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे टपालाव्दारे माहिती अपेक्षिली असतांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २०-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती पाहण्यासाठी त्यांच्या कार्यालयात येण्याचे सूचित

केले. हे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे नीट अवलोकनही केले नसल्याची आयोगास शंका येत आहे. अशा प्रकारे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम कलम ७ (१) मधील विहीत मुदतीत माहिती देण्यासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. पी. डी. मुंडे (सध्या कृषि अधिकारी, कृषि चिकित्सालय, बिंदूसरा नर्सरी, व्दारा उपविभागीय कृषि अधिकारी, बीड, जिल्हा बीड) व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस. पी. सोनपीर (सध्या मंडळ कृषि अधिकारी, घाटनांदूर, व्दारा तालुका कृषि अधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड) यांनी टाळाटाळ केल्याचे नि:संशयपणे सिध्द होत असल्याने ते दोघे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. आज रोजी सुनावणीसाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. केवळ वादाच्या प्रयोजनार्थ जरी जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-०८-२००८ रोजी काही माहिती देऊ केली हे जरी ग्राह्य धरले तरी, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या प्रथम अर्जास प्रतिसाद देण्यासाठी, अनुज्ञेय कालावधी लक्षात घेता, एकूण ४६ दिवसांचा असमर्थनीय विलंब लागला आहे ही बाब येथे नाकारता येत नाही. सबब तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. पी. डी. मुंडे (सध्या कृषि अधिकारी, कृषि चिकित्सालय बिंदूसरा नर्सरी, व्दारा उपविभागीय कृषि अधिकारी, बीड, जिल्हा बीड) व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस. पी. सोनपीर (सध्या मंडळ कृषि अधिकारी, घाटनांदूर, व्दारा तालुका कृषि अधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड) यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यासाठी लावलेल्या ४६ दिवसांच्या विलंबाबाबत विलंबाच्या प्रतिदिनी रु. २५० या प्रमाणे एकूण ११५०० रुपये (अक्षरी रुपये अकरा हजार पाचशे ) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी लावलेला विलंब त्यांना मान्य असल्याचे अनुमान काढण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस माहिती

देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पोस्टाव्दारे उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पोस्टाव्दारे उपलब्ध करुन द्यावी.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. पी. डी. मुंडे (सध्या कृषि अधिकारी, कृषि चिकित्सालय बिंदूसरा नर्सरी, व्दारा उपविभागीय कृषि अधिकारी, बीड, जिल्हा बीड) व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस. पी. सोनपीर (सध्या मंडळ कृषि अधिकारी, घाटनांदूर, व्दारा तालुका कृषि अधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड) यांना एकूण ११५०० रुपये (अक्षरी रुपये अकरा हजार पाचशे ) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विजय हिरामण गायकवाड, रा. महात्मा फुलेनगर, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, पालम, तालुका पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ श्री. पी. डी. मुंडे, कृषि अधिकारी, कृषि चिकित्सालय बिंदूसरा नर्सरी, व्दारा उपविभागीय कृषि अधिकारी, बीड, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे )

४ श्री. एस. पी. सोनपीर, मंडळ कृषि अधिकारी, घाटनांदूर, व्दारा तालुका कृषि अधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे )

५ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, पालम, तालुका पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७१४

निर्णय दिनांक ०५-११-२००९

१ श्री. वाकडे माणिक त्रिंबकराव, : अपिलार्थी

रा. बोधेनगर, सूत मील रोड, लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर .

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपायुक्त, नगरपालिका प्रशासन,

विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती पुरविली नाही व पुरविलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याने त्यांचे अपील मंजूर करुन संबधितांच्यावर कार्यवाही करावी. अपिलार्थीने व्दितीय अपील अर्जासोबत आयोगास उद्देशून एक वेगळे निवेदन सादर केले असून या निवेदनामध्ये त्यांनी लातूर नगरपरिषदेतर्फे मंजूर करण्यात आलेल्या आगाऊ वेतनवाढीसंदर्भातील त्यांच्या आक्षेपांचा उल्लेख केलेला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे शासन निर्णय दिनांक १८-०२-१९७५ अन्वये करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत एकूण चार मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शासन निर्णय दिनांक १८-०२-१९७५ नुसार अनुज्ञेय नसलेल्या किती कर्मचा-यांना किती वेतनवाढी दिल्या त्याची यादी, बेकायदेशीरपणे संगनमताने नगरपरिषदेतील निधीचा दुरुपयोग करण्यासाठी जबाबदार असणा-या कर्मचारी / अधिका-यांची नावे, या अधिका-यावर केलेल्या कार्यवाहीचा तपशील व तांत्रिक कर्मचारी / अधिकारी यांना एल. जी. एस. उतीर्ण झाल्यावर वेतनवाढी चालू करण्याच्या मंजुरीच्या शासन निर्णयाची प्रत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्याकडील दिनांक १४-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला. तथापि प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०४-२००८ रोजी रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०५-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्द क्रमांक ४ च्या संदर्भात सात दिवसाचे आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०६-२००८ रोजी माहिती पुरविली. तथापि ही माहिती विलंबाने प्राप्त झाल्याबद्दल आणि प्राप्त माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी हजर आहेत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १८-०१-२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी वेळोवेळी, प्रथम दिनांक १४-०२-०८ व तदनंतर दि. १३-०५-२००८ व ०९-०६-२००८ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः किती वेळा उपस्थित झाले याचा कोणताही उल्लेख त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये केलेला नाही तसेच यासंदर्भात आवश्यक तो पुरावा सादर करण्यासाठी ते आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीपुरते या अपील अर्जाकडे पाहावयाचे झाल्यास असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांचे, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हस्तगत करुन घेण्याचे, उत्तरदायित्व योग्य प्रकारे पार पाडले नाही. तसेच अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी का वाटते या पृष्ठयर्थ त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत दिलेल्या निवेदनामध्ये ऊहापोह केला आहे त्याचे अवलोकन करता, अपिलार्थीने या अर्जामध्ये उपस्थित केलेले मुद्दे हे पूर्णतः प्रशासकीय स्वरुपाचे आहेत. अशा प्रकारच्या प्रकरणी आदेश देण्याची आयोगास अधिकारिता नाही. याकरिता अपिलार्थीस आपल्या तक्रारीचे निवारण संचालक, नगरपालिका प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून करुन घ्यावे लागेल, असे त्यांना येथे

सूचित करण्यात येत आहे. अशा प्रकारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी वेगवेगळ्या टप्प्यावर संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे व ही माहिती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या मर्यादेमध्ये चुकीची व दिशाभूल करणारी नाही असे आयोगास आढळून येत आहे. तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते त्यांच्या कार्यालयात माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी उपस्थित राहिल्याचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगास सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही आणि यासंदर्भात तोंडी निवेदन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितिय अपील अर्जामध्ये उपस्थित केलेले सर्व मुद्दे निकाली निघत आहेत. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वाकडे माणिक त्रिंबकराव, रा. बोधेनगर, सूत मील रोड, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७१५

निर्णय दिनांक ०५-११-२००९

१ श्री. संजय पंडीतराव काळे, : अपिलार्थी
काळे भुवन, २३/११ पापविनाश रोड, महावीर चौक,
लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप विभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर, लातूर
जन अपिलीय अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०८-२००८ रोजी फेर सादर झालेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व दिशाभूल करणाी माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०३-२००८ रोजी गांधी चौक, लातूर येथील पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रार अर्जाची प्रमाणित प्रत व या अर्जावर पोलीस स्टेशनच्या संबंधितांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा अर्ज पोलीस अधीक्षक कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्यांनी सदरचा अर्ज दिनांक ००-०४-२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर यांच्याकडे पाठवून या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. यानंतर अपिलार्थीच्या या अर्जावर पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन गांधी चौक, यांनी दिनांक १३-०५-२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती शासकीय फीस नियमाप्रमाणे भरुन त्यांच्याकडून त्वरीत घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी व्यक्तिशः माहिती देऊ केली असता अपिलार्थीने ती माहिती न स्वीकारल्यामुळे दिनांक ३१-०५-२००८ रोजी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पोस्टाव्दारे पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती पुरविली आहे ती आज उपस्थित जन माहिती अधिकारी यांना आयोगास दाखविता आली नाही. सबब अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २२-०३-२००८ रोजीच्या तक्रार अर्जाची प्रत व ती तक्रार त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी यासंदर्भात वेगवेगळ्या प्राधिकरणाशी केलेला पत्रव्यवहार व तक्रारीशी संबंधित त्यांच्याकडील अभिलेख्यावरील टिपणीच्या सत्यप्रती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसात आत विनामूल्य पुरवाव्यात. अपिलार्थीस निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती प्राप्त झाली आणि प्राप्त माहितीने अपिलार्थीची दिशाभूल कशी झाली ते आयोगास कळण्यास मार्ग नाही. तेव्हा आता जन माहिती अधिकारी यांनी वर सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या तक्रार अर्जाची प्रत व त्यावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने संदर्भीत विषयावर त्यांनी केलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती, अभिलेख्यावरील टिपणीच्या प्रती ही माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात् या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय घेतला नाही. यासंदर्भात असे सूचित करण्यात येत आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रथम अपील अर्जावर इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१.	अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**	**( वि. बा. बोरगे )**

**दिनांक	०५-११-२००९**	**राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१	श्री. संजय पंडीतराव काळे, काळे भुवन, २३/११ पापविनाश रोड, महावीर चौक, लातूर.

२	जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७१६

निर्णय दिनांक ०५-११-२००९

१ श्री. कोरनुळे अंबादास व्यंकटराव, : अपिलार्थी
प्रसाद बुक सेंटर, कदम हॉस्पीटलसमोर, नांदेड-लातूर
रोड, शिवाजी चौक, अहमदपूर, तालुका अहमदपूर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय, अहमदपूर, तालुका अहमदपूर,
जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर,
तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे २५० रुपये इतकी शास्ती लावण्यात यावी व त्यांच्यावर शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात यावी. जन अपिलीय अधिकारी यांच्याविषयी त्यांनी अपील

अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी स्वंयस्पष्ट आणि न्यायिक पध्दतीने निर्णय दिला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे सावरगांव (थोट) या तलाठी सज्जा अंतर्गत गट नंबर १५७ व १५८ व गट नंबर ७९ या क्षेत्रात मार्च २००४ ते २००५, मार्च २००५ ते मार्च २००६ व मार्च २००६ ते डिसेंबर २००७ या कालावधीमध्ये फेरफार केलेल्या फेरफार नक्कल व त्यास पुरावा म्हणून जोडलेल्या कागदपत्रांच्या छायांकीत प्रती, ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १२८ इतके त्यांच्याकडे भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने या शुल्काचा भरणा दिनांक २८-०७-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात केला. परंतु मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रामध्ये अपिलार्थीने समाविष्ट केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी निश्चित कोणता निर्णय दिला हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. परंतु यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे आणि अपिलार्थीने ही जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः मागितली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजपावेतो कोणती माहिती उपलब्ध झाली, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणता निर्णय दिला हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अभावी कळण्यास मार्ग नाही. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे, हे पाहता ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावी लागेल. जर अद्यापपावतो जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दिली नसेल तर त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कोरनुळे अंबादास व्यंकटराव, प्रसाद बुक सेंटर, कदम हॉस्पीटलसमोर, नांदेड-

लातूर रोड, शिवाजी चौक, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७१७

निर्णय दिनांक ०५-११-२००९

१ श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, : अपिलार्थी
मु. टेंभुर्णी, पो. तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता,
जिल्हा परिषद, पाणीपुरवठा उपविभाग, अहमदपूर,
जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद, पाणीपुरवठा विभाग, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळेत माहिती उपलब्ध न करुन दिल्याने व सत्य माहिती दडवून ठेवल्याने आणि कर्तव्यात कसूर केल्याने त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे दंड आकारण्यात यावा व २००० रुपये इतकी शास्ती लावण्यात यावी आणि या दंडाची रक्कम अर्जदाराच्या खर्चापोटी अर्जदारास देण्याचे आदेशित करावे. अपिलार्थीने या अर्जाव्दारे आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे हासर्णी व टेंभूर्णी येथील भारत निर्माण योजनेअंतर्गत चालू असलेल्या विहिरीच्या व पाईपलाईनच्या कामासंदर्भात काही माहिती एकूण पाच मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये - कामाच्या अंदाजपत्रकाची छायांकीत प्रत, काम करण्यासाठी प्राप्त झालेल्या जमिनीचे दानपत्राची / खरेदीखताची / बक्षिसपत्राची प्रत, हे काम कोणत्या योजनेतून किती लाखाची प्रस्तावित मागणी आहे, भारत निर्माण योजनेमध्ये सदरील लाभार्थी गाव आलेले आहे काय ? कामाशी संबंधित शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता यांची नावे व पत्ते, पाईपलाईन खरेदीचे दरपत्रक कोणत्या दुकानदाराकडून घेतले त्याची माहिती, या योजनेवर होणारा खर्च लक्षात घेऊन प्रदुषित पाण्याऐवजी शुध्द पाणी टेभुंर्णी या गावास मिळणार आहे काय - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. या नंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधीही उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून ज्या भारत निर्माण

योजनेअंतर्गत केल्या जाणा-या कामांची माहिती मागविली आहे त्या योजनेचे वैशिष्ट्य असे आहे की, या योजनेची अंमलबजावणी करतांना जरी शासनाचे भरीव अर्थसहाय्य होत असले तरीही ही योजना संबंधित गावाच्या ग्रामस्थांनी प्रत्येक गावात पाणीपुरवठा समिती स्थापन करुन कार्यान्वित करावयाची आहे. या योजनेची अंमलबजावणी ही शासनाच्या इतर विकास कामाच्या अंमलबजावणीपेक्षा पूर्णतः वेगळया पध्दतीने करावयाची आहे. ही योजना शासनाकडून आर्थिक सहाय्य प्राप्त करुन घेऊन आणि लोकवर्गणी गोळा करुन घेऊन ग्रामस्थांनी त्यांच्याच मार्फत पार पाडावयाची आहे. या योजनेशी संबंधित अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही टेंभुर्णी गावाच्या पाणीपुरवठयाशी संबंधित आहे. या समितीचे अध्यक्ष, सदस्य व सचिव हे सर्व ग्रामस्थ म्हणजे खाजगी व्यक्ती आहेत. त्यांना अधिनियमातील कलम २ (ज) च्या तरतुदीनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण' असे संबोधता येणार नाही, त्यामुळे यासंदर्भात त्यांना माहिती अधिकार अधिनियम लागू होणार नाही. अपिलार्थीने ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे ही माहिती मागितली आहे, त्या प्राधिकरणाचा या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अत्यल्प सहभाग आहे (केवळ तांत्रिक नियंत्रण ), सदर सार्वजनिक प्राधिकरण हे या योजनेवर दैनंदिन नियंत्रण ठेवत नाही व त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली कोणतीही माहिती कशाही प्रकारे उपलब्ध असू शकत नाही. अशा प्रकरणी माहिती उघड करण्यासाठी वापराव्या लागणाऱ्या पध्दती संदर्भात आयोगाने शासनाच्या पाणीपुरवठा विभागाच्या सचिवांना वेळोवेळी सूचना केलेल्या आहेत. या योजनेस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत वित्तीय पुरवठा होत असल्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या योजनेसंदर्भात त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे प्रथमतः करावी जे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरवू शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीकरिता चुकीच्या प्राधिकरणाकडे अर्ज केल्याचे सिध्द होत असल्याने, अपिलार्थीचे राज्य माहिती

आयोगाकडे केलेले विचाराधीन व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, मु. टेंभुर्णी, पो. तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, पाणीपुरवठा उपविभाग, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, पाणीपुरवठा विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७१९

निर्णय दिनांक ०५-११-२००९

१ श्री. जोतिबा लिंबाजी पवार, : अपिलार्थी
मु. पो. सिंदफळ, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, आरळी खुर्द,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील कोणतीही माहिती दिली नाही. त्यांच्या प्रथम अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही, माहिती देण्यास टाळाटाळ केली त्यामुळे संबंधितांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये यशवंत ग्राम समृध्दी योजना, १२ वा वित्त आयोग, जवाहर योजना, दलित वस्ती योजना या योजनाअंतर्गत झालेल्या सर्व कामांसंदर्भात सन २००० ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण सात मुद्दयाव्दारे मागितली होती.

तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-०७-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि यासंदर्भात त्यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, माहितीसाठीचा अर्ज सादर करते वेळेस श्री. राम कदम नावाचे ग्रामसेवक जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले. या प्रकरणी संबंधित ग्रामपंचायतीने मोठ्या प्रमाणात शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीमध्ये भ्रटाचार केला असून या भ्रष्टाचाराच्या निर्मुलनाकरिता त्यांना या माहितीची आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर जानेवारी २००९ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहितीतील मुद्दा क्रमांक ७ पूर्ण व ६ अंशतः वगळता उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ मधील वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिलेल्या पत्राच्या सत्यप्रती एवढीच माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. त्याचप्रमाणे मुद्दा क्र. ६ च्या उर्वरित व मुद्दा क्रमांक ७ शी संबंधित संपूर्ण माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. कारण अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचा खुलासा व स्पष्टीकरण अपेक्षिणा-या स्वरुपात मागितली आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. उर्वरित पाचही मुद्दयांवरील संपूर्ण माहिती अपिलार्थीस अधिनियमातील विहित केलेल्या तरतुदीमध्ये देय असतांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीशी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाच्या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेऊन आपल्या बेजबाबदारपणाच्या कार्यशैलीचा प्रत्यय संबंधितांनी आणून दिला आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या वर्तनामुळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिल्याचे सिध्द होत आहे. उपरोक्त प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. राम कदम व सध्याचे जन माहिती अधिकारी श्री. चौधरी यांनी अशा प्रकारे आपल्या कृतीव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या दोनही जन माहिती अधिका-यांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती-तील मुद्दा क्रमांक ७ व ६ अंशतः वगळता उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. चौधरी व श्री राम कदम यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जोतिबा लिंबाजी पवार, मु. पो. सिंदफळ, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, आरळी खुर्द, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७२०

निर्णय दिनांक ०५-११-२००९

१ श्री. औचरमल भगवान तात्याराव, अपिलार्थी

भिमनगर, भावसिंगपुरा,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अतिरिक्त शहर अभियंता, औरंगाबाद महानगरपालिका,

औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अतिरिक्त शहर अभियंता, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : शहर अभियंता, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रामधील १९९३ साली सर्व्हे नंबर ४६ मधील डीपी रोडच्या खडीकरणाच्या टेंडरच्या आदेशाची सत्यप्रत त्यांना प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी या अपिलाच्या सुनावणीच्या सुरुवातीस अपिलार्थीने आयोगास असे स्पष्ट केले की, त्यांनी या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना एका न्यायालयीन प्रकरणाच्या संदर्भात हवी होती. तथापि न्यायालयाचा निर्णय त्यांच्या बाजूने लागला असल्याने त्यांना आता या प्रकरणी त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता उरलेली नाही, त्यामुळे त्यांचे विचाराधीन अपील खारीज करण्यात यावे. अपिलार्थीची ही विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १७२०/२००८, दिनांक ०१-१०-२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. औचरमल भगवान तात्याराव, भिमनगर, भावसिंगपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त शहर अभियंता, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७२१

निर्णय दिनांक ०५-११-२००९

१ श्री. अनंत अपसिंगेकर, : अपिलार्थी
" विवेकसिंधु " अंबिका कॉलनी, सोमनाथपूर, उदगीर,
तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
नगर परिषद कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उदगीर,
तालुका उदगीर, जिल्हा लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न पुरविल्यामुळे आणि त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी

दिलेल्या निर्णयाची प्रत त्यांना प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नगरपरिषदेस प्राप्त होणारे जकात अनुदान व महागाई भत्त्यापोटी प्राप्त होणा-या अनुदानाच्या संदर्भात दिनांक ०१-०४-२००७ ते ३१-०३-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयातील शिपायामार्फत पुरविली तथापि ती माहिती घेण्याचे अपिलार्थीने नाकारले आणि तदनंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेण्यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः कधीही उपस्थित झाले नाहीत, त्यामुळे त्यांनी दिनांक १७-०७-२००८

रोजी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील शिपायामार्फत माहिती पाठविली तथापि त्यांनी ती स्वीकारण्याचे नाकारले, त्यामुळे त्यांनी सरतेशेवटी जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानुसार त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०९-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली. ती माहिती अपिलार्थीस दिनांक १५-०९-२००८ रोजी प्राप्त झाल्याची त्यांची पोच त्यांच्याकडे उपलब्ध आहे. त्यांच्या या म्हणण्यापृष्ठयर्थ त्यांनी पोस्टाच्या पावतीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली. जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः कधीही उपस्थित झाले नाहीत, एवढेच नव्हे तर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने शिपायामार्फत अपिलार्थीस देऊ केलेली माहिती देखील त्यांनी नाकरली आहे. यानंतर अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या-कडील दिनांक ०९-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली आहे. ही माहिती अपिलार्थीस अंतीमतः दिनांक १५-०९-२००८ रोजी म्हणजे त्यांनी आयोगाकडे दि. ०६.०९.२००८ रोजी व्दितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

उपरोक्त प्रकरणी अशाप्रकारे, अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार आहेत असे सिध्द होत असल्याचे आयोगास

आढळून येत आहे.  त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अनंत अपसिंगेकर, संचालक, ज्येष्ठ नागरिक तक्रार निवारण केंद्र, " विवेकसिंधु " अंबिका कॉलनी, सोमनाथपूर, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७२२

निर्णय दिनांक ०५-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. नरवाडे प्रसन्नजित गणपतराव,<br>रा. आंबेडकर नगर, गोकुंदा, तालुका किनवट,<br>जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गोकुंदा,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, गोकुंदा ग्रामपंचायतीमध्ये सन २००५ ते २००७ या वर्षामध्ये झालेल्या एकूण

ग्रामसभा, मासिक सभा, घेण्यात आलेले ठराव, मंजूर झालेले ठराव, प्रोसिडींग, एकूण शिल्लक रक्कम व एकूण खर्च, ही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती संकलीत करण्याचे काम त्यांच्याकडे चालू असल्याचे कळविले व ही माहिती अपिलार्थीस लवकरात लवकर देण्यात येईल असे त्यांना आश्वासीत केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०५-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीचा निर्णय काय झाला हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. परंतु यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०४-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत माहिती मागितली आहे. तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२-०५-२००८ पर्यंत देखील त्यांनी माहिती दिली नसल्याचे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट यांनी जन माहिती अधिका-यास दिलेल्या पत्रावरुन दिसून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी प्रथमतः अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क, सदरचा

अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून तीस दिवसाच्या आत कळविणे अशा प्रकारची कृती करणे जन माहिती अधिका-यास अनिवार्य होते, तथापि त्यांनी असे केले नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जावरुन अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाली किंवा कसे हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे व सर्व संबधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस माहिती दिली नसल्यास, अपिलार्थीने, त्यांच्या दिनांक ०४-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज केल्यानंतर ते आजपर्यंतच्या कालावधीमध्ये माहिती पुरविली नसल्यास, त्यांना त्यांच्या दिनांक ०४-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जातील, त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३.	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, गोकुंदा यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नरवाडे प्रसन्नजित गणपतराव, रा. आंबेडकर नगर, गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२००५

निर्णय दिनांक ०५-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुभाष रतनसिंग महेर,<br>रा. व्दारा बालासाहेब वाळुंज,<br>सी-५२, न्यू विशालनगर, गारखेडा परिसर,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,<br>औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील १९ (३) अन्वये दिनांक २७-०६-२००७ रोजी आयोगाकडे नोंदणी झालेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपिलावर आयोगाने यापूर्वी दिनांक २०-१२-२००८ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला होता. सदर अपिलावरील निर्णयाविरुध्द अपिलार्थी यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्रमांक २४६२/२००९ दाखल केली होती व मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०५-१०-२००९ रोजीच्या आदेशाव्दारे सदर अपिलासंदर्भातील सुनावणीची दिनांक २०.११.२००८ रोजीची आदेशाची नोटीस अपिलार्थीस मिळाली नव्हती या

कारणास्तव सदर अपिलाची दिनांक ०५-११-२००९ रोजी फेरसुनावणी घेण्याचे आयोगास निर्देश दिले होते.

मा. उच्च न्यायालयाचे वरील आदेशानुसार या प्रकरणाची फेर सुनावणी आज दिनांक ०५-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी त्यांचे वकील श्री. एस. बी. गस्तगार यांचेसह, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी, मा. राज्य माहिती आयोगाने, त्यांच्या अपील क्रमांक २००५ दिनांक २०-१२-२००८ रोजीच्या निर्णयाव्दारे संबंधित जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे २५००० रुपये इतकी शास्ती लावली नाही म्हणून त्यांनी मा. उच्च न्यायालयाकडे रिट याचिका दाखल केली होती. मा. राज्य माहिती आयोगाचा दिनांक २०-१२-२००८ रोजीचा निर्णय त्यांना मान्य आहे, तथापि राज्य माहिती आयोगाने निर्णय देऊनही त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती दिलेली नाही. अद्यापही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही अपूर्ण स्वरुपात आहे. यावेळी नेमकी कोणत्या मुद्दयावर माहिती उपलब्ध झाली नाही याची विचारणा आयोगाने अपिलार्थीस केली असता, त्यांनी अद्यापपावेतो त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २, ३ व ६ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्णतः मिळाली नसल्याचे आयोगास अवगत केले व या मुद्दयांवरील संपूर्ण माहिती त्यांना आवश्यक असल्याचे सांगितले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून, जर ही माहिती त्यांनी प्रथम अर्ज केला त्याचवेळी विहित मुदतीत त्यांना प्राप्त झाली असती तर, त्यांच्या संघटनेच्या शिक्षकावर संस्थेने केलेली बडतर्फीची कारवाई टळली असती. केवळ जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुदतीत माहिती न दिल्यामुळे या शाळेमध्ये प्रभारी मुख्याध्यापक या पदावरील कार्यरत शिक्षकांना त्यांची नोकरी गमवावी लागली. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारे कोणतीही माहिती न देण्याच्या कृतीमुळे त्यांची हानी झाली असल्यामुळे त्यांच्यावर २५००० रुपये इतकी शास्तीची कार्यवाही तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी विहीत मुदतीत त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय न दिल्यामुळे

त्यांचेविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई त्यांना आयोगाकडून अपेक्षित आहे, असेही त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये अंतिमतः स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी आयोगाने दिलेल्या निर्णयानंतर त्यांनी विशेष परिश्रम घेऊन आयोगाच्या दिनांक २०-१२-२००८ रोजीच्या निर्णयानुसार मुख्याध्यापक, जगदंबा प्रतिष्ठान शिक्षण संस्था संचलित प्राथमिक शाळा, गारखेडा परिसर, औरंगाबाद यांनी दिनांक ३१-१२-२००८ रोजी त्यांच्याकडे माहिती सादर केली असता, दिनांक १२-०१-२००९ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये एकूण ८३२ पृष्ठांची माहिती कार्यालयातून घेऊन जाण्याबाबत त्यांनी अपिलार्थीस सूचित केले. अपिलार्थीने स्वतः उपस्थित राहून माहिती प्राप्त करुन न घेतल्यामुळे त्यांनी हीच माहिती अपिलार्थीस दिनांक १३-०१-२००९ रोजी रजिस्टर्ड पोच देय डाकेने अपिलार्थीस पाठविली. ती माहिती अपिलार्थीस दिनांक २१-०१-२००९ रोजी दुपारी १ वाजून १५ मिनिटांनी प्राप्त झाली आहे. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, ही माहिती देण्यापूर्वी दिनांक १२-०१-२००९ रोजी अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले होते परंतु अपिलार्थीने माहिती पोस्टाने पाठवून द्या अशी जन माहिती अधिकारी यांना विनंती केल्यावरुन त्यांनी ही माहिती अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली. अपिलार्थी श्री. महेर यांनी जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचा इन्कार केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०८-११-२००६ रोजीच्या अर्जामध्ये मागणी केलेली माहिती आयोगाने दिनांक २०-१२-२००८ रोजी दिलेल्या आदेशानंतर अपिलार्थीस दिनांक १३-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेली आहे. तथापि या प्राप्त माहितीने देखील अपिलार्थीचे समाधान झाले नाही असे आज सुनावणीच्या वेळी आयोगास आढळून आले आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापही मुद्दा क्रमांक १, २, ३ व ६ शी संबंधित संपूर्ण

माहिती दिली नसल्याचे अपिलार्थीने आयोगास अवगत केले. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मध्ये अपिलार्थीने जगदंबा प्रतिष्ठान शिक्षण संस्था संचलित प्राथमिक शाळा, गारखेडा परिसर, औरंगाबाद या शाळेच्या मुख्याध्यापकाने जून २००२ ते ऑक्टोबर २००६ पर्यंत शालेय पोषण आहार योजनेखाली मागणी केलेल्या तांदुळाची माहिती व मागणी केलेल्या मागणीच्या पत्राच्या प्रती मागितल्या होत्या. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही ५३ महिन्यांशी संबंधित होती. या ५३ महिन्यांपैकी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त ३० महिन्यांच्या संबंधात मुख्याध्यापकाच्या मागणी पत्राच्या प्रती पुरविल्या आहेत, उर्वरित २३ महिन्याच्या संदर्भात या प्रती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व संबधित संस्थेकडे उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी आता उर्वरित २३ महिन्यांच्या मागणी पत्राच्या प्रती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थीस विशेष लक्ष देऊन विनामूल्य पुरवाव्यात. जर या कालावधीमध्ये या प्रती त्यांना उपलब्ध झाल्या नाहीत तर ही कागदपत्रे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचा-यावर होती, त्या कर्मचा-यावर त्यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग विषयक कारवाई अथवा कायद्यातील इतर तरतुदीन्वये करता येण्यासारखी तत्सम कार्यवाही करावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्रमांक २ व्दारे गट शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयाकडून जून २००२ पासून ऑक्टोबर २००६ पर्यंत तांदुळ पुरवठा केलेल्या कागदपत्रांच्या व माल पाठवल्याच्या व मिळाल्याच्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रतींची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती. या मुद्दयावर गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी त्यांच्या कार्यालयाचा काहीही संबंध येत नाही. कारण गट शिक्षणाधिकारी हे प्रत्यक्षतः शिक्षण संस्थेस तांदुळ पुरवठा करीत नाहीत आणि अशा प्रकारे धान्य वाटपाचे अभिलेखे जतन करुन ठेवण्याची पध्दत त्यांच्याकडे प्रचलीत नाही. तांदुळ वाटपाची पध्दत स्पष्ट करतांना त्यांनी आयोगास असे अवगत केले की, या योजनेखाली तांदुळ वाटपाच्या पध्दतीमध्ये प्रथमतः मुख्याध्यापक त्यांची

मागणी दरमहा गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे नोंदवितात, गट शिक्षणाधिकारी हे मुख्याध्यापकाची मागणी अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्याकडे सादर करतात. अन्नधान्य वितरण अधिकारी अशा प्रकारे त्यांच्याकडे एकूण मागणी प्राप्त झाल्यानंतर ते शाळेच्या नावांवर संबंधित रेशन दुकानदारास परवाना देतात आणि त्यानंतर संबंधित दुकानदार शाळेला तांदुळ पुरवठा करतात व त्याची नोंद मुख्याध्यापकाच्या नावाने असलेल्या शिधापत्रिकेवर घेण्यात येते. अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे सदर शाळेस शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांकडून सरळ (direct) तांदुळ पुरवठा केला जात नाही. जन माहिती अधिकारी यांनी या मुद्दयावर अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, त्यांनी या मुद्दयावर अपिलार्थीस दिलेली माहिती अपूर्ण आहे. त्यांनी या मुद्दयासंदर्भात अपिलार्थीस अन्नधान्य वितरण अधिकारी औरंगाबाद यांच्याकडून तांदुळाचा प्रत्यक्ष किती पुरवठा किती झाला याची नोंद असलेली पुरवठा पत्रिका शिधापत्रिकेची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि मूळ मागणीच्या प्रती दिल्या नाहीत असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे अभिप्रेत केलेली पध्दती त्याच्या विभागाकडे प्रचलीत नसल्याचे, अपिलार्थीस कळविले नाही त्यामुळे अपिलार्थीस या मुद्दयावरील माहिती प्राप्त होऊ शकली नाही. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी यासंदर्भातील प्रचलीत पध्दत अपिलार्थीस लेखी कळवावी व मागणीच्या पत्राच्या प्रती अपिलार्थीस पुरवाव्यात. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे अपिलार्थीने जगदंबा प्राथमिक शाळेने मागणी केलेला तांदुळ व दिलेले अनुदान, या अनुदानाच्या केलेल्या खर्चाचे विवरणपत्र व व्हाउचर्सच्या प्रमाणित प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्या असता, या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस २८१ पृष्ठांची माहिती ज्यामध्ये १८ महिन्यांची बिले व उर्वरित खर्च झालेले अनुदान दर्शविणा-या बँकेच्या खात्याच्या छायाकींत प्रती अपिलार्थीस दिनांक १३-०१-२००९ रोजी पुरविल्या आहेत. तथापि देण्यात आलेल्या माहितीत संबंधित शाळेच्या शिक्षकांच्या पगाराचाही समावेश आहे. त्यामुळे या पासबुकामध्ये दर्शविलेल्या रकमांमधील नेमकी तांदुळ शिजविण्यासाठी मिळालेल्या अनुदानाची रक्कम कोणती आहे याचा बोध होत नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी

यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात पुरविलेल्या माहितीमध्ये तांदुळ शिजविण्यास आलेल्या खर्चाचा निश्चित भाग किती त्याची माहिती अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत पुरवावी. अपिलार्थीने उपस्थित केलेल्या मुद्दा क्रमांक ६ च्या संदर्भात असे आढळून येते की, या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून जून २००२ ते ऑक्टोबर २००६ पर्यंतच्या विद्यार्थी उपस्थितीविषयीच्या गोषवारा रजिस्टरच्या प्रमाणित प्रतीची मागणी केली आहे. ही माहिती जगदंबा प्रतिष्ठान संचलित प्राथमिक शाळा, गारखेडा या शाळेशी संबंधित आहे. तथापि ही माहिती शिक्षण संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. परंतु या माहितीने अपिलार्थीचे समाधान झ ालेले नाही. कारण या माहितीमध्ये जून २००२ ते ऑक्टोबर २००६ या कालावधीशी संबंधित गोषवारा रजिस्टर संबंधित शाळेकडून उपलब्ध झाले नाही. त्यामुळे विद्यार्थी उपस्थिती विषयी गोषवारा रजिस्टरची या कालावधीतील प्रमाणित प्रत अपिलार्थीस पुरविली नाही. जर संबंधित शाळेकडे विद्यार्थी गोषवारा उपलब्ध नसेल तर त्या शाळेवर काय कार्यवाही करता येईल अशी आयोगाने विचारणा केली असता माध्यमिक शाळा संहितेप्रमाणे या शाळेवर शिक्षणाधिकारी यांना कार्यवाही करता येते असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित आवश्यक माहिती, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. जर या कालावधीमध्ये शिक्षण संस्थेकडूनही माहिती उपलब्ध होऊ शकली नाही तर त्यांनी या शाळेवर माध्यमिक शाळा संहितेनुसार कार्यवाही करण्याचा जरुर विचार करावा.

वरील प्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व आतापर्यंत अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती यांचे, अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या संदर्भात केलेले विश्लेषण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १, २,

३ व ६ मधील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीप्रमाणे शास्ती लावण्याची विनंती आयोगास केली आहे. यासदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न दिल्यास या अधिनियमामध्ये कलम २० व्दारे आयोगास दोन विकल्प दिले गेले असून यातील कलम २० (२) प्रमाणे दिलेल्या विकल्पाचा आयोगाने स्वीकार केला आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती ज्या दुस-या सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध होती, त्या प्राधिकरणाकडे अपिलार्थीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मध्ये विहित केलेल्या मुदतीत न पाठवून, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. याचबरोबर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणाची सखोल चौकशी होण्याच्या दृष्टीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्यावर अशा प्रकारची कारवाई आयोगाने करण्यासंदर्भात कोणतीही तरतूद नसल्यामुळे अपिलार्थीची ही विनंती आयोग फेटाळून लावत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत टपालाव्दारे माहिती मागितली होती, असे असतांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित

राहून हस्तगत करुन घेण्यासाठी केलेल्या विनंतीच्या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या माध्यमाव्दारे माहिती मागितली आहे त्याच माध्यमाव्दारे अर्जदारास माहिती पुरविणे हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी स्वतः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्या-कडून माहिती हस्तगत करुन घेण्यासाठीची केलेली सूचना अवैध आहे. हा अभिप्राय येथे विशेषत्वाने नोंदण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**

**दिनांक ०५-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**

**राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुभाष रतनसिंग महेर, रा. व्दारा बालासाहेब वाळुंज सी-५२, न्यू विशालनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७२३
निर्णय दिनांकः ०६-११-२००९

१. श्री.संजय रामचंद्र लिहिणार, : अपिलार्थी
रा.घाणेगाव, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, गंगापूर, जि. औरंगाबाद.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी, वैजापूर, जि.औरंगाबाद
प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय अधिकारी, वैजापूर, जि.औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून तहसीलदार व तलाठी यांनी दिशाभूल करुन, गोलमाल उत्तरे देऊन त्यांची दिशाभूल करुन व अपेक्षित माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे तसेच जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश पाळले नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - "वाळुज बु. येथील ग.क्र. ३११ या गटाचे मूळ मालक फकिर किसन यांची

७५ गुंठे जमीन बाकी असताना मूळ रेकॉर्डवरुन त्यांचे नाव २००२ पासून कमी करण्यात आले आहे. नाव कमी करण्याचे कारण, नाव कमी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व नाव कमी करण्यामागचा अधिकाऱ्याचा हेतू, फकिरी किसन या गरीब व कोल्हाटी समाजाच्या गरीब महिलेचा गट नं.३११ वाळुज बु. येथील ७/१२ आतापर्यंत दुरुस्त का केला नाही, सन २००२ ते २००८ या दरम्यान, ७/१२ दुरुस्ती महसूल अभियान किती वेळेस घेण्यात आले, त्याचे सविस्तर अहवाल आणि या अभियानामध्ये किती लोकांचे ७/१२ दुरुस्ती केले, त्यांची नावानिशी,गावाची व गटाची सविस्तर माहिती, " - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगापूर यांना उद्देशून केला होता. अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीचा अर्ज तलाठी, सज्जा वाळुज यांच्याकडे दि. ०२.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पाठवून दिला. तलाठी, सजा वाळुज यांनी त्यांच्या दि. २३.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीच्या मूळ अर्जास प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात कोणत्याही दस्तऐवजामध्ये उपलब्ध नाही व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात अपिलार्थीस असे कळविले आहे की, ही माहिती तहसील कार्यालयाशी संबंधित असल्याने तरी अपिलार्थीने तहसील कार्यालय,गंगापूर येथून ही माहिती हस्तगत करुन घ्यावी. अशाप्रकारचे उत्तर देऊन संबंधित तलाठयाने अपिलार्थीचा दि. २८.०५.२००८ रोजीचा अर्ज निकाली काढला. जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक, तलाठी वाळुज यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीअंतर्गत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०८.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.०७.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगापूर यांना सूचित केले. परंतु या आदेशानंतरही अपिलार्थीस तहसीलदार, गंगापूर यांच्याकडून कोणतीही

माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात तहसीलदार यांनी हेतूपुरस्सर व गोलमाल उत्तरे देऊन मूळ माहिती देण्याचे टाळले आहे. त्यांनी मागणी केलेली माहिती उघड झाल्याने त्यांच्या कार्यालयामध्ये मोठया प्रमाणात होणारा भ्रष्टाचार उघड होणार असल्याची त्यांना शंका आहे. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे आणि माहिती अधिकारी तथा तहसीलदार,गंगापूर यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करावी आणि तसेच या प्रकरणी झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याचे आदेश देण्यात यावेत व अपिलार्थीस या प्रकरणी झालेल्या मानसिक व आर्थिक नुकसानीची भरपाई देण्यात यावी. अपिलार्थी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी - कर्मचारी/अधिकारी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २८.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस देय नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. १ मधील नाव कमी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व मुद्दा क्र. ३ मधील सन २००२ ते २००८ या दरम्यान ७/१२ दुरुस्ती महसूल अभियान किती वेळेस घेण्यात आले, किती लोकांचे ७/१२ दुरुस्त केले, त्यांची नावे, गाव व गट ही माहिती वगळता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्यांवरील कोणतीही माहिती देय नाही. कारण या उर्वरित मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची कारणे व स्पष्टीकरणे अपेक्षित

करणारी माहिती मागितली आहे. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ मध्ये  अपिलार्थीने नाव कमी करणाऱ्या अधिकाऱ्याचा हेतू, अशी अमूर्त स्वरुपातील माहिती देखील मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कोणत्याही कृतीबद्दलची अथवा निर्णयाबद्दलची कारणे अथवा स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी व अमूर्त स्वरुपातील माहिती मागणे अनुज्ञेय नाही. कारण अशा स्वरुपाची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. अशाप्रकारची माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्यामुळे ती अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वर नमूद केलेली देय माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देणे त्यांना अनिवार्य आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेली अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांना देण्याकरिता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) मधील तरतुदीप्रमाणे प्रतिसाद देणे त्यांना गरजेचे होते. अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी हा अर्ज संबंधित तलाठयाकडे दि. ०२.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पाठवून दिला व त्या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. वास्तविक पाहता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एकूण ३ मुद्यांवरील माहितीपैकी  मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित असताना देखील त्यांनी या मुद्यावरील माहिती तलाठी वाळुज यांना देण्याचे सांगितले. तलाठी वाळुज यांच्याकडे फारतर त्यांच्या तलाठी सजाची माहिती उपलब्ध असू शकते.परंतु तहसीलदार यांच्या नियंत्रणाखाली अनेक तलाठी कार्यरत असतात. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे तहसीलदार यांच्या कार्यक्षेत्रातील त्यांच्या तहसील कार्यालयाशी संबंधित माहिती मागितली होती. परंतु अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जाचे नीटपणे वाचन न करता तहसीलदाराने,

अपिलार्थीचा अर्ज सरळ संबंधित तलाठयाकडे दि. ०२.०६.२००८ रोजी पाठवून दिला. तलाठयाने दि. २३.०६.२००८ रोजी अपिलार्थीस, या पत्राद्वारे जो प्रतिसाद दिला आहे, त्या प्रतिसादाला उध्दटपणाचा तीव्र दर्प येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भात त्यांनी जर तलाठी वाळुज येथे ग.क्र. ३११ मध्ये बदल केलेल्या कर्मचाऱ्याचे नाव अपिलार्थीस कळविले असते तर ते अधिक योग्य ठरले असते किंवा जर अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे नावात बदल झाला नसला तर ग.क्र. ३११ च्या ७/१२ च्या उताऱ्याची प्रत त्यांनी अपिलार्थीस पाठवावयास हवी होती. परंतु त्यांच्या कार्यालयाकडे अशाप्रकारचे कोणतेही दस्तऐवज नसल्याचे बेजबाबदारपणाचे उत्तर संबंधित तलाठयाने अपिलार्थीस दि. २३.०६.२००८ रोजी दिले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहिती देताना अपिलार्थीस परत तहसीलदार, गंगापूर यांच्याकडून माहिती हस्तगत करण्याचे सूचविले. वास्तविक पाहता, अपिलार्थीने या मुद्यावर मागितलेली माहिती तहसीलदार, गंगापूर यांना त्यांच्या स्तरावरुन देणे अपेक्षित होते. अपिलार्थीने ही माहिती पोस्टाद्वारे मागितली असल्याने अपिलार्थीस तहसीलदार,गंगापूर यांच्याकडून माहिती हस्तगत करुन घ्यावयाची सूचना करण्याचे संबंधित तलाठयास कोणतेही कारण नव्हते. तहसीलदार,गंगापूर व संबंधित तलाठी यांच्या अशाप्रकारच्या वर्तनाची जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २८.०७.२००८ रोजीच्या निर्णयामध्ये योग्य प्रकारे दखल घेऊन आपल्या दि. २८.०७.२००८ रोजीच्या निर्णयामध्ये खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

"उपरोक्त माहिती तलाठी व माहिती अधिकारी गंगापूर यांना माहिती असतानादेखील मोघम स्वरुपाचे चुकीचे व दिशाभूल करणारा पत्रव्यवहार करुन तलाठी व माहिती अधिकारी यांनी देण्याचे टाळल्याचे स्पष्टपणे दिसून येते. यावरुन माहिती अधिकारी हे माहिती अधिकार अधिनियम प्रकरणात अत्यंत उदासीन असल्याचे स्पष्ट होते."

जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊन देखील अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत तर सोडाच परंतु आजतागायत म्हणजे सुमारे सव्वा वर्षाचा कालावधी ओलांडून गेल्यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

अपिलार्थीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक कर्मचारी/अधिकारी हे देखील आयोगाच्या कार्यालयातून अंदाजे एक महिन्यापूर्वी लेखी सूचना देऊनही सुनावणीसाठी आज रोजी उपस्थित नाहीत. आयोगाच्या सुनावणीचे दि. ०५.१०.२००९ रोजीचे पत्र तहसीलदार,गंगापूर यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याची आयोगाच्या कार्यालयातून आज रोजी दूरध्वनीवरुन खात्री करुन घेण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या वर्तनावरुन ते केवळ सामान्य नागरिकांशी उद्धटपणे वागत आहेत,असे नव्हे तर ते आयोगाच्या सुनावणीच्या नोटीसला देखील कोणताही प्रतिसाद देत नाहीत, असे आयोगास आढळून आले आहे.

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार आता अपिलार्थीस देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी सात दिवसांच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती, अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत व जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही न पुरविल्यामुळे संबंधित तहसीलदार, गंगापूर हे अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरले आहेत.तसेच या कालावधीमध्ये अपिलार्थीस माहिती न देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सहायक अधिकारी/कर्मचारी ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीप्रमाणे 'जन माहिती अधिकारी' समजावे, अशी तरतुद आहे,हे सर्वजण एकत्रितपणे जबाबदार असल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यांच्यापैकी आज रोजी सुनावणीसाठी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाहीत. त्यांना बचावाची संधी देण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगापूर व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे कार्यालयीन सहायक अधिकारी/कर्मचारी या सर्वांना मिळून एकत्रितपणे त्यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर रु. २५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा एकत्रित खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर

आदेशाची प्रत संबंधितांना तामिल करावी. या मुदतीत संबंधितांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयात स्पष्ट केलेली, त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल या सर्वांवर एकत्रित एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा एकत्रित खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांकः 	०६-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.संजय रामचंद्र लिहिणार,मु.पो.घाणेगाव, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील

नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, वैजापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७२५
निर्णय दिनांकः ०६-११-२००९

१. श्री.समीर वैजनाथराव भालके, : अपिलार्थी
रा. धारखेड, ता.गंगाखेड,जि.परभणी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, गंगाखेड, जि. परभणी.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय,गंगाखेड, जि.परभणी.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. या अर्जाद्वारे त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००५-२००८ या कालावधीतील काही माहिती टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये - गंगाखेड तालुक्यातील एकूण स्वस्त धान्य दुकानदारांची संख्या, नाव, गाव, जात,

परवाना नंबर, त्यांना प्रत्येक महिन्याला मिळणारा कोटा, ए.पी.एल.,बी.पी.एल.अंत्योदय, लाभधारकांची शिधापत्रिकेवरील संख्या, शिधापत्रिकेचा नंबर, संबंधित दुकानदारांना किती दराने कोटा प्राप्त होतो, लाभधारकांना किती दराने कोटा (धान्य) वाटप करतात त्या पावती बुकाची प्रत, स्टॉक रजिस्टरची प्रत व विक्री रजिस्टरची प्रत,भाव फलकाची माहिती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.०४.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाच्या शिपायामार्फत माहिती देऊ केली तथापि ही माहिती अपूर्ण असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने ही माहिती अस्वीकृत केली व दि. ०७.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,परभणी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय पारीत करण्यात आला नाही. अशाप्रकारे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना न मिळाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, उपविभागीय अधिकारी, परभणी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०७.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथम सुनावणी घेऊन त्यावर निर्णय देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब उपविभागीय अधिकारी, परभणी यांनी अथवा या प्रकरणाशी संबंधित नियुक्त केलेल्या जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०७.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०७.०६.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला ि-नर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक: ०६-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.समीर वैजनाथराव भालके,रा. धारखेड, ता.गंगाखेड,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगाखेड, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७२६

निर्णय दिनांक ०६-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. नाटकर रमेश गोपाळराव,<br>रा. परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, परभणी | : | प्रतिवादी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत्यक्षात | : | जन माहिती अधिकारी | : | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, परभणी |
| | | जन अपिलीय अधिकारी | : | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.०९.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित केलेल्या मुदतीत माहिती दिली नाही आणि अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार त्यांनी प्रथम अपील करुनही संबंधितांकडून त्यांना अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी यांच्याकडे पंचायत समिती अंतर्गत रिक्त पदे व बदल्याबाबत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही महिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. तथापि विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २२.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि मुख्य कार्यकारी अधिकारी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी हे जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले नसल्याने त्यांनी दिनांक ०४.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे पाठवून दिला. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०७.०१.२००९ रोजी विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाद्वारे उपलब्ध करुन दिली आहे.

वरील घटनाक्रम जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुन ते ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे किती वेळा व्यक्तिशः उपस्थित झाले या संदर्भात कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे केलेल्या

द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने 'व्यक्तिशः ' माहितीची मागणी केल्यास माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर आवश्यक त्या माहितीच्या संदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात होण्याकरिता अर्जदाराने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः संपर्क साधणे गरजेचे असते. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी व्यक्तिशः संपर्क साधल्याचा कोणताही पुरावा आयोगास सादर केलेला नाही. अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे उपलब्ध करुन दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता ती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आढळून येत आहे. प्राप्त माहितीवर अपिलार्थीने कोणतेही लेखी भाष्य आयोगाकडे आजतागायत केलेले नाही अथवा तोंडी अभिप्राय व्यक्त करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज उपस्थित नाहीत. हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नाटकर रमेश गोपाळराव, द्वारा संपादक सा. विचारचक्र, मातोश्री विहारनगर रविराज पार्क, परभणी, - ४३१४०१

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, परभणी, ता. जि.

परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७२७

निर्णय दिनांक ०६-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीमती रुखसाना हमीद खॉन,<br>रा. औरंगाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | : प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण उपसंचालक,<br>औरंगाबाद विभाग,औरंगाबाद | |

त्रयस्थ पक्ष : मुख्याध्यापक, तलत उर्दू हायस्कूल, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.०९.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९४ ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - तलत हायस्कूल या संस्थेने त्यांच्याकडे दाखल केलेल्या वैयक्तिक मान्यतेच्या प्रस्तावाची प्रत, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून देण्यात आलेल्या वैयक्तीक मान्यतेची प्रत, सेवा सातत्य देण्यात आलेल्या वैयक्तिक मान्यतेची

प्रत, आणि संस्थेने दाखल केलेल्या सेवाज्येष्ठतेच्या आदेशाची प्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७.०५.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपैकी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य हस्तांतरित केली. तथापि पूर्ण माहिती अपिलार्थीस न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. त्यांनी हे अपील शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांच्याकडे केले होते. तथापि या प्रकरणी त्यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती झाली नसल्याने त्यांनी दिनांक २३.०७.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे अपिलार्थीचे प्रथम अपील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे पाठविले. त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिल्याचे,आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. परंतु यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष मुख्याध्यापिका, तलत ऊर्दू हायस्कूल, औरंगाबाद यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, दिनांक १७.०५.२००८ रोजी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस व्यक्तिशः हस्तांतरित केली आहे. अपिलार्थीस माहिती मिळाल्याबद्दलची अपिलार्थीची पोचसही त्यांनी आयोगास दाखविली.

त्रयस्थ पक्ष,मुख्याध्यापिका, तलत ऊर्दू हायस्कूल,श्रीमती खुतबाउन्नीसा खान यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही ती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १२.०२.२००९ रोजी विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थीस अशा प्रकारे प्राप्त झालेल्या माहितीवर अपिलार्थीने आयोगाकडे कोणतेही लेखी अभिप्राय व्यक्त केलेले नाहीत अथवा या संदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्षाने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने दिनांक ०३.०५.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे व उर्वरित माहिती त्रयस्थ पक्षाकडून दिनांक १२.०२.२००९ रोजी, अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर, विनामूल्य प्राप्त झाली आहे. प्राप्त माहितीवर अद्यापपावेतो अपिलार्थीने कोणतेही लेखी भाष्य आयोगाकडे केलेले नाही. हे पाहता, अपिलार्थीस ती माहिती संबंधितांकडून प्राप्त झाली असल्याचे अनुमान काढण्यात येत आहे त्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नसल्याने अपिलार्थीचे सदर अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रुखसाना हमीद खॉन, रा. घर नं.-११०, म्हाडा कॉलनी, चंपा चौकाजवळ,रोशनगेट, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०२
निर्णय दिनांक ०६/११/२००९

१ श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी (आस्थापना विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

**निर्णय**

श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २५.०९.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १०.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०६/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅंड रोड, नांदेड.
२) जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी (आस्थापना विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
३) जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०३
निर्णय दिनांक ०६/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>सना उर्दू हायस्कूल,<br>नोमानियानगर, तरोडा बु., नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**<u>निर्णय</u>**

श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १५.०५.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २६.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०६/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅंड रोड, नांदेड.
२) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू हायस्कूल, नोमानियानगर, तरोडा बु., नांदेड
३) जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०४
निर्णय दिनांक ०६/११/२००९

१ सौ.एस.पी.नैण, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, उमरी, जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
तहसील कार्यालय, उमरी, जि.नांदेड

**निर्णय**

सौ.एस.पी.नैण यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २७.०९.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०५.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ५० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०६/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) सौ.एस.पी.नैण, व्दारा-मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड- ४३१ ६०५.
२) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उमरी, जि.नांदेड
३) जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उमरी, जि.नांदेड

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७२९

निर्णय दिनांक ०६-११-२००९

१ श्री. वामन रंगनाथराव मोरे, : अपिलार्थी
बी/१५४, विवेकनगर, वसमत रोड, परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, वसंत अनुसूचित जाती प्राथमिक व
माध्यमिक आश्रमशाळा, कारेगांव, तालुका जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
परभणी

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ५, ६ व ७ च्या संदर्भात दिलेली महिती दिशाभूल करणारी व खोटी असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, वसंत अनुसूचित जाती व जमाती प्राथमिक, माध्यमिक आश्रमशाळा, कारेगांव, तालुका जिल्हा परभणी यांच्याकडे त्यांच्या शाळेसंदर्भात काही माहिती एकूण सात मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११-०७-२००८ रोजीच्या निर्णयाद्वारे दिनांक ०२-०५-२००८ रोजीची माहिती सुधारीत करुन देण्याचे आदेशित केले. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०७-२००८ रोजी माहिती पुरविली आहे. तथापि प्राप्त माहितीतील मुद्दा क्रमांक ५, ६ व ७ शी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती खोटी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास दिनांक ०२-०५-२००८ व तदनंतर दिनांक २२-०७-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीपासून माहिती दडविण्याचा त्यांचा कधीही हेतू नव्हता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही दहा वर्षापुर्वीची जुनी असल्यामुळे अपिलार्थीस काही मुद्दयावर त्यांना माहिती पुरविता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व्दारे आश्रमशाळा खळी, तालुका गंगाखेड येथे शाळा स्थलांतरास ज्या शासन आदेशाने परवानगी दिली त्या शासकीय परिपत्रकाची माहिती मागितली होती. मूळात अपिलार्थीने ही माहिती मागतांना शासनाची परवानगी घेतली काय अशा स्वरुपाची मागितली आहे. त्यामुळे या मुद्दयावर अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देय होत नाही. परंतु एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या शाळा स्थलांतर परवानगी ज्या शासन आदेशाने देण्यात आली त्या समाजकल्याण विभागाच्या दिनांक २२-०६-१९९८ रोजीच्या आदेशाची प्रत दिनांक २२-०७-२००८ रोजी उपलब्ध करुन दिली. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ मध्ये आश्रम शाळा स्थलांतर करण्याची जी कारणमिमांसा गृहीत धरण्यात आली किंवा सरपंच, अधिकारी यांच्या शिफारशी होत्या त्या शिफारसपत्राच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्या आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दिनांक २२-०७-२००८ रोजी पुरविली आहेत. समाजकल्याण विभागाच्या दिनांक २२-०६-१९९८ च्या शासकीय आदेशामध्ये या स्थलांतराची कारणे स्पष्ट केली आहेत. ती शाळा स्थलांतर करण्यासाठी मूळात कोणते शिफारस पत्र दिले आहे किंवा कसे या संदर्भातील कोणताही पुरावा अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही व या संदर्भातील युक्तिवाद करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भातील दिलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीच्या या मुद्दयावरील माहितीचा समावेश होतो, असे मानण्यास हरकत नसावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे आश्रमशाळा स्थलांतर प्रस्ताव त्यांच्यामार्फत केव्हा पाठविला, त्याचा जावक क्रमांक काय आहे, अशी माहिती मागविली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, आश्रमशाळा स्थलांतर प्रस्ताव त्यांच्यामार्फत पाठविला नव्हता व तसे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या

दिनांक २२-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे कळविले आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील उपस्थित केलेले मुद्दे व त्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०७-२००८ रोजी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०७-२००८ रोजी पुरविली असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती ही खोटी व दिशाभूल करणारी कशी आहे हे अपिलार्थीने आयोगास सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही आणि यासंदर्भात तोंडी स्पष्टीकरण करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वामन रंगनाथराव मोरे, संपादक, साप्तहिक, सत्यम् शिवम् सुंदरम्, बी/१५४, विवेकनगर, वसमत रोड, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, वसंत अनुसूचित जाती प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, कारेगांव, तालुका जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७३०

निर्णय दिनांक ०६-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. बंडगर सुरेश शिवाजीराव,<br>यशवंत ॲटोमोबाईल्स, दुकान नंबर ३८, बसस्थानकाच्या<br>समोर, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड,<br>तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राअंतर्गत दिनांक ०१-०४-२००० ते ३१-०३-२००८ या कालवधीशी संबंधित विशेष घटक योजनेअंतर्गत अनुदान देण्यात आलेल्या लाभार्थ्यांच्या नावांची

यादी, गाव व या योजनेसाठी असलेल्या शासनाच्या आदेशाची साक्षांकीत प्रत ही माहिती टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १७५ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. परंतु अपिलार्थीने या प्रमाणे कार्यवाही न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-०८-२००८ रोजी आपले आदेश पारीत करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अपिलार्थीस पत्राव्दारे कळविले असून ते पत्र अपिलार्थीने स्वीकारले नाही. पोस्टाने जन माहिती अधिकारी यांचे पत्र, या पाकिटावर त्यांचे, " सदर दुकान बंद आहे " असे अभिप्राय देऊन जन माहिती अधिकारी यांच्याकडे परत पाठविले. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविले. त्यांनी आपल्या युक्तिवादात पुढे असेही स्पष्ट केले की, अपिलार्थी हे माहितीसाठीच्या केलेल्या अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्यावर राहत नसून त्यांचे निवासस्थान वेगळे आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दोन वेळा सुनावणी ठेवली असता अपिलार्थी हे गैरहजर राहिले. त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या शिपायामार्फत ही माहिती पाठविली असता अपिलार्थीने या माहितीचा स्वीकार केला नाही.

अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ते अपिलार्थीस ती माहिती आता सशुल्क पुरविण्यास तयार आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारलेले नाही त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील ७ (१) प्रमाणे आवश्यक व योग्य प्रतिसाद दिला आहे. तथापि अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याची तयारी, जन माहिती अधिकारी यांच्याकडे या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर दर्शविली नाही. ते जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, सुनावणीसाठी गैरहजर राहिले व आजही आयोगाकडील सुनावणीसाठी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे या प्रकरणी आढळून येत आहे. परिणामी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बंडगर सुरेश शिवाजीराव, यशवंत ॲटोमोबाईल्स, दुकान नंबर ३८, बसस्थानका-च्या समोर, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७३१

निर्णय दिनांक ०६-०११-२००९

१ श्री. वैजनाथ विश्वनाथ मल्लिशे, : अपिलार्थी
मु. पो. चापोली, तालुका चाकूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,
चापोली, तालुका चाकूर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर,
जिल्हा लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४, ६ व ७ ची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून चुकीची, दिशाभूल करणारी व अपूर्ण दिली आहे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-०५-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील, अंगणवाडीचे बांधकाम, पाण्याच्या टाकीचे बांधकाम, पाईपलाईनचे खोदकाम व इतर कामाच्या संदर्भात एकूण दहा मुद्दयांद्वारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०६-२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १६ इतके भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने या शुल्काचा भरणा केला किंवा कसे हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. परंतु त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर यांच्याकडे दिनांक २२-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात कोणतीही कागदपत्रे अपिलार्थीने आयोगास उपलब्ध करुन दिलेली नाहीत. परंतु यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी ते स्वतः अथवा त्यांचे कोणी प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपुरी, दिशाभूल करणारी व खोटी माहिती दिली या कारणास्तव विचाराधीन अपील सादर केले आहे. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कोणत्या मुद्दयावर अद्यापपावेतो माहिती द्यावयाची राहिली आहे आणि त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती खोटी व दिशाभूल करणारी कशी आहे हे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही. तसेच तोंडी स्वरुपात स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, आवश्यक त्या कागदपत्रांच्या व

संबंधितांच्या उपस्थितीअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वैजनाथ विश्वनाथ मल्लिशे, मु. पो. चापोली, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, चापोली, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७३२

निर्णय दिनांक ०६-०११-२००९

१ श्री. शेख हासन वजीर, : अपिलार्थी

मु. पो. जवळा (बु.), तालुका जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर, जिल्हा लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर, तालुका जिल्हा लातूर

त्रयस्थ पक्ष : राशेदबी लालसाहेब शेख

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना " राशेदबी लालासाहेब शेख स. गा. यो. १३९९/३० (ग्रामीण) ची संचिका मिळण्याबाबत " अशी माहिती मागितली आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास नकार दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०९-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन १९८५ ते २००३ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १. राशेदबी लालसाहेब शेख सं. गा. यो. ग्रामीण १३९९/३० ची संचिका मिळणे बाबत

२. अनुदान बंद पडल्याचे कारण मिळणेबाबत "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने तपासणीसाठी मागणी केलेली संचिका त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने ती अपिलार्थीस देता येत नसल्याचे त्यांचे पत्र दिनांक ०६-०५-२००५ व्दारे कळविले व अपिलार्थीने ज्या त्रयस्थ पक्षाची संचिका तपासणी करण्याची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती त्या त्रयस्थ पक्ष श्रीमती राशेदबी शेख यांना संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत देण्यात येत असलेले अनुदान त्यांची मुलगी सज्ञान झाल्याने बंद करण्यात आल्याचे कळविले. त्यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व परिणामी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आवश्यक असलेले अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या संचिकेची तपासणीसाठी मागणी केली होती ती संचिका त्यांच्याकडे उपलब्ध नाही. ती

शोधण्यासाठी त्यांनी त्यांच्या कार्यालयातील ४० जणांची नेमणूक करुनही त्यांना संचिका उपलब्ध झाली नाही, त्यामुळे ती संचिका ते अपिलार्थीस तपासणीसाठी उपलब्ध करुन देऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीस राशेदबी लालसाहेब शेख १३९९/३० संजय गांधी निराधार योजना (ग्रामीण) या क्रमांकाची संचिका तपासणीसाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे. तथापि ही संचिका जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे, त्यांनी या संचिकेचा बराच शोध घेऊनही सापडली नाही. अपिलार्थीने ज्या विषयाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे संचिकेची मागणी केलेली आहे त्या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता, जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत त्यांच्या कार्यालयात या संचिकेचा शोध घेऊन अपिलार्थीस ही संचिका तपासणीसाठी तीस दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी व या कालावधीमध्ये जर जन माहिती अधिकारी यांना ही संचिका सापडली नाही तर ती संचिका जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचा-यावर होती त्या कर्मचा-यावर त्यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संचिका त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

| | |
|---|---|
| **औरंगाबाद** | **( वि. बा. बोरगे )** |
| **दिनांक ०६-११-२००९** | **राज्य माहिती आयुक्त** |
| | **खंडपीठ औरंगाबाद** |

प्रत,

१ श्री. शेख हासन वजीर, मु. पो. जवळा (बु.), तालुका जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर, तालुका जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर, तालुका जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७३३

निर्णय दिनांक ०६-११-२००९

१ श्री. मलंग अब्दुल रहेमान मो. इस्माईल, अपिलार्थी
रा. दबीरपुरा, घर क्रमांक १-३-५८, उदगीर, तालुका उदगीर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, उदगीर,
तालुका उदगीर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे हजरत मियॉ शॉ खादरी उर्दू प्राथमिक शाळा, वाढवणा (बु.) तालुका उदगीर

या शाळेच्या मुख्याध्यापकाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या जून ते नोव्हेंबर ९३ च्या शिक्षक माहिती पत्रक अहवालाच्या सत्यप्रतींची मागणी केली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. अशा प्रकारे अपिलार्थीस जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी आणि जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील माहिती पुरविली आहे. ही माहिती मिळाल्याची पोच अपिलार्थीने दिली आहे. या म्हणण्याच्यापृष्ठ्यर्थ अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे अपील क्रमांक १४४४/२००८ दिनांक २९-०९-२००९ मध्ये केलेले शपथपत्र आयोगास सादर केले आहे. या शपथपत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना माहिती मिळाल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे अपिलार्थीस अपील क्रमांक १४४४/०८ व २२१८/०८ या अपिलांमध्ये अपेक्षित असलेली माहिती मिळाली असल्याचे स्पष्ट होते. केवळ या पत्राचा आधार घेऊन जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस विचाराधीन अपिलाशी संबंधित मूळ अर्जातील माहिती देण्यास टाळाटाळ करत आहेत, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक

२१-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मलंग अब्दुल रहेमान मो. इस्माईल, रा. दबीरपुरा, घर क्रमांक १-३-५८,उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७३४

निर्णय दिनांक ०६-११-२००९

१ श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, अपिलार्थी
रा. नांदगांव, पो. गांजूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, चाकूर,
तालुका चाकूर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.)व मुद्रांक
जिल्हाधिकारी, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून माहिती दिली नाही, जन अपिलीय अधिकारी यांचा पत्ता दिला नाही, त्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (२) नुसार प्रतिदिवस रुपये २५० इतकी शास्ती लावण्यात यावी व शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००३ ते दि. २३-०५-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - खरेदीखत, गहाणखत, दानपत्र, बक्षिसपत्र इत्यादी नोंदणीकृत दस्तऐवजाच्या सत्यप्रती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ ची १७ कामे कोणत्या दिवशी पूर्ण केली व वरिष्ठ कार्यालयास कळविलेल्या पत्राची सत्यप्रत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे मागितली असून या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस या संदर्भात निर्णय दिला असून अपिलार्थीस, "आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या नकला संबंधितांकडून प्राप्त करुन घेऊ शकता" असे उत्तर दिले व अपिलार्थीस नोंदणी अधिनियम १९०८ व महाराष्ट्र नोंदणी नियम सन १९६१ अन्वये विहित केलेली देय नक्कल फीस व मुद्रांक शुल्क जमा करण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांना दिनांक ३१-०७-२००८ रोजी पुरविल्याचे आढळून येत आहे.

परंतु अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती देतांना अपिलार्थीस नोंदणी अधिनियम १९०८ व महाराष्ट्र नोंदणी नियम सन १९६१ चे नियम ७३ व महाराष्ट्र नोंदणी आदेश संहिता भाग २ चे आदेश संहिता क्रमांक ४८२ व ५०४ अन्वये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात विहित केलेल्या कालावधीसाठी, अपिलार्थीस त्यांच्या विभागाच्या प्रचलीत नियमाप्रमाणे त्यांना आवश्यक असलेले शुल्क भरण्याचे सूचित केले आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती देतांना त्यांनी नोंदणी अधिनियम १९०८ व नोंदणी नियम सन १९६१ अन्वये अपिलार्थीस त्यांच्या खात्याने विहीत केलेल्या दराने शुल्क आकारले व अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात 'अ' पत्रकाची सत्यप्रत देण्याची तरतूद त्यांच्याकडे नाही परंतु अपिलार्थीने विहित फी जमा केल्यास संगणकीय प्रींट अपिलार्थीस देता येईल असे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहितीमधील मुद्दा क्रमांक १ व ३ च्या संदर्भात दिलेली माहिती चुकीची असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर, त्यांना या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती आवश्यक असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार एखाद्या अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अशा प्रकारच्या प्रतींची मागणी केल्यास शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. आर.टी.आय. २००५/सिआर३१५/०५/५, दिनांक ११-१०-२००५ रोजीच्या अधिसूचनेप्रमाणे कार्यवाही करणे जन माहिती अधिकारी यांना गरजेचे आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित मागितलेल्या "अ" कागदपत्रांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्याव्यात. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये त्यांच्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे. परंतु ही झेरॉक्स प्रत साक्षांकीत नसल्यामुळे अपिलार्थी हे खरोखरच दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस देण्यापूर्वी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी

खरोखरच दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे याची स्वत: खात्री करुन घ्यावी व जर ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे सिध्द होत असेल तर त्यांना ही माहिती विनामूल्य द्यावी अन्यथा ही माहिती त्यांनी अपिलार्थीस, माहितीपोटीच्या वरील अधिसूचनेमध्ये विहीत केलेल्या दराने शुल्काचा भरणा त्यांच्याकडून करुन घेऊन ती अपिलार्थीस पुरवावी. जन माहिती अधिकारी यांनी ही कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत करावयाची आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत जर ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असतील तर विनामूल्य पुरवावी अन्यथा सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, रा. नांदगांव, पो. गांजूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.)व मुद्रांक

जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७२८

निर्णय दिनांक ०६-११-२००९

१ श्री. राजेंद्र सखाराम कमळू, : अपिलार्थी
रा. पूर्णा, जि. परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसिल कार्यालय,
पूर्णा, जि. परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी
यांचे कार्यालय, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो कोणतीही माहिती न दिल्यामुळे, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील निकाली न काढल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१.०२.२००८ ते २९.०२.२००८ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यक्षेत्रातील पूर्णा तालुक्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या संदर्भात काही माहिती मागितली

होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - पूर्णा तालुक्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत रेशनिंगचा माल (धान्य) किती आला पैकी ए.पी.एल. किती, बी.पी.एल. किती व अंत्योदय किती, पूर्णा तालुक्यातील रेशन दुकानदारांची यादी व प्रत्येकी रेशन कार्ड धारकांची संख्या व त्यांना मिळणाऱ्या रेशन कोट्याची माहिती, पूर्णा तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांची (निळे) यादी, त्यांना मिळणाऱ्या कोट्याची माहिती, कोटा किती, प्रत्येक अर्धघाऊक व्यापाऱ्यांकडील किरकोळ रॉकेल विक्रेत्यांची संख्या व त्यांना मासिक मिळणाऱ्या कोट्याची माहिती व पूर्णा तालुक्यातील गॅस धारकांची संख्या व तालुक्याची लोकसंख्या - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १२०/- इतके भरण्याचे सूचित केले. त्या प्रमाणे अपिलार्थीने दिनांक ०४.०४.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मनीऑर्डरद्वारे शुल्क पाठविले. हे शुल्क तहसील कार्यालय, पूर्णा यांना दिनांक १७.०४.२००८ रोजी प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीस पोच दिली आहे. या पोचपावतीची झेरॉक्स प्रत अपिलार्थीने आयोगाकडे सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीने पाठविलेली मनीऑर्डर जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्याचे आढळून येत आहे. यानंतर शुल्क भरुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १५.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परभणी यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला किंवा कसे, हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. परंतु अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काची जन माहिती अधिकारी यांच्याकडे १२० रु. इतक्या रकमेची मनीऑर्डर केली असल्याचे व ही मनीऑर्डर तहसिल कार्यालय, पूर्णा यांना प्राप्त झाली असल्याचा पुरावा अपिलार्थीने आयोगास सादर केला आहे. परंतु अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही, असे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही पूर्णपणे अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देणे त्यांना भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ११.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालद्वारे पुरवावी व अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क, स्विकृत करुनही अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न दिल्यामुळे, त्यांच्याकडे अपिलार्थीने माहितीपोटीचे भरलेले शुल्क रु. १२०/- इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क स्वीकृत करुनही अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी यांची ही कृती त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपराणतेचा अभाव स्पष्ट करीत आहे. जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांनी आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या

तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (पुरवठा), पूर्णा व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकृत केलेले शुल्क रु. १२०/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत परत करावे.

४. सचिव (महसूल) यांना संबंधित नायब तहसिलदार (पुरवठा), पूर्णा व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेंद्र सखाराम कमळू, रा. आझाद रोड, पूर्णा, जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), पूर्णा, ता. पूर्णा, जि. परभणी

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, स्टेशन रोड, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७२४

निर्णय दिनांक ०६-११-२००९

१ श्री. संतराम काशिनाथ माने - पाटील, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा विशेष पोलीस महानिरीक्षक,
मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विशेष पोलीस माहानिरीक्षक,
मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे

प्रत्यक्षत : जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक , मोटार परिवहन, पुणे

जन अपिलीय अधिकारी : पोलीस उपअधीक्षक प्रशासन, विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, पुणे

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५.०९.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपीलाची सुनावणी आज दिनांक ०६.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या सुरवातीसच जन माहिती अधिकारी श्री. अशोक लालू पंडत यांनी अपिलार्थीचे

आयोगास उद्देशून केलेले दिनाक ०५.११.२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून प्राप्त झाली असून त्यांची आता कोणतीही तक्रार शिल्लक नाही त्यामुळे ते खंडपीठापुढे ही केस चालवू इच्छित नाहीत.

खुद्द अपिलार्थीस विचाराधीन अपील आयोगापुढे चालवावयाचे नसल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १७२४/०८, दिनांक ०५.०९.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६.११.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संतराम काशिनाथ माने-पाटील, रा. च्कहेष्काङ्ङ २४ न्यु.एस.बी.एच. कॉलनी, ज्योती नगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन,महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (प्रशासन), विशेष पोलीस माहानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, औंध , पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र.१७३५/०८ व १७३६/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७३५ व १७३६
निर्णय दिनांक: ०७-११-२००९

१. श्री.जयराम सिध्देश्वर कंचलीवार, :अपिलार्थी
रा.किनवट, जि.नांदेड

**विरुध्द**

१. अपील क्र.१७३५/२००८
जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, इस्लापूर,
ता.किनवट,जि.नांदेड.

जन अपिलीय अधिकारी तथा, :प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, किनवट,
जि.नांदेड.

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, किनवट,
जि.नांदेड

२. अपील क्र.१७३६/२००८
जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,आप्पारावपेठ,
ता.किनवट,जि.नांदेड.

जन अपिलीय अधिकारी तथा,
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, किनवट,
जि.नांदेड.

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.११.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले क्र. १७३५/०८ व १७३६/०८ ही आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी, सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही, त्यांना माहिती देण्यासाठी

टाळाटाळ व विलंब केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत व आपल्या दोनही मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या या दोनही प्रकरणांशी संबंधित कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपील क्र.१७३५/०८ च्या संदर्भात अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, इस्लापूर ता. किनवट यांच्याकडे स.नं. २४१ मधील मालमत्ता क्र.८८८, स.नं. ०३ मधील मालमत्ता क्र.८८९, स.नं.२७३ मधील मालमत्ता क्र.८९० व अपील क्र. १७३६/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, आप्पारावपेठ ता.किनवट यांच्याकडे ग्रामपंचायत,आप्पारावपेठमधील गावठाण मालमत्ता क्र. ७६९ मधील - "एकूण प्लॉटपैकी फेरफार झालेल्या प्लॉटची संख्या, फेरफार झालेल्या व्यक्तींची नावे, गाव,पत्ते,प्लॉटच्या क्रमांकासह तपशीलवार माहिती", अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात ग्रामसेवक, ग्रामपंचायत इस्लापूर यांनी अपिलार्थीस दि. १५.०५.२००८ रोजी काही माहिती दिली व तदनंतर दि. ०४.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस, "प्लॉट विक्री करणारे मालक आपणच असल्यामुळे सदरील प्लॉट घेतलेल्या व्यक्तींची नावे आपणाकडेच आहेत", असे उत्तर दिले व ग्रामसेवक, ग्रामपंचायत, आप्पारावपेठ यांनी अपिलार्थीच्या या अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नाही. अशाप्रकारे दोनही ग्रामसेवकांच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीअंतर्गत दि. ११.०९.२००८ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, जि.नांदेड यांच्याकडे दोन स्वतंत्र प्रथम अपिले केली. यापैकी इस्लापूर ग्रामपंचायत संदर्भातील प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.०९.२००८ रोजी निर्णय देऊन, या निर्णयाद्वारे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी आणि एकूण रजिस्ट्रीद्वारे विक्री झालेल्या प्लॉटची यादी अपिलार्थीकडून प्राप्त झाल्यानंतर फेरफार झाल्याची माहिती व शिल्लक प्लॉटची यादी देण्यात यावी, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी तथा

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट यांनी ग्रामसेवक, ग्रामपंचायत, आप्पारावपेठ ता.किनवट यांच्याविरुध्दच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय दिला किंवा कसे, हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आणि अपील क्र. १७३६/०८ च्या संदर्भातील सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. परंतु अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे दोनही जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, इस्लापूर व आप्पारावपेठ यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना आदेश देऊनही माहिती न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे दोन स्वतंत्र द्वितीय अपिले सादर केली असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०७.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपील क्र. १७३५/०८ शी संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आणि अपील क्र. १७३६/०८ शी संबंधित जन माहिती अधिकारी व दोनही प्रकरणांशी संबंधित जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, इस्लापूर श्री. डी.एन.खुळे यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या माहितीची मागणी केली आहे ती माहिती खरेदीखताच्या आधारे त्यांनी आपल्या अभिलेखावर उपलब्ध करुन ठेवली आहे. तथापि ही माहिती अपिलार्थीस अद्यापपावेतो न देण्याची कोणतीही कारणे ते आयोगास, त्यांना पुरेशी संधी देऊनही, स्पष्ट करु शकले नाहीत व आता अपिलार्थीस ही माहिती दहा दिवसांच्या आत विनामूल्य देण्यासाठी ते तयार आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

ग्रामसेवक, ग्रामपंचायत,आप्पारावपेठ ता. किनवट,जि.नांदेड हे आज रोजी सुनावणीसाठी उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, ग्रामसेवक, ग्रामपंचायत, इस्लापूर यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, ग्रामसेवक,

इस्लापूर यांनी जरी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरीही हा प्रतिसाद अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने सकारात्मक नाही. या पत्रामध्ये त्यांनी उलट अपिलार्थी यांच्याकडे खरेदीखतांच्या प्रती असल्याचे गृहीत धरुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याचकडे आहे, असे विधान केले व अपिलार्थीने या प्रकरणाच्या संदर्भात केलेल्या मूळ अर्जाव्यतिरिक्त दुसऱ्या पत्राचा संदर्भ देऊन अपिलार्थीस शिल्लक प्लॉटची माहिती दिल्याचे अवगत केले आहे. अशाप्रकारच्या चुकीच्या प्रतिसादानंतरही जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २९.०९.२००८ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी परत एकदा संधी दिली होती. तथापि संबंधित ग्रामसेवकाने जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली नसल्याचे येथे आढळून आले आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या दोनही अपील प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे दोनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे प्रतिसाद देणे या प्रकरणी गरजेचे होते.येथे अपील क्र. १७३५/०८ च्या संदर्भात ग्रामसेवक, ग्रामपंचायत,इस्लापूर यांनी अपिलार्थीस चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली तर अपील क्र.१७३६/०८ च्या संदर्भात ग्रामसेवक, ग्रामपंचायत,आप्पारावपेठ यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी देखील ते आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अशाप्रकारे अपिलार्थी यांना उपरोक्त दोनही प्रकरणासंदर्भातील माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे अपेक्षिलेली माहिती प्राप्त होण्यापासून जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,इस्लापूर व आप्पारावपेठ यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय दीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याचे नि:संशयपणे सिध्द होत असल्याचे आयोगाचे मत आहे. त्यामुळे

हे दोनही जन माहिती अधिकारी अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत.

सबब या दोनही प्रकरणातील जन माहिती अधिकाऱ्यांपैकी अपील क्र.१७३५/०८ च्या संदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, इस्लापूर ता.किनवट,जि.नांदेड यांना आज रोजी त्यांच्या बचावाची पुरेशी संधी देऊनही त्यांना या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना न देण्याच्या कृतीचे समर्थन आयोगासमोर करता आले नाही, हे पाहता, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,इस्लापूर यांना या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती अधिनियमातील विहित मुदतीमध्ये न पुरविल्यामुळे त्यांच्यावर एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीचा भरणा त्यांनी जास्तीत दहा हप्त्यात किनवट येथील शासकीय कोषागारात पुढील लेखाशीर्षाखाली करावा. लेखाशीर्ष : "००७० इतर प्रशासनिक सेवा-६० इतर सेवा-८०० इतर जमा रक्कम-१८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१"

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या शास्तीची पूर्ण रक्कम भरणा होईपर्यंत संबंधित जन माहिती अधिकारी हे शासकीय कोषागारात माहे, जानेवारी, २०१० पासून नियमितपणे शास्तीचे हप्ते भरतील असे पहावे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने व विनामूल्य पुरवावी.

अपील क्र.१७३६/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, आप्पारावपेठ ता.किनवट,जि.नांदेड यांना त्यांच्या बचावाची संधी देण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय

कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने व विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची दोनही अपिले क्र. १७३५/०८ व १७३६/०८ मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र. १७३५/०८ व १७३६/०८ मान्य करण्यात येत आहेत.

२. अपील क्र. १७३५/०८ व १७३६/०८ या दोनही प्रकरणी, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. अपील क्र.१७३५/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, इस्लापूर ता.किनवट,जि.नांदेड यांना या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती अधिनियमातील विहित मुदतीमध्ये न पुरविल्यामुळे त्यांच्यावर एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी शासकीय कोषागारामध्ये वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट यांनी वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी हे उपरोक्त आदेश क्र.३ चे अनुपालन करतील, याची दक्षता घ्यावी.

५. अपील क्र.१७३६/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, आप्पारावपेठ, ता.किनवट, जि.नांदेड यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जयराम सिध्देश्वर कंचलीवार,कृष्णा गारमेंटस्, मेन रोड किनवट, ता.किनवट, जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत,इस्लापूर,ता.किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत,आप्पारावपेठ, ता. किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

४. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. उपकोषागार अधिकारी, किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्र.१७३७/०८ व १७३८/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७३७ व १७३८
निर्णय दिनांक: ०७-११-२००९

१. श्री.संतोष उत्तमराव नायबळ, :अपिलार्थी
रा.गुंजथडी, ता. माजलगाव, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
तहसीलदार,
तहसील कार्यालय,माजलगाव,
जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
नायब तहसीलदार, माजलगाव,
जि.बीड

प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार, माजलगाव, जि.बीड
जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, माजलगाव,जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.११.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले क्र. १७३७/०८ व १७३८/०८ ही आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी अपील क्र. १७३७/०८ च्या संदर्भातील मूळ अर्जाद्वारे प्राप्त झालेली माहिती दिशाभूल करणारी व चुकीची असून जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्यावर दंडाची व शिस्तभंगाची कोणतीही कारवाई न केल्यामुळे व अपील क्र. १७३८/०८ च्या संदर्भात त्यांना माहिती अधिकाऱ्याने अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, त्यांना अद्यापपावेतो प्राप्त

न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत. या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या या दोनही प्रकरणांच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपील क्र.१७३७/०८ च्या संदर्भात अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मौ. गुंजथडी शिवारातील ग.नं.१४८ या शेतजमिनीवर झालेल्या पेऱ्यातील व वहितीतील फेरबदलासंदर्भात सन २००७-०८ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या जमिनीवर सन २००६-२००७ पर्यंत मूळ मालक हे कब्जेदार असून त्यांचा ७/१२ फेरा व वहिती असून सन २००७-०८ मध्ये पेरा व वहितीतील झालेल्या फेरबदलाची सविस्तर माहिती व हा फेर कशाच्या आधारे झाला-या मुद्यांचा समावेश होता.

अपील क्र. १७३८/०८ च्या संदर्भात, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ०७.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौ. गुंजथडी येथील स्वस्त धान्य व केरोसीन पुरवठाधारकांची नावे, अंत्योदय, बी.पी.एल. व ए.पी.एल.,केरोसीन धान्य वाटपाचे प्रमाण व दर किती आहेत, दुकानदारास प्रत्येक योजनेचे दरमहा धान्य व केरोसीन किती दिले जाते आणि स्वस्त धान्य दुकानाचे विक्री रजिस्टर व त्यावरील नोंदी, अशी माहिती मागितली होती. या अर्जाद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयाशी सन १९९८-२००८ या कालावधीशी संबंधित होती.

या दोनही अर्जाद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती.

अपिलार्थीच्या अपील क्र. १७३७/०८ च्या संदर्भातील मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. परंतु तलाठी सजा सोन्नाथडी, ता. माजलगाव श्री. ए.के. सपकाळ यांनी अपिलार्थीस दि. २६.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस संबंधित जमिनीचा ७/१२ चा उतारा पाठविला व ७/१२ च्या उताऱ्यावर झालेला फेरफार हा

तहसीलदार, माजलगाव यांचे कार्यालयीन आदेश क्र. २००८/आर.ओ.आर./सी.आर./१०, दि. ०९.०६.२००८ च्या अनुषंगाने करण्यात आल्याचे अपिलार्थीस कळविले. अपिलार्थीच्या अपील क्र.१७३८/०८ च्या संदर्भातील मूळ अर्जावर तहसीलदार,माजलगाव यांनी अपिलार्थीस विनादिनांकाच्या पत्राने प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीचा अर्ज अधिनियमातील कलम ६(३) नुसार श्री. एन. डी. नायबळ, रा. गुंजथडी, ता.माजलगाव यांच्याकडे वर्ग केला व त्याची प्रत अपिलार्थीस दिली. सदर व्यक्ती हे सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित आहेत किंवा कसे याचा कोणताही उल्लेख तहसीलदार यांनी या पत्रामध्ये केलेला नाही.

दोनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दोनही प्रकरणी दि. २६.०९.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दोन स्वतंत्र प्रथम अपिले केली. या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणता निर्णय दिला, हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे दोन स्वतंत्र द्वितीय अपिले सादर केली असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०७.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा कोणताही प्रतिनिधी उपस्थित नाही.

वरील दोनही अपिलांशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या द्वितीय अपील क्र. १७३७/०८ च्या संदर्भातील मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद न देता त्यांच्या नियंत्रणाखालील तलाठयाने अपिलार्थीस दि. २६.०८.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद दिला आहे. या अपिलाशी संबंधित प्रथम अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ७/१२ च्या उताऱ्यावर झालेल्या फेरबदलाबद्दल सविस्तर माहिती व फेरबदल कशाच्या आधारे घेतले, अशी माहिती मागितली होती. यासंदर्भात तलाठी श्री. सपकाळ यांनी अपिलार्थीस दि.

२६.०८.२००८ रोजी पुरविलेल्या माहितीमध्ये त्यांनी तहसीलदार, माजलगाव यांच्या दि. ०९.०६.२००८ रोजीच्या आदेशाचा उल्लेख केला आहे. परंतु या आदेशाची प्रत त्यांनी अपिलार्थीस पुरविली असल्याचे आयोगास आढळून आले नाही. सबब जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी आता त्यांचे आदेश क्र. २००८/ आर.ओ.आर./सी.आर./१०, दि. ९.६.२००८ ची प्रत अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपील क्र.१७३८/०८ च्या संदर्भात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील स्वस्त धान्य दुकानाचे विक्री रजिस्टर व त्यावरील नोंदी, या मुद्यावरील माहिती वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती तहसीलदार यांच्याकडेच, धान्य वितरण प्रक्रियेमधील प्रचलीत कार्यपध्दती पहाता, उपलब्ध असणे अनिवार्य आहे. तथापि अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देण्याचा कोणताही प्रयत्न न करुन त्यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज श्री. एन.डी.नायबळ यांच्याकडे वर्ग केला. श्री. एन.डी.नायबळ यांचे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये नेमके कोणते स्थान आहे, याचा आयोगास उलगडा होत नाही. परंतु महसूल विभागाची नियमित कार्यपध्दती पाहता, श्री. एन.डी.नायबळ हे संबंधित स्वस्त धान्य दुकानमालक असावेत असे अनुमान काढण्यात येत आहे. या प्रकरणी आयोगास असे आढळून येते की, सार्वजनिक वितरण व्यवस्थेसंबंधीची ही माहिती तर निश्चितपणे तहसीलदार, माजलगाव यांच्याकडेच असावयास हवी. तथापि ही माहिती देखील त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयामार्फत पुरविण्याचा कोणताही प्रयत्न न करता त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज श्री. एन.डी.नायबळ यांच्याकडे अधिनियमातील कलम ६(३) प्रमाणे हस्तांतरित केला. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अधिनियमातील कलम ६(३) (एक) नुसार अर्जदाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसेल तर आणि ही माहिती ज्या अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे असली तरी किंवा त्या माहितीचा विषय अन्य सार्वजनिक प्राधिकरणाशी अधिक संबंधित असला तरी अशा सार्वजनिक प्राधिकरणांकडे अर्जदाराचा अर्ज हस्तांतरित करणे अभिप्रेत आहे. परंतु या प्रकरणी जन माहिती

अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज श्री. एन.डी.नायबळ यांच्याकडे त्यांच्याकडील विनादिनांकाच्या पत्राद्वारे हस्तांतरित केला. श्री. एन.डी.नायबळ हे सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित नेमक्या कोणत्या पदावर काम करीत आहेत, याचा कोणताही उल्लेख त्यांनी या पत्रामध्ये केलेला नाही. याही पेक्षा महत्त्वाचे असे आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जांची त्यांनी कोणतीही दखल घेतलेली नाही.

आज रोजी देखील सुनावणीसाठी आयोगाने या सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी एक महिन्यापूर्वी नोटीसद्वारे कळवूनही माजलगाव तहसील कार्यालयाचे कोणतेही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदींच्या अंमलबजावणीप्रती तहसील, माजलगाव यांची बेजबाबदार मनोभूमिका स्पष्ट होत आहे, असे आयोगाचे मत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, ती तहसीलदार माजलगाव यांना अपिलार्थीस देणे अनिवार्य आहे.सबब त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०७.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीने ही माहिती दोनही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी व्यक्तिशः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः हस्तांतरित करुन घ्यावी.

अपील क्र. १७३८/०८ च्या संदर्भातील प्रथम अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, माजलगाव,जि.बीड यांनी अपिलार्थीस प्रथमतः कोणतीही माहिती न पुरवून व तदनंतर अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची अक्षम्य उपेक्षा करुन अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याचे या प्रकरणी आढळून येत आहे. अशाप्रकारच्या त्यांच्या अकार्यक्षम व बेजबाबदार कार्यपध्दतीमुळे

त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २०(२) च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास निःसंशयपणे पात्र ठरविले आहे. सबब सचिव (महसूल) यांना या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यक्षेत्रातील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या दोनही अपिलांसंदर्भात खालीलप्रमाणे

आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र. १७३७/०८ अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपील क्र. १७३८/०८ मान्य करण्यात येत आहे.

३. अपील क्र. १७३७/०८ च्या संदर्भात तहसीलदार,माजलगाव यांनी त्यांचे आदेश क्र. २००८/आर.ओ.आर./सी.आर./१०,दि. ९.६.२००८ ची प्रत अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

४. अपील क्र.१७३८/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०७.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

५. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,माजलगाव,जि.बीड यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यक्षेत्रातील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संतोष उत्तमराव नायबळ, रा.गुंजथडी, ता.माजलागाव, जि.बीड-४३१ १३१.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगाव, जि.बीड

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगाव,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७३९
निर्णय दिनांक: ०७-११-२००९

१. श्री. अजित किसनलालजी कोठारी, :अपिलार्थी
रा. जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
मुख्याधिकारी तथा बांधकाम विभाग,
नगर परिषद, जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगरपरिषद, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नगर अभियंता,बांधकाम विभाग, नगर परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दि. ०७.११.२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्राद्वारे त्यांनी विचाराधीन अपील परत घेण्याचा निर्णय घेतला असल्याचे आयोगास अवगत केले आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्यामुळे, सदर अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १७३९/०८, दि. २१.११.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अजित किसनलालजी कोठारी, घर नं. २-२०-१५, पारसी गल्ली, बेंझजी रोड, काद्राबाद,जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम विभाग,नगर परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७४०
निर्णय दिनांकः ०७-११-२००९

१. श्री. अजित किसनलालजी कोठारी, :अपिलार्थी
रा. जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
पाणी पुरवठा अभियंता,
नगर परिषद, जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अभियंता, पाणी पुरवठा विभाग,
नगरपरिषद, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नगर अभियंता,
पाणी पुरवठा विभाग, नगरपरिषद, जालना
जन अपिलीय अधिकारी : मुख्याधिकारी,
नगर परिषद, जालना.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दि. २६.०९.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जावर त्यांना दि. १७.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दि. १८.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, या अपिलाच्या संदर्भात संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.११.२००८ रोजी दिलेल्या निर्णयानेही समाधान न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २६.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जालना शहरातील विंधन विहिरींविषयी दि.०१.०१.१९८० ते १५.०६.२००८ या कालावधीतील काही माहिती शीघ्र टपालाद्वारे मागितली होती. अलिपार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जालना नगर परिषदेच्या हद्दीमध्ये एकूण १३२० विंधन विहिरी ज्या ठिकाणी आहेत, ती ठिकाणे कोणत्या वॉर्डात, कोणत्या ठिकाणी याची आजूबाजूंची एखादी खूण याची माहिती,कोणत्या वॉर्डात किती विंधन विहिरी आहेत (चालू व बंद), जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार १२० विंधन विहिरी नादुरुस्त आहेत, वॉर्डनिहाय नादुरुस्त विंधन विहिरींची वॉर्डनिहाय संख्या व त्या बंद असल्याची कारणे, सदर विंधन विहिरी बंद असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी ज्या अहवालाच्या आधारे ठरविले, त्या अहवालाची व कागदपत्रांच्या प्रती- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.१०.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस संक्षिप्त स्वरुपात मुद्देनिहाय माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १८.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.११.२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांनी शहरातील नगर परिषदेच्या विंधन विहिरीबाबत पूर्ण सर्व्हे करुन, सर्व्हे पूर्ण झाल्यावर अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. तथापि या निर्णयाने समाधान न झाल्याने व अपेक्षित माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, मागील अनेक वर्षापासून जालना शहरात पाणी टंचाई आहे व ही परिस्थिती पुढे कायम राहण्याची शक्यता आहे. अद्यापपावेतो शहराच्या ३० टक्के भागात नळ योजना पोहोचलेली नाही. पाणी टंचाईच्या या परिस्थितीवर मात करण्यासाठी जालना नगर परिषदेतर्फे एकूण १३२० विंधन विहिरी घेतल्या गेल्या आहेत. या पैकी अनेक विंधन विहिरींवर शहरातील काही नागरिकांनी नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन स्वतःच्या फायद्यासाठी अवैधरित्या कब्जा केला आहे. नगर परिषदेचे अधिकारी कोणतीही कार्यवाही करीत नाहीत, त्यामुळे जालना शहरातील अवैधरित्या कब्जा केलेल्या विंधन विहिरींवर टंचाईकाळात गोरगरीब जनतेला पाणी भरता यावे यासाठी या विंधनविहिरी कोठे व कोणत्या वॉर्डामध्ये आहेत, हे जाणून घेणे त्यांना आवश्यक वाटते. त्यासाठी त्यांनी माहिती मागितली होती. परंतु नगरपरिषदेचे अधिकारी ही माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहेत. या सर्व परिस्थितीत त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. १७.१०.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.अपिलार्थीस त्यांनी ही माहिती कोणत्या कागदपत्रांच्या आधारे दिली आहे, असे आयोगाने उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीस विचारले असता, त्यांनी जालना नगर परिषदेच्या कार्यक्षेत्रातील विंधन विहिरींचे रजिस्टर आयोगास दाखविले. या रजिस्टरमध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली सर्व माहिती उपलब्ध आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आज रोजी आयोगास दाखविलेल्या त्यांच्या कार्यालयामध्ये जतन करुन ठेवलेल्या विंधन विहिरीच्या रजिस्टरच्या सर्व पृष्ठांच्या झेरॉक्स त्यांनी अपिलार्थीस दिल्यास, त्यांना त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मिळू शकेल, असे आयोगास वाटते. सबब जन माहिती

अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांच्याकडील विंधन विहिरीच्या रजिस्टरच्या सर्व पृष्ठांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात. तसेच या रजिस्टरमध्ये ज्या विंधन विहिरी बंद असल्याचा उल्लेख आहे, तो उल्लेख ज्या अभिलेख्याद्वारे या रजिस्टरमध्ये नोंदविण्यात आला आहे, अशा सर्व अभिलेख्यांमधील कागदपत्रांच्या प्रती देखील त्यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये पुरवाव्यात, जेणेकरुन अपिलार्थीस पूर्ण माहिती मिळू शकेल.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या लेखी युक्तिवादामध्ये जालना शहरातील काही नागरिकांनी नगरपरिषदेच्या विंधन विहिरीवर अवैधरित्या कब्जा केलेला असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. अपिलार्थीच्या या युक्तिवादामध्ये त्यांनी नेमकी कोणत्या नागरिकांनी नगरपरिषदेच्या विंधन विहिरीवर अवैधरित्या कब्जा केला आहे याचा उल्लेख केलेला नाही. तेव्हा त्यांच्या या मुद्याचे निराकरण होण्याच्या दृष्टीने त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी जालना नगर परिषदेच्या क्षेत्रातील ज्या व्यक्तींनी नगर परिषदेच्या विंधनविहिरींवर अवैधरित्या कब्जा केला आहे, अशा सर्व विंधन विहिरींची यादी त्यांनी आवश्यक त्या पुराव्यासह व तपशीलासह प्रथमतः मुख्याधिकारी यांच्याकडे सादर करावी. यानंतर मुख्याधिकारी, नगरपरिषद, जालना यांनी प्रचलीत नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी, असे मुख्याधिकारी, नगरपरिषद, जालना यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीकडील नगरपरिषदेच्या जतन करुन ठेवलेल्या विंधन विहिरीच्या रजिस्टरची पाहणी करता, हे रजिस्टर अधिकृत आहे की अनधिकृत आहे, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही, कारण या रजिस्टरला कोणताही क्रमांक दिलेला नाही. रजिस्टरच्या प्रत्येक पृष्ठावर पृष्ठ क्रमांक नाही व हे रजिस्टर कोणाच्या ताब्यात आहे, याचा उल्लेख देखील या रजिस्टरच्या कोणत्याही पृष्ठावर नाही. एवढेच नव्हे तर या रजिस्टरची शेवटची पाने फाडलेली आहेत व या रजिस्टरच्या शेवटी लाल शाईने चित्रे देखील रेखाटलेली आहेत. नगरपरिषदेने नागरिकांनी भरलेल्या कराच्या रकमेतून उभ्या केलेल्या मालमत्तेच्या संबंधित

माहितीची ही अवस्था संचालक, नगरपरिषद संचालनालय यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. प्रत्येक नगर परिषदेने त्यांच्या कार्यक्षेत्रात खणलेल्या विंधन विहीरी अथवा तत्सम स्वरुपाची केलेली कामे ही शासनाची व नगरपरिषदेची संपत्ती आहे व ती जतन करुन ठेवणे ही नगरपरिषदेची जबाबदारी आहे व अशाप्रकारे नगरपरिषदेशी संबंधित मालमत्तेची माहिती जतन करुन ठेवण्यासाठी संचालकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व नगर परिषदा/महानगरपालिका यांना आवश्यक त्या सूचना एका परिपत्रकाव्दारे द्याव्यात, असे त्यांना आयोगातर्फे अधिनियमातील कलम १९(८)(क) (चार) प्रमाणे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीतील वर निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे विंधन विहिरीच्या रजिस्टरच्या सर्व पृष्ठांच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अजित किसनलालजी कोठारी, घर नं. २-२०-१५, पारसी गल्ली, बेंझजी रोड,कादृाबाद,जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,पाणी पुरवठा विभाग, नगरपरिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, नगरपालिका संचालनालय,शासकीय परिवहन सेवा इमारत,३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग,सी-फेस,वरळी,मुंबई-३०

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०५
निर्णय दिनांक ०७/११/२००९

१ श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू प्राथमिक शाळा, नोमानियानगर, तरोडा बु., नांदेड : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १६.०५.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २६.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅड रोड, नांदेड.
२) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू प्राथमिक शाळा, नोमानियानगर, तरोडा बु., नांदेड
३) जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०७
निर्णय दिनांक ०७/११/२००९

१ श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट, जि.नांदेड : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, जि.नांदेड

**निर्णय**

श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.१०.२००८रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २६.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅड रोड, नांदेड.
२) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट, जि.नांदेड.
३) जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, जि.नांदेड

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७४१

निर्णय दिनांक ०७-११-२००९

१ श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव, : अपिलार्थी
मु. होंडाळा, पो. दापका (राजा), तालुका मुखेड,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, गुलशन निवासी मतीमंद विद्यालय,
निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा माहितीसाठीचा अर्ज घेण्यास नकार दिला, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्यानंतर अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली त्यामुळे खरी माहिती मिळविण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित, सन १९९७ ते २००५ या कालावधीतील काही माहिती एकूण आठ मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अनुदानापोटी प्राप्त निधी, सदर निधी खर्च केल्याच्या झेरॉक्स प्रती, या काळातील कर्मचा-यांच्या दैनंदिन हजेरीपटाच्या प्रती, ऑडिट रिपोर्ट, विद्यालयातील कर्मचा-यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती, या काळामध्ये समाजकल्याण अधिकारी, विभागीय समाजकल्याण अधिकारी व अपंग आयुक्त, पुणे यांनी तपासणी केलेल्या अहवालाच्या झेरॉक्स प्रती, कर्मचा-यांच्या संच मान्यतेच्या प्रती, या काळामध्ये विद्यार्थ्यांना परिपोषण आहार दिल्याच्या प्रत्येक महिन्यानुसार माहिती, विद्यार्थ्यांचे हजेरीपत्रक प्रत्येक महिन्यानुसार व त्यांचे राहते गाव - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून साक्षांकीत स्वरुपात व रजिस्टर्ड पोस्टाने अपेक्षिली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने ही माहिती मिळण्यासाठी व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यासाठी अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०९-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत संपूर्ण माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १०-१०-२००८ रोजीच्या पत्राद्वारे काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांचा माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांनी नाकारल्याचे म्हटले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी हा अर्ज का नाकारला हे आयोगास त्यांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. याच अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली आहे. अपिलार्थीस निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती प्राप्त झाली आहे त्या माहितीच्या प्रती, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या नाहीत. त्यांनी यासंदर्भात मुख्याध्यापकाच्या त्यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक १०-१०-२००८ रोजीच्या पत्राची एक प्रत सादर केली आहे. तथापि या पत्राबरोबरच्या सहपत्राच्या प्रती त्यांनी आयोगास सादर केलेल्या नाहीत. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत ग्रामसेवकाचे अपिलार्थी दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे. या सर्व प्रकारावरुन आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही दिशाभूल करणारी का वाटत आहे हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, आवश्यक ती कागदपत्रे व पुराव्याअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

प्रसंगावशात् या प्रकरणी आयोगास असेही आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांचा दूरध्वनी क्रमांक ९७६५७६५५४४ असा दिला आहे. याचा अर्थ अपिलार्थी हे दूरध्वनीधारक असतांना ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती कसे आहेत याबाबत आयोग साशंक आहे. सबब गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना अपिलार्थी श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव, रा. होंडाळा, पो. दापका

(राजा), तालुका मुखेड, जिल्हा नांदेड हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे, यासंदर्भात त्यांचेशी संपर्क करुन, सदरचे प्रमाणपत्र दिले गेले आहे किंवा कसे याची चौकशी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत करुन यासंदर्भात आपला अहवाल त्यांनी आयोगास पाठवावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव, मु. होंडाळा, पो. दापका (राजा), तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गुलशन निवासी मतीमंद विद्यालय, निलंगा, तालुका निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड, ता. मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७४२

निर्णय दिनांक ०७-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पुपलवाड नारायण सिताराम व<br>श्री. पुपलवाड भागवत आत्माराम,<br>मु. पो. पाटोदा (त.ब.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही आणि जन अपिलीय अधिकारी यांनी पूर्ण माहिती देण्याचे आदेश देऊनही त्यांना पूर्ण माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबधित सन २००५ ते २००८ या कालावधीतील मोठ्या प्रमाणात व्याप्ती असलेली काही माहिती एकूण १४ मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय लेखी स्वरुपात पारीत न केल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी एक अपिलार्थी हजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे अवगत केले की, जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिका-याला तोंडी सूचना देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले होते. मात्र त्यांना असा कोणताही लेखी आदेश अद्यापपर्यंत प्राप्त झाला नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय न देण्याची कृती पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १४-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी या टप्प्यावर सुनावणी घेऊन आपले लिखित स्वरुपाचे आदेश पारीत करणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अथवा त्यांनी या प्रकरणी नियुक्त केलेले जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन याच कालावधीत

आपले आदेश पारित करावे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी अथवा त्यांनी या प्रकरणी नियुक्त केलेले जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पुपलवाड नारायण सिताराम व
श्री. पुपलवाड भागवत आत्माराम, मु. पो. पाटोदा (त.ब.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७४३

निर्णय दिनांक ०७-११-२००९

१ श्री. धनंजय विठ्ठलराव देशमुख, : अपिलार्थी
मु. पो. तालुका सोनपेठ,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, परळी (वै.),
तालुका परळी (वै.), जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, परळी (वै.),
तालुका परळी (वै.), जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबधित ०१ एप्रिल २००५ ते ३० जून २००८ या कालावधीशी संबधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. यानंतर त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना परत दिनांक ०६-१०-२००८ रोजी स्मरणपत्र दिले. तथापि याहीनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील तक्रारीच्या चौकशीचा अहवाल हा मुद्दा, अपिलार्थीने मागणी केलेले अहवाल अपिलार्थीस प्राप्त न झाल्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १५-०९-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परळी (वै.), तालुका परळी (वै.), जिल्हा बीड यांनी या टप्प्यावर सुनावणी घेऊन आदेश पारीत करणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परळी (वै.), तालुका परळी (वै.), जिल्हा बीड यांनी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-०९-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन याच कालावधीत आपले आदेश पारित करावे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार

अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

प्रसंगावशात् सचिव (कृषि) यांच्या असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, कृषि विभागातील बहुसंख्य जन अपिलीय अधिकारी हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) प्रमाणे प्राप्त होणा-या अपील अर्जावर कोणताही निर्णय देत नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अपील अर्जावर त्यांनी सुनावणी घेऊन आदेश पारीत करणे अभिप्रेत आहे. तेव्हा या प्रकरणी त्यांनी त्यांच्या स्तरावर त्यांच्या विभागातील सर्व जन अपिलीय अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना त्वरीत जारी कराव्यात असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परळी (वै.), तालुका परळी (वै.), जिल्हा बीड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-०९-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. धनंजय विठ्ठलराव देशमुख, मु. पो. तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, परळी (वै.), तालुका परळी (वै.), जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परळी (वै.), तालुका परळी (वै.), जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (कृषि), महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७४४

निर्णय दिनांक ०७-११-२००९

१ श्री. भाऊसाहेब ज्ञानोबा पाटील, : अपिलार्थी
पाटील गल्ली, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, लिंबा,
तालुका पाथरी, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाथरी,
तालुका पाथरी, जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाथरी यांच्यातर्फे अपिलार्थीच्या आयोगास उद्देशून लिहिलेल्या दिनांक १२-१०-२००९ रोजीच्या पत्राची एक सत्यप्रत आयोगास सादर करण्यात

आली असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, लिंबा, तालुका पाथरी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे व यासंदर्भात त्यांची ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, लिंबा, तालुका पाथरी यांच्याबद्दल कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक ०२-०१-२००९ रोजी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज केल्यानंतर, प्राप्त झाल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीस आता जरी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असली तरी या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १६-०७-२००८ रोजीच्या अर्जानुसार त्यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दिनांक ०२-०१-२००९ रोजी म्हणजे अंदाजे पाच ते साडेपाच महिने इतक्या विलंबाने जन माहिती अधिकारी यांनी पुरविल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता ही माहिती अपिलार्थीस देणे हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या आवाक्याच्या बाहेर होते असे आयोगास वाटत नाही. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा विलंबाने देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना करण्यात येत आहे.

यासंदर्भात उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला की, अपिलार्थीस त्यांनी माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क भरणा करण्याचे दिनांक २५-०७-२००८ रोजी सूचित केले होते व अपिलार्थीच्या प्रथम अर्जातील उणिवा त्यांच्या नजरेस आणल्या होत्या. परंतु अपिलार्थीने त्या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे केला नाही. नंतर स्वखर्चाने ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून त्यांना आवश्यक असलेली माहिती दिनांक ०२-०१-२००९ रोजी घेऊन गेले.

या प्रकरणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील न करता आयोगाकडे सरळ व्दितीय अपील सादर केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. या सर्व बाबी पाहता, विशेषतः अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भाऊसाहेब ज्ञानोबा पाटील, पाटील गल्ली, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, लिंबा, तालुका पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७४५

निर्णय दिनांक ०७-११-२००९

१ श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर, : अपिलार्थी
मु. पो. स्वयंभु निवास, जैनपुरा, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण,
तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण,
तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, पैठण,
तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी सात दिवसाच्या आत माहिती पुरविण्याचा निर्णय देऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून आणि अपिलार्थीस

मानसिक त्रास देण्याच्या उद्देशाने व ही माहिती उघड होऊन भ्रष्टाचार जनसामान्यासमोर येऊ नये म्हणून अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले आहे, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये करण्यात आलेल्या कामांच्या संदर्भात एकूण दहा मुद्दयाव्दारे काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १००० इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता "अपिलार्थीस माहिती देण्यासाठी नकार" या कारणास्तव अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-११-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे माहिती अधिकारी यांना आदेशित केले. परंतु यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती विनामूल्य प्राप्त व्हावी व या प्रकरणी त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी टाळले असल्यामुळे त्यांच्यावर शास्तीची कार्यवाही व्हावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केलेली

असतांना माहिती घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः किती वेळा उपस्थित राहिले या संदर्भातील पुराव्याविषयी, आयोगाने त्यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांनी अशा प्रकारचा कोणताही पुरावा आयोगासमोर सादर न करता त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर केले व माहिती प्राप्त करुन घेण्यात आली तोच जन माहिती अधिकारी यांच्याकडे ते व्यक्तिशः उपस्थित राहिल्याचा पुरावा म्हणून मानावा अशी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १०-११-२००८ रोजी त्यांनी मागणी केलेली माहिती देऊ केली असता, सदरील माहिती अपूर्ण असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने ती माहिती स्वीकारण्यास नकार दिला. यावेळी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस देऊ केली होती. मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यावेळी त्यांच्या कार्यालयातील संबंधित लिपीक रजेवर असल्याने ते अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती देऊ शकले नाहीत. ती माहिती त्यांनी आता बरोबर आणली असून ते आता ती अपिलार्थीस देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने दिनांक १६-०९-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. तथापि अपिलार्थीने माहितीसाठीचा प्रथम अर्ज पूर्णतः भरलेला नाही. त्यामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे यासंदर्भात कोणतीही माहिती दिलेली नाही व व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे असे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज सादर केल्यानंतर ही माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी अर्जदार यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः उपस्थित राहून ही माहिती प्राप्त करुन घेणे सर्वसाधारणपणे अभिप्रेत

आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने ते ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिल्याचा कोणताही पुरावा आयोगासमोर सादर केलेला नाही. अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्यांनी दिनांक १७-१०-२००८ रोजी प्रथम अपील अर्ज सादर केला त्यावेळी त्यांनी व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती परंतु, याचा अर्थ ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिशः उपस्थित राहिले असा होत नाही. या प्रकरणी आयोगास असेही आढळून आले आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे या संपूर्ण घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर नाकारले नाही. जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे १००० रुपये इतके शुल्क भरण्याचे सूचित केले व शुल्क भरल्यानंतर माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले असल्याचे सिध्द होत नाही. अपिलार्थीस प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी माहिती अधिकारी यांनी माहिती देऊ केली असता, ती माहिती अपूर्ण असल्याच्या कारणास्तव अपिलार्थीने ती स्वीकारण्याचे नाकारले. जर अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये स्वारस्य असते तर त्यांनी ही माहिती त्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेतली असती. जर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यावेळी अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले होते तर त्यांना लगेच आयोगाकडे त्याप्रमाणे व्दितीय अपील करण्यास कोणताही मज्जाव केला नव्हता. तथापि त्यांनी मूळ अर्जाच्या दहा पैकी नऊ मुद्दयावरील माहितीचा स्वीकार करण्यास नकार दिला. यावरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये खरोखरच स्वारस्य आहे किंवा कसे याबाबत आयोग साशंक आहे. आज रोजी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याबरोबर आणली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दिनांक १५-१०-२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता, या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना कळवितांना अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे ज्याप्रकारे प्रतिसाद देणे

आवश्यक आहे त्याप्रकारे तो दिलेला नाही. या पत्रामध्ये त्यांनी माहितीपोटीच्या शुल्काचा आवश्यक तो तपशील न देऊन अधिनियमातील कलम ७ (३) (क) चा भंग केला आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती विनामूल्य देय होत आहे. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी ही माहिती संबधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः प्राप्त करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीस त्यांच्या प्रतिनिधीमार्फत जन माहिती अधिकारी यांच्याकडून अनुज्ञेय असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थी त्यांच्या युक्तिवादामध्ये, ते या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना शास्तीचे आदेश निर्गमित करण्याबाबत जास्त आग्रही असल्याचे दिसून येते. तथापि यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे असद्‌हेतुने टाळले असल्याचे अथवा अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दुष्ट हेतूने दडवून ठेवली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई करण्याची मागणी आयोग अमान्य करत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर, मु. पो. स्वयंभु निवास, जैनपुरा, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७४६

निर्णय दिनांक ०७-११-२००९

१ सौ. शालीनी शंकर राठोड, : अपिलार्थी

रा. साईनगर, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट,

तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट, तालुका किनवट,

जिल्हा नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, बोधडी (बु.), तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००५ जानेवारी ते २००८ जून या

कालावधीतील त्यांच्या कार्यालयातर्फे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार योजना, पाणलोटक्षेत्र, मराठवाडा विकास मिशन व मानव विकास मिशन या योजनांतर्गत केलेल्या कामांच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती या योजने अंतर्गत केल्या गेलेल्या नाला सरळीकरण कामे, अर्दन स्ट्रक्चर कामे, अनगड दगडी बांधकामे, शेती सपाटीकरण कामे या कामांच्या संदर्भात मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती मंडळनिहाय, गावनिहाय मागितली असून यामध्ये कामाच्या मोजमाप पुस्तिका व मजुरांची वस्तुनिष्ठ माहिती या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे मुदतीच्या आत तयार होती. तथापि अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही त्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित राहिल्या नाहीत. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी दिनांक ०५-११-२००८ रोजी अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीची पोचसही आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०५-११-२००८ रोजी माहिती मिळाल्याचे सिध्द होत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जर अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती अपेक्षिली असेल तर त्यांनी मागितलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हस्तगत करुन घेण्याची पूर्ण जबाबदारी संबंधित अर्जदाराची असते. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्या व्यक्तिशः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात किती वेळा उपस्थित राहिल्या यासंदर्भात कोणताही पुरावा त्यांनी जोडलेला नाही अथवा यासंदर्भात तोंडी स्पष्टीकरण करण्यासाठी व जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी त्या आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०५-११-२००८ रोजी प्राप्त झालेल्या माहितीवर त्यांनी आयोगाकडे त्यांचे कोणतेही लेखी अभिप्राय आजातागायत पाठविलेले नाहीत. हे पाहता अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झाली असल्याचे दिसून येते. तसेच जरी ही माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्राप्त झाली असली तरीही अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती हस्तगत करुन घेण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला याचा कोणताही पुरावा आयोगास सादर केला नसल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०७-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. शालीनी शंकर राठोड, रा.साईनिवास, साईनगर, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, बोधडी (बु.), तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०६
निर्णय दिनांक ०७/११/२००९

१ श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
सना उर्दू प्राथमिक शाळा, नोमानियानगर,
तरोडा बु., नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १६.०५.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २६.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३४ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅंड रोड, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू प्राथमिक शाळा, नोमानियानगर, तरोडा बु., नांदेड
**३.** जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्र.१८७३/०८ व १८७४/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८७३ व १८७४
निर्णय दिनांक: ०९-११-२००९

१. श्री. राधाकृष्ण राजाराम गायकवाड, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
औरंगाबाद.

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.११.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले क्र. १८७३/०८ व १८७४/०८ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

**अपील क्र.१८७३/०८ :**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागास क्षेत्र अनुदान निधी (B.R.G.F.) योजनेत निवड झालेल्या सदस्यांची नावे व निवडतांना केलेल्या निकषांची छायाप्रत, ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०१.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क प्रतिपृष्ठ रु.२/- या दराने एकूण रु.२७८/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने या शुल्काचा भरणा चलनाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १६.०९.२००८ रोजी केला. अपिलार्थीकडून आवश्यक ते शुल्क प्राप्त झाल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. २२.०९.२००८ रोजी माहिती दिली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.११.२००८ रोजी आपले लेखी आदेश पारीत केले. या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ८ दिवसांच्या आत उर्वरित माहिती देण्याचे आदेशित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २२.१०.२००८ रोजी या सदस्यांची माहिती अपिलार्थीस पाठविली. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली. परंतु ही माहिती उशिरा प्राप्त झाल्याने व प्राप्त माहितीने समाधान झाले नसल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे आवश्यक त्या शुल्काचा दि. १६.०९.२००८ रोजी भरणा करुनही दि. २२.०९.२००८ रोजी अपूर्ण माहिती दिली व आयोगाकडे द्वितीय अपील करण्याच्या सुमारास दि. २२.१०.२००८ रोजी सदस्यांची नावे त्यांना कळविली. जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी ज्या सदस्यांना या योजनेअंतर्गत सहाय्य केले आहे, त्यापैकी या यादीतील अब्दुल सलाम पठाण, ग्रामीण विकास सदस्य या सदस्यास ते निकषात पात्र नसूनही जिल्हा परिषदेने त्यांना सहाय्य केले आहे. यासंदर्भात आयोगाने जिल्हा परिषदेला आदेश द्यावेत, अशी अपेक्षा अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये केली.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी प्रथमतः दि. २२.०९.२००८ रोजी व तदनंतर दि. २२.१०.२००८ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी दि. १६.०९.२००८ रोजी भरले आहे. अधिनियमातील कलम ७(३)(क) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्याची अंतिम मुदत दि. २५.०९.२००८ रोजी संपते, परंतु या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अपूर्ण माहिती दिली, उर्वरित माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी झाल्यानंतर दि. २२.१०.२००८ रोजी म्हणजेच अंतीम मुदतीनंतर दिली आहे, त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य देय होत आहे. हे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले संपूर्ण शुल्क त्यांना परत करावे

लागेल. हे शुल्क त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत परत करावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीबद्दल काही आक्षेप असून त्यांचे म्हणणे असे आहे की, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी बीआरजीएफ या योजनेअंतर्गत विहित निकषांची पूर्तता न करणाऱ्या संस्थेला शासकीय योजनेचा लाभ दिला आहे. या मुद्यावर अपिलार्थीस आयोगाकडून आदेश अपेक्षित असल्याचे त्यांच्या युक्तिवादावरुन आढळून येत आहे. तथापि या मुद्यावर त्यांना असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीस आयोगाकडून ज्या मुद्यावर आदेश अपेक्षित आहे, तो मुद्दा पूर्णतः प्रशासकीय स्वरुपाचा आहे आणि सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रशासकीय बाबीमध्ये अशाप्रकारे हस्तक्षेप करण्याची अथवा सार्वजनिक प्राधिकरणाचा निर्णय बदलण्याची अथवा सुधारण्याची अधिकारिता आयोगाच्या कार्यकक्षेत येत नसल्यामुळे, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर जर काही आक्षेप असतील तर त्या आक्षेपांचे निराकरण त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडून अथवा न्यायालयाकडून करुन घ्यावे, असे त्यांना सूचविण्यात येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीपुरते या प्रकरणी पहावयाचे झाल्यास, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडून आवश्यक त्या शुल्काचा स्वीकार करुनही प्रथमतः अपूर्ण व विहित मुदतीनंतर उर्वरित माहिती दिली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटी स्वीकारलेल्या शुल्काची रक्कम त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीच्या स्वीकारलेल्या शुल्काची रक्कम त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावी.

**अपील क्र. १८७४/०८:**

सदर अपीलामध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून योग्य माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे केल्याचे या अपील अर्जात नमूद केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "टी.टी.सी., औरंगाबाद येथे सन २००१ ते २००८ पर्यंत प्रशिक्षण दिलेल्या प्रशिक्षणार्थींची नावे व पत्ते, प्रशिक्षणार्थींना अदा केलेली रक्कम,मानधन अदा करण्याचे शासनाचे निकष, अदा केलेल्या मानधनाच्या रकमेचा धनादेश", याची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.०८.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या २७ पृष्ठाकरिता प्रतिपृष्ठ रु.२/- या दराने चलनाव्दारे शुल्काचा भरणा कोषागारात करुन सदर चलनाची प्रत त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले. या प्रमाणे अपिलार्थीने दि. ०१.०९.२००८ रोजी या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे चलनाद्वारे केल्यानंतर अपिलार्थीस दि. ०२.०९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २०.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.११.२००८ रोजी निर्णय देऊन या विषयावरील शासन निकषांच्या परिपत्रकाच्या व मार्गदर्शक सूचनांच्या प्रती अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन

माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २०.११.२००८ रोजी त्यांच्या घरी माहिती पाठविली. परंतु अपिलार्थीने या माहितीचा स्वीकार न केल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०२.०१२.२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने ही माहिती परत पाठविली. परंतु अपिलार्थीने या माहितीचा स्वीकार केला नाही व सदरचे रजिस्टर्ड पत्राचे पाकीट जन माहिती अधिकारी यांना विनातामिली परत प्राप्त झाले. मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दि.०९.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दि. ०२.०९.२००८ रोजी माहिती दिली. त्यांना दिलेली माहिती अपूर्ण स्वरुपात होती. तदनंतर प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती देऊ केली होती. परंतु त्याचवेळी आयोगाकडे द्वितीय अपील केले असल्यामुळे त्यांनी या माहितीचा स्वीकार केला नाही. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर असा आक्षेप घेतला आहे की, जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती बरोबर नसून आता प्रशिक्षणार्थी म्हणून ज्या मुलांची नावे दिली आहेत, ती सर्व नावे खोटी आहेत. शासनाचे संबंधित प्रशिक्षणार्थींना चेकद्वारे मानधन अदा करण्याचे निर्देश असताना देखील जन माहिती अधिकाऱ्याने ही रक्कम संबंधित प्रशिक्षणार्थींना रोखीच्या स्वरुपात वाटली आहे. यासंदर्भात आयोगाने त्यांना आदेश द्यावेत, अशी अपेक्षा अपिलार्थीने आपल्या युक्तिवादामध्ये शेवटी व्यक्त केली.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठवूनही अपिलार्थीने ही माहिती न स्वीकारल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्याकडून संपूर्ण माहितीचे शुल्क स्वीकारुनही त्यांना अपूर्ण माहिती व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी दिलेल्या निर्देशानंतर त्यांनी अपिलार्थीस काही माहिती दिली आहे. अशाप्रकारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक असलेली माहिती दि. २.९.२००८ व २०.११.२००८ अशा दोन टप्प्यामध्ये पुरविल्याचे दिसून येत आहे. केवळ राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले असल्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती स्वीकारली नाही, ही अपिलार्थीची भूमिका आयोगास अयोग्य वाटते. त्यांनी या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती प्रथमतः स्वीकारणे या प्रकरणी उचित राहिले असते. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीबद्दल अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये काही आक्षेप घेतले आहेत. अपिलार्थीचे म्हणणे असे असे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीतील कित्येक प्रशिक्षणार्थी हे केवळ नावाकरिता दर्शविले असून ही नावे खोटी आहेत. तसेच प्रशिक्षणार्थींना मानधन वाटप करतांना जन माहिती अधिकारी यांनी अनियमितता केलेली आहे, यावर आयोगाने आपले आदेश पारित करावेत, या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरणाच्या अशाप्रकारच्या प्रशासकीय बाबीमध्ये हस्तक्षेप करणे, आयोगाच्या अधिकार कक्षेत येत नाही. त्यामुळे अपिलार्थीस या मुद्यावर त्यांच्या तक्रारीची जर तड लावून घ्यावयाची असेल तर त्यांनी सार्वजनिक प्राधिकरणाच्या वरिष्ठतम अधिकाऱ्याकडे अथवा अन्य वेगळया यंत्रणेकडे आपली तक्रार नोंदवून आपल्या शंकांचे निरसन करुन घ्यावे, असे त्यांना या प्रकरणी सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीस, त्यांच्याकडील माहितीपोटीचे संपूर्ण शुल्क घेऊनही प्रथम अपूर्ण व तदनंतर विलंबाने माहिती दिल्याचे सिध्द होत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलेले

शुल्क त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे. अपिलार्थीस द्यावयाच्या उर्वरित माहितीबद्दल जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेण्याकरिता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहावे लागेल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी स्वीकारलेल्या शुल्काची संपूर्ण रक्कम त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावी.

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राधाकृष्ण राजाराम गायकवाड,रा.विष्णूनगर, आकाशवाणीच्या पाठीमागे,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८७५
निर्णय दिनांकः ०९-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री.हेमंत श्रावण खोतकर,<br>रा.पडेगाव, ता.जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे, जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, जालना | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही संबंधित माहिती अधिकाऱ्याने त्यांना माहिती न पुरविल्यामुळे व माहिती अधिकार कायद्याचा भंग केल्याने त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १५.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००७-०८ या कालावधीतील, जालना जिल्हयातील रो.ह.यो.अंतर्गत चालू असलेल्या व झालेल्या पाझर तलावाच्या संदर्भात माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- काम सुरु झाल्याचा दिनांक, दानपत्र,

अंदाजपत्रके, हजेरीपत्रक, प्रशासकीय मान्यता व कामाची सद्य:स्थिती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने हा अर्ज कार्यकारी अभियंता, ल.पा., जि.प.जालना यांना उद्देशून केला होता. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही उपअभियंत्यांशी संबंधित असल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम ६(३) (एक) च्या तरतुदीनुसार दि. १६.०७.२००८ रोजी, अपिलार्थीच्या अर्जाच्या प्रती संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जालना,परतूर,अंबड व भोकरदन यांच्याकडे पाठविला. तथापि अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०९.२००८ रोजी निर्णय देऊन उप अभियंता परतूर, भोकरदन व अंबड यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती द्यावयाचे सूचित केले. परंतु यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थीने विचाराधीन अपील अर्जामध्ये त्यांनी केलेल्या विनंतीशी सुसंगत युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील तालुका स्तरावरील उपअभियंता जालना, परतूर, अंबड व भोकरदन यांच्याकडे उपलब्ध होती. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीचा अर्ज सर्व संबंधित उपअभियंत्यांकडे दि. १६.०७.२००८ रोजी पाठविला. या उपअभियंत्यांपैकी जालना उपविभागाच्या उपअभियंत्याने दि. ०५.०८.२००८ रोजी अपिलार्थीच्या मूळ अर्जास प्रथम प्रतिसाद

देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ११,२४०/- इतके त्यांना कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न केल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. उपअभियंता, अंबड यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास दि. १८.०८.२००८ रोजी प्रतिसाद दिला. उपअभियंता, परतूर यांनी अपिलार्थीस दि. ०१.०८.२००८ रोजी आवश्यक ती माहिती दिली असून यासंदर्भात अपिलार्थीची पोचसही त्यांच्याकडे उपलब्ध आहे. उपअभियंता, भोकरदन यांनी अपिलार्थीस दि. ०४.०९.२००८ रोजी माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने ही माहिती स्वीकारण्यास इन्कार केला. या मुद्यावर अपिलार्थीने असे सूचित केले की, यानंतर दि. २५.०९.२००८ रोजी उपअभियंता, भोकरदन यांच्याकडे गेले असता, कार्यालयामध्ये कोणीही उपस्थित नव्हते व तसे पत्र त्यांनी भोकरदन उपविभागात दिलेले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास उपअभियंता, जालना यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये आवश्यक तो प्रतिसाद अपिलार्थीस देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी अपिलार्थीस भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न केल्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही. अपिलार्थीस उपअभियंता, जालना यांनी दि. ०५.०८.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद दिला आहे तथापि या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस या शुल्काचा तपशील - जो त्यांनी अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे अपिलार्थीस देणे अनिवार्य होते तो - दिलेला नाही. त्यामुळे त्यांना आता अपिलार्थीस विनामूल्य माहिती द्यावी लागेल. उपअभियंता, परतूर यांच्याकडून अपिलार्थीस दि. ०१.०८.२००८ रोजी आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे व तशी अपिलार्थीची पोचसही जन माहिती अधिकारी यांनी आयोगास उपलब्ध करुन दिली आहे. भोकरदन उपविभागातील उपअभियंता यांनी अपिलार्थीस दि. ०४.०९.२००८ रोजी देऊ केली असता सदर माहिती स्वीकारण्यास अपिलार्थीने इन्कार केला, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तर अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, त्यांनी

माहिती घेण्यासाठी अशाप्रकारे कधीही नाकारले नाही. उपअभियंता, अंबड यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीनंतर प्रथम प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. हे पाहता, उपअभियंता, जालना,अंबड व भोकरदन यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यामुळे ते भोकरदन येथील कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहिल्याचा पुरावा त्यांनी आयोगास सादर केलेला आहे. त्यामुळे उपअभियंता, भोकरदन यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता जालना,अंबड व भोकरदन यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांच्या आत त्यांना विनामूल्य व व्यक्तिशः दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.हेमंत श्रावण खोतकर,गुलमोहर कॉलनी, पडेगाव, ता.जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपअभियंता, लघुपाटबंधारे जि.प.उपविभाग अंबड / भोकरदन, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८७६
निर्णय दिनांकः ०९-११-२००९

१. श्री.प्रफुल्लबुवा रंगनाथबुवा तळेगावकर, : अपिलार्थी
रा.पैठण, जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १३.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "माझे अर्ज दि.०८.०८.२००१, १७.०८.२००१, ०८.११.२००२, ०६.१२.२००२, १४.०१.२००३ व २३.०२.२००३ यावर झालेल्या कार्यवाहीची माहिती" अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. /९/२००८ च्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की, "आपण ज्या विषयावर माहिती मागितली आहे, त्याविषयासंदर्भात सन २००१-२००३ पर्यंतच्या अभिलेखाचा शोध घेतला. सदरील अर्ज आढळून येत नसून त्यासंदर्भात आपण या कार्यालयात दिलेल्या अर्जाच्या पोचपावत्या या कार्यालयास सादर कराव्यात, म्हणजे प्रकरणात पुढील कार्यवाही करणे सुलभ होईल." जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी अपिलार्थीस उद्देशून दिलेल्या या पत्रावर जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांची स्वाक्षरी नाही तसेच ज्या दिवशी हे पत्र निर्गमित करण्यात आले होते त्या दिवसाच्या दिनांकाचा या पत्रावर उल्लेख नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.१०.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील नामंजूर केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या दि.२०.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस प्राप्त झालेल्या पत्रावर जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांची स्वाक्षरी नाही. या

पत्रावर दिनांक नाही व जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्याने हे पत्र जन माहिती अधिकारी या नात्याने पाठविले आहे किंवा कसे, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीस त्यांनी दि. २०.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिल्याचे आयोगास अवगत केले आहे. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या विनादिनांकाच्या पत्राची प्रत व आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये नमूद केलेल्या दि. २०.०९.२००८ रोजीच्या पत्राची प्रत यामध्ये आयोगास पूर्णतः विसंगती आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.०९.२००८ रोजी अपिलार्थीस दिलेल्या पत्राचे अवलोकन करता, यामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या अर्जातील काही मुद्यांचा स्पष्ट बोध होत नसल्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दि. २५.०९.२००८ रोजी स्वतः हजर राहण्याचे सूचित केले होते, असे दिसून येते. मूळात या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे माहिती मागितली असता, अशाप्रकारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात हजर राहण्याचे सूचित करण्याची त्यांची कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने सादर केलेल्या कागदपत्रांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करुन जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्याच्या दि.२०.०९.२००८ रोजीच्या पत्रावर विसंबून राहिल्याचे त्यांच्या निर्णयावरुन आढळून येत आहे.

अपिलार्थीने ज्या माध्यमाद्वारे माहिती मागितली आहे, त्याच माध्यमाद्वारे अपिलार्थीस माहिती देणे या अधिनियमामध्ये अभिप्रेत असताना अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दि. २५.०९.२००८ रोजी व्यक्तिशः उपस्थित राहण्याचे सूचित केले आहे. या प्रकरणाशी संबंधित वस्तुस्थिती व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीचा दि. १३.०८.२००८ रोजीचा अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अतिशय निष्काळजीपणे हाताळल्याचे आयोगास आढळून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः विनादिनांकाच्या व विनास्वाक्षरीच्या पत्राने प्रथम प्रतिसाद दिला तर आता आयोगाकडे सादर केलेले दि. २०.०९.२००८ रोजीचे पत्र पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात हजर राहण्याचे सूचित केले आहे. या दोनही पत्रांचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली कोणतीही माहिती दिली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या अर्जावर जर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नसेल तर त्यांनी तसे अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये स्पष्टपणे कळविण्यास काहीही हरकत नव्हती. तथापि तसेही त्यांनी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस कळविल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच त्यांना सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा दि. १३.०८.२००८ रोजीचा प्रथम अर्ज निष्काळजीपणे हाताळून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची सचिव (महसूल) यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०९-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.प्रफुल्लबुवा रंगनाथबुवा तळेगावकर,श्री अमृतराय संस्थान, नाथगल्ली, पैठण जि. औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८७७
निर्णय दिनांक ०९/११/२००९

१ श्री. कंधारकर महंमद शहेजादा महंमद सुलतान, : अपिलार्थी
रा.मुदखेड, जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, धर्माबाद, जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
तहसील कार्यालय, धर्माबाद, जि.नांदेड

**निर्णय**

श्री. कंधारकर महंमद शहेजादा महंमद सुलतान यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०३.०३.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १४.०५.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १४.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १११ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. कंधारकर महंमद शहेजादा महंमद सुलतान, मुखेड तालुका सरचिटणीस, लोकभारती, नवी आबादी, मुदखेड, ता.मुदखेड, जि.नांदेड.
२) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, धर्माबाद, ता.धर्माबाद, जि.नांदेड.
३) जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद, ता.धर्माबाद, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८७८
निर्णय दिनांक ०९/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. कंधारकर महंमद शहेजादा महंमद सुलतान, रा.मुदखेड, जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड | | |

**निर्णय**

श्री. कंधारकर महंमद शहेजादा महंमद सुलतान यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०३.०३.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १४.०५.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १४.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १११ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. कंधारकर महंमद शहेजादा महंमद सुलतान, मुखेड तालुका सरचिटणीस, लोकभारती, नवी आबादी, मुदखेड, ता.मुदखेड, जि.नांदेड.
२) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड.
३) जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८७९
निर्णय दिनांक ०९/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. नवनाथ दगडू नाईकवाडे,<br>रा.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, बीड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, बीड | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. नवनाथ दगडू नाईकवाडे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ११.०३.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ११.०९.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १६.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. नवनाथ दगडू नाईकवाडे, लाईन गल्ली, कारंजा रोड, बीड, ता.जि.बीड.
२) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड.
३) जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८८०
निर्णय दिनांक ०९/११/२००९

१ श्री. रामचंद्र विजयकुमार देशपांडे, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपकुलसचिव (शैक्षणिक),
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : संचालक,
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद.

**निर्णय**

श्री. रामचंद्र विजयकुमार देशपांडे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १३.०६.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २४.०९.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १९.१०.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत  द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते.  तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ११५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक :     ०९/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. रामचंद्र विजयकुमार देशपांडे, सात चौक वाडा, सराफा रोड, बीड, ता.जि.बीड- ४३१ १२२.
२) जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (शैक्षणिक), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
३) जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८८१
निर्णय दिनांक ०९/११/२००९

१ श्रीमती. सुमनबाई भ्र. ब. सो. साठे, : अपिलार्थी
रा.माकणी, ता.लोहारा, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, उमरगा, जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

श्रीमती. सुमनबाई भ्र.ब.सो.साठे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०३.०७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २८.०७.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २५.०९.२००६ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४८९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्रीमती. सुमनबाई भ्र.ब.सो.साठे, मु.पो.माकणी, ता.लोहारा, जि.उस्मानाबाद
२) जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद
३) जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८८२
निर्णय दिनांक ०९/११/२००९

१ श्री. राजकुमार माधवराव कोरेकर, : अपिलार्थी
मु.पो. मंगरुळ, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषी अधिकारी,
उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी,
उस्मानाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषी अधिकारी,
तालुका कृषी कार्यालय, उस्मानाबाद

**निर्णय**

श्री. राजकुमार माधवराव कोरेकर यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४.०४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.०९.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक ०९.१०.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर दिनांक २७.११.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करुन माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ३८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**लातूर**
**दिनांक : ०९/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. राजकुमार माधवराव कोरेकर, मु.पो. मंगरुळ, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद
२) जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी कार्यालय, उस्मानाबाद
३) जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, तालुका कृषी कार्यालय, उस्मानाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८३५
निर्णय दिनांक ०९/११/२००९

१ श्री. म.फारुक बाबु तगाले, : अपिलार्थी
रा.किनवट, जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तहसील कार्यालय, किनवट, जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
तहसील कार्यालय, किनवट, जि.नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नागरी पुरवठा तपासणी अधिकारी,
तहसील कार्यालय, किनवट, जि.नांदेड

**निर्णय**

श्री. म.फारुक बाबु तगाले यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १८.०७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०४.०३.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०६.०५.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३१३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. म.फारुक बाबु तगाले, बाबा रमजान गल्ली, किनवट, ता.किनवट, जि.नांदेड.
२) जन माहिती अधिकारी तथा नागरी पुरवठा तपासणी अधिकारी, तहसील कार्यालय, किनवट, जि.नांदेड
३) जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १८६९/२००८, १८७०/२००८ व १८७१/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८६९, १८७० व १८७१

निर्णय दिनांक ०९-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. सोमीनाथ दगडू थोरात,<br>रा. आंबेगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, आंबेगांव,<br>तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,<br>तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-११-२००८ रोजी नोंदविलेली तीन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या तीनही व्दितीय अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित वेळेत माहिती न मिळाल्यामुळे आणि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या विचाराधीन अपिलांशी संबंधित अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०१-०७-२००८ रोजीच्या तीनही मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामाशी संबंधित वेगवेगळ्या तीन अर्जांव्दारे अनुक्रमे सन २००६ ते २००७, २००६ ते दि. ०१-०७-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने या तीनही अर्जाद्वारे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या तीनही अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०७-२००८ रोजीच्या एकाच पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस तीनही अर्जाद्वारे आवश्यक असलेल्या एकूण सर्व माहितीचे २३२० रुपये इतके शुल्क भरण्याचे सूचित केले. परंतु जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०८-२००८ रोजी प्रथम अपिले केली. अपिलार्थीच्या या तीनही अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०९-२००८ रोजी अपिलार्थीस दिनांक २५-०९-२००८ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०३-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी या तीनही अपील प्रकरणांशी संबंधित अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात सादर केला असून त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती भ्रष्टाचार उघड होण्याच्या भीतीने ग्रामसेवकाने दडवून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामसेवक हे त्यांच्या कामात मनमानी, हलगर्जीपणा व लापरवाही करतात असे आढळून आले आहे. त्यामुळे त्यांच्या

मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना मोफत देण्याचे आयोगाने आदेशित करावे आणि ग्रामसेवक यांच्याविरुध्द अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी व तसेच ग्रामसेवकाची विभागीय चौकशी करण्याचे आदेशित करावे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थीस त्यांनी शुल्क भरण्याचे पत्र पाठविले असता त्या पत्रातील सूचनेप्रमाणे अपिलार्थीने शुल्काचा भरणा केला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार आहे व ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत. अपिलार्थीपासून माहिती दडविण्याचा त्यांचा कोणताही हेतू नव्हता.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची व्यक्तिशः मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः आवश्यक असेल तर त्यांनी या माहितीसंदर्भात, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केल्यानंतर प्रत्येक घडामोडी ज्ञात होण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वतः होऊन संपर्क साधणे गरजेचे आहे. आज रोजी अपिलार्थीस ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता उपस्थित राहिल्यासंदर्भात त्यांच्याकडे एखादा पुरावा आहे का असे आयोगाने विचारले असता, अशा प्रकारचा पुरावा त्यांच्याकडे नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार तीन स्वतंत्र प्रथम अर्ज केले असता जन माहिती अधिकारी यांनी मात्र या तीनही अर्जास एकाच दिनांकास दिनांक २६-०७-२००८ च्या एकाच पत्राव्दारे प्रतिसाद देऊन आवश्यक ते शुल्क भरणा करण्याचे अपिलार्थीस

सूचित केले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रत्येक अर्जाची तीनही प्रकरणे त्यांनी स्वतंत्र ठेवणे गरजेचे होते. आता जन माहिती अधिकारी यांच्या या तांत्रिक त्रुटीमुळे अपिलार्थी यांना विनामूल्य माहिती त्यांना द्यावी लागेल.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या व्दितीय अपील क्रमांक १८७०/२००८ शी संबंधित प्रथम अर्जान्वये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे " जमा झालेल्या एकूण निधीचा २२ १/२ % रक्कम दलित वस्तीवरती आतापर्यंत खर्च का करण्यात आली नाही " अशा प्रकारची माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात देण्यासंदर्भात कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये समाविष्ट आहे. या अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या निर्णयाबाबत कारणे मागणे अथवा खुलासे, स्पष्टीकरण अपेक्षित करणाऱ्या स्वरुपात माहिती मागणे मूळात अभिप्रेत नाही. त्यामुळे या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. उर्वरित दोनही अपील अर्जासंबंधीच्या प्रथम अर्जाव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना ती अपिलार्थीस द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त तीनही प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या अपील क्रमांक १८६९/२००८ व १८७१/०८ च्या संबंधीत प्रथम अर्जातील संपूर्ण माहिती व अपील क्रमांक १८७०/२००८ शी संबंधीत प्रथम अर्जामधील " खर्च का करण्यात आला नाही त्याची कारणे " हा भाग वगळता उर्वरित सर्व मुद्दयांची माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. अपिलार्थीने या तीनही प्रकरणी संबंधित तीनही अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून कार्यालयीन वेळेत व पूर्वनियोजित वेळी त्यांच्या कार्यालयात स्वतः हजर राहून जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी लागेल. या कालावधीनंतर

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती विनामूल्य देय असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या लेखी युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि यासंदर्भात आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक तो प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीकडे, ते स्वतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती घेण्यासाठी उपस्थित राहिल्याचा, कोणताही पुरावा नाही. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी त्यांनी मागणी केलेली माहिती सशुल्क प्राप्त करुन घेण्यासाठी या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर तयार नव्हते व त्यामुळे त्यांना माहिती प्राप्त होत नव्हती. हे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली असल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्यासाठीची अपिलार्थीची विनंती आयोग अमान्य करत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली तीनही व्दितीय अपिले अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक १८६९/२००८, १८७०/२००८ व १८७१/२००८अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या अपील क्रमांक १८६९/२००८ व १८७१/२००८ शी संबंधित प्रथम अर्जातील संपूर्ण माहिती व अपील क्रमांक १८७०/२००८ शी संबंधित प्रथम अर्जातील अपिलार्थीस देय उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत

विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सोमीनाथ दगडू थोरात, रा. आंबेगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, आंबेगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८७२

निर्णय दिनांक ०९-११-२००९

१ श्री. राधाकृष्ण राजाराम गायकवाड, : अपिलार्थी
विष्णुनगर, आकाशवाणीच्या मागे, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून योग्य प्रकारे माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे," बचत गटांनाही भ्रष्टाचाराचे खिंडार " या आशयाखाली दैनिक सामना या वृत्तपत्रामध्ये दिनांक २०-०३-२००६ रोजी प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने श्री. सिध्दीकी, सहा - प्रकल्प अधिकारी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी केलेल्या चौकशीचा अहवाल व त्यावर केलेली कार्यवाही, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०७-२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रसिताद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये दोन या दराने एकूण ८२ पेजेस करिता भरण्याचे सूचित केले. या शुल्काचा भरणा अपिलार्थीने दिनांक ०१-०८-२००८ रोजी केला. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीमध्ये त्रुटी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-११-२००८ रोजी आपले आदेश पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत द्यावयाची बाकी असलेली उर्वरित माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या कथित माहितीमध्ये प्रकल्प संचालक यांच्या दिनांक २१-०६-२००८ रोजीच्या अहवालाच्या पृष्ठावर दिलेले अभिप्राय त्यांना जन माहिती अधिकारी

यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये समाविष्ट नाहीत. त्यांना ही माहिती प्रकल्प संचालकाच्या अभिप्रायासह हवी आहे. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की अपिलार्थीस त्यांनी दिनांक २१-११-२००८ रोजीच्या पोस्टाने पाठविलेल्या माहितीचे पाकिट जन माहिती अधिकारी यांच्याकडे विना तामिली परत प्राप्त झाले आहे. यासंदर्भात अपिलार्थीस स्पष्टीकरण विचारले असता त्यांनी आयोगास असे अवगत केले की, या प्रकरणी त्यांनी आयोगाकडे दिनांक ०३-११-२००८ रोजी व्दितीय अपील केले असल्यामुळे त्यांनी या पाकिटाचा स्वीकार केला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १६-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः मागितलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २१-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे जरी विहित मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी, या पत्रात त्यांनी अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क कळवितांना त्यांच्या दोन अर्जावरील शुल्क एकत्र कळविले आहे. तसेच अपिलार्थीस माहिती देतांना सहायक प्रकल्प अधिकारी श्री. सिध्दीकी यांच्या प्रकल्प संचालक यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक २१-०६-२००६ रोजीच्या पत्रावरील प्रकल्प संचालकाचे अभिप्राय अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीमध्ये समाविष्ट नाहीत. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध होती त्या स्वरुपात न देता प्रकल्प संचालकांचे या पत्रावरील अभिप्राय जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिले नसल्याचे सिध्द होत आहे. याबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी आयोगास असे अवगत केले की, सहायक प्रकल्प संचालकांच्या दिनांक २१-०६-२००६ रोजीच्या पत्राची झेरॉक्स प्रत काढतांना प्रकल्प संचालकांचे अभिप्राय झेरॉक्स काढण्याच्या पध्दतीमधील त्रुटीमुळे काढले गेले नाहीत. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोग अमान्य करत आहे. या प्रकरणाशी संबंधित कागदपत्रे पाहता आयोगास असे आढळून आले आहे

की, अपिलार्थीने दिनांक ०१-०८-२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे संपूर्ण शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरले असतांना देखील संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध होती त्या स्वरुपात त्यांनी ती देण्याची दक्षता घेतली नाही. याचबरोबर आयोगाच्या असेही निदर्शनास आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २१-११-२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पुरविलेली माहिती अपिलार्थीने, आयोगाकडे व्दितीय अपील केल्याच्या कारणास्तव स्वीकृत केली नाही. अपिलार्थीची अशा प्रकारची कृती बरोबर नाही. या त्यांच्या कृतीमुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी खरोखरच स्वारस्य आहे किंवा कसे हे समजून येत नाही. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-११-२००८ रोजीच्या पत्राने अपिलार्थीस देऊ केलेली माहिती पाहता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पाच दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस त्यांनी आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क भरुनही ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अयोग्य स्वरुपात दिली असल्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून या प्रकरणी त्यांनी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क त्यांना परत करावे लागेल. अपिलार्थीस हे शुल्क त्यांनी हे आदेश निर्गमित होताच पाच दिवसाच्या आत परत करावे, असेही त्यांना पुढे आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पाच दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पाच दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०९-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राधाकृष्ण राजाराम गायकवाड, विष्णुनगर, आकाशवाणीच्या मागे, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५४३
निर्णय दिनांकः १०-११-२००९

१. श्री. पांडुरंग किसनराव गायकवाड, : अपिलार्थी
रा.वैजापूर, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपजिल्हाधिकारी, वैजापूर,
जि.औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय अधिकारी,
वैजापूर, जि. औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०७.२००९ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - "गट नं. १५२ मौ. वैजापूर येथील नागपूर-मुंबई महामार्गाकरिता संपादित क्षेत्राची स्थळपहाणीची व पंचनामा, संमतीपत्र आणि दि. ०३.०७.२००२ ची व्हीडीओ कॅसेट, यावेळी स्थळपहाणी व पंचनामा आणि व्हीडीओ कॅसेट करतेवेळी मा. उपजिल्हाधिकारी, श्री.

सोळंकी, काटकरसाहेब व त्यांच्यासोबतचे कर्मचारी बाबूभाई शौकत अप्पा, क टारे अप्पा असे सर्व कर्मचारी हजर होते व १५०-२०० शेतकरी होते. त्या दिवसाची सर्व माहिती मिळणेबाबत."- अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी दि. ०३.०७.२००२ असा अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये दर्शविला आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस,"नागपूर-मुंबई महामार्गासाठी संपादित जमिनीबाबतची संचिका क्र. ५/२००१ विशेष भूसंपादन अधिकारी, कृष्णा खोरे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या कार्यालयास दि. ०७.११.२००२ रोजी पाठविण्यात आली आहे, असे संबंधित विभागाने कळविले असून सदरील संचिका या कार्यालयात उपलब्ध नाही" असे उत्तर दिले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.०९.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मंजूर केले व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती उपलब्ध असल्यास पंधरा दिवसांचे आत विनामूल्य देण्याचे आणि माहिती उपलब्ध नसल्यास त्याप्रमाणे अपिलार्थीस कळविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले असल्याचे या आदेशामध्ये दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील माहितीच्या मागणीचा पुनरुच्चार केला.

जन माहिती अधिकारी अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आपला युक्तिवाद सादर करण्यासाठी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयामार्फत दि. ०३.०७.२००२ रोजी ग.नं. १५२ मौ. वैजापूर येथील नागपूर-मुंबई महामार्गासाठी संपादित केलेल्या क्षेत्राच्या स्थळ पाहणीचा पंचनामा आणि संबंधितांच्या संमतीपत्राची व तसेच या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेल्या व्हीडीओ शुटींगच्या कॅसेटची प्रत आवश्यक आहे. अपिलार्थीच्या माहितीच्या मागणीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या प्रतिसादाचे अवलोकन करता, यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कागदपत्रांची नस्ती विशेष भूसंपादन अधिकारी, कृष्णा खोरे विकास मंडळ,औरंगाबाद यांच्याकडे दि. ०७.११.२००८ रोजी पाठविल्याचे फक्त नमूद केले आहे. विशेष भूसंपादन अधिकारी, कृष्णा खोरे विकास महामंडळ व संबंधित जन माहिती अधिकारी हे एकाच सार्वजनिक प्राधिकरणाचे (महसूल खात्याचे) अधिकारी आहेत. त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) नुसार अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर पाच दिवसांच्या आत, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध होती, त्यांच्याकडे पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस द्यावयास हवी होती. परंतु त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केली नाही अथवा त्यांच्या दि. १७.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे किंवा कसे, याबाबतही काहीही नमूद केले नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही, हे पाहता या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय

अधिकारी,वैजापूर यांनी अशाप्रकारच्या त्यांच्या कृतीद्वारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांनी विशेष भूसंपादन अधिकारी, कृष्णा खोरे विकास महामंडळ अथवा भूसंपादन करणाऱ्या यंत्रणेकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस कोणत्याही परिस्थितीत हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १०-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पांडुरंग किसनराव गायकवाड, रा. गायकवाड वाडी, शिवराई रोड, वैजापूर, जि. औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई -३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५४४
निर्णय दिनांक: १०-११-२००९

१. श्री. सुभाष पुंजाराम काळे, : अपिलार्थी
रा.राहटगाव, ता.पैठण, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, पैठण
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.११.२००८ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि. २९.१०.२००९ रोजी लिहिलेले पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील क्र. १५४४/०८ हे ते, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असल्याने स्वखुषीने मागे घेत आहे, असे नमूद केले आहे आणि त्याचप्रमाणे हे अपील रद्द करण्याचीही त्यांनी या पत्रामध्ये आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीनेच आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील, मागे घेतले असल्याने सदर अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १५४४/०८, दि.२४.११.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुभाष पुंजाराम काळे,रा.राहटगाव, ता.पैठण, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५४५
निर्णय दिनांकः १०-११-२००९

१. श्री. शेख नईम शेख लाल, : अपिलार्थी
रा. हिंगोली.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,हळदा, ता.सिल्लोड
जि.औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती,सिल्लोड, जि.औरंगाबाद.

त्रयस्थ पक्ष : श्री. हरी आनंदा गवळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - त्रयस्थ पक्ष श्री. हरी आनंदा गवळे या शाळेतील विद्यार्थ्याने दि. १४.०७.१९६६ रोजी शाळेचा दाखला घेतलेल्या टी.सी. च्या निर्गम उताऱ्याची व प्रवेश नोंद

रजिस्टरची आणि प्रवेशाच्या वेळी त्रयस्थ पक्षाच्या वडिलांनी दाखल केलेल्या जन्म प्रमाणपत्राची सत्यप्रत - अशी माहिती मागितली होती.

तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२६.०९.२००८ रोजी प्रथम सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थी या सुनावणीस गैरहजर राहिले. अपिलार्थीस त्यांच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय प्राप्त न झ ााल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीचा दि. २९.०७.२००८ रोजीचा प्रथम अर्ज त्यांच्याकडे कधी प्राप्त झाला, या अर्जावर त्यांनी काय कार्यवाही केली, यासंदर्भात त्यांना आयोगास काहीही अवगत करुन देता आले नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या दि. २६.०८.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ०६.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडील संपूर्ण उपलब्ध माहिती रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली असून ही माहिती अपिलार्थीस दि. ०८.११.२००८ रोजी प्राप्त झाली आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, मुख्याध्यापक यांच्याकडून श्री. हरी आनंदा गवळे यांच्या शाळा प्रवेशाच्या वेळी त्यांच्या वडिलांनी दाखल केलेल्या जन्म प्रमाणपत्राची प्रत उपलब्ध न झाल्याने ही माहिती वगळता, उर्वरित मुद्यांवरील संपूर्ण माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पाठविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीस पाठविलेली माहिती व ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ अपिलार्थीची पोचसही आयोगासमोर सादर केली. यावरुन

असे आढळून येते की, अपिलार्थीस, त्यांनी आयोगाकडे दि. २१.१०.२००८ रोजी द्वितीय अपील केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून दि. ०८.११.२००८ रोजी माहिती प्राप्त झाली आहे. यामध्ये अपिलार्थीस त्रयस्थ पक्ष श्री. हरी आनंदा गवळे यांनी शाळेत प्रवेश घेतेवेळी त्यांच्या वडिलांनी त्यावेळी दाखल केलेल्या जन्म प्रमाणपत्राची प्रत फक्त उपलब्ध झाली नाही. ही माहिती शाळेच्या मुख्याध्यापकाकडे उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी नमूद करीत आहेत. मूळात त्रयस्थ पक्षाच्या वडिलांनी त्रयस्थपक्षाच्या जन्म प्रमाणपत्राची सत्यप्रत त्यावेळी सादर केली होती किंवा कसे यासंदर्भातही कोणताही पुरावा अपिलार्थीने सादर केलेला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता अपिलार्थीस ही माहिती मिळणार नाही. हा मुद्दा वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. १५४५/०८, दि. २१.१०.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख नईम शेख लाल,रा.नवीन पाण्याच्या टाकीजवळ,पलटन, हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हळदा, ता. सिल्लोडजि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५४६
निर्णय दिनांक: १०-११-२००९

१. श्री. एम. ए. सिद्दीकी, : अपिलार्थी
रा.अंबाजोगाई, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (महसूल),
अंबाजोगाई, जि.बीड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, अंबाजोगाई, जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे तहसीलदार, अंबाजोगाई यांना उद्देशून लिहिलेले दि. ०४.११.२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०३.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाशी संबंधित माहिती दिल्याने त्यांचे समाधान झाले आहे, असे कबूल केले आहे आणि त्यांचे आयोगाकडील द्वितीय अपील क्र.१५४६/०८ हे निकाली काढण्याची तहसीलदार, अंबाजोगाई यांनी विनंती केली आहे.

अपिलार्थीने सदर पत्र तहसीलदार, अंबाजोगाई यांना, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर दि. ०४.११.२००९ रोजी लिहिल्याचे दिसून येत आहे व तसेच अपिलार्थीस आज रोजीच्या सुनावणीच्या वेळेच्या अनुपस्थितीवरुन त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याचे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १५४६/०८, दि.०४.०८.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. एम. ए. सिद्दीकी,रा.मंगळवार पेठ, हावळे गल्ली,अंबाजोगाई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५४७
निर्णय दिनांकः  १०-११-२००९

१. श्री. गंगामोहन गंगाधरसा सातपुते, : अपिलार्थी
रा.वसमत, जि.हिंगोली.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
वसमत, जि.हिंगोली.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, हिंगोली.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" विद्युत जोडणी पी.सी.१/०३-१०९०-०१७५/०२०५७२२/ग्राहक क्र. ५४५०१०००२४८२, एम.जी.सातपुते कोणत्या कागदपत्रांद्वारे स्थानांतरीत करण्यात आले. त्या कागदपत्रांची झेरॉक्स कॉपी मिळणे करीता."

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १०.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविल्याचे आयोगास अवगत केले. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये असेही स्पष्ट केले की, अपिलार्थीने ज्या विद्युत जनित्राच्या स्थलांतराविषयी त्यांच्याकडे माहिती मागितली होती त्या विद्युत जनित्राचे स्थानांतरण झाले नसल्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असण्याचा प्रश्न उद्‌भवत नव्हता. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या दि. २८.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत होती. ही माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्याचे पूर्ण उत्तरदायित्त्व अपिलार्थीचे होते. या प्रकरणी अपिलार्थी ही माहिती घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात किती वेळा गेले यासंदर्भातील कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केलेला नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. १०.०९.२००८ रोजी दिलेल्या पत्राची प्रत उपलब्ध आहे. परंतु या पत्रासोबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १०.०९.२००८ रोजीच्या पत्रामध्ये नमूद केलेली सहपत्रे पाठविली नसल्याचे आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १०.०९.२००८ रोजीच्या पत्रामध्ये नमूद केलेल्या सर्व सहपत्रांच्या प्रती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्याव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात, अपिलार्थीस त्यांच्या दि. १०.०९.२००८ रोजीच्या पत्रामध्ये नमूद केलेल्या सर्व सहपत्रांच्या प्रती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्याव्यात.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १०-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गंगामोहन गंगाधरसा सातपुते, घर नं. बी. /२०४, गणेश पेठ, वसमत, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,विभागीय कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५४८
निर्णय दिनांकः १०-११-२००९

१. श्री. रामकिशन निवृत्ती लिपने, : अपिलार्थी
रा.सिध्दनाथ बोरगाव, ता.सेलू, जि. परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तहसील कार्यालय, पाथरी,
जि.परभणी.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी, सेलू,
जि.परभणी.

प्रत्यक्षात : विद्यमान जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल-२),
तहसील कार्यालय,पाथरी,
जि.परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून आयोगास असे अवगत केले आहे की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना न्यायालयीन कामकाजाकरिता आवश्यक आहे. त्यांनी तहसील कार्यालय पाथरी, प्रथम अपिलीय अधिकारी,सेलू यांच्याकडे रीतसर मागणी करुनही आवश्यक ते दस्तावेज त्यांना संबंधितांकडून देण्यात आले नाहीत. यामध्ये वेळ, पैसा व मानसिक ताण त्यांना सहन करावा लागला आहे. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असून या अर्जामध्ये त्यांनी पुढे अशी

विनंती केली आहे की, त्यांनी मागणी केलेल्या दस्तऐवजांच्या नकला,झेरॉक्स प्रती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आयोगाने आदेशित करावे आणि तसेच संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना दंडीत करण्यात यावे व अपिलार्थीस न्याय द्यावा.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, पाथरी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील सन १९३५ ते १९५३ पर्यंतच्या स.नं. ९३ च्या फेराची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीतील स.नं. ९३ मधील फेराच्या नकला, श्री. रावसाहेब निवृत्ती लिपने यांच्या नावाचे हक्क नोंदपत्र, आरओआर फाईल नं. १७ हुकूम निशाण तारीख ३०.१०.१९८० च्या निर्णयाची प्रत, श्री.निवृत्ती गोविंद लिपने यांच्या नावाची होल्डींग नक्कल, १९५० पर्यंतची व जमाबंदी ६ ची जुनी नक्कल - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही तहसीलदार,सेलू यांच्याकडे उपलब्ध असल्याचे निदर्शनास आल्यानंतर नायब तहसीलदार तथा जन माहिती अधिकारी पाथरी यांनी अपिलार्थीस त्यांना ही माहिती तहसील कार्यालय, सेलू यांच्याशी संपर्क साधून उपलब्ध करुन घ्यावी, असे दि. १४.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सूचित केले. यानंतर तहसीलदार,सेलू यांनी त्यांच्या दि. १८.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेख्यातून अपिलार्थीस हव्या असलेल्या नकला आठ दिवसांच्या आत घेऊन जाण्याचे सूचविले व त्यांच्या कार्यालयात जे अभिलेखे उपलब्ध नाहीत, त्याबाबतीत तहसीलदार, पाथरी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे सूचित केले. तहसीलदार, पाथरी व सेलू यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०६.०५.२००८ रोजी निर्णय देऊन तहसीलदार, पाथरी यांना अपिलार्थीस तात्काळ उर्वरित माहिती देण्याचे सूचित केले. यानंतर नायब

तहसीलदार (महसूल-२), पाथरी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २७.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे मोडी व ऊर्दू भाषेत असल्यामुळे अपिलार्थीने मोडी व ऊर्दू भाषेच्या जाणकाराकडून तपासणी करुन हस्तगत करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

तहसीलदार, पाथरी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडील अभिलेख विभागातील नस्तीमध्ये मोडी व ऊर्दू भाषेत उपलब्ध आहे व ही माहिती ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत, असा युक्तिवाद केला.

वरील घटनाक्रम, तहसीलदार,पाथरी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१८.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७(१) मधील तरतुदीप्रमाणे प्रथम प्रतिसाद देणे आवश्यक होते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय,पाथरी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे माहितीची मागणी केली होती. या कार्यालयाशी संबंधित जन माहिती अधिकारी म्हणून नायब तहसीलदार (महसूल-२) यांची नेमणूक केली गेली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे तहसीलदार, पाथरी यांनी तहसीलदार, सेलू यांच्याकडे वर्ग केले असल्यामुळे त्यांनी दि. १४.०३.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती तहसील कार्यालय, सेलू यांच्याशी संपर्क साधून उपलब्ध करुन घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय,पाथरी यांची सदरची कृती ही अधिनियमातील तरतुदींशी विसंगत

आहे. जर ही माहिती पाथरी तहसील कार्यालयामध्ये उपलब्ध नव्हती तर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर, पाच दिवसांच्या आत हा अर्ज जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, सेलू यांच्याकडे हस्तांतरित करुन त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती न करुन अपिलार्थीस तहसील कार्यालय, सेलू यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, पाथरी यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे अधिनियमातील कलम ६(३)(एक) चा भंग केल्याचे या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी,तहसील कार्यालय, सेलू यांनी यावरही कडी करुन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देण्याऐवजी अपिलार्थीस हव्या असलेल्या नकला त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेख्यातून आठ दिवसांच्या आत घेऊन जाण्याचे व जे अभिलेखे उपलब्ध नाहीत, त्याबाबतीत तहसीलदार,पाथरी यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले. यावरुन जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय,सेलू यांनी देखील अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याचे कोणतेही सकारात्मक प्रयत्न केले असल्याचे आयोगास आढळून येत नाही. यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्याप्रमाणे नायब तहसीलदार,महसूल-२, पाथरी तथा जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २७.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती मोडी व ऊर्दू भाषेत उपलब्ध असल्याचे कळविले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती केवळ मोडी व ऊर्दू भाषेत उपलब्ध आहे, म्हणून अपिलार्थीस माहिती न देता, या अभिलेखाची त्यांच्या कार्यालयामध्ये मोडी व ऊर्दू भाषेच्या जाणकारासह तपासणी करण्याच्या, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या सूचना सर्वथा अवैध आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती त्यांनी अर्जदारास देणे, या अधिनियमामध्ये मूळात अभिप्रेत आहे. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय,पाथरी व सेलू यांच्यापैकी कोणीही

अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्न केलेले नाहीत, असे आयोगास आढळून येत आहे. या घटनाक्रमाशी संबंधित सर्व घटनांचा आढावा घेतला असता, अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त न होण्यासाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-२) पाथरी हे जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-२), पाथरी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांनी ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जात अपिलार्थीने पोस्टाने माहिती अपेक्षिली असताना देखील अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अभिलेखे तपासणीसाठी उपस्थित राहण्याचे कळविण्याची त्यांची कृती चुकीची आहे, हे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी सेलू तहसील कार्यालयात उपलब्ध असली तरीही नायब तहसीलदार (महसूल-२), पाथरी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या अभिलेख्याच्या प्रती सेलू कार्यालयाशी संपर्क साधून त्या अपिलार्थीस याच कालावधीमध्ये पोस्टाने विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणताही सकारात्मक प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल महसूल आयुक्त, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, पाथरी व सेलू यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-२), पाथरी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

३. महसूल आयुक्त, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, पाथरी व सेलू यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रामकिशन निवृत्ती लिपने,मु.सिध्दनाथ बोरगाव,पो.आहेर बोरगाव व्हाया सेलू ता.सेलू, जि. परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-२), पाथरी,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३९
निर्णय दिनांक १०/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, उपविभाग, जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, जालना | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०८.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १०.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.
२) जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, उपविभाग, जालना
३) जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, जालना

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४०
निर्णय दिनांक १०/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, सना वेल्फेअर ॲण्ड एज्युकेशन सोसायटी, नोमानियानगर, तरोडा बु., नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मदाय आयुक्त, सहायक धर्मदाय आयुक्त कार्यालय, नांदेड विभाग, नांदेड | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०७.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.
२) जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, सना वेल्फेअर ॲण्ड एज्युकेशन सोसायटी, नोमानियानगर, तरोडा बु., नांदेड.
३) जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मदाय आयुक्त, सहायक धर्मदाय आयुक्त कार्यालय, नांदेड विभाग, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४१
निर्णय दिनांक १०/११/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राचार्य / मुख्याध्यापक,
नोबल ज्युनिअर कॉलेज, मुखेड, जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

**<u>निर्णय</u>**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०४.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०७.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.
२) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य / मुख्याध्यापक, नोबल ज्युनिअर कॉलेज, मुखेड, ता.मुखेड, जि.नांदेड.
३) जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५४९

निर्णय दिनांक १०-११-२००९

१ श्री. सिरसाट प्रभाकर तुळशीराम, : अपिलार्थी
मु. सोनखेड, पो. तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना अद्यापही जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांनी कोणतीही माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सोनपेठ जिल्हा परभणी येथील केरोसीन विक्रेत्याचा किरकोळ परवाना रद्द केल्याप्रकरणाशी संबंधित एकूण ९ मुद्दयाव्दारे काही कागदपत्राच्या प्रतींची मागणी केली होती. अपिलार्थीने हा अर्ज उपविभागीय अधिकारी, परभणी यांना उद्देशून केला

होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीने हा अर्ज उपविभागीय अधिकारी, परभणी यांना उद्देशून केला होता. अपिलार्थीचा हा अर्ज उपविभागीय अधिकारी, परभणी यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांच्याकडे दिनांक १२-०२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे पाठविला व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तरीही अपिलार्थीस जिल्हा पुरवठा अधिका-याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे दिनांक ०६-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०५-२००८ रोजी निर्णय देऊन जिल्हा पुरवठा अधिका-यास अपिलार्थीस सात दिवसाच्या आत नियमाप्रमाणे माहिती पुरविण्याचे सूचित केले. परंतु जिल्हा पुरवठा अधिका-याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

उपविभागीय अधिकारी, परभणी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण ९ मुद्दयावरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ ते ३ शी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असून ती त्यांनी आता त्यांच्यासोबत आणली आहे. अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती का पुरविली नाही याचे कारण त्यांना माहित नाही. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या मूळ

अर्जातील मुद्दा क्रमांक ४ ते ९ शी संबंधित माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या अर्जातील माहिती त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत म्हणजे मुद्दा क्र. १ ते ३ शी संबंधीत माहिती दिनांक १५-०२-२००८ रोजी व उर्वरित माहिती दिनांक २०-०२-२००८ पूर्वी प्राप्त होणे आवश्यक होते. तथापि अद्यापही अपिलार्थीस ही माहिती उपविभागीय अधिकारी, परभणी अथवा जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यापैकी कोणाकडूनही प्राप्त झालेली नाही. या प्रकरणी मूळात अपिलार्थीचा दिनांक १६-०१-२००८ रोजीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज उपविभागीय अधिकारी, परभणी यांनी जिल्हा पुरवठा अधिका-याकडे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे सदर अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कार्यवाही, अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर विलंबाने केली आहे. अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर उप विभागीय अधिकारी, परभणी यांनी अपिलार्थीचा अर्ज जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांच्याकडे पाठवून त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) चा भंग केल्याचे या प्रकरणी आढळून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ ते ९ शी संबंधित माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असल्याचे जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने आयोगास अवगत केल्याने व तसेच अपर जिल्हाधिकारी, परभणी यांच्या दिनांक ०५-०५-२००८ रोजीच्या आदेशान्वये जिल्हा पुरवठा अधिका-याला अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले आहे, हे पाहता, या प्रकरणी जिल्हा पुरवठा अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ ते

९ शी संबंधित माहिती पुरवावी लागेल. सबब उपविभागीय अधिकारी, परभणी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या प्रथम अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ३ शी संबंधित माहिती व जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांनी अपिलार्थीस याच अर्जातील मुद्दा क्रमांक ४ ते ९ शी संबंधित माहिती हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येते की, या प्रकरणी जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी किंवा उपविभागीय अधिकारी, परभणी यांच्याकडून अपिलार्थीच्या दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या अर्जावर अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद देणे आवश्यक होते. तथापि जिल्हा पुरवठा अधिकारी परभणी यांनी विहित मुदतीनंतर त्यांच्याकडील दिनांक १७-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संचिकांची शोध मोहिम चालू असल्याचे आणि संचिका उपलब्ध होताच झेरॉक्स प्रती पुरविण्यात येतील असे अपिलार्थीस अवगत केले. तथापि यानंतरही आणि विशेषतः जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात काहीही कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी काय प्रयत्न केले याची उपविभागीय अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीस कोणतीही कल्पना नाही. तेव्हा या प्रकरणी अपिलार्थीस कोणतीही माहिती उपलब्ध करुन न देण्यासंदर्भात उपविभागीय अधिकारी, परभणी व जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांच्या दोनही कार्यालयाचे जे जन माहिती अधिकारी यांचे सहाय्यक जबाबदार आहेत त्या सर्वांवर व संबंधित उपविभागीय अधिकारी, परभणी आणि जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची /प्रस्तावित करण्याची शिफारस महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना करण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अपील मान्य करण्यात येत आहे.

२. उपविभागीय अधिकारी, परभणी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या प्रथम अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ३ शी संबंधित माहिती व जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ ते ९ शी संबंधित माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत रजिस्टर्ड टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

३. महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना, संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी व उपविभागीय अधिकारी परभणी आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची/ प्रस्तावित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सिरसाट प्रभाकर तुळशीराम, मु. सोनखेड, पो. तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५५०

निर्णय दिनांक १०-११-२००९

१ श्री. अभय दादासाहेब खरसडे, : अपिलार्थी
मु. पो. तांदुळवाडी, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परंडा, तालुका परंडा,
जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), भूम,
तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. बाबासाहेब माणिकराव खरसडे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. बाबासाहेब माणिकराव खरसडे यांनी मिळविलेल्या आर्थिक-दृष्ट्या दुर्बल घटक प्रमाणपत्राच्या संदर्भात जानेवारी २००५ ते डिसेंबर २००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री. बाबासाहेब माणिकराव खरसडे यांचे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र व प्रोसिडींगच्या नकला, अर्ज, केलेला पंचनामा, तलाठी प्रमाणपत्र, फायलीमधील टिपणी, प्रतिज्ञापत्र व प्रमाणपत्र - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या-कडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०४-२००८ रोजी सुनावणी घेऊन दिनांक ०९-०४-२००८ रोजी आपले आदेश पारीत केले व आठ दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि त्यानंतरही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर जन माहिती अधिकारी म्हणून दिनांक २९-०५-२००९ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे त्यांना त्यांच्या कार्यालयात आढळून आले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरी या माहितीचे सार्वजनिक स्वरुप पाहता ही माहिती मिळणे गरजेचे आहे. आज रोजी युक्तिवादाच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध नाही असे आयोगास अवगत केले आहे. तथापि त्यांचा हा युक्तिवाद आयोग अमान्य करत असून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही जानेवारी २००५ ते डिसेंबर २००७ या विशिष्ट कालावधीशी संबंधित आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या कालावधीमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या प्रमाणापत्रासंदर्भात कसोशीने शोध घेऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. जर या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या अभिलेख्यामध्ये आढळून आली नाही तर ही माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचा-यावर होती त्यांच्यावर प्रशासकीय अथवा फौजदारी कार्यवाही करण्याचे जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना प्रस्तावित करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जावर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार परंडा यांनी माहिती अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन त्यांनी अपिलार्थीस संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणतीही माहिती पुरविल्याचे अथवा माहिती पुरविण्यासाठी संबंधितांनी सकारात्मक प्रयत्न केल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरवले आहे. सबब जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत

सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अभय दादासाहेब खरसडे, मु. पो. तांदुळवाडी, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५५१

निर्णय दिनांक १०-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव,<br>मु. होंडाळा, पो. दापका (राजा), तालुका मुखेड,<br>जिल्हा नांदेड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>नांदेड | : प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना आजपावेतो माहिती न मिळाल्यामुळे विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे व संबधितांवर शिस्तभंग व दंडात्मक कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सौ. रेणुकाबाई यांचे कोर्ट डीक्री प्रकरण ७६/०१ च्या संबंधाने सन २००६ ते

डिसेंबर २००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण दोन मुद्दयाव्दारे खालीलप्रमाणे मागितली होती.

" १. मे. साहेब, आपण दिलेल्या दि. २४/२/०७ च्या माहीती अधिकार माहीतीमध्ये मा. तहसीलदार मुखेड यांना आपण अत्यंत जरुरीचे म्हणून कोर्ट डिक्री प्रकरण ७६/०१ हे आपण ताबा पावती देण्यासाठी सोपवले आसता त्यांनी माझा १० महीने ऑफिस भौवती फिरण्यात वेळ घातला. तसे मी दि. ९/१/०७ च्या पत्रात कळवले होतोच तसेच आमच्या गरिबीचा करीत आसलेला टेलरिंग व्यवसाय माझ्या डोक्यावर टेंशन येवून माझा विसरभोळेपणा वाढल्यामुळे तो व्यवसाय बंद करुन मला नाविलाजाने मजूरी करुन खावे लागत आहे तरी असे कृत्य करणा-या दोषी अधिका-यावर कडक कार्यवाही करुन आम्हाला नुकसानभरपाई मीळवून देणार काय ? हयाची माहीती देणे.

२. जर आपण कार्यवाही करत नसाल तर आम्हाला दोषी अधिका-यावर कायदेशीर कोर्टात कार्यवाही करण्याकरीता आपण परवानगी आपली देणार काय हयाची माहीती देणे. ही आपणास नम्र विनंती."

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन तहसीलदार, मुखेड यांच्याकडे अपिलार्थीच्या अर्जाची छायांकित प्रत पाठवून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या बाबीवर नियमानुसार कार्यवाही करण्याचे त्यांना सूचित केले व त्याची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे दिनांक १९-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. नंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात सादर केला असून या युक्तिवादामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी तहसीलदार, मुखेड यांना आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी दिनांक ०८-०५-२००८ रोजी सूचना केल्या असून या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली होती. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्या कार्यालयातून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधियिमातील तरतुदीशी सुसंगत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक एक व्दारे अपिलार्थीने " ............. तरी असे कृत्य करणा-या दोषी अधिका-यावर कडक कार्यवाही करुन आम्हाला नुकसानभरपाई मिळवून देणार काय, ह्याची माहिती देणे ", मुद्दा क्रमांक दोन व्दारे " ............. आम्हाला दोषी अधिका-यावर कायदेशीर कोर्टात कार्यवाही करण्याकरिता आपण परवानगी देणार काय, याची माहिती देणे " अशा स्वरुपाची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रश्नाची उत्तरे अशा स्वरुपाची माहिती अपेक्षित असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात अधिनियमातील तरतुदीनुसार उपलब्ध करुन देण्यासंदर्भात त्यांनी कार्यवाही करणे इतपत सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचा खुलासा, स्पष्टीकरण, कारणे, व प्रश्नांची उत्तरे अशा प्रकारची माहिती ही, माहिती

अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे अपिलार्थीस ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय होत नाही. परंतु अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदतीत अपिलार्थीस देण्यासाठी तहसीलदार, मुखेड यांना सुचविले आहे. याचा अर्थ, संबंधित जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, महसूल शाखा-२, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळले आहे व आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, (श्रीमती एस. एस. आंबेकर) महसूल शाखा-२, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी (श्रीमती एस. एस. आंबेकर, महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस

करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव, मु. होंडाळा, पो. दापका (राजा), तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५५२

निर्णय दिनांक १०-११-२००९

१ श्री. भिक्कू आमरु राठोड, : अपिलार्थी
रा. पाटोदा (खुर्द), तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, पाटोदा (खु.) येथील सर्वे नंबर ९२ च्या संदर्भात व मंडळ अधिकारी, बोधडी

(बु.) यांनी दिनांक १५-०५-२००८ रोजीच्या पत्रानुसार केलेली कार्यवाही, अशी एकूण दोन मुद्दयाव्दारे व्यक्तिशः माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०८-२००८ रोजी अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस दिनांक १३-०८-२००८ रोजी तहसीलदार, किनवट यांनी व्यक्तिशः ही माहिती उपलब्ध करुन दिली आहे. यासंदर्भात अपिलार्थीकडून माहिती प्राप्त करुन घेतल्याची पोच त्यांच्याकडे उपलब्ध आहे काय, असे आयोगाने विचारले असता, जन माहिती अधिकारी यांनी अशी पोच त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार "व्यक्तिशः" माहितीची मागणी केल्यानंतर अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीप्रमाणे हस्तगत करुन घेणे त्यांचे

कर्तव्य ठरते. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १३-०८-२००८ रोजी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती सर्वसाधारणपणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे. परंतु या संदर्भातील कोणताही पुरावा त्यांना आयोगास सादर करता आलेला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा, त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचा युक्तिवाद, आयोगास मान्य करता येणार नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. या कालावधीमध्ये अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी उपस्थित न राहिल्यास, या कालावधीनंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती उपलब्ध करुन दिली जाणार नाही याची अपिलार्थीने नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भिक्कू आमरु राठोड, रा. पाटोदा (खुर्द), तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५५३

निर्णय दिनांक १०-११-२००९

१ श्री. शर्मा राजेंद्र हरीनारायण, : अपिलार्थी
संपादक, नांदेड पोलखोल,
एस. पी. ऑफिसच्या मागे, वजिराबाद, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपजिल्हाधिकारी, किनवट, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट यांना लेखी आदेश देऊनही त्यांनी

कोणत्याही प्रकारची माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची, शिफारस करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे केरोसीन विक्रेत्यांच्या विक्री रजिस्टरबाबत जानेवारी २००५ ते नोव्हेंबर २००७ या कालावधीशी संबधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीतील बोधडी येथील अर्धघाऊक केरोसीन विक्रेत्यांच्या विक्री रजिस्टरच्या प्रती, या अर्धघाऊक विक्रेत्यांना जोडलेले किरकोळ परवानाधारक व त्यांना ठरवून दिलेला मासिक कोटा प्रपत्राच्या प्रती, घाऊक विक्रेत्यास जोडलेल्या रॉकेल किरकोळ परवानाधारकाच्या साठा रजिस्टरच्या प्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीने माहितीसाठीचा प्रथम अर्ज तहसील कार्यालय, किनवट यांना उद्देशून केला होता. कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार उपजिल्हाधिकारी, किनवट यांच्याकडे दिनांक ०५-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले होते. त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज दिनांक २२-०२-२००८ रोजी नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठवून अपिलार्थीस तात्काळ माहिती पुरविण्याचे सूचित केले आणि या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय व अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी आपल्याबरोबर आणली असून ते अपिलार्थीस ती विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील किरकोळ परवानाधारक व त्यांना ठरवून दिलेल्या मासिक कोट्याच्या प्रती ते अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने, ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी अर्ज केल्यानंतर तीस दिवसाच्या आत म्हणजे दिनांक २३-०१-२००८ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे अभिप्रेत होते. परंतु अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील करेपर्यंत देखील त्यांना ती प्राप्त झाली नाही. मूळात अपिलार्थीचा दिनांक २४-१२-२००७ रोजीचा मूळ अर्ज तहसीलदार, किनवट यांनी संबधित जन माहिती अधिकारी यांना पाच दिवसाच्या आत पाठवून देणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अभिप्रेत असतांनाही त्यांनी दिनांक २४-१२-२००७ रोजीचा मूळ अर्ज अंदाजे पावणे दोन महिन्याने इतक्या विलंबाने संबंधित नायब तहसीलदार यांच्याकडे पाठविला. संबंधित नायब तहसीलदार यांनी यावरही कडी करुन अपिलार्थीच्या दिनांक २४-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जास आजपावेतो कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अशा प्रकारे नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट व तहसीलदार, किनवट यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्ज व अपील अर्जाकडे अक्षम्य दुर्लक्ष केले असल्याचे या प्रकरणी सप्रमाण सिध्द होत आहे. संबंधित नायब तहसीलदार (पुरवठा) व तहसीलदार, किनवट यांनी आपल्या अशा प्रकारे विलंबाने कृती करण्याच्या आणि अपिलार्थीच्या अर्जास कोणताही प्रतिसाद न देण्याच्या कृतीव्दारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव

स्पष्ट करुन त्यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (महसूल) यांना या प्रकरणाशी संबंधित तहसीलदार, किनवट आणि नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत रजिस्टर्ड टपालाने विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसाच्या आत रजिस्टर्ड टपालाने विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (महसूल) यांना या प्रकरणाशी संबंधित तहसीलदार, किनवट आणि नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शर्मा राजेंद्र हरीनारायण, संपादक, नांदेड पोलखोल, एस. पी. ऑफिसच्या मागे, वजिराबाद, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उप विभागीय अधिकारी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८०६

निर्णय दिनांक १०-११-२००९

१ श्री. सरदार हरजीत सिंग तीरथ सिंग सहानी, अपिलार्थी
घर नं. ५-१-५५/१, उस्मानपुरा,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद
उपविभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०९-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १०-११-२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने ते त्यांचे अपील मागे घेत असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले

आहे. खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे नोंदविलेले त्यांचे विचाराधीन अपील आज रोजी मागे घेतले असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २८०६/२००७, दिनांक २७-०९-२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सरदार हरजीत सिंग तीरथ सिंग सहानी, घर नं. ५-१-५५/१, उस्मानपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद उपविभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७४८
निर्णय दिनांकः ११-११-२००९

१. श्री. मुन्नवर अहेमद नईम अहेमद, रा. औरंगाबाद. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. अंजुमने इशाने तालीम संस्था
प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे. परंतु ज्या विषयावर अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये माहिती मागितलेली आहे, त्यापेक्षा वेगळया विषयाचा उल्लेख त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २३.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "अंजमन ए ईशाती संस्थेचे अध्यक्ष, डॉ. कादरी यांनी श्री. शेख हसीबोद्दीन इमादोद्दीन यांना एकाच वेळी दोन ठिकाणी नोकरी देऊन एम.एस्सी अभ्यासक्रम पूर्ण करण्याची

परवानगी दिली. या विषयावर त्यांच्या दि. १२.०५.२००८ च्या तक्रार अर्जाच्या संदर्भात करण्यात आलेल्या चौकशीच्या अहवालाची सत्यप्रत व संबंधितावर कारवाई करण्यात आली असल्यास कारवाईची माहिती." अशी सन २००५ ते २००७ या कालावधीशी संबंधित माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद यांच्याकडे केला होता. अपिलार्थीच्या या अर्जावर शिक्षण उपसंचालक कार्यालयाने कोणतीही कार्यवाही केली नाही, त्यामुळे अपिलार्थीने परत दि. ३१.०७.२००८ रोजी अधिनियमातील कलम कलम १९(१) च्या तरतुदीनुसार शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद यांनी सुनावणी घेतली किंवा कसे हे आयोगास आढळून येत नाही. परंतु अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत त्यांच्या अपिलासंदर्भात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी दि. १५.०९.२००८ रोजी दिलेला निर्णय जोडला आहे. यामध्ये शिक्षण विभागाने अपिलार्थीस ही माहिती आठ दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे त्यांना आदेशित केल्याचे आढळून येत आहे. यानंतर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.०९.२००८ रोजी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी तसेच त्रयस्थ पक्षाचे वकील उपस्थित आहेत व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने एकाच विषयावर एकाच वेळी अनेक अर्ज केले असून विचाराधीन अपिलाशी संबंधित मूळ अर्जाद्वारे अपिलार्थीने जी माहिती मागितली आहे, ती त्यांनी अपिलार्थीस दि. १९.०३.२००९ रोजी पोस्टाने पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची केली होती. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व आयोगाकडे दाखल केलेला द्वितीय अपील अर्ज यामधील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचा विषय यामध्ये विसंगती आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १९.०३.२००९ रोजी पोस्टाने पाठविली आहे. अपिलार्थीस पोस्टाने पाठविलेली माहिती त्यांनी त्यांच्या दि. २३.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीशी व विषयाशी सुसंगत आहे. हे पाहता, तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील व द्वितीय अपील अर्जातील विषय वेगवेगळा असल्यामुळे आणि अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

प्रसंगावशात, या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ चा मूळ गाभा हा अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्येच आवश्यक ती कार्यवाही होणे हा आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ चे अस्तित्त्व, विहित मुदतीतील करावयाच्या कार्यवाहीवर अवलंबून आहे, त्यामुळे त्याची योग्यप्रकारे अंमलबजावणी होण्यासाठी सचिव (शालेय शिक्षण) यांनी अधिनियमातील विहित तरतुदीअंतर्गत तत्परतेने व सकारात्मक कार्यवाही करण्यासंदर्भात त्यांच्या क्षेत्रीय कार्यालयांना सूचना देणारे परिपत्रक त्यांच्या स्तरावरुन तात्काळ जारी करावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. सचिव (शालेय शिक्षण) यांना या सूचना अधिनियमातील कलम १९(८) (क)(चार) अन्वये देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ११-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुन्नवर अहेमद नईम अहेमद,प्लॉट नं.४०, द्वारा अब्दुल माजीद, न्यु एस.टी. कॉलनी, कटकट गेट, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७४९
निर्णय दिनांकः ११-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. रामभाऊ विठोबा झोंड,<br>रा. गोळेगाव बु., ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक<br>ग्रामपंचायत गोळेगाव (बु.),<br>ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद.<br>२. जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, सिल्लोड,जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असून त्यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या नियमानुसार मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी नाकारली असल्यामुळे त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देण्याचे आणि त्यांच्या हक्कावर गदा आणणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यावर शास्तीची कारवाई आदेशित करावी. त्यांनी मूळ अर्ज माहिती मिळविण्यासाठी केला असून माहिती पाहण्यासाठी केलेला नाही, असेही त्यांनी या अपील अर्जामध्ये आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्राम पंचायत गोळेगावशी संबंधित एकूण ९ विविध मुद्यांद्वारे सन २००५ ते दि. २१.०५.२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - गोळेगाव ग्रामपंचायतीने विविध योजनेअंतर्गत केलेल्या कामांची कामनिहाय माहिती व मोजमापपुस्तिकेच्या सत्यप्रती, ग्रामपंचायतीच्या अर्थसंकल्पामध्ये मागासवर्गीयांसाठी २० टक्के अनुदानाची तरतुद असून ग्रामपंचायतीने पाच वर्षामध्ये दलित वस्तीत खर्च केला काय? ग्राम पंचायत नमुना नंबर ५ (कॅशबुक) च्या, नमुना न.१५ च्या, नमुना.नं.२२ च्या मजूरी वाटपाच्या सत्यप्रती, ग्रामपंचायतने दि.२१.०५.२००८ पर्यंत विविध कामावर केलेल्या कामांची योजनानिहाय माहिती व खर्चाच्या पावत्यांच्या सत्यप्रती, नवीन ग्राम पंचायत कार्यकारिणी अस्तित्त्वात आल्यापासून विकासात्मक केलेल्या कामाची कामनिहाय माहिती, संपूर्ण ग्रामीण रोहयो अंतर्गत किती काम चालू आहेत व त्या कामावर दि.२१.०५.२००८ पर्यंत केलेल्या कामाच्या मजूर हजेरीपत्रकाच्या व पेमेंटपत्रकाच्या सत्यप्रती, १२ व्या वित्त आयोगाच्या निधीमध्ये केलेल्या कामांची नावे व खर्च याचा तपशील - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने या अर्जासोबत विस्तार अधिकाऱ्याने दि. ०३.०६.२००८ रोजी निर्गमित केलेले त्यांचे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १८,४५०/- इतके त्यांना ग्रामपंचायतीमध्ये भरण्याचे सूचित केले. तथापि या पत्राचा स्वीकार करण्यासाठी अपिलार्थीने नकार दिला आणि दि. १०.०७.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यासाठी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि. ०५.०८.२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पूर्वनियोजित दिवशी कार्यालयात उपस्थित राहून हवी

असलेल्या माहितीची पाहणी करण्याची विनंती करण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २३.०८.२००८ रोजी ग्राम पंचायत कार्यालयात माहिती पाहणी करण्यासाठी बोलावले. तथापि अपिलार्थीस प्रत्यक्षात भौतिक स्वरुपात माहिती अपेक्षित असल्यामुळे या पत्रास अपिलार्थीने कोणता प्रतिसाद दिला हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या उपलब्धतेअभावी समजून येत नाही. परंतु यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांनी ग्राम पंचायतीच्या हिताच्या दृष्टीने माहिती देण्याचे टाळले असा युक्तिवाद करुन त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती प्रचंड असून, ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी ग्राम पंचायतीस रु. १८,४५०/- इतका खर्च येणार आहे. हा खर्च ग्रामपंचायतीला परवडण्यासारखा नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्याकडे उपस्थित राहून पाहण्याचे सूचविले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही व्यापक स्वरुपाची आहे. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,४,५,८ व ९ शी संबंधित माहिती अपिलार्थीस पूर्णतः देय होत आहे. या अर्जातील मुद्दा क्र. १ मधील - मोजमाप पुस्तिकेच्या सत्यप्रती, मुद्दा क्र. २ मधील - २० टक्के निधी ५ वर्षात दलित वस्तीवर केलेल्या खर्चाची रक्कम, मुद्दा क्र. ६ मधील - कोणत्या कामावर किती निधी खर्च केला व

खर्चाच्या पावत्यांच्या सत्यप्रती - या मुद्यांवरील माहिती फक्त अपिलार्थीस देय होत आहे. या मुद्यांमधील उर्वरित मुद्यांवर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्यामुळे ती त्यांना देय असणार नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ७ मध्ये अपिलार्थीने, - नवीन ग्राम पंचायत कार्यालय अस्तित्त्वात आल्यापासून ग्रामपंचायतीने गाव विकासात्मक केलेल्या विविध कामाची कामनिहाय माहिती लेखी स्वरुपात - अशी माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. तथापि 'कामनिहाय माहिती' म्हणजे निश्चित कोणती अथवा कोणत्या मुद्यावरील माहिती त्यांना अपेक्षित आहे याचा खुलासा अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ७ च्या संदर्भात कोणतीही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना झेरॉक्स प्रतींच्या स्वरुपात देणे ग्रामपंचायतीला परवडणारे नाही, असा आयोगासमोर खुलासा केला आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांचा मूळ माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याच्या आवश्यक त्या वैध पुराव्यासह सादर करुनही या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस त्यांच्या दि. ३०.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे शुल्काची आकारणी केली. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(५) मधील परंतुकाच्या तरतुदीनुसार अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहिती ही विनामूल्य देय होते. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क कळविले, ही जन माहिती अधिकारी यांच्याकडून झालेली चूक आहे. अपिलार्थीस वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे देय असलेली संपूर्ण माहिती आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून उपरोक्त कालावधीमध्ये विनामूल्य हस्तगत करावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्‌हेतूने नाकारल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीने आयोगाकडे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई करण्याची केलेली विनंती आयोग अमान्य करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांना देय असलेली माहिती, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रामभाऊ विठोबा झोंड,रा. गोळेगाव बु., ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत गोळेगाव (बु.) ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड,

जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७५०
निर्णय दिनांकः ११-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. अनिल पुंजा साळवे,<br>रा.गंगापूर, जि.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत वाळुज,<br>ता.गंगापूर, जि.औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.०७.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. सुनावणीच्या दिवशी अपिलार्थी हे गंगापूर येथे हजर असताना, गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थीस जी माहिती हवी आहे, ती प्राप्त झाल्यानंतर कळवू असे सांगितले. अपिलार्थीस हवी असलेली माहिती देण्याचे नाकारल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १२.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, वाळुज ग्राम पंचायत कार्यालयास मिळालेल्या उत्पन्नाच्या रकमेतील २० टक्के रक्कम दलित वस्तीमध्ये कोठे व कशाप्रकारे खर्च केली व त्यामध्ये कोण-कोणती कामे केली आणि २० टक्के रक्कम दलित वस्तीमध्ये खर्च केली गेली नसेल तर कोणत्या कारणाअभावी ती खर्च केली गेली नाही, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २४.०५.२००८ रोजी माहिती पुरविली असल्याचा निष्कर्ष काढून जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. २४.०५.२००८ रोजी संपूर्ण माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, विशेषतः जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता, या माहितीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा जरी समावेश असला तरीही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.०५.२००८ रोजी पुरविलेली माहिती ही, अत्यंत मोघम स्वरुपात पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही ग्राम पंचायतीतील दलित वस्ती मध्ये विकास कामांसाठी खर्च केलेल्या रकमेसंदर्भातील आहे. तेव्हा या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या

कार्यक्षेत्रामध्ये सन २००५ ते २००७ या कालावधीमध्ये ग्रामपंचायत वाळुज येथे दलित वस्तीमध्ये केलेल्या अशाप्रकारच्या कामांची नावे व त्या संपूर्ण कामांवर झालेला खर्च आणि ग्राम पंचायतीस दलीत वस्ती सुधार योजनेअंतर्गत उपलब्ध झालेला निधी याचा स्पष्ट उल्लेख करुन अपिलार्थीस कामनिहाय माहिती पुरवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. ही माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे त्यांना या कालावधीत पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः हजर राहून, ही माहिती हस्तगत करुन घ्यावी लागेल.

आयोगास अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये वाळुज ग्रामपंचायतीच्या हद्दीत भरणाऱ्या आठवडी बाजारासाठी करण्यात आलेल्या लिलाव व मालमत्ता कर, पाणीपट्टी,कोंडवाडा,जि.प.उपकरातील मुद्रांक शुल्काची ५० टक्के रक्कम इत्यादी मुद्यांसंदर्भात माहिती हवी असल्याचे म्हटले आहे. तथापि या मुद्यांचा उल्लेख अपिलार्थीने त्यांच्या या प्रकरणाशी संबंधित माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये केला नसल्यामुळे अपिलार्थीस या मुद्यावरील माहितीकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वतंत्रपणे अर्ज करावा लागेल, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ११-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अनिल पुंजा साळवे,मु.पो.वाळुज बाजार गल्ली, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत वाळुज ता.गंगापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १७५१/०८ व १७५२/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७५१ व १७५२
निर्णय दिनांकः ११-११-२००९

१. श्री. जयंत अनंत खोत, : अपिलार्थी
रा. अंबाजोगाई, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हाधिकारी, बीड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय आयुक्त,औरंगाबाद

प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी : तहसीलदार, अंबाजोगाई, जि.बीड
जन अपिलीय अधिकारी : जिल्हाधिकारी, बीड.

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०९.२००८ रोजी फेर सादर केलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

**<u>अपील क्र. १७५१/०८:</u>**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे अंबाजोगाई येथील स्वातंत्र्य सैनिक गृहनिर्माण संस्थेच्या संचिकेसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१) आपल्या कार्यालयाचे आदेशान्वये अंबाजोगाई येथील स्वातंत्र्य सैनिक गृहनिर्माण संस्थेमधील स्वातंत्र्य सैनिकांना दि.२१.०१.८८ रोजी एकूण किती प्लॉटसचे वितरण करण्यात आले त्यानुसार सदरील स्वातंत्र्य सैनिकांच्या प्लॉटसधारकांच्या यादीची संपूर्ण माहिती व शासनाने वितरण केलेल्या प्लॉटपैकी सद्यस्थितीत स्वातंत्र्यसैनिकांचे एकूण किती प्लॉटस आहेत, याबाबत सदरील संस्थेच्या संचिकेची संपूर्ण माहिती देण्यात यावी.

२) शासनाने स्वातंत्र्य सैनिकांना वितरण केलेले प्लॉटस सदरील स्वातंत्र्य सैनिकांकडून काढून घेऊन सदरील प्लॉटस अन्य स्वातंत्र्य सैनिकांना देण्याची अगर विकण्याची अशा दोन्ही प्रकारची परवानगी अध्यक्ष/सचिव यांनी घेतली किंवा नाही, याची माहिती मा. उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांनी दि. ०४.०१.०८ रोजी आपल्या कार्यालयाकडून घ्यावी असे पत्र दिले आहे याची माहिती देण्यात यावी."

अपिलार्थीच्या या अर्जास जिल्हाधिकारी, बीड यांनी त्यांच्या कार्यालयातून दि.२२.०२.२००८ रोजी पत्र पाठवून अपेक्षित संचिका पाहून माहितीची मागणी करावी, असे अपिलार्थीस सूचित केले. या पत्राप्रमाणे अपिलार्थी जिल्हाधिकारी कार्यालय,बीड येथे दि. १७.०३.२००८ रोजी उपस्थित झाले. या संपूर्ण संचिकेचे त्यांनी अवलोकन केले आणि संचिका पाहिल्यानंतर संचिकेतील कागदपत्रे नको असल्याचे जिल्हाधिकारी यांना दि. १७.०३.२००८ रोजी लिहून दिले. जिल्हाधिकारी यांच्याकडे कागदपत्रे नको असल्याचे लिहून देऊनही अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १२.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले व सदर अपील अपिलार्थीने विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांना उद्देशून केल्याचे दिसून येत असून त्याचप्रमाणे अपिलार्थीने यासंदर्भात विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांना उद्देशून दि.२२.०२.२००८ द्वितीय अपील केल्याचे व तदनंतर हे अपील दि. २८.०२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झाल्याचे आणि सदर द्वितीय अपील अर्जातील त्रूटींची पूर्तता करुन अपिलार्थीने तदनंतर दि. २०.०९.२००८ रोजी ते आयोगाकडे फेरसादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित व जन अपिलीय अधिकारी आणि निवासी उपजिल्हाधिकारी, बीड उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वातंत्र्यसैनिक गृहनिर्माण संस्थेच्या संचिकेची संपूर्ण माहिती अशा स्वरुपात त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ द्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जिल्हाधिकारी कार्यालयाने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ही माहिती उपलब्ध करुन देऊ केली असता, अपिलार्थीने दि. १७.०३.२००८ रोजी त्यांना माहिती आवश्यक नाही, असे जिल्हाधिकारी कार्यालयास लिहून दिले आहे. या संदर्भातील योग्य तो पुरावा जिल्हाधिकारी,बीड यांनी आयोगास सादर केला आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.२ चे अवलोकन केले असता, या मुद्दामध्ये देखील अपिलार्थीने जिल्हाधिकारी,बीड यांच्याकडे,"शासनाने स्वातंत्र्य सैनिकांना वितरण केलेले प्लॉटस काढून घेऊन सदरील प्लॉट्स अन्य स्वातंत्र्यसैनिकास देण्याची अगर विकण्याची अशा दोन्ही प्रकारची परवानगी अध्यक्ष/सचिव यांनी घेतली आहे किंवा नाही", अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थीने जिल्हाधिकारी,बीड यांच्याकडे मागणी केलेली ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. त्यामुळे या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्याइतपतच या अधिनियमातील तरतुदीची व्याप्ती मर्यादित आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागत असताना त्यांची मते अथवा अभिप्राय, खुलासे, स्पष्टीकरणे अपेक्षित करणाऱ्या स्वरुपातील माहिती अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारे खुलासे अथवा

वैयक्तिक अभिप्राय अर्जदारास देणे अशाप्रकारच्या प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाहीत. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याने, त्यांना ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अशाप्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहिती त्यांना आवश्यक नसल्याचे त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना लेखी दिले आहे व मुद्दा क्र. २ संदर्भातील माहिती त्यांना अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय नाही. तसेच अपिलार्थीने विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांच्याकडे दि. १२.०९.२००८ रोजी केलेले प्रथम अपील तसेच त्याच संदर्भात विभागीय आयुक्त तथा विभागीय माहिती आयुक्त, अशा चुकीच्या प्राधिकरणास उद्देशून लिहिलेले, आयोगाकडे सादर केलेले द्वितीय अपील आणि अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रातील विसंगती पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

**<u>अपील क्र. १७५२/०८:</u>**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१) स्वातंत्र्य सैनिक गृहनिर्माण संस्थेमधील प्लॉट क्र. १६ व प्लॉट क्र. २७,४१ अशा एकूण तीन प्लॉट बाबतचे तीन प्रस्ताव मा. उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांनी दि. ०३.०९.२००२ रोजी उचित कार्यवाही करण्याकरिता आपल्या कार्यालयात सादर केले. त्या अनुषंगाने सदरील विषयाची संपूर्ण माहिती देण्यात यावी.

२) सदरील तीन प्रस्तावांचा निर्णय देण्याकरिता त्यास आवश्यक असलेला चौकशी अहवाल तहसीलदार,अंबाजोगाई दि. ०३.०९.२००२ ते आजतागायत पर्यंत शासनास का सादर करीत नाहीत याची माहिती देण्यात यावी."

या प्रकरणासंदर्भात अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना उद्देशून दि. १२.०९.२००८ रोजी प्रथम अपील केल्याचे दिसून येत असून त्याचप्रमाणे अपिलार्थीने यासंदर्भात विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांना उद्देशून दि.२२.०२.२००८ द्वितीय अपील सादर केले. तदनंतर विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांच्या कार्यालयातून हे अपील दि. २८.०२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झाले. सदर द्वितीय अपील अर्जातील त्रूटींची पूर्तता करुन अपिलार्थीने ते दि. २०.०९.२००८ रोजी आयोगाकडे फेरसादर केले असल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने विभागीय आयुक्त यांच्याकडे दि. २२.०२.२००८ रोजी अपील केले होते. हे अपील प्रथम अपील आहे की द्वितीय अपील आहे, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. तथापि अपिलार्थीस अपेक्षित माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात संदर्भित केलेल्या दि. ०४.०१.२००८ रोजीच्या पत्रासंदर्भात आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांच्याकडे यापूर्वी दि. २०.१२.२००७ रोजी केलेल्या अर्जासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १४/- इतके भरणा करण्याचे सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा त्यांनी न केल्यामुळे त्यांना ही माहिती देता आली नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की,

अपिलार्थीने या प्रकरणी स्वातंत्र्यसैनिक गृहनिर्माण संस्थेचे प्लॉट क्र. १६,२७ व ४१ अशा तीन प्लॉट बाबतच्या उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांनी सादर केलेल्या प्रस्तावाची संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ द्वारे मागितल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिलेला आहे. परंतु त्याचबरोबर आयोगास असेही आढळून येत आहे की, अपिलार्थीने या मुद्यावरील मागणी केलेली माहिती ही पूर्णतः मोघम स्वरुपातील आहे. अपिलार्थीस या विषयावरील 'संपूर्ण माहिती' म्हणजे कोणत्या विशिष्ट मुद्याची माहिती हे त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही. तसेच हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. या मुद्यावर उपस्थित निवासी उपजिल्हाधिकारी, बीड यांनी असा खुलासा केला की, अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे स्वातंत्र्यसैनिक गृहनिर्माण संस्थेमध्ये प्लॉट क्र. १६,२७ व ४१ बाबत कोणताही प्रस्ताव त्यांच्या कार्यालयाकडे मूळात प्राप्त झालेला नाही. त्यामुळे या मुद्यांवरील त्यांच्याकडील माहिती 'निरंक' आहे. अपिलार्थीने त्यांच्या दि. २२.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.२ द्वारे त्यांनी,"सदरील ३ प्रस्तावांचा निर्णय देण्याकरिता त्यास आवश्यक असलेला चौकशी अहवाल तहसीलदार अंबाजोगाई दि. ०३.०९.२००२ ते आजतागायतपर्यंत शासनास का सादर करीत नाहीत" अशी माहिती विचारली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या या माहितीचे स्वरुप व राज्य माहिती आयोगाने अपिलार्थीच्या वरील द्वितीय अपील क्र.१७५१ मध्ये अशाप्रकारच्या माहितीबाबत दिलेले स्पष्टीकरण पाहता, अपिलार्थी यांच्या या प्रकरणाशी संबंधित अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती देखील अपिलार्थीस, ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अशाप्रकारे अपिलार्थीच्या या अपील अर्जाशी संबंधित मूळ अर्जातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय होत नसल्याने आणि अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रातील विसंगती आणि अपिलार्थीची अनुपस्थिती पाहता अपिलार्थीचे विचाराधीन

अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन उपरोक्त दोनही अपील अर्जांसंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १७५१/०८ व १७५२/०८ फेटाळण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जयंत अनंत खोत, द्वारा कन्नडकरांचा वाडा, गणेशपाराजवळ,अंबाजोगाई,जि.बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७५३
निर्णय दिनांकः ११-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. संभाजी ओंकार साबळे,<br>रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विहित मुदतीत पुरविली नाही त्यामुळे त्यांनी उपविभागीय अधिकारी,औरंगाबाद यांच्याकडे रितसर अपील दाखल केले असता त्यांनी मागणी केलेली माहिती आठ दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. तथापि त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करेपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने संबंधितांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, - "खरेदी खताच्या आधारे मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेच्या नावे फेर होण्यास दि. १२.०४.२००८ रोजी अर्ज देऊनसुध्दा आजपर्यंत कार्यवाही झालेली नाही. कार्यवाहीसाठी कोणत्या कायदेशीर अडचणी आहेत, मागास समाजाची अडवणूक कुठपर्यंत चालविली जाणार",- अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्रूटी अपिलार्थीच्या निदर्शनास आणली. या त्रूटींची पूर्तता अपिलार्थीने त्यांच्या दि. ०७.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे केली, परंतु यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले.अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.०८.२००८ रोजी अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जातील विनंतीशी सुसंगत युक्तिवाद आयोगासमोर केला. त्यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, उच्च न्यायालयाने आदेश देऊनही या प्रकरणी संबंधित तलाठयाने २००८ साली अवैधरित्या संदर्भिय जमिनीचे फेर मंजूर केले आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या गृहनिर्माण संस्थेच्या नावे जमिनीच्या मालकीहक्कात फेर होण्यासाठी ज्या जमिनीच्यासंदर्भात अर्ज केला होता,त्या गट क्रमांकाच्या संदर्भात दि. २०.१२.२००१ रोजीच्या आदेशान्वये त्यांनी जमिनीचे

हस्तांतरण अथवा विक्री करण्यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने मनाई हुकूम जारी केला होता. त्यामुळे अपिलार्थीच्या नावे फेर होऊ शकला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता,असे आढळून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ द्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती ही, 'माहिती' नसून त्यांच्या दि. १२.०४.२००८ रोजीच्या अर्जावर आजपर्यंत कार्यवाही झाली नाही, असे त्यांनी तहसीलदार,औरंगाबाद यांना अवगत केले आहे. याच अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे त्यांनी मागाससमाजाची अडवणूक कुठेपर्यंत चालविली जाणार,अशाप्रकारे प्रश्नार्थक स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांची वैयक्तिक मते व अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागविल्याचे दिसून येते. अशाप्रकारची माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्यामुळे, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ द्वारे अपिलार्थीने तहसीलदार,औरंगाबाद यांना मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेच्या नावे फेर होण्यास कोणती कायदेशीर अडचण आहे? अशी माहिती मागितली होती. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, या प्रकरणाशी संबंधित मा. उच्च न्यायालयाच्या अपील नं.३५६/२००१ च्या संदर्भात, उच्च न्यायालयाने दि. २०.१२.२००१ रोजी दिलेल्या निर्णयाची प्रत, अपिलार्थीस विहित मुदतीमध्ये पुरविण्यामध्ये त्यांना कोणतीही अडचण नव्हती, परंतु या प्रकरणी असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.३०.०६.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील त्रूटी कळविली. या त्रूटीची पूर्तता अपिलार्थीने दि. ०७.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे केल्यानंतर अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणतीही अडचण असण्याचे कारण सकृतदर्शनी आयोगास दिसून येत नाही. याही उपर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.०८.२००८ रोजी अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत देण्याचे सूचित करुनही जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाकडे पूर्ण दुर्लक्ष केल्याचे या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या

अशाप्रकारच्या कृतीद्वारे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ करुन दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावामुळे स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांना संबंधित तहसीलदार,औरंगाबाद यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ द्वारे मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये मा.उच्च न्यायालयाने या भूखंडाच्या हस्तांतरणासंदर्भात स्थगिती आदेश देऊनही तलाठयाने या आदेशानंतर फेर नोंदविल्याबाबत आयोगाकडे तक्रार नोंदविली आहे. यासंदर्भात त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी आवश्यक वाटल्यास त्यांनी मा. उच्च न्यायालयाकडे अवमान याचिका दाखल करावी. अपिलार्थीने आज रोजी सुनावणीच्यावेळी उपस्थित केलेल्या मुद्यांवर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणताही निर्णय देण्याची अधिकारिता आयोगास नसल्यामुळे त्यांच्या या मुद्यांवर आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच, सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ११-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संभाजी ओंकार साबळे,रा.सिडको, एन-६, संभाजी कॉलनी, घ . नं. जी. १८/६, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०८
निर्णय दिनांक ११/११/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
उर्दू हायस्कूल, धर्माबाद, ता.धर्माबाद, जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नांदेड.

**<u>निर्णय</u>**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०१.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २६.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.
२) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, उर्दू हायस्कूल, धर्माबाद, ता.धर्माबाद, जि.नांदेड.
३) जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०९
निर्णय दिनांक ११/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,<br>रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, नांदेड, ता.जि.नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, नांदेड, ता.जि.नांदेड. | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २२.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २६.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.
२) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड, ता.जि.नांदेड.
३) जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड, ता.जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११०
निर्णय दिनांक ११/११/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
शिवाजी माध्यमिक विद्यालय, आण्णाभाऊ साठे
पुतळ्याजवळ, सिडको, नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नांदेड.

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २६.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २६.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.
२) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवाजी माध्यमिक विद्यालय, आण्णसाहेब साठे पुतळ्याजवळ, सिडको, नांदेड.
३) जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७५४

निर्णय दिनांक ११-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव,<br>रा. नांदगांव, पो. गांजूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, चाकूर,<br>तालुका चाकूर, जिल्हा लातूर | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर,<br>तालुका चाकूर, जिल्हा लातूर | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात | :जन माहिती अधिकारी | : | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,<br>चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर |
| | जन अपिलीय अधिकारी | : | विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, चाकूर,<br>तालुका चाकूर, जिल्हा लातूर |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार त्यांना प्रतिदिवस

२५०/- किंवा शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण पाच मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - ग्रामपंचायतीच्या दिनांक ०१-०१-२००६ ते २४-०४-२००८ या कालावधीत जन्म मृत्युच्या नोंदी, सन २००४-०५, २००५-०६ व २००६-०७ या कालावधीतील ग्रामपंचायतीच्या लेखापरीक्षण अहवालाच्या प्रती, दिनांक ०१-०१-२००६ ते २४-०४-२००८ पर्यंत ग्रामपंचायतीच्या किती ग्रामसभा आणि मासिकसभा झाल्या आणि कोणकोणत्या तारखांना याबद्दलची माहिती, दिनांक ०१-०१-२००६ ते २४-०४-२००८ या कालावधीमध्ये झालेल्या ग्रामसभेच्या इतिवृत्तांच्या प्रती, ग्रामसभेस हजर ग्रामपंचायत सदस्यांच्या सह्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती व तसेच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ प्रमाणे केलेल्या १७ कामांची माहिती कोणत्या तारखेला पूर्ण केली, ही माहिती किती पृष्ठांची आहे आणि ती माहिती वरिष्ठांकडे किती तारखेस पाठविली - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा दाखला जोडून व टपालाव्दारे माहिती मागवूनही त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस व्यक्तिशः हस्तांतरीत करण्याचे नाकारले व तेच अर्जदार आहेत याबद्दलचा वैध पुरावा त्यांच्याकडे दि. २४.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे मागितला. परंतु अशा प्रकारचा कोणताही वैध पुरावा त्यांनी माहिती अधिका-याकडे सादर केला नाही आणि अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-

०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०८-२००८ रोजी आदेश देऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-०८-२००८ रोजी ५४२९ इतक्या पृष्ठांची माहिती पार्सलव्दारे पाठविली. तथापि ही माहिती घेण्यासाठी अपिलार्थीने इन्कार केला त्यामुळे त्या गावाच्या पोस्टमनने परत हे पार्सल चाकूर पोस्ट ऑफिसकडे पाठविले व त्या पोस्ट ऑफिसने हे माहितीचे पार्सल जन माहिती अधिकाऱ्यांकडे परत केले. यानंतर अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही या कारणास्तव वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगास अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात खुलासा केला.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते आताही अपिलार्थीस देण्यास तयार आहेत. तेव्हा अपिलार्थी यांना सूचित करण्यात येत आहे की, त्यांच्या दिनांक २४-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जातील विनंतीप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी एकदा रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविली आहे, हे पाहता त्यांना अद्यापही याच माहितीची आवश्यकता असल्यास हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत त्यांनी स्वत: ओळखपत्र घेऊन ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयात

पूर्वनियोजित वेळी उपस्थित राहून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीने आयोगास अशी विनंती केली आहे की, आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिनी रु.२५० प्रमाणे शास्ती लावावी. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर अपिलार्थीस दुष्ट हेतूने माहिती नाकारल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने, अपिलार्थीची ही विनंती अमान्य करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्या कार्यालयात, हे आदेश निर्गमित झाल्यानंतर तीस दिवसांपर्यंत अपिलार्थीसाठी विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन ठेवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, रा. नांदगांव, पो. गांजूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७५५

निर्णय दिनांक ११-११-२००९

१ श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, अपिलार्थी

रा. नांदगांव, पो. गांजूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर,

तालुका जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर,

तालुका जिल्हा लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लातूर, तालुका जिल्हा लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपूर्वक चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली. या अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मानसिक, शारीरिक व आर्थिक त्रास दिला असल्यामुळे त्यांच्यावर प्रतिदिवस २५०/- प्रमाणे शास्तीची कार्यवाही व शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित विविध मुद्दयावर विविध विषयावर एकूण १५ मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली असून या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे त्यांना वाटल्यामुळे त्यांच्यावर शास्ती लावण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली होती. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०७-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले आणि अपिलार्थीस पूर्वी दिलेली माहिती वगळून तात्काळ वस्तुस्थितीबाबतची माहिती सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे त्यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी गैरहजर राहिले त्यामुळे अपिलार्थीस नेमकी कोणत्या मुद्दयावर प्राप्त

झालेली माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी आहे हे त्यांना न समजल्यामुळे, ते जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०६-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे म्हणजेच, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांच्या-कडील उपलब्ध माहिती विनामूल्य पोस्टाने पाठविली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती आणि अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती यांची तुलना करता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४, १२, १५ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस काहीशा विसंगत स्वरुपात दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे अपिलार्थीने, 'अपर जिल्हाधिकारी यांनी तहसीलदारांच्या किती वेळा बैठका घेतल्या व किती वेळेला आपण हजर होता त्या तारखांची यादी', अशी माहिती मागितली होती. तथापि ही माहिती नायब तहसीलदार यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत अपर जिल्हाधिकाऱ्यास पाठवून त्यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित करणे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) नुसार अभिप्रेत होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली नाही. सबब या मुद्दयावरील अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना अपर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल. मुद्दा क्रमांक १२ मध्ये अपिलार्थीने 'तहसीलदारांनी शासकीय गोदामांना किती वेळेस भेट दिली व रास्त भाव दुकानदारांना दिल्या जाणा-या शिधा वस्तुंच्या दर्जाची पाहणी वरील कालावधीत किती वेळेस केली'

अशी माहिती मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी तहसीलदाराने अशा स्वरुपाची पाहणी ज्या महिन्यात केली, त्या महिन्यांची नावे अपिलार्थीस दिली आहेत. तथापि निश्चित तारखा त्यांनी या मुद्दयासंदर्भात अपिलार्थीस कळविल्या नाहीत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १५ च्या संदर्भात 'माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ ची १७ कामे कोणत्या दिवशी पूर्ण करण्यात आली, याबाबतची माहिती वरिष्ठांना कळविलेल्या पत्राची प्रत व ही माहिती किती पानांची आहे याची माहिती द्यावी', अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. तथापि या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस 'कलम ४ ची १७ कामे कार्यालयीन कामकाजाशी संबंधित आहेत', अशी माहिती दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्दयावर दिलेली ही माहिती पूर्णतः चुकीची आहे. या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी कलम ४ ची १७ कामे पूर्ण केल्याबाबत जर वरिष्ठांना अहवाल पाठविला असेल तर त्या अहवालाची प्रत व ही माहिती किती पानांची आहे, एवढीच माहिती त्यांना अपिलार्थीस देणे आता भाग आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व अपिलार्थीस दिनांक ०६-०६-२००८ रोजी पुरविलेली माहिती यांचे वरीलप्रमाणे केलेले पृथःकरण पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एकूण १५ मुद्दयापैकी मुद्दा क्रमांक ४, १२, १५ या तीन मुद्दयावर काहीशी विसंगत माहिती दिल्याचे आढळून आले आहे. तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने अथवा त्यांच्याकडील उपलब्ध माहिती टाळण्यासाठी चुकीची माहिती दिली, असे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने, अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची मागणी,आयोग फेटाळून लावत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४, १२ व १५ शी संबंधित माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४, १२ व १५ शी संबंधित, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, रा. नांदगांव, पो. गांजूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लातूर, तालुका जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर, तालुका जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७५६

निर्णय दिनांक ११-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गणेश किशनराव हणमंते,<br>समता नगर, कोर्टाच्या पाठीमागे, अहमदपूर,<br>तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | : | प्रतिवादी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत्यक्षात | : | जन माहिती अधिकारी | : | उपकुलसचिव, परीक्षा विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड |
| | | जन अपिलीय अधिकारी | : | परीक्षा नियंत्रक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना न दिल्यामुळे त्यांनी दिनांक २१-०६-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु त्यांनीही

माहिती अधिका-यास पाठीशी घालून अपिलार्थीची दिशाभूल केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या विद्यापीठाअंतर्गत बी. ए. तृतीय वर्षाच्या उन्हाळी २००८ मधील झालेल्या परीक्षाअंतर्गत "क्रिटीसीजम" या विषयाच्या ११ विद्यार्थ्यांच्या संदर्भात उत्तरपत्रिकांच्या झेरॉक्स प्रती मागितल्या होत्या. ही माहिती अपिलार्थीच्या जीविताशी संबंधित असल्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून ती, अर्ज प्राप्त झाल्यापासून ४८ तासाच्या आत देण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१-०७-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीमध्ये बसत नसल्याने अपिलार्थी देता येणार नाही असे कळविले व विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेची छायाप्रत मिळण्यासाठी केलेल्या अध्यादेशाची प्रत त्यांना पाठविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक २१-०७-२००८ रोजी प्राप्त झाला. यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०८-२००८ रोजी आपले आदेश पारीत करुन जन माहिती अधिकारी यांच्या या प्रकरणातील भूमिकेशी सहमती दर्शविली व अपिलाथीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मध्ये विद्यापीठातील विद्यार्थ्यांना त्यांच्या तपासलेल्या उत्तरपत्रिकाच्या प्रती देण्यासंबंधी अध्यादेश जारी केला असून हा अध्यादेश २००३ मध्ये पारीत केला गेला आहे. या अध्यादेशाव्दारे विद्यार्थ्यांना फक्त त्यांच्याच उत्तरपत्रिकांच्या प्रती विद्यापीठाकडून पुरविल्या जातात. या प्रकरणी अपिलार्थीने ११ उत्तरपत्रिकांच्या स्थळप्रती एकाच अर्जाव्दारे मागवून ही माहिती अध्यादेशाव्दारे विहित केलेल्या दरापेक्षा कमी दराने प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न केला आहे आणि अपिलार्थी हे स्वतः बी. ए. तृतीय वर्षाच्या उन्हाळी २००८ मधील विद्यापीठाच्या परीक्षेस बसले नव्हते. त्यांनी या अर्जाव्दारे मागणी केलेल्या उत्तरपत्रिकांच्या प्रती या त्रयस्थ पक्षांशी संबंधित होत्या. तसेच आता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेल्या उत्तरपत्रिका जतन करुन ठेवण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्या देखील नष्ट केल्या आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिलेल्या निर्णयाचे अवलोकन करता, अपिलार्थीने ज्या माहितीची मागणी त्यांच्या दिनांक १४-०६-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे केली होती त्यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०८-२००८ रोजी निर्णय दिला असून जन अपिलीय अधिकारी यांच्या या प्रकरणी त्यांनी दिलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

# <u>आदेश</u>

१.	अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक	११-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१	श्री. गणेश किशनराव हणमंते, समता नगर, कोर्टाच्या पाठीमागे, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२	जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, परीक्षा विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७५७

निर्णय दिनांक ११-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मोहन कडाजी बिबराळे,<br>' गोपाळ स्मृती '<br>ड्रायव्हर कॉलनी, जुना औसा रोड, लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे " सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत बिबराळे, तालुका शिरुर

अनंतपाळ यांनी बनावट पावती पुस्तके छापून वाळू वाहतूक कर रक्कम अपहार केल्याबाबत " या विषयावर सन २००५-०६ व २००६-०७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०६-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या अपील निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जामध्ये उपस्थित केलेल्या १९ मुद्दयावर कार्यवाही करण्याचे जन माहिती अधिकारी यांना मार्गदर्शन केल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०८-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाशी संबंधित संपूर्ण माहिती त्यांनी एकूण दोन टप्प्यात, दिनांक १८-०३-२००८ व दिनांक १२-०८-२००८ रोजी पुरविली आहे व दिनांक ०४-११-२००९ रोजी अपिलार्थीस परत माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी यांनी असाही युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे याच विषयावर वेगवेगळ्या प्रकारे माहिती अधिकाराचा दुरुपयोग करुन माहिती मागवित असतात. अपिलार्थी यांना शासन

सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आलेले आहे. अशा प्रकारची विस्तृत स्वरुपाची माहिती मागवून ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास वेठीस धरत असतात.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये मुद्दा क्र. ३ तीन एक (२) संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी "तत्कालीन गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्ताव सक्षम अधिका-याकडे पाठविल्याबाबतची प्रत देण्यात आलेली आहे. त्यामुळे मुद्दा निकाली काढयात येत आहे" असे म्हटले आहे. तथापि तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या विरुध्दच्या शिस्तभंग विषयक प्रस्तावाची प्रत अपिलार्थीस देण्यात आलेली नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सुनावणीच्या वेळी असा खुलासा केला की, या प्रकरणी तत्कालीन गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक प्रस्ताव तयारच नसल्यामुळे हा प्रस्ताव सक्षम अधिका-याकडे पाठविण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही. अशा प्रकारची माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०३-२००८ रोजी दिलेली आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये उपस्थित केलेल्या इतर मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०८-२००८ व दिनांक ०४-११-२००९ रोजी दिलेल्या माहितीचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेगवेगळ्या टप्प्यामध्ये अपिलार्थीने मागितलेली माहिती दिल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता नक्की कोणती माहिती अपेक्षित आहे याचे तोंडी स्पष्टीकरण करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे. ५

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ११-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोहन कडाजी बिबराळे, ' गोपाळ स्मृती ' ड्रायव्हर कॉलनी, जुना औसा रोड, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७५८

निर्णय दिनांक ११-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेख नईम शेख लाल,<br>नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा अतिरिक्त विभागीय आयुक्त,<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अतिरिक्त विभागीय आयुक्त,<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक आयुक्त (मा.व.क.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. अरुण ग्यानबाराव घुमनवाड, रा. मुखेड, जिल्हा नांदेड व श्री. रविंद्र सिताराम पाटील, रा. भिकार सारोळा, तालुका जिल्हा उस्मानाबाद यांचे महादेव कोळी

या अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र जात पडताळणी समितीने वैध ठरविले आहे,  या जात वैधता प्रमाणपत्रासाठी त्रयस्थ पक्षाने केलेले अर्ज, शपथपत्र व पुराव्यासाठी सादर केलेल्या कागदपत्राच्या सत्यप्रती,  ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जातील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्णतः प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले.  अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०६-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्रयस्थ पक्ष श्री. अरुण ग्यानबाराव घुमनवाड, रा. मुखेड यांच्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस एक महिन्याच्या आत उपलब्ध करुन देण्याचे  आदेशित केले.

मध्यंतरीच्या काळात दिनांक २७-०५-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्रयस्थ पक्ष श्री. रविंद्र सिताराम पाटील यांच्या संदर्भात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक २७-०५-२००८ रोजी सशुल्क पुरविली.  अपिलार्थीने दोन त्रयस्थ पक्षांच्या मागणी केलेल्या माहितीपैकी फक्त एकाच त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांच्या प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील श्री. अरुण ग्यानबाराव घुमनवाड, मुखेड यांच्या जात पडताळणी संदर्भातील त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांची नस्ती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. त्यांच्या आवक शाखेत अशा प्रकारची नस्ती त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.  तथापि जात

पडताळणी प्रकरणे औरंगाबाद, नाशिक व पुणे या तीन ठिकाणी वेळोवेळी हस्तांतरीत केली गेली असल्यामुळे त्यांना अपिलार्थीस अपेक्षित माहिती देता आली नाही असे त्यांनी आयोगास अवगत केले व आयोगास ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी एक महिन्याची मुदत मागितली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भातील माहिती जात पडताळणी समितीच्या औरंगाबाद, नाशिक, पुणे येथील कार्यालयात उपलब्ध असण्याची शक्यता जन माहिती अधिकारी यांना वाटत आहे. सबब त्यांना या प्रकरणी अपिलार्थीस या मुद्दयावर माहिती देण्यासाठी तीस दिवसांची मुदत देण्यात येत असून त्यांना असेही आदेशित करण्यात येत आहे की, मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख नईम शेख लाल, जिल्हाध्यक्ष, समाजवादी पार्टी, हिंगोली, नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (मा.व.क.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८९१

निर्णय दिनांक ११-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. राजाभाऊ श्रीमंतराव जाधव,<br>रा. व्हंताळ, पो. बलसूर, तालुका उमरगा,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>ग्रामपंचायत कार्यालय, व्हंताळ,<br>तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा,<br>तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, व्हंताळ, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी

संबंधित माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश न दिल्याने ते व्यथित झाले असून या अपील अर्जाव्दारे त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, १९९४ साली झालेल्या भूकंपातील नवीन बांधकामास परवानगी देण्यात आलेल्या लाभार्थ्यांच्या यादीची प्रत, पहिल्यांदा वाटप झालेल्या लाभार्थ्यांची यादी, दोन घराऐवजी एक घर वाटप करण्यासंबंधी ठराव घेऊन एक घर वाटप करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची यादी, शासनाकडून घर वाटपासंबंधी निर्देशित केलेल्या परिपत्रकाची प्रत, ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०४-२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०७-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात, आयोगाने विचारलेल्या प्रश्नास कोणतेही उत्तर देता आले नाही. त्यांनी फक्त आयोगास अपिलार्थीस दिनांक ०५-०४-२००८ रोजी माहिती पुरविल्याचे सांगितले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अस्पष्ट व अवाचनीय आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नक्की कोणती माहिती दिली याचा कोणताही बोध होत नाही. सबब गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी, अपिलार्थीने या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या दिनांक १९-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत वाचनीय स्वरुपात व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध न करुन देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजाभाऊ श्रीमंतराव जाधव, रा. व्हंताळ, पो. बलसूर, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, व्हंताळ, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उमरगा, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१११
निर्णय दिनांक १२/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल विभाग), तहसील कार्यालय, देगलूर, ता.देगलूर, जि.नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर, ता.देगलूर, जि.नांदेड. | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १०.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २७.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७५९

निर्णय दिनांक : १२.११.२००९

१ श्री. कान्हे मच्छिंद्र बहिरु, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
सिडको कार्यालय,
नवीन औरंगाबाद.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य प्रशासक (नवीन शहर),
वाळुज, औरंगाबाद.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक वसाहत अधिकारी (वाळुज),
सिडको कार्यालय (वाळुज),औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : प्रशासक (औरंगाबाद/वाळूज),
सिडको, नवीन औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी आणि दिशाभूल करणारी माहिती पुरविल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अर्जामध्ये त्यांनी, "थकबाकीची रक्कम भरणा करुन जप्तीची कारवाई रद्द करण्याची अंतीम तारीख काय होती?" - या मुद्यावर माहिती मागविली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०८.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित जानेवारी, २००३ ते दि. ०८.०४.२००८ या कालावधीतील, "अंतीम सूचना देऊन घर जप्तीची कार्यवाही झाल्यानंतर घरधारकाचे नाव,क्रमांक,जप्तीची तारीख इत्यादी तपशील वर्तमानपत्रातून जाहीर सूचना देऊन प्रकाशीत करण्याचे कारण काय ? जानेवारी, २००३ पासून किती जाहीर सूचना वेगवेगळया वर्तमानपत्रातून प्रकाशित करण्यात आल्या व प्रत्येक जाहीर सूचनेची एक झेरॉक्स प्रत", ही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे दि. १०.०६.२००८ प्रथम अपील केले. परंतु या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २५.०४.२००८ रोजी त्यांच्याकडील माहिती उपलब्ध करुन दिली आहे, असे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम,जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेली, त्यांना आवश्यक असलेली माहिती ही, त्यांच्या दि. ०८.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये समाविष्ट नाही. अपिलार्थीच्या मूळ

अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने या अर्जातील मुद्दा क्र.१ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीची कारणे विचारल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याइतपतच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाबद्दलची कारणे अर्जदारास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागता येणार नाहीत, त्यामुळे मूळात अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २५.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविली आहे. अपिलार्थीचा दि. १०.०६.२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नाही, असे आयोगास जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अवगत करुन देण्यात आले. तथापि अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या प्रथम अपील अर्जाची प्रत पाहता, हा अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ संबंधित लिपीकाने दिलेली पोचसही त्यावर दिसून येत आहे. यावरुन जन अपिलीय अधिकारी यांचा, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही हा युक्तिवाद, आयोग अमान्य करीत आहे. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांच्या कार्यालयातील या प्रकरणाशी संबंधित अपिलार्थीचे प्रथम अपील स्वीकृत करुन ते त्यांच्याकडे सादर न करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर त्यांनी प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीबद्दल अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी हा मुद्दा त्यांच्या प्रथम अर्जामध्ये समाविष्ट न केल्यामुळे, आता जन माहिती अधिकारी यांना, त्यांना नवीन मुद्यांवर अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेशित करणे उचित होणार नाही. या नवीन मुद्यावर जर अपिलार्थीस अद्यापही माहिती

आवश्यक असेल तर त्यांनी या माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वतंत्र अर्ज करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अशाप्रकारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व त्या वरील त्यांना देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य पुरविली असल्यामुळे आणि आता अपिलार्थीने त्यांच्या विचाराधीन अपील अर्जामध्ये उपस्थित केलेल्या नवीन मुद्याच्या माहितीकरिता त्यांना वेगळा अर्ज करण्याचे वरील परिच्छेदामध्ये सूचित केले असल्याने, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील तीनही मुद्दे निकाली निघत आहेत. ही वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः १२-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कान्हे मच्छिंद्र बहिरु,द्वारा गुलाब संदनशिव, आरएच-१८/१२, बजाजनगर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक वसाहत अधिकारी (वाळुज),सिडको कार्यालय (वाळुज),औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासक (औरंगाबाद/वाळुज), सिडको, नवीन औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

**२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७६०

निर्णय दिनांक : १२.११.२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. जगदिश हरिभाऊ बेदवे,<br>रा.सिल्लोड,जि.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा,<br>तहसीलदार, सिल्लोड,<br>जि.औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, सिल्लोड,<br>जि.औरंगाबाद. | | |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी त्यांच्या दि.०५.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित जानेवारी, २००६ ते जानेवारी, २००८ पर्यंत पार पडलेल्या वेगवेगळया निवडणुकीसाठी निवडणूकनिहाय शासनाकडून प्राप्त झालेला निधी व प्राप्त निधीचा विनियोग निवडणूक विभागातर्फे कसा करण्यात आला, याची संपूर्ण तपशीलवार माहिती.- अशी माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०५.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २४.०७.२००८ रोजीच्या निर्णयाद्वारे अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांच्या दि. ०२.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.११.२००९ रोजी औरंगाबाद घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे तपशीलवार माहिती मागितली होती. तथापि त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ०२.०८.२००८ रोजी प्राप्त झालेली माहिती ही एकत्रित स्वरुपातील आहे. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जानेवारी,२००६ ते जानेवारी २००८ या कलावधीमध्ये पार पडलेल्या विविधी निवडणूकांच्या संदर्भात निवडणूकनिहाय झालेला खर्च, कर्मचाऱ्यांच्या पगारावर झालेला खर्च अशी वेगवेगळया मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिली होती. हा मुद्दा त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी मांडला होता. तथापि या मुद्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश दिले नाहीत व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून संक्षिप्त स्वरुपात माहिती प्राप्त झालेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती.

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जासंदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्त्व हे अर्जदाराचे असते. अपिलार्थीस ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ते म्हणतात त्याप्रमाणे बऱ्याच वेळा उपस्थित राहिले, या विधानाच्या पुरावे सादर करण्याचे आयोगाने सूचित केले असता, अशाप्रकारचा कोणताही पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले आहे. यावरुन माहिती घेण्यासाठी अपिलार्थीने त्यांचे उत्तरदायित्त्व योग्यप्रकारे पार पाडले नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे शासनाकडून त्यांना प्राप्त झालेल्या निवडणूकीसाठी निवडणूकनिहाय निधीचा त्यांनी कशाप्रकारे खर्च केला आहे, याची माहिती हवी आहे. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि.०२.०८.२००८ दिलेल्या माहितीचे अवलोकन करता यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सन २००६-०७ व २००७-०८ या कालावधीमध्ये त्यांना प्राप्त झालेल्या निधी व तो कोणकोणत्या कामावर खर्च करण्यात आला, याचीच माहिती दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये त्यांच्याकडे सन २००६-०८ या कालावधीमध्ये घेतल्या गेलेल्या विविधी निवडणूकांमध्ये त्यांच्या कार्यालयातर्फे किती खर्च करण्यात आला, याची माहिती दिलेली नाही. आयोगाच्या मते अपिलार्थीस अपेक्षित माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००६ ते २००८ या कालावधीतील कॅशबुकच्या, संबंधित जमा व खर्च यासंदर्भातील नोंदवहीच्या प्रती उपलब्ध करुन दिल्यास आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकेल. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून पूर्वनियोजित वेळेत जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः हस्तगत करुन घेणे त्यांना अनिवार्य आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांच्या कार्यालयातर्फे सन २००६ ते २००८ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या निधीच्या जमेचा व

विनियोगाच्या कॅशबुकच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्याव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात त्यांच्या कार्यालयाच्या, निवडणूक निधी जमा व खर्चाच्या संदर्भातील कॅशबुकच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः १२-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जगदिश हरिभाऊ बेदवे, शहीद भगतसिंग चौक,मेनरोड, सिल्लोडजि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सिल्लोड,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७६१

निर्णय दिनांक : १२.११.२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मिलींद वसंतराव विटेकर,<br>रा.सोनपेठ, जि.परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, परभणी. | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर निर्णय न झाल्याने आणि त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व या अर्जाद्वारे त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून, संबंधित जन माहिती अधिकाऱ्यावर माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे शास्तीची कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी त्यांच्या दि.०४.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे लोकशाही दिनामध्ये व इतर वेळी त्यांनी केलेल्या विविध अर्जासंदर्भात पाच मुद्यांद्वारे काही माहिती

मागविली होती. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला आहे किंवा कसे, याबाबत आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात व मागणी केलेली उर्वरित माहिती न मिळाल्याच्या कारणास्तव अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.११.२००९ रोजी औरंगाबाद घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २१.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेणे हे आयोगास गरजेचे वाटते. अपिलार्थीच्या दि. २१.०५.२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी येथे दि. २१.०५.२००८ रोजी प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ संबंधित लिपीकाची पोचसही व जिल्हाधिकारी कार्यालयाचा शिक्का असलेली झेरॉक्स प्रत त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडली आहे. यावरुन सदर अपील अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयात प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २१.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि. २१.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांकः १२-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मिलींद वसंतराव विटेकर,रा.सोनपेठ, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७६३

निर्णय दिनांक : १२.११.२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. बापूराव रामचंद्र मालुसरे,<br>रा.घोनसी, ता.जळकोट, जि.लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा माहिती अधिकारी,<br>जिल्हा माहिती कार्यालय, लातूर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक (माहिती),<br>विभागीय माहिती कार्यालय, लातूर. | | |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अर्धवट माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०९.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दै.महिला एकजुट, उदगीर येथे मुद्रित व प्रकाशित केलेल्या दि. ०३.१०.२००२, १३.१०.२००२, २३.१०.२००२ व ०३.११.२००२ च्या अंकांच्या मूळ प्रती किंवा साक्षांकित/प्रमाणित प्रती, त्यांच्या कार्यालयातील माहिती अधिकारी जन अपिलीय अधिकारी यांचे

नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक, फॅक्स क्रमांक व केंद्र, राज्य मुख्य माहिती आयुक्तांचे नाव, पद, कार्यालयीन पत्ता,फोन क्रमांक,फॅक्स क्रमांक, पुणे, नागपूर व औरंगाबाद येथील राज्य माहिती आयुक्तांचे नाव,पद इत्यादी  आणि जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील द्वितीय अपील कोणाकडे करावयाचे त्यांचे नाव,पत्ता,दूरध्वनी क्रमांक इत्यादी, अशी माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०५.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०३.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०६.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सर्व माहिती तात्काळ उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर दि. ३०.०६.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी पूर्वी दिलेल्या माहितीतील काही माहिती दुरुस्त करुन ती अपिलार्थीस परत विनामूल्य पुरविली. यानंतर अपिलार्थीने  वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.११.२००९ रोजी औरंगाबाद घेण्यात आली. सुनावणीसाठी तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी  उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दि. ०५.०५.२००८ व ३०.०६.२००८ रोजी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली आहे.अपिलार्थीच्या मूळ अर्जातील लातूर जिल्हयातील उदगीर येथून प्रसिध्द होणाऱ्या वर्तमानपत्राच्या मूळ प्रती त्यांनी त्यांच्याकडील प्रचलीत कार्यपध्दतीनुसार रद्दीमध्ये विकल्या आहेत, त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ च्या संदर्भात त्यांना माहिती देता आली नाही. अपिलार्थीस त्यांनी दि. ०५.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे तसे कळविले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रथमतः दि. ०५.०५.२००८ रोजी व तदनंतर दि. ३०.०६.२००८ रोजी सुधारित माहिती देण्यात आली आहे व अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये महिला एकजूट या वर्तमानपत्राच्या मूळ प्रतींची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती. तथापि सदर वर्तमानपत्रे रद्दीमध्ये विकल्याची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती बरोबर आहे. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत आणि आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती विनामूल्य प्राप्त झाली असल्यामुळे, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः १२-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बापूराव रामचंद्र मालुसरे,रा.घोनसी, ता.जळकोट, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, लातूर

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७६४

निर्णय दिनांक : १२.११.२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सुनिल श्रावण बनसोडे,<br>रा.नळदुर्ग, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत देवसिंगा (नळ),<br>ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती,तुळजापूर,<br>जि.उस्मानाबाद. | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.११.२००९ रोजी औरंगाबाद घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत आणि जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत देवासिंगा (नळ), ता. तुळजापूर श्री. चंद्रकांत नारायण लोकरे यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दि. ११.११.२००९ रोजीचे एक पत्र सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने

त्यांचे विचाराधीन अपील क्र. १७६४/०८ हे ते, स्वखुषीने मागे घेत असल्याचे नमूद करुन सदर अपील रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडील विचाराधीन अपील मागे घेतले असल्याने ते खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १७६४/०८, दि.२५.०८.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः १२-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुनिल श्रावण बनसोडे, मु.पो.नळदुर्ग, ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, देवसिंगा (नळ), ता.तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिति, तुळजापूर,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१११
निर्णय दिनांक १२/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,<br>रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल विभाग),<br>तहसील कार्यालय, देगलूर,<br>ता.देगलूर, जि.नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, देगलूर, ता.देगलूर,<br>जि.नांदेड. | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १०.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २७.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११२
निर्णय दिनांक १२/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,<br>रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>डॉ. राममनोहर लोहीया उर्दू प्राथमिक शाळा,<br>देगलूर, ता. देगलूर, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २२.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २७.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११३
निर्णय दिनांक १२/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १०.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २७.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०२४
निर्णय दिनांक १२/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. प्रफुल्ल नरहरराव सावंत,<br>रा. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका निरीक्षक,<br>भुमी अभिलेख, नांदेड, ता.जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधिक्षक,<br>भुमी अभिलेख, नांदेड, जि.नांदेड | | |

**निर्णय**

श्री. प्रफुल्ल नरहरराव सावंत यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०७.०७.२००८ (दि. ०१.११.२००८ रोजी फेरसादर) रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २६.१२.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २२.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. प्रफुल्ल नरहरराव सावंत, मस्तानपुरा, नवामोंढा, पो. शिवाजीनगर, नांदेड, ता.जि. नांदेड ४३१ ६०२.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७६५

निर्णय दिनांक १२-११-२००९

१ श्री. संजय महादेवराव सोनवणे, : अपिलार्थी
रा. राजे संभाजीनगर (प), तुळजापूर, तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर, तालुका
तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद
उपविभाग, उस्मानाबाद

त्रयस्थ पक्ष : १. श्री. संजय महादेवराव सोनवणे
२. श्रीमती शारदाबाई महादेवराव सोनवणे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली, जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयावर त्यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असून या अपील अर्जामध्ये त्यांनी

आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर दंडात्मक शास्ती लावावी अशी आयोगास विनंती केली आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

या अपील अर्जाच्या सुनावणीच्या सुरुवातीस श्री. देवेंद्र कटके, जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर यांनी अपिलार्थीचे दिनांक ०७-०८-२००८ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थी यांनी या प्रकरणाशी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना मिळाल्याने यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केले आहे. यावरुन असे आढळून येते की, आयोगाकडे अपिलार्थीने व्दितीय अपील केल्यानंतर अपिलार्थीस माहिती मिळाली असून त्यांचे प्राप्त माहितीने समाधान झालेले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना मिळाल्याचे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक १७६५/२००८, दिनांक ०६-०८-२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संजय महादेवराव सोनवणे, रा. राजे संभाजीनगर (प), तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद उपविभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७६६

निर्णय दिनांक १२-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. भारत छोटूलाल चव्हाण,<br>व्दारा- कापड विक्री केंद्र, पोलीस लाईन, उस्मानाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद | : प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता (बां.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०८-२००८ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी उस्मानाबाद येथील गट नंबर ६१४ मधील त्यांच्या मालकी कब्जाच्या क्षेत्रात अनधिकृतरित्या अतिक्रमण करुन शेततळे प्रकल्प केल्याबाबत कार्यकारी अभियंता,

बांधकाम, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्या विरुध्द दिनांक २५-०४-२००७ रोजी दाखल केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांच्या अर्जाचा प्रवास, प्रगती याचा तारीखनिशी अहवाल व कार्यालयीन टिपणीची सत्यप्रत, उपरोक्त विषयी योजना राबविणा-या यंत्रणेकडून प्राप्त झालेल्या माहितीची सत्यप्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीचा दिनांक ०८-११-२००७ रोजीचा अर्ज संबधित यंत्रणेकडून दिनांक १७-११-२००७ रोजी कार्यकारी अभियंता, बांधकाम, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे पाठविला गेला.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती न देता त्यांना, उपविभाग उस्मानाबादने हद्दबंदी नकाशा व शेततळ्याचे डी मार्केशन नकाशा त्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याबाबत कळविले आहे, असे कळविले. अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०१-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी दिनांक २७-१२-२००७ रोजी पुरविलेली माहिती आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे कार्यकारी अभियंता, बांधकाम, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या शेतामध्ये अनधिकृतरित्या अतिक्रमण करुन शेततळे बांधल्याबाबत तक्रार अर्ज केला होता. त्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने कोणती कार्यवाही केली याची माहिती अपिलार्थीस अपेक्षित असल्याचे दिसून येते. तथापि यासंदर्भात अपिलार्थीस अशी माहिती न पुरविता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याविरुध्द केलेल्या दिनांक २५-०४-२००७ रोजीच्या तक्रार अर्जातील मुद्दयांदर्भात अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती पूर्णतः चुकीची आहे. आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक २५-०४-२००७ रोजी त्यांनी तक्रार अर्ज केला होता त्या दिवसापासून ते अपिलार्थीने दिनांक ०८-११-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या प्रथम अर्जाच्या दिनांकापर्यंत, त्यांच्या कार्यालयाने अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भात वेगवेगळ्या प्राधिकरणांशी केलेला पत्रव्यवहार आणि या प्रकरणाशी संबंधित कार्यालयीन अभिलेख्यावर असलेल्या सर्व संबंधित टिपणीच्या,अभिप्रायाच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने ही माहिती १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास दिनांक २७-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे चुकीचा प्रतिसाद देऊन संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, उस्मानाबाद आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सहायक, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे, या सर्वांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बां.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**

**दिनांक १२-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भारत छोटूलाल चव्हाण, व्दारा- कापड विक्री केंद्र, पोलीस लाईन, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बां.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७६८

निर्णय दिनांक १२-११-२००९

१ श्री. पूरभाजी हनमंतराव शिंदे, : अपिलार्थी
रा. लोणी खुर्द, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर,
तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर,
तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक २८-०७-२००८ रोजीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०८-२००८ रोजी सुनावणी घेतली आहे. परंतु त्यांच्या प्रथम अपील अर्जावरील निकाल संबंधितांकडून प्राप्त झाला नाही. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, जमिनीची वाटणी वारसाआधारे वाटणीपत्राआधारे, सख्ख्या भावामधील शेतीची वाटणी वाटणी पत्राआधारे, चुलते व पुतणे यांच्यामध्ये वाटणी पत्राआधारे, पतीचे शेत पत्नीच्या नावाने फेर करावयाचे असेल तर, वडील हयात असून त्यांनी मुलास वाटणीपत्रक करुन दिल्यास, वडिलोपार्जीत जमिनीची वाटणी, बहिणीस शेती हिश्याप्रमाणे वाटणीपत्र दिल्यास, इतर जमिनीवर फेरफाराची नोंद घ्यावयाची असेल तर कोणकोणत्या कागदपत्रांची आवश्यकता आहे, हे फेर करण्यासाठी किती दिवसांचा कालावधी लागतो या संदर्भातील शासनाच्या परिपत्रकाची सत्यप्रत व हे करण्यासाठी किती खर्च लागतो, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा कालावधी सन २००७ ते २००८ असा असून अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तलाठ्याशी संबंधित असल्यामुळे तहसीलदार, अर्धापूर यांनी अपिलार्थीचा अर्ज जुलै २००८ च्या पत्राव्दारे (तहसीलदारांच्या या पत्रावर दिनांकाचा उल्लेख नाही) अपिलार्थीचा अर्ज संबधित तलाठी, सज्जा लोणी (बु.) यांच्याकडे पाठविण्यात आल्याचे अपिलार्थीस अवगत केले व त्यांच्याकडून माहिती घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित तलाठ्याने त्यांच्याकडील दिनांक १९-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार प्रश्नांची उत्तरे देणे अपेक्षित नसल्याचे कळविले आणि शासनाचे परिपत्रक त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस अवगत केले. संबंधितांकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-१०-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १४९ चे वाचन करुन दाखविले व अपिलार्थीस त्यांच्या शेतजमिनीचा फेर घेतल्याची नोंद दाखविली परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी या सुनावणीचे कोणतेही लिखित आदेश पारीत केले नाहीत. अशा प्रकारे अपिलार्थीस जन

माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती लेखी स्वरुपात प्राप्त न झाल्याने  व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व  जन माहिती अधिकारी हजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या जमाबंदी दप्तरावरुन दाखविली आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम १४९ मध्ये उपलब्ध आहे. फेर घेण्यासाठी कोणताही खर्च लागत नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मागितलेली माहिती ही सर्वसाधारणपणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. ती माहिती घेण्यासाठी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याशी व्यक्तिशः किती वेळा संपर्क साधला हे त्यांच्या अनुपस्थितीमुळे व आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम १४९ ची प्रत व फेरफाराकरिता त्यांच्या कार्यालयातर्फे आकारण्यात येणा-या शुल्काच्या संबंधात त्यांच्याकडे एखादे परिपत्रक असेल तर किंवा सध्या त्यांच्या कार्यालयामार्फत कोणती कार्यपध्दती अवलंबिली जाते त्याची माहिती अपिलार्थीस पुरविणे उचित राहिल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती वर कथन केल्याप्रमाणे,हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत, त्यांना विनामूल्य पुरवावी.

जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर लेखी आदेश पारीत करण्याऐवजी अपिलार्थीच्या शंकांचे तोंडी निरसन केले व त्यांचे तशा अर्थाचे अभिप्राय अभिलेख्यामध्ये दिले आहेत. जन अपिलीय अधिकारी यांची निर्णय देण्याची ही कृती सर्वथा गैर आहे. इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अपील अर्जावर त्यांनी लिखित स्वरुपात निर्णय देणे त्यांना अनिवार्य आहे, याची त्यांनी नोंद घ्यावी.

तहसीलदार, अर्धापूर यांची वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेली प्रथम अपिलावरील निर्णय देण्याची कार्यपध्दती पाहिली असता, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देण्याचे त्यांचे कर्तव्य चोखपणे पार पाडल्याचे आढळून येत नाही. त्यांच्या या प्रकरणातील अशा प्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद जिल्हाधिकारी, नांदेड यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पूरभाजी हनमंतराव शिंदे, रा. लोणी खुर्द, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७६९

निर्णय दिनांक १२-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. अविनाश पुंडलिकराव ईटकापल्ले,<br>मु. पो. गडगा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, नायगांव (खै.),<br>तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, नायगांव (खै.),<br>तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे ७५१६ रुपये इतके चलनाव्दारे भरुनही त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, एन. एफ. एफ. डब्ल्यू. या योजनेअंतर्गत दिनांक १५-०३-२००६ अखेरपर्यंत

केलेल्या कामावरील कामगारांची (कामाची) नांवासह यादी आणि एम. बी. रेकॉर्ड संबंधीचा तपशील, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम उत्तर देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १०९५६ इतके त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने दिनांक १९-०७-२००८ रोजी यापैकी रु. ७५१६/- इतके शुल्क कोषागार कार्यालयात भरल्याबाबतची चलनाची प्रत दिनांक १९-०७-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांना सादर केली व मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले होते. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. या काळामध्ये अपिलार्थी कृषि विभागातील वेगवेगळ्या अधिका-यांकडे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी वेगवेगळा पत्रव्यवहार करत राहिले. अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७५१६ इतके शासकीय कोषागारात भरल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांच्याकडे दिनांक २४-०७-२००८ रोजी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी रुपये ७५१६ इतक्या अनुदानाची मागणी त्यांच्याकडे केली. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा त्यांनी जन माहिती

अधिकारी यांच्याकडे चलनाव्दारे केला असूनही, माहिती, केवळ अनुदान उपलब्ध नाही या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करेपर्यंत देखील माहिती दिली नव्हती. अपिलार्थीने माहितीसाठीचा त्यांचा अर्ज केल्याचा दिनांक, त्यांनी आवश्यक त्या शुल्काचा शासकीय कोषागारात भरणा केल्याचा दिनांक हे पाहता आता अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याची मुदत व्यपगत झाल्याचे आढळून येत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल. तसेच या प्रकरणी अपिलार्थीने शासकीय कोषागारात भरलेले शुल्क रुपये ७५१६ इतके त्यांना परत करावे लागेल. अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना ती देणे भाग आहे, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने माहितीपोटीचे शुल्क भरल्यानंतरही कृषि विभागाच्या अधिका-यांशी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात वेगवेगळया पातळीवर पत्रव्यवहार केला आहे. एवढेच नव्हे तर त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी त्यांनी दिनांक ०२-०८-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे ते आमरण उपोषणास बसत असल्याचे देखील तालुका कृषि अधिका-यास कळविले. त्यांच्या या कृतीचा प्रतिसाद म्हणून तालुका कृषि अधिकारी, नायगांव (खै.) यांनी त्यांच्याकडील पत्र क्रमांक १३२७, दिनांक ०८-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस दिनांक ३०-०९-२००८ पर्यंत माहिती देण्याचे आश्वासीत देखील केले होते. परंतु ०८.१०.२००८ ही तारीख उजाडेपर्यंत देखील कृषि विभागाच्या संबंधित अधिका-यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस,हे आदेश निर्गमित होताच १५

दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी माहितीपोटीचे भरलेले शुल्क रुपये ७५१६ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत परत करावे.

वरील घटनाक्रमातून कृषि विभागाच्या क्षेत्रीय पातळीवरील कृषि विभागाची यंत्रणा जन-सामान्यांच्या संवेदनेप्रती किती निर्ढावली आहे याचा प्रत्यय येतो. आयोगास देखील तीन वर्षामध्ये कृषि विभागासंदर्भातील वेळोवेळी घेतलेल्या सुनावणींमध्ये असे आढळून आले आहे की, एखादा दुसरा अपवाद वगळता अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अर्जदारास कृषि अधिकाऱ्याकडून अपेक्षित प्रतिसाद प्राप्त होत नाही. जन माहिती अधिकारी प्रत्येक वेळी अपिलार्थीने जर त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क शासकीय कोषागारात भरले की त्याची मागणी त्यांच्या वरिष्ठांकडे करतात आणि अपिलार्थीस विहित कालावधी ओलांडून गेला तरी कोणतीही माहिती देत नाहीत. कृषि विभागाकडून माहिती देण्यासाठी त्यांच्या विभागाच्या क्षेत्रीय पातळीवरील या अशा प्रकारच्या व्यवस्थेमध्ये कोणत्याही प्रकारचे बदल अथवा यासंदर्भात कोणतेही मार्गदर्शन केले जात नाही. सबब सचिव (कृषि) यांनी, अशा प्रकारची परिस्थिती ज्यावेळी उद्‌भवते त्यावेळी त्यांच्या विभागाच्या क्षेत्रीय अधिका-यांनी कशा प्रकारे कार्यवाही करावी याचे मार्गदर्शन करण्यासाठी त्यांच्या पातळीवर सूचना पारीत कराव्यात जेणेकरुन त्यांच्या विभागातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त अर्जास सकारात्मक प्रतिसाद देता येईल. सचिव (कृषि) यांना या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (८) (क) (चार) मधील तरतुदीनुसार या सूचना देण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३.	जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ७५१६ इतके त्यांना,हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१	श्री. अविनाश पुंडलिकराव ईटकापल्ले, मु. पो. गडगा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड.

२	जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७७०

निर्णय दिनांक १२-११-२००९

१ श्री. भवरे गोकूळ वामनराव, : अपिलार्थी
मु. पो. अंबाडी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
ल. पा. पा. पु. (जि.प.) कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता,
ल. पा. पा. पु. (जि.प.) कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने लोकसहभागावर आधारित संपूर्ण स्वजलधारा अंबाडीतांडाची माहिती मागितली असून अपिलार्थीने या अपील अर्जाव्दारे आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये किनवट तालुक्यातील मौजे अंबाडीतांडा येथे लोकसहभागावर आधारित संपूर्ण स्वजलधारा योजनेअंतर्गत ग्राम पाणीपुरवठा समितीकडून पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी करण्यात येत असलेल्या नळयोजनेची

माहिती उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे, पाणीपुरवठा (जिल्हा परिषद), किनवट यांच्याकडे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - योजनेच्या अंदाजपत्रकाची प्रत, कार्यारंभ आदेशाची प्रत, समितीने नळ योजनेसाठी खरेदी केलेल्या प्रत्येक वस्तुच्या पावत्या, देयके देण्यात आलेल्या मोजमाप पुस्तिकेच्या प्रती, मंजूर निधी, लोकसहभागाचा वाटा, खर्च रक्कम, शिल्लक रक्कम व शिल्लक कामे - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती उपविभागीय अभियंत्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास उपविभागीय अभियंता यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार परत उप अभियंता, लघुपाटबंधारे, पाणीपुरवठा, किनवट यांच्याकडे दिनांक ०८-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. उप अभियंता, लघुपाटबंधारे पाणीपुरवठा, किनवट यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही आणि त्यामुळे अपिलार्थी हे त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने संबंधित उप अभियंता, लघुपाटबंधारे पाणीपुरवठा, किनवट यांच्याकडे ज्या योजनेसंदर्भात माहिती मागितली आहे ती योजना शासनाच्या इतर विकास योजनेपेक्षा वेगळी असून या योजनेची अंमलबजावणी ही संबंधित गावाच्या ग्रामस्थांनी करावयाची आहे. या योजनेची अंमलबजावणी संबंधित गावाच्या ग्रामस्थांकडून निवड केलेल्या ग्रामस्थांच्या समितीकडून केली जाते. या समितीचे अध्यक्ष व सचिव हे त्या त्या गावाचे ग्रामस्थ असतात. या योजनेवर उप

अभियंता यांचे नियंत्रण फक्त तांत्रिक बाबी तपासण्यापुरते असते. अपिलार्थीने ज्या प्रकारच्या माहितीची मागणी उप अभियंता, लघुपाटबंधारे पाणीपुरवठा, किनवट यांच्याकडे केली आहे ती माहिती संबंधित गावाच्या पाणीपुरवठा समितीकडे उपलब्ध आहे. ती पाणीपुरवठा समिती माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मधील तरतुदीतील 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकणार नाही. त्यामुळे या प्रकरणी मूळात अपिलार्थीने चुकीच्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे असे आढळून येत आहे. या योजनेसाठी ९० टक्के निधी हा शासनाकडून जिल्हा परिषदेमार्फत संबंधित समितीस पुरविला जातो. त्यामुळे अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे विनंती करणे योग्य राहील. जेणेकरुन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे अंबाडी तांडा येथील ग्रामीण पाणीपुरवठा योजनेची अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरवतील. अशाप्रकारे अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार या प्रकरणी चुकीच्या व न नियुक्त केलेल्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली असल्यामुळे त्यावरील प्रथम अपील देखील नियुक्ती न केलेल्या प्राधिकरणाकडे केले असल्यामुळे तसेच या युक्तिवादावर भाष्य करण्यसासाठी आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही उपस्थित नसल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भवरे गोकूळ वामनराव, मु. पो. अंबाडी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, ल. पा. पा. पु. (जि.प.) कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, उपविभागीय अभियंता, ल. पा. पा. पु. (जि.प.) कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९६३

निर्णय दिनांक १२-११-२००९

१ श्री. शेख वहाबोद्दीन शेख करीमोद्दीन, : अपिलार्थी
मु. पो. तळेगांव, तालुका उमरी, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उमरी,
तालुका उमरी, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती पुरविली नाही. त्यांना पुरविलेली माहिती चुकीची आणि दिशाभूल करणारी आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कृतीमुळे ते माहिती मिळण्यापासून वंचित राहिले व त्यामुळे त्यांना मानसिक त्रास झाला आहे. त्यामुळे

संबंधित अधिका-यावर दंडात्मक कार्यवाही करावी आणि अपिलार्थीस माहिती मिळवून द्यावी अशी त्यांनी आयोगास या अपील अर्जाव्दारे विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, उमरी तालुक्यातील आज तारखेपर्यंत किती शेतक-यांच्या शेतात विहिर किंवा बोर आहे, अशा शेतक-यापैकी किती शेतक-यांची बागायतदार म्हणून नोंद आहे, अशा बागायतदार शेतक-यांनी आपल्या कार्यालयाकडून पाणी मिळत असल्याचे पाणी प्रमाणपत्र घेतले आहे त्या शेतक-यांच्या नावाची गावासहीत सर्वे नंबर, गट नंबर, क्षेत्रफळ अशी तपशीलवार माहिती द्यावी आणि ज्या शेतक-यांना शेतामध्ये विहिर किंवा बोर नाही अणि ज्या शेतक-यांनी त्यांच्याकडून पाणी प्रमाणपत्र घेतले नाही अशा कोरडवाहू शेतक-यांची स्वतंत्र यादी द्यावी, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक १५-१०-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. तसेच शेतकरी बागायतदार आहेत किंवा नाही याची नोंद तहसील कार्यालयात नसते. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ३ च्या

संदर्भात पाणी परवानगी पाटबंधारे विभागाकडून संबधित शेतक-यांना दिली जाते, त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती ते पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ संदर्भात तालुक्यातील कोरडवाहू शेतक-यांची यादी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली नाही परंतु ही माहिती ते आता १५ दिवसाच्या आत पुरवू शकतील.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-१०-२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविली आहे. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असणे संभवत नाही आणि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत. अशा परिस्थितीत अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, ही माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असली तरी, या माहितीची व्याप्ती मोठी असल्याचे आयोगास आढळून येत आहे. ही माहिती नायब तहसीलदार यांना त्यांच्या नियंत्रणाखालील विविध कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरवावी लागेल. ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना, ती माहिती अधिकार अधिनियमातील सुसंगत असल्यामुळे, पुरवावी लागेल, सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबधित माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व टपालाव्दारे उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करणे आयोगास उचित वाटत नाही परंतु या

प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः अपूर्ण माहिती पुरविल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व टपालाव्दारे पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख वहाबोद्दीन शेख करीमोद्दीन, मु. पो. तळेगांव, तालुका उमरी, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

**२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८८३

निर्णय दिनांक : १३.११.२००९

१ श्री. एम.ए.हकीम, : अपिलार्थी
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
वैद्यकीय अधिकारी,
प्राथमिक आरोग्य केंद्र, येरमळा,ता.कळंब,
जि.उस्मानाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनाच्या व सेवानिवृत्ती परती प्रवासभत्ता बीलासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०८.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ते कुष्ठरोग तंत्रज्ञ म्हणून कार्यरत असताना माहे ८/९४ ते ८/९६, मार्च,९७ ते ऑक्टो.,९७ या कालावधीशी संबंधित काही माहिती त्यांनी खालीलप्रमाणे मागितली होती.

"अर्जदार कुष्ठरोग तंत्रज्ञ म्हणून कार्यरत असताना (१) माहे ८/९४ ते ८/९६ या कालावधीचे घरभाडे भत्ता अदा केलेला नाही,घरभाडयाच्या पावत्या कार्यालयात दाखल केलेल्या आहेत (२) माहे मार्च,९७ ते माहे १०/९७ चा कायम प्रवासभत्ता अनुदान नसल्याने अदा करण्यात आला नाही. आता केव्हा अदा करणार, कालावधी कळवावा (३) सेवानिवृत्ती प्रती प्रवासभत्ता रु. ३६४४/- अद्यापि दिलेला नाही. केव्हा देणार, कालावधी कळवावा."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.०७.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपृष्ठयर्थ त्यांना रु. १२९/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे नमूद करुन आयोगास असे अवगत केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो प्रवासभत्ता दिला नाही तसेच ते सेवानिवृत्त झाल्यानंतर स्वग्रामी जाण्यासाठी जी प्रवासभत्ता रक्कम अनुज्ञेय असते त्या थकबाकीची रक्कम देखील त्यांना जन माहिती अधिकारी हे केव्हा देणार आहेत, अशी माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे.

जन माहिती यांनी आयोगास असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस देय असलेली सर्व देयके त्यांना अदा केली असून, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या

माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे न केल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती पुरविलेली नाही व ही माहिती ते अपिलार्थीस केव्हाही सशुल्क देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ०८.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे कोणत्याही (विशिष्ट) स्वरुपाची माहिती मागविल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने त्यांच्या या अर्जामध्ये उपस्थित केलेल्या तीन मुद्यांमध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना घरभाडे भत्ता अदा केला नाही, त्यांच्याकडे अनुदान नसल्याने प्रवासभत्ता रक्कम अदा करण्यात आली नाही आणि सेवानिवृत्तीनंतर अनुज्ञेय असलेला स्वग्रामी परतीचा प्रवासभत्ता रु. ३६६४/- अद्यापि दिला नाही, असे आयोगास अवगत करुन त्यांची देयके कधी देणार, अशी भविष्यकाळातील माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य देणे अभिप्रेत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे भविष्यकाळातील माहिती विचारली असल्यामुळे, ही माहिती आजच्या परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे संभवत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती हीच मूळात अशाप्रकारे अवैध असल्याचे सिध्द होत असल्यामुळे ती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. यास्तव अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

प्रसंगावशात, आयोगास असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थी हे १९९७ साली सेवानिवृत्त होऊनही त्यांना सेवानिवृत्तीच्या वेळी देय असणारा प्रवासभत्ता रु. ३६४४/- अद्यापपावेतो अदा केला गेलेला नाही. ही बाब जिल्हा परिषद,उस्मानाबादमधील आरोग्य विभागास फारशी भूषणावह आहे, असे आयोगास वाटत नाही. यास्तव जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस देय असलेल्या

सर्व देयकांबाबत तातडीने निर्णय घ्यावा, जेणेकरुन अपिलार्थीस त्यांच्या प्रकरणासंदर्भात प्रशासनाची भूमिका ज्ञात होऊ शकेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक: १३-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. एम.ए.हकीम,सेवानिवृत्त कुष्ठरोग तंत्रज्ञ, द्वारा महंमद साजेद सलीम, घ.क्र.८-८-६५०, हिनानगर, रशिदपुरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,प्राथमिक आरोग्य केंद्र, येरमळा,ता.कळंब, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८८४

निर्णय दिनांक : १३.११.२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. श्रीकांत मारोतराव कदम,<br>रा.कंठेश्वर, ता.पूर्णा, जि.परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय,पूर्णा, जि. परभणी. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती,पूर्णा, जि. परभणी. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०७.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये ग्रामपंचायत, कंठेश्वर ता.पूर्णा यांच्यासंदर्भात गट विकास अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०१.२००४ ते दि. ०६.०८.२००८ या कालावधीशी संबंधित ग्रामपंचायतीने केलेल्या विकास कामांच्या मोजमापपुस्तिकेच्या प्रती, जमा झालेली घरपट्टी व नळपट्टी आणि केलेला खर्च, या कालावधीमध्ये

झालेल्या ग्रामसभांच्या संख्या, उपस्थित ग्रामस्थांची सहीनिशी नावे, घरकुल योजनेमध्ये लावलेले निकष आणि लाभार्थ्यांची यादी आणि नमुना नंबर ८ ची प्रत आणि दि. १६.०१.२००४ ते दि. ०६.०१.२००८ या कालावधीतील जमाखर्चाच्या ताळेबंद हिशोबाच्या प्रती,अशी माहिती मागितली होती.

यानंतर संबंधित ग्रामसेवकाने अपिलार्थीस काही माहिती दिली, परंतु काही मुद्यांवर अपिलार्थीस माहिती मिळाली नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २३.०९.२००८ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी काय निर्णय दिला हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. परंतु यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जाचे अवलोकन केले असता, हा अर्ज सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचना क्र. आर.टी.आय. २००५/ सी.आर. ३१५/०५/५,दिनांक ११.१०.२००५ मध्ये दिलेल्या विहित नमुन्यात नाही. अर्ज जरी विहित नमुन्यात नसला तरी अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे, त्यांना अपेक्षित माहिती टपालाद्वारे हवी की समक्ष या मुद्यांवर कोणतेही भाष्य या अर्जामध्ये केलेले नाही. आयोगास पुरविण्यात आलेल्या त्यांच्या प्रथम अर्जाच्या प्रतीवर रु. १०/- इतक्या किमतीचे कोर्ट-फी-स्टॅम्प डकविल्याचे आढळून येत नाही.

सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कथित अपूर्ण माहिती प्राप्त झाली किंवा कसे,

हे ही आयोगास कळण्यास मार्ग नाही, हे पाहता, आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे व सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक: १३-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्रीकांत मारोतराव कदम,रा.कंठेश्वर, ता.पूर्णा, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी, गट विकास अधिकारी,पंचायत समिती कार्यालय,पूर्णा, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती,पूर्णा, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८८५

निर्णय दिनांक : १३.११.२००९

१. श्रीमती अन्नपूर्णा भगवान शिगेदार, :अपिलार्थी
रा. गंगाखेड, जि.परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,पाथरी, जि. परभणी.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, परभणी.

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, परभणी

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जाची दखल घेतली नाही आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सदोष व अपूर्ण माहिती दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२५.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे विविध कालावधीशी संबंधित त्रयस्थ पक्ष श्री. शिगेदार (मयत कर्मचारी) यांची

वेतनश्रेणी व रजेच्या हक्कपट आणि इतर सेवाविषयक बार्बीच्या संदर्भात एकूण सहा मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्रयस्थ पक्षाची मान्य केलेली वेतनश्रेणी, या वेतनश्रेणीत निश्चित केलेले वेतन, वेतनवाढ, १९९३-९४, १९९५-९६च्या पगारपत्रकाच्या प्रती, त्रयस्थ पक्षाकडून या कालावधीमध्ये जादा अदाईची वसूल केलेली रक्कम, त्रयस्थ पक्षाच्या रजेचा हक्कपट व प्रलंबित रजा, रजा प्रलंबित राहण्याचे कारण, प्रलंबित वेतनवाढी रु. ९४५०/- ही रक्कम कोणत्या कालावधीची, कशाची, शासनाकडे या रकमेचा भरणा केल्याच्या चलनाची प्रत व त्रयस्थ पक्षाची अनधिकृत गैरहजेरी पाठविणाऱ्या तत्कालीन विस्तार अधिकारी (पं) व गट विकास अधिकारी यांची नावे.- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.३०.०७.२००८ रोजी प्राप्त झाला. या अर्जास त्यांनी दि. २७.०८.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १८/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर शुल्क अपिलार्थीने दि. २७.०८.२००८ रोजी भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दि. ०५.०९.२००८ रोजी उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०९.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय झाल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये आढळून येत नाही, परंतु त्यांनी दि. ०८.१२.२००८ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकाऱ्यास अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दि. १०.१२.२००८ पर्यंत त्यांच्या कार्यालयात सादर करण्याचे सूचित केल्याचे दिसून येत आहे. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १८.१०.२००८ रोजी व यापूर्वी दि. २७.०८.२००८ च्या पत्राव्दारे प्रत्यक्षात दि.०५.०९.२००८ रोजी माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्याकडील माहिती त्यांनी दि. २७.०८.२००८ रोजीच्या पत्राव्दारे व सामान्य प्रशासन विभागामार्फत दि. १८.१०.२००८ रोजी पुरविली आहे. त्यांनी अपिलार्थीपासून कोणतीही माहिती हेतूपुरस्सर दडवून ठेवलेली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ४ - रजा प्रलंबित राहण्याचे कारण - ही माहिती वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.४ मध्ये - रजा प्रलंबित राहण्याचे कारण- अशी माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारली आहे. वास्तविक रजा घेणे हा ज्या त्या कर्मचाऱ्याचा वैयक्तिक अधिकार असतो, त्यामुळे त्रयस्थ पक्षाच्या प्रलंबित रजा प्रलंबित का राहिल्या, याचे कारण जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही प्रकारे उपलब्ध असणे शक्य नाही. अशाप्रकारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या मुद्यांवर मागणी केलेली माहिती ही, अमूर्त स्वरुपातील असल्यामुळे ती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय असणार नाही. जन माहिती अधिकारी आणि सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांनी दि. २७.०८.२००८ च्या पत्राव्दारे पुरविलेली व १८.१०.२००८ रोजी पुरविलेली माहिती व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती याची तुलना करता त्रयस्थ पक्ष श्री. शिगेदार यांच्या रजेच्या हक्कपटाची प्रत त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. रजेचा हक्कपट म्हणजे प्रत्येक कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तिकेच्या शेवटी कर्मचाऱ्याने त्यांच्या सेवाकालावधीमध्ये घेतलेल्या रजेचा हिशोब असतो. अपिलार्थीच्या

सेवापुस्तिकेची झेरॉक्स प्रत, जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने त्यांना दि. १८.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली आहे. तथापि त्रयस्थ पक्षाच्या सेवापुस्तिकेची झेरॉक्स प्रत जन माहिती अधिकारी यांना आयोगास दाखविता आली नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ च्या संदर्भातील ही माहिती दिली नाही, असे अनुमान आयोग काढत आहे. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात अपिलार्थीकडून जिल्हा परिषदेने त्यांच्या देयकातून रु.९४५०/- ही त्रयस्थ पक्षास जादा दिलेली रक्कम वजावट करुन दिलेली आहे. ही रक्कम जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही चलनाद्वारे कोषागारात भरलेली नाही. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या चलनाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे संभवत नाही, परंतु अपिलार्थीच्या शंकेचे निरसन होण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मुद्दा क्र.५ च्या संदर्भात हा खुलासा त्यांना करणे आयोगास गरजेचे वाटते. या प्रकरणी त्यांनी हा खुलासा अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २७.०८.२००८ व १८.१०.२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविलेल्या माहितीचे वरीलप्रमाणे केलेले विश्लेषण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ मधील अपिलार्थीच्या रजेच्या हक्कपटाची झेरॉक्स प्रत व मुद्दा क्र.५ शी संबंधित वरील परिच्छेदात स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य टपालाद्वारे पुरवावी. तसेच अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क आकारुनही अपिलार्थीस अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने व अपूर्ण स्वरुपात पाठविल्यामुळे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे त्यांनी स्विकारलेले शुल्क रु. १८/- इतके त्यांना या कालावधीमध्ये परत करावे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित असतानादेखील संबंधित जन माहिती अधिकारी यांनी

अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे कार्यवाही न केल्यामुळे व याचा परिणाम अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यात झाल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी दिलेल्या माहितीमध्ये त्रयस्थ पक्ष, श्री. शिगेदार यांना देय असलेल्या बोनसची माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिली नसल्याचे नमूद केले आहे. तथापि ही माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २७.०८.२००८ च्या पत्राव्दारे दि. ०५.०९.२००८ रोजी पुरविल्याचे आयोगास आढळून आले आहे. यामध्ये १९९३-९४ साली अपिलार्थीस रु.२३३९/- इतकी रक्कम अदा केल्याचे दर्शविले आहे. ही रक्कम बोनस रक्कम असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे. त्यामुळे या मुद्यावर अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली असे मानता येईल, तथापि त्याचा स्पष्ट उल्लेख करुन आता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती वेगळ्या पत्राव्दारे पुरवावी, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ४ मधील अपिलार्थीच्या रजेच्या हक्कपटाची झेरॉक्स प्रत व मुद्दा क्र.५ शी संबंधित वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक: १३-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती अन्नपूर्णा भगवान शिगेदार,द्वारा अरुण पुरुषोत्तम देवळे, देवळे जिनिंग, गंगाखेड, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती,पाथरी, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८८६

निर्णय दिनांक : १३.११.२००९

१. श्रीमती अन्नपूर्णा भगवान शिगेदार, :अपिलार्थी
रा. गंगाखेड, जि.परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.),
जिल्हा परिषद, परभणी.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, परभणी.

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.),
जिल्हा परिषद, परभणी.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर दि. २१.१०.२००८ रोजी सुनावणी घेऊनही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २५.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये, त्रयस्थ पक्ष बी.के.शिगेदार (मयत) यांच्या सेवानिवृत्तीबाबत संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ९ मुद्यांवर वेगवेगळया कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने वरील परिच्छेदात

नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या प्रथम अपिलावर दि. २१.१०.२००८ रोजीच्या सुनावणीनंतर यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी काय निर्णय दिला, हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. तथापि यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केल्याचे आयोगास आढळून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.११.२००९ रोजी औरंगाबाद घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर असा खुलासा सादर केला आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी दि. २१.१०.२००८, ०७.११.२००८ व २५.११.२००८ रोजी ठेवण्यात आली होती. तथापि अपिलार्थी हे सुनावणीसाठी सतत गैरहजर राहिल्याने त्यांनी दि. ०५.१२.२००८ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दि. १८.१०.२००८ रोजी पुरविल्यामुळे, अपिलार्थीस तसे कळवून अपिलार्थीचे प्रकरण निकाली काढले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद परभणी यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दि. १८.१०.२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, या पत्रामध्ये त्यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ च्या संदर्भात,- 'वित्त विभाग दि. ०६.०६.२०००च्या शासन निर्णयाची प्रत जोडली नाही', असे विधान नमूद केले आहे. तथापि असे कळविण्याऐवजी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अशाप्रकारची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे या प्रकरणी अपिलार्थीस कळविणे उचित राहिले असते. मूळात अपिलार्थीने देखील यासंदर्भात फक्त वित्त विभाग - दि.०६.०६.२००० ची प्रत - असे त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केले आहे. शासनाचा हा निर्णय नेमका कोणत्या विषयासंदर्भात आहे, तो विषयदेखील त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेला

नाही. यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे या मुद्यावरील मागणी केलेली माहिती, ही मोघम स्वरुपाची ठरते व पर्यायाने ती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. तसेच अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात लोकायुक्त, मुंबई यांच्याशी जन माहिती अधिकारी यांनी शिगेदार यांच्यासंदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती मागितल्या होत्या, तथापि या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी असा पत्रव्यवहार त्यांच्या संचिकेत दिसून आला नाही, असे बेजबाबदारपणाचे उत्तर दिले आहे. मूळात त्रयस्थ पक्ष,बी. के.शिगेदार (मयत) यांच्या सेवानिवृत्तीप्रकरणासंदर्भात त्यांनी लोकायुक्त मुंबई यांच्याशी काही पत्रव्यवहार केला होता किंवा कसे याबाबत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १८.१०.२००८ रोजीच्या पत्रामध्ये कोणतेही भाष्य केले नाही, त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात त्रयस्थ पक्ष,बी.के.शिगेदार (मयत) यांच्या संदर्भात लोकायुक्त,मुंबई यांच्याशी केलेल्या संपूर्ण पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्याव्यात. जर त्यांच्याकडील अभिलेख्यावर अशा पत्रव्यवहाराची कागदपत्रे उपलब्ध नसतील तर, अपिलार्थीस तसे कळवावे. अपिलार्थीच्या या अर्जातील मुद्दा क्र. ९ च्या संदर्भात अपिलार्थीस ही माहिती, गट विकास अधिकारी यांनी दि. २७.०८.२००८ रोजी त्यांच्या दुसऱ्या अर्जाच्या संदर्भात पुरविली आहे, हे पाहता, आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील फक्त ४ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस देय होत आहे, ती त्यांना अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्याचे आदेश वरील परिच्छेदामध्ये आयोगाने जन माहिती अधिकारी यांना दिलेले आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भातील, वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक: १३-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती अन्नपूर्णा भगवान शिगेदार,द्वारा अरुण पुरुषोत्तम देवळे, देवळे जिनिंग, गंगाखेड, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४३
निर्णय दिनांक   १३/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा सचिव, भारत एज्युकेशन सोसायटी, मार्फत मौलाना आझाद उर्दू हायस्कूल, पोलीस ठाण्याजवळ, मुदखेड, ता.मुदखेड, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, नांदेड विभाग, नांदेड. | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०१.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १०.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ०७ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४४
निर्णय दिनांक १३/११/२००९

१ श्री. उमाप नंदकुमार भाऊराव, : अपिलार्थी
मु. गोगलगांव, पो. गळनिंब,
ता.नेवासा, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
विशेष जिल्हा समाजकल्याण कार्यालय,
अहमदनगर.

२. जन अपिलीय अधिकारी,
विशेष जिल्हा समाजकल्याण कार्यालय,
अहमदनगर

**निर्णय**

श्री. उमाप नंदकुमार भाऊराव यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०२.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १९.०९.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ११.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १३/११/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. उमाप नंदकुमार भाऊराव, मु. गोगलगांव, पो. गळनिंब, ता.नेवासा, जि.अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४५
निर्णय दिनांक १३/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. संजय अनंदा पाटील,<br>मु.पो. तारखेडा बु., ता.पाचोरा, जि.जळगांव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रुप ग्रामपंचायत, तारखेडा बु.,<br>ता.पाचोरा, जि.जळगांव. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती, पाचोरा, ता.पाचोरा,<br>जि.जळगांव. | | |

**निर्णय**

श्री. संजय अनंदा पाटील यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १७.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाच्या पुणे येथिल कार्यालयात सादर झालेले व दि.१६.०९.२००९ रोजी औरंगाबाद कार्यालयास प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २१.११.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १४.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते.  तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. संजय अनंदा पाटील, मु.पो. तारखेडा बु., ता.पाचोरा, जि.जळगांव.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९०८
निर्णय दिनांक १३/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती. सुरैया बेगम महंमद बीन अब्दुला<br>व्दारा- श्री. भारत मारुतीराव कोकाटे, जय भवानी चौक, इंगळे गल्ली, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, परंडा, ता.परंडा,<br>जि.उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,<br>उपविभागीय कार्यालय, भूम, ता.भूम,<br>जि.उस्मानाबाद | | |

**<u>निर्णय</u>**

श्रीमती. सुरैया बेगम महंमद बीन अब्दुला यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २८.०१.२००८ (दि.१६.०८.२००८ रोजी फेरसादर) रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २९.१२.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दिनांक १२.०६.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर दिनांक ०९.०७.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ११० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्रीमती. सुरैया बेगम महंमद बीन अब्दुला, व्दारा- श्री. भारत मारुतीराव कोकाटे, जय भवानी चौक, इंगळे गल्ली, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९०९
निर्णय दिनांक १३/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गायकवाड संजीवकुमार पंढरी,<br>मु. जोगाळा, पो. लक्कडजवळगा,<br>ता.शिरुर अनंतपाळ, जि.लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा परिषद कार्यालय, अमरावती | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी,<br>जिल्हा परिषद कार्यालय, अमरावती | | |

**निर्णय**

श्री. गायकवाड संजीवकुमार पंढरी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाच्या नागपूर येथिल कार्यालयात दिनांक ३१.०१.२००८ (दि. ०६.०६.२००८ रोजी फेरसादर) रोजी सादर झालेले व दि. १८.१०.२००८ रोजी औरंगाबाद कार्यालयास प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २८.०८.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे विनादिनांकाचे अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक २८.०८.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जास्तीत जास्त २८.१०.२००६ पर्यंत प्रथम अपील करणे व त्यानंतर दि. २८.०२.२००७ पर्यंत व्दितीय

अपील करणे आवश्यक होते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने दिनांक ३१.०१.२००८ रोजी म्हणजेच प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३३३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. गायकवाड संजीवकुमार पंढरी, मु. जोगाळा, पो. लक्कडजवळगा, ता.शिरुर अनंतपाळ, जि.लातूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९१०
निर्णय दिनांक १३/११/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शिराणे दत्ता गणपतराव,<br>रा. सरसम बु., ता.हिमायतनगर, जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत),<br>पंचायत समिती, हिमायतनगर, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती, हिमायतनगर, जि.नांदेड | | |

**निर्णय**

श्री. शिराणे दत्ता गणपतराव यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २६.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २०.०२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०८.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर दिनांक ०८ .०४.२००८ रोजी निर्णय दिला. परंतू हवी असलेली माहिती न मिळाल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या

दिनांकापासून ९० दिवसापेक्षा १७१ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. शिराणे दत्ता गणपतराव, मु.पो. सरसम बु., ता.हिमायतनगर, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०३६
निर्णय दिनांक १३/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गंगाधर संभाजी जोगदंड,<br>रा. येलदरी कॅम्प, ता.जिंतुर, जि.परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर,<br>ता.वसमत, जि.हिंगोली | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर,<br>ता.वसमत, जि.हिंगोली | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. गंगाधर संभाजी जोगदंड यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.०८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयास प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०९.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २९.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४४ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १३/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. गंगाधर संभाजी जोगदंड, मु.पो. येलदरी कॅम्प, ता.जिंतुर, जि.परभणी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८८७

निर्णय दिनांक १३-११-२००९

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, : अपिलार्थी
रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा वन परिक्षेत्र अधिकारी (रोहयो), किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक वन संरक्षक (जंकाससं), किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०१-२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाव्दारे अर्ज पाठवून दिला असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०४-२००८ रोजी

सुनावणी घेऊन निर्णय न देता अपिलार्थीचे प्रथम अपील प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजनेच्या कामासंदर्भात आर्थिक वर्ष २००४ ते डिसेंबर २००७ या कालावधीतील वेगवेगळ्या मुद्दयावरील विस्तृत व्याप्ती असलेली माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती. तथापि ही माहिती त्यांना विहित मुदतीत प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जाची सुनावणी दिनांक १५-०४-२००८ रोजी होऊन त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाची प्रत अपिलार्थीस प्राप्त झाली नसावी त्यामुळे त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या दिनांक १८-०१-२००८ रोजीच्या अर्जावर त्यांनी दिनांक १३-०२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या महितीपोटीचे शुल्क रुपये ७२०८ इतके चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, किनवट शाखा येथे भरण्याचे सूचित केले होते. त्यांच्या दिनांक १३-०२-२००८ रोजीच्या पत्रासोबत त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेले माहितीपोटीचे शुल्क भरण्याकरिता चलनही तयार करुन त्यासोबत जोडले होते, परंतु अपिलार्थीने या शुल्काचा

भरणा न केल्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती त्यावेळी पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आजही त्यांच्याकडे तयार असून ते ती अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १८-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदीमधील विहित कालावधीत आवश्यक तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे या शुल्काचा तपशील देऊन त्यांना माहितीपोटीचे शुल्क त्याच्या तपशीलासह कळविले आहे. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर केल्याचे अथवा त्यांची अशी तयारी असल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-४-२००८ रोजी आदेश पारीत करुनही, व या निर्णयाची प्रत अपिलार्थीस अग्रेषित करुनही जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील प्रलंबीत ठेवल्याचे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे. हे पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती विनामूल्य हवी असावी असे आयोगास आढळून येते. तथापि अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नाहीत असे नमूद केले आहे त्यामुळे त्यांना अद्यापही जर ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी असेल तर त्यांनी आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १३-०२-२००८ रोजीच्या पत्रामध्ये सूचना दिल्याप्रमाणे करावा आणि जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हस्तगत करुन घ्यावी अथवा पोस्टाचा खर्च भरुन ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पोस्टाने मागवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

विचाराधीन अपिलाशी संबंधित ही माहिती वर नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस विनामूल्य देय असणार नाही. अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती न मिळण्याचे कारण म्हणजे अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला नाही. अशाप्रकारे त्यांना माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे दिसून येत असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (रोहयो), किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक (जंकाससं), किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८८८

निर्णय दिनांक १३-११-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. धुमाकूळ,
सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा वन परिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), भोकर,
तालुका भोकर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक वन संरक्षक (रोहयो), किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना त्यांनी केलेल्या अर्जातील कर्मचा-यांची नावागावासहीत व महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना कामांची नांवागावासहीत माहिती त्यांना आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०३-२००८ रोजीचा केलेला मूळ अर्ज, जो प्रत्यक्षात दिनांक ०७-०४-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला, त्याअन्वये

त्यांच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजनेच्यासंदर्भात आणि त्यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांची नांवे, ते कोणत्या जातीच्या आरक्षणाअंतर्गत शासकीय नोकरीस लागले, कामासाठी धान्य राष्ट्रीय कार्यक्रम योजनेचे ५० टक्के धान्याचा परतावा मजुरांना रोखीने मजूरी वाटप केलेल्या मस्टरच्या छायांकीत प्रती, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती सन २००७-०८ या कालावधीशी संबंधित मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०४-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने ज्या कालावधीशी संबंधित माहिती त्यांच्याकडे मागितली होती, त्या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालयाकडून रोजगार हमी योजना व कामासाठी धान्य राष्ट्रीय कार्यक्रमाअंतर्गत कोणतीही कामे केली नसल्याने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती निरंक असल्याचे अपिलार्थीस कळविले व त्यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांची यादी त्यांचे पदनाम, नांव व वन क्षेत्रीय कार्यालयात कार्यरत असल्यापासूनचा दिनांक या मुद्दयावर अपिलार्थीस माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०९-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील माहिती दिनांक १७-०४-२००८ रोजी अपिलार्थीस दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन त्यांना काही माहिती कळविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी कोणत्या जातीच्या आरक्षणातून शासकीय नोकरीस लागले याची माहिती मागविली असता, जन माहिती अधिकारी यांनी या मुद्दयावर अपिलार्थीस माहिती न देता त्यांच्या वन क्षेत्रात ते कधीपासून कार्यरत आहेत तो दिनांक कळविला आहे. वास्तविक पाहता अपिलार्थीने या दिनांकाची मागणी मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेली नाही, त्यामुळे अपिलार्थीस ती माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना कोणतेही प्रयोजन नव्हते. सदरचे कर्मचारी कोणत्या जातीच्या आरक्षणाअंतर्गत नोकरीस लागले, अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता जन माहिती अधिकारी यांनी असे अवगत केले की, वन संरक्षकाच्या नेमणूका या विभागीय वन अधिका-या-कडून केल्या जात असल्याने आणि त्यांची आस्थापना ही विभागीय कार्यालय असल्याने अपिलार्थीने या मुद्दयावर मागितलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे कळविलेल्या माहितीचे अवलोकन करता असे आढळून येत की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे त्यांच्या कार्यालयीन कर्मचा-यांच्या जातीच्या मुद्दयावर अपिलार्थीस काहीही कळविले नाही. जर ही माहिती, जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे विभागीय वन अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असेल तर त्यांनी, अपिलार्थीच्या दिनांक २८-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत विभागीय वनअधिकारी यांच्याकडे सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे गरजेचे होते, तथापि अशी कोणतीही कार्यवाही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या

प्रकरणी केल्याचे आयोगास आढळून येत नाही. त्यामुळे या मुद्दयावर अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी हे जबाबदार आहेत, असे सिध्द होत आहे. अपिलार्थीस माहिती पुरविण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाच्या कर्मचा-यांच्या जातीची माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीस प्रथमतः जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक असलेली माहिती द्यावयाची सोडून दुसरीच माहिती देऊन अपिलार्थीची दिशाभूल केल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या निष्काळजी कार्यवाहीबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जाचे त्यांनी काळजीपूर्वक वाचन करुन त्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, सा. धुमाकूळ, सरस्वती कॉलनी, किनवट,

तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक (रोहयो), किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८८९

निर्णय दिनांक १३-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. तुकाराम शिवराम वाडीयार,<br>छत्रपतीनगर, पूर्णा रोड,<br>नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्रीमती खल्लाळ सुचिता उमाजी

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्रीमती खल्लाळ सुचिता उमाजी यांच्या संदर्भात त्यांनी शिक्षण विस्तार अधिकारी या पदासाठी भरलेल्या अर्जाची सत्यप्रत, त्यांच्या बी. एड्. च्या प्रमाणपत्राची

सत्यप्रत व ही कागदपत्रे छाननी केलेल्या पत्रकाची सत्यप्रत, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, त्रयस्थ पक्ष हजर व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे मूळात व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली त्रयस्थ पक्षाच्या संदर्भातील माहिती स्वतःकडे तयार करुन ठेवली होती. परंतु अपिलार्थी ही माहिती घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात स्वतः होऊन कधीही हजर झाले नाहीत. स्वतः शिक्षणाधिका-यांनी दूरध्वनीवरुन त्यांनी मागितलेली माहिती तयार असून ही माहिती घेण्यासाठी अपिलार्थीस सूचित करुनही ते ही माहिती व्यक्तिशः प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत व त्यांनी शिक्षणाधिका-यास असे उत्तर दिले की, त्यांनी आता आयोगाकडे अपील केले असून ती माहिती ते आयोकडूनच घेतील. त्यामुळे अंतिमतः शिक्षणाधिका-याने दिनांक २२-१२-२००८ रोजी अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठवून दिली.

त्रयस्थ पक्ष सुचिता उमाजी खल्लाळ यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी आणि त्या एकाच बॅचच्या असून त्यांनी अपिलार्थीपेक्षा आवश्यक ती शैक्षणिक पात्रता जास्त प्राप्त करुन घेतल्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या विषयीची माहिती केवळ वैयक्तीक व्देषापोटी व विस्तार अधिकारी या पदावर घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये त्यांना अपिलार्थीपेक्षा जास्त मार्क पडल्यामुळे

केवळ मत्सरापोटी अपिलार्थीने ही माहिती मागितली आहे. ही माहिती उघड करण्यासाठी त्यांची कोणतीही हरकत असणार नाही.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती उघड करण्यासाठी कोणतीही हरकत असू नये. परंतु या ठिकाणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या-कडे त्यांच्या मूळ अर्जाशी संबंधात पुढील सर्व घडामोडी ज्ञात होण्याकरिता व्यक्तिशः संपर्क साधणे गरजेचे होते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणतात त्याप्रमाणे, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः संपर्क साधल्याचे दिसून येत नाही अथवा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिशः उपस्थित राहिल्याचा कोणताही पुरावा आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीचा, अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कधीही उपस्थित झाले नाहीत हा युक्तिवाद, आयोग मान्य करत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पाठविलेली माहिती ही अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत आहे. शिक्षणाधिका-यांना आयोगासमोर माहिती स्वीकृत करण्याचे दूरध्वनीवर सांगूनही अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली आहे असा निष्कर्ष काढून, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. तुकाराम शिवराम वाडीयार, 'साईप्रसाद', छत्रपतीनगर, पूर्णा रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८९०

निर्णय दिनांक १३-११-२००९

१ श्री. येताळे लक्ष्मण नागोराव, : अपिलार्थी
रा. बाभळी (ध.), पो. मंगनाळी, तालुका धर्माबाद,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद,
तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जुलै २००८ मध्ये मौजे मोकळी, आटाळा, येलापूर येथील स्वस्त धान्य दुकानांनी कोणकोणत्या योजनांचा माल किती उचल केला व रॉकेल किती उचल केले त्या बाबतच्या साठा रजिस्टर व वाटप रजिस्टरच्या प्रती, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही

माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने आणि अशा प्रकारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-११-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात एकूण सहा वेळा गेले असता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. तसेच त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून विनाकारण वंचित राहावे लागले. त्यांनी ज्या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती त्या कालावधीमध्ये संबंधित दुकानदारांनी गावातील जनतेला त्यांना सरकारकडून कोणतेही धान्य प्राप्त झाले नाही असे सांगून ग्रामस्थांना देय धान्य वाटप केले नाही. दुकानदारांच्या माहितीच्या सत्यासत्यतेची पडताळणी करण्यासाठी आणि अशा दृष्टीने व्यापक जनहितासाठी त्यांना या माहितीची आजही आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी आयोगास पुढे असेही स्पष्ट केले की, या प्रकरणी संबंधित अधिका-यांनी त्यांना माहिती देण्याचे असद्‌हेतूने टाळले असल्याने जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर आयोगाने शास्तीची कार्यवाही आदेशित करावी आणि त्यांना या

प्रकरणी झालेला नाहक खर्च व ५०० रुपये इतकी नुकसानभरपाई त्यांना देण्याचे आयोगाने आदेशित करावे.

अपिलार्थी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २९-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्याने अपिलार्थीने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून ती माहिती प्राप्त करुन घ्यावयास हवी होती. तथापि अपिलार्थीने जरी त्यांच्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सहा वेळा उपस्थित राहिले असा युक्तिवाद केला असला तरी, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे ते कोणत्या तारखेस उपस्थित राहिले या तारखा आयोगास सांगता आल्या नाहीत आणि यासंदर्भातील कोणताही लेखी पुरावा आयोगास त्यांना सादर करता आला नाही. त्यामुळे अपिलार्थीचा, ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी व्यक्तिशः हजर राहिले हा युक्तिवाद, आयोग फेटाळून लावीत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती पाहता, अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार होती अथवा ही माहिती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना कष्टप्रद वाटावे अशा प्रकारची कोणतीही परिस्थिती या ठिकाणी संभवत नाही. अपिलार्थीने या ठिकाणी एकाच महिन्याशी संबंधित स्वस्त धान्य दुकानदारांना होणा-या धान्य व रॉकेल वाटपाची माहिती मागितली होती. धर्माबाद तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागामध्ये कोणत्या दुकानास कोणत्या वेळी किती

धान्य व रॉकेल पुरवठा केला गेला याची माहिती निश्चितपणे उपलब्ध असणार याची, धान्य वाटपासंदर्भात सार्वजनिक वितरण व्यवस्थापनासंदर्भात अन्नधान्य व नागरी पुरवठा विभागाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या आदेशावरुन अशाप्रकारची माहिती तहसील कार्यालयाकडे उपलब्ध असण्याची आयोगास खात्री आहे. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धर्माबाद यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक १८-०९-२००८ रोजी केलेल्या अपील अर्जावर जरी अधिनियमातील कलम १९ (६) मधील तरतुदीनुसार सुनावणी घेतली असती तरी देखील अपिलार्थीस ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आयोगाकडे व्दितीय अपील करण्याची गरज पडली नसती. अपिलार्थीने मागणी केलेल्या एवढ्या साध्या माहितीसाठी अपिलार्थीस आयोगाकडे धाव घेऊन, त्यांचे गांव मौजे बाभळी, तालुका धर्माबाद येथून औरंगाबाद येथे हजर राहण्यासाठी कष्ट घ्यावे लागले, ही बाब आयोगास प्रामुख्याने खटकत आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये धर्माबाद येथून औरंगाबाद येथे व औरंगाबादवरुन परत जाण्याचा भाड्याचा खर्च, आज रोजी त्यांची बुडालेली मजूरी पाहता अपिलार्थीस त्यांच्या या प्रकरणी खर्चापोटीचे नुकसान त्यांच्या विनंतीप्रमाणे तहसीलदार, धर्माबाबत यांनी भरुन द्यावे असे आयोगास वाटत आहे. अपिलार्थीने दिलेल्या तपशीलामध्ये बाभळी ते धर्माबाद एस. टी. भाडे ६ रुपये, धर्माबाद ते औरंगाबाद रेल्वे भाडे ७५ रुपये व औरंगाबाद रेल्वे स्टेशन ते आयोगाचे कार्यालय येथील रिक्षा भाडे रुपये जाणेयेणे रुपये ३० याचा विचार करता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून भाड्यापोटी रु. १९२ आणि आज बुडालेल्या मजुरीकरिता रुपये २०० असे एकूण रुपये रु.३९२ इतकी नुकसानभरपाई रक्कम देय होत आहे. अपिलार्थीची ही नुकसानभरपाई तहसीलदार, धर्माबाद यांच्याकडून अपिलार्थीस करुन देणे योग्य वाटते. सबब तहसीलदार, धर्माबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस सोसाव्या लागलेल्या नुकसानभरपाईची किंमत म्हणून एकूण ३९२ रुपये इतकी रक्कम त्यांनी अपिलार्थीस स्वतःच्या पगारातून हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत अदा करावी. हे आदेश तहसीलदार,धर्माबाद यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(८) (ख) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहेत. अपिलार्थीस माहिती

देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, ही माहिती घेऊन जाण्यासाठी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वरील कालावधीमध्ये पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती हस्तगत करुन घ्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही या संदर्भातील कोणताही पुरावा आयोगाकडे सादर न केल्यामुळे अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची विनंती आयोग मान्य करत नाही. परंतु या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धर्माबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी न घेऊन दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदापणाची नोंद जिल्हाधिकारी, नांदेड यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. तहसीलदार, धर्माबाद यांनी अपिलार्थीस रुपये ३९२ इतकी नुकसानभरपाई हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत स्वतः अदा करावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १३-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. येताळे लक्ष्मण नागोराव, रा. बाभळी (ध.) पो. मंगनाळी, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र.१८१/०९ व १८२/०९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१८१,१८२
निर्णय दिनांक १६/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ चेअरमन,<br>जगदंबा महिला ग्रामिण बिगरशेती सहकारी<br>पतसंस्था मर्या., बेलापूर बु., ता.श्रीरामपूर,<br>जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक,<br>सहकारी संस्था, श्रीरामपूर, जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११.०६.२००९ रोजी नोंदविलेली व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या प्रकरणी सौ. आरती अविनाश गायकवाड यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक १३.१०.२००८ रोजीच्या दोन स्वतंत्र अर्जाद्वारे चेअरमन / मॅनेजर, जगदंबा महिला ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था, बेलापूर बु., ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने सौ. गायकवाड यांनी सहायक निबंधक, सहकारी संस्था, श्रीरामपूर, जि.अहमदनगर यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक १६.०२.२००९ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले दाखल केली. सदर अपिलांसंदर्भात संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था,

श्रीरामपूर  यांनी दि. ०५.०३.२००९ रोजी सुनावणी घेऊन, दि. १२.०३.२००९ रोजी आपले आदेश पारित केले. याव्दारे त्यांनी सौ. गायकवाड  यांची अपिले मान्य केली व त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना तात्काळ उपलब्ध करुन देण्याचे चेअरमन, जगदंबा महिला ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द संबंधित चेअरमन, जगदंबा महिला ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. यांनी  वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे  राज्य माहिती आयोगाकडे दोन स्वतंत्र व्दितीय अपिले  सादर केली आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, सौ. आरती अविनाश गायकवाड व जन अपिलीय अधिकारी हे सर्वजण गैरहजर आहेत.

सुरुवातीसच सर्व संबंधितांच्या असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता, मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु या पतसंस्थेच्या सदस्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर चेअरमन, जगदंबा महिला ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. यांनी या प्रकरणी घेतलेली भूमिका योग्य आहे. त्यामुळे त्यांना मूळ अर्जदार सौ. गायकवाड यांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार माहिती देणे बंधनकारक असणार नाही. परिणामी सहायक निबंधक, सहकारी संस्था, श्रीरामपूर, जि.अहमदनगर यांचे दि. १२.०३.२००९ रोजीचे निर्णय अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. १८१/०९ व १८२/०९ मान्य करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : १६-११-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. आरती अविनाश गायकवाड, मु.पो. बेलापूर बु., ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर

२. चेअरमन/मॅनेजर, जगदंबा महिला ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., बेलापूर बु., ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, श्रीरामपूर, जि.अहमदनगर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१८३
निर्णय दिनांक १६/११/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अरुण सोपान वाबळे,<br>रा. गुहा, ता.राहुरी, जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी,<br>पंचायत समिती, राहुरी, ता.राहुरी,<br>जि.अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, राहुरी, ता.राहुरी,<br>जि.अहमदनगर | | |

**निर्णय**

श्री. अरुण सोपान वाबळे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २६.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०७.०२.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ३१.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : १६/११/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. अरुण सोपान वाबळे, मु.पो. गुहा, ता.राहुरी, जि.अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३५

निर्णय दिनांक  १६-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. अभिजीत सी. पुप्पाल,<br>३०१, आदर्श क्लासिक, खिस्त गल्ली, अहमदनगर | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर | : प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : तहसीलदार (सामान्य प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर |
| | जन अपिलीय अधिकारी | : निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर |
| | त्रयस्थ पक्ष | : सिमरतमल कुंदनमल बोरा |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिका-याने कोणतीही माहिती दिली नाही, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विलंबाने माहिती

दिली. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना शास्ती लावावी व अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जिलहाधिकारी, अहमदनगर यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. सिमरतमल कुंदनमल बोरा या स्वातंत्र्य सैनिकाला दिलेल्या सेवानिवृत्ती संदर्भात एकूण तीन मुद्याव्दारे माहिती मागितली होती आणि यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेले अभिलेखे तपासणी करुन घेण्याची विनंती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दि. ०१-०१-१९८० ते ०४-१०-२००८ या कालावधीशी संबंधित होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी यांचे दिनांक १४-१०-२००८ रोजीचे पत्र म्हणजे त्यांनी जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर व लिड बँक ऑफिसर, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, अहमदनगर यांना उद्देशून लिहिलेले पत्र असून या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीचा दिनांक ०४-१०-२००८ रोजीचा अर्ज जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर यांच्याकडे पाठविला असल्याचे दिसून येते व या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे संबधितांना सूचित केले. तथापि प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-१२-२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दिली असा निष्कर्ष काढून आणि तसेच या व्यतिरिक्त जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी असे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-११-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, स्वातंत्र्य सैनिकांना पेन्शनचे वाटप हे कोषागार कार्यालयामार्फत केले जाते. या संदर्भात त्यांची भूमिका व कर्तव्य म्हणजे पेन्शनकरिता येणा-या स्वातंत्र्य सैनिकांच्या आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन नंतर ते प्रस्ताव शासनाकडे पाठविणे. शासकीय कोषागारात परस्पर स्वातंत्र्य सैनिकांच्या खाती पेन्शनच्या रकमा जमा होतात, त्यामुळे त्रयस्थ पक्षाने दिनांक ०१-०१-१९८० ते ०४-१०-२००८ या कालावधीमध्ये अशी नेमकी किती पेन्शन उचलली हे त्यांना माहीत राहणार नाही. यासंदर्भातील सर्व अभिलेखे अपिलार्थीस तपासणीकरिता उपलब्ध करुन दिली आहेत. अपिलार्थीस माहिती देण्यास त्यांनी कधीही नाकारले नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडील श्री. सिमरतमल कुंदनमल बोरा, स्वातंत्र्य सैनिक यांच्या संदर्भातील अभिलेखे तपासणी करावयाची आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित केलेल्या मुद्दयांचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले आहे की, त्रयस्थ पक्षाचे दु:खद निधन झाले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडील उपलब्ध अभिलेखावरुन हस्तगत करुन घेण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या ज्या विभागाशी संबंधित माहिती मागितली आहे त्या विभागाशी संबंधित त्यांच्याकडील संबंधित अभिलेखे हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थीस तपासणीसाठी

विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत. या कालावधीनंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून हे अभिलेखे तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध होऊ शकणार नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी तपासणीसाठी मागितलेल्या सवातंत्र्य सैनिकाच्या सेवानिवृत्तीविषयक सर्व कागदपत्रे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावीत.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अभिजीत सी. पुण्पाल, ३०१, आदर्श क्लासिक, खिस्त गल्ली, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (सामान्य प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३६

निर्णय दिनांक १६-११-२००९

१ श्री. काळे विठ्ठल एकनाथराव, : अपिलार्थी
मु. पो. खंदे, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), निफाड भाग,
निफाड, तालुका निफाड, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), निफाड भाग,
निफाड, तालुका निफाड, जिल्हा नाशिक

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी (महसूल) कार्यालय, निफाड भाग, निफाड, तालुका निफाड, जिल्हा नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नाशिक जिल्ह्यातील येवले तालुक्यातील क्षेत्र वाटपाच्या नोंदी संदर्भात सन

१९९० ते २००८ या कालावधीशी संबधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - चार हेक्टर क्षेत्राचे वाटप करतांना फक्त ज्या व्यक्तीच्या नावावर संबंधित क्षेत्र आहे त्या व्यक्तीच्या फक्त साध्या अर्जावरुन चार हेक्टर क्षेत्राची बागायती क्षेत्राची कायदेशीर करुन नोंद करता येते का, वाटपाची नोंद करण्यासाठी कोणती कागदपत्रे अत्यावश्यक असतात, क्षेत्र नावावर असणा-या व्यक्तीच्या साध्या अर्जावरुन वाटपाची नोंद कायद्याच्या कोणत्या कलमान्वये मंजूर करता येते त्या कलमाच्या नकला - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील वाटपाशी संबंधित कलम ८५ च्या संदर्भात माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य द्यावी असे सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०१-२००९ रोजी माहिती पुरविली. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-११-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थी यांच्या युक्तिवादावरुन अपिलार्थीस त्यांच्या वाटपाच्या संदर्भात त्यांच्या असलेल्या आक्षेपाचे निराकरण करुन घ्यावयाचे आहे, असे आयोगास आढळून आले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २०-१०-२००८ रोजी व दिनांक १४-०१-२००९ रोजी माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचा-याकडून ही माहिती स्वीकारत नाहीत त्यामुळे त्यांना शेवटी अपिलार्थीस ही माहिती पोस्टाने पुरवावी लागली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही सर्वसाधारण स्वरुपाची असून या माहितीमध्ये त्यांनी कोणताही विशिष्ट संदर्भ दिलेला नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-१०-२००८ व दिनांक १४-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे ही माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. तथापि अपिलार्थीस जर त्यांच्या बागायती क्षेत्राच्या झालेल्या वाटपासंदर्भात काही आक्षेप असतील तर त्यांचे निराकरण करण्याकरिता दिवाणी न्यायालय अथवा महसूल विभागाचे सक्षम प्राधिकरण हे दोन पर्याय त्यांना खुले आहेत. त्यापैकी योग्य तो पर्याय निवडून अपिलार्थीने आपल्या गा-हाण्याची तड लावून घ्यावी असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक २०-१०-२००८ रोजी व तदनंतर दिनांक १४-०१-२००९ रोजी प्राप्त झाली असून, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. काळे विठ्ठल एकनाथराव, मु. पो. खंदे, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी (महसूल) कार्यालय, निफाड भाग, निफाड, तालुका निफाड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), निफाड भाग, निफाड, तालुका निफाड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३७

निर्णय दिनांक १६-११-२००९

१ श्री. दिलीपराव नायकू थोरात, : अपिलार्थी
रा. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव,
तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-११-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे एक पत्र सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर दिनांक ०७-

०३-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली असून प्राप्त माहितीबद्दल त्यांची आता कोणतीही तक्रार नाही त्यामुळे सदरचा अपील अर्ज रद्द करावा अशीही विनंती अपिलार्थीने आयोगाकडे केली आहे.

अपिलार्थीस आता आवश्यक ती माहिती त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली असल्याने व प्राप्त माहितीवर अपिलार्थीची कोणतीही तक्रार नसल्याने, अपिलार्थीचे त्यांनी आयोगाकडे केलेले विचाराधीन व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १३७/२००९, दिनांक ०६-०३-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिलीपराव नायकू थोरात, रा. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३८

निर्णय दिनांक १६-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. दिलीपराव नायकू थोरात,<br>रा. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सुरेगांव,<br>तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोपरगांव,<br>तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-११-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे एक पत्र आयोगास सादर करण्यात आले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर दिनांक ०६-०३-

२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली आहे. त्यामुळे सदरचा अपील अर्ज रद्द करावा अशी अपिलार्थीने आयोगाकडे विनंती केली आहे.

अपिलार्थीस आता आवश्यक ती माहिती त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली असल्याने त्यांनी आयोगाकडे केलेले विचाराधीन व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १३८/२००९, दिनांक ०६-०३-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिलीपराव नायकू थोरात, रा. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सुरेगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६६

निर्णय दिनांक १६-११-२००९

१ श्री. बापुसाहेब उत्तमराव पालवे, : अपिलार्थी
प्लॉट नंबर ५८, गुरुकुल सोसायटी, पाईप लाईन रोड,
सावेडी, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),
पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), औरंगाबाद शहर,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून अपूर्ण माहिती दिल्याने आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगा-कडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दिनांक ०३-०४-२००६ ते १३-०४-२००६ व ०४-०९-२००६ ते ३०-०९-२००६ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यालयातील आवक जावक रजिस्टर, गोपनीय आवक जावक रजिस्टरमध्ये घेण्यात आलेल्या नोंदी, पोलीस आयुक्त यांच्या नावाने व्यक्तिशः आलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या विरुध्द आलेल्या अर्जाची नोंद ज्या रजिस्टरमध्ये घेण्यात आली त्या रजिस्टरमधील नोंदीची सत्यप्रत, अशी माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीमध्ये गोपनीय नोंदीचा समावेश नसल्यामुळे व ही माहिती अपूर्ण आहे असे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २७-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने आणि परिणामी अपिलार्थी अपेक्षित माहितीपासून वंचित राहिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-११-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती तथा अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ माहितीची मागणी आपल्या युक्तिवादामध्ये कायम ठेवली आहे.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने अपील अर्ज केला त्यावेळी ते या कार्यालयात नव्हते, ते या पदावर कार्यरत नव्हते.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दिनांक २७-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः जन अपिलीय अधिकारी यांच्यामार्फत या टप्प्यावर सुनावणी होणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २७-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २७-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बापुसाहेब उत्तमराव पालवे, प्लॉट नंबर ५८, गुरुकुल सोसायटी, पाईप लाईन रोड, सावेडी, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), औरंगाबाद शहर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६७

निर्णय दिनांक १६-११-२००९

१ श्रीमती रत्नमाला सुरेश बोरसे, : अपिलार्थी
स्मृती हौसिंग सोसायटी, बाबु गेनू मार्ग, आगरकर मळा,
स्टेशन रोड, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हाधिकारी, धुळे, जिल्हा धुळे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती, माहिती अधिका-याने दिली नाही, आणि अपर जिल्हाधिकारी धुळे यांनी आयोगाने सुनावणी घेण्याचे सांगूनही त्यांच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेतली नाही. सुनावणी घेण्यास टोलवाटोलवी केली. तसेच त्यांनी आरोग्य अधिका-याकडे वेळोवेळी पाठपुरावा करुनही त्यांना आरोग्य अधिका-याने कोणतीही माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जिल्हाधिकारी, धुळे यांच्याकडे " बोगस डॉक्टरविषयी " या विषयावर ९६ ते २००८ या कालावधी- तील काही माहिती खालीलप्रमाणे मागितली मागितली होती.

" ३/३/०८ रोजी मी आपल्या कार्यालयास पाठवलेली पत्रे व (सोबत गावक-यांचे ॲफीडेव्हीट, ग्रामपंचायती, दाखला, मंजूरी, ठराव) यावर आपल्या कार्यालयाकडून झालेली कारवाईचा अनुपालन अहवाल मिळावा. "

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. व या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांच्याकडे केले होते. तथापि अपिलार्थीस जिल्हाधिकारी, धुळे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-११-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगासमोर सादर केला असून त्यांनी या विषयावर वारंवार पाठपुरावा करुनही त्यांना जिल्हाधिकारी कार्यालय, आरोग्य अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अर्जाच्या संदर्भात कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे व तसेच जिल्हाधिका-याने आरोग्य अधिकारी यांना सूचित करुनही त्यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही न केल्याने नाईलाजास्तव त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे आणि या प्रकरणी त्यांना आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा

लागला असल्याने त्यांना १०,००० रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेशित करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या दिनांक १०-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती ही मोघम स्वरुपात असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी, धुळे यांच्याकडे मागणी केलेल्या माहिती अर्जामध्ये कोणत्याही एका विशिष्ट अशा अर्जाचा संदर्भ न देता त्यांनी दिनांक ०३-०३-२००८ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविलेल्या पत्रावर जिल्हाधिकाऱ्यांनी केलेली कार्यवाही अशी माहिती मागविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने, बोगस डॉक्टरच्या बाबत जिल्हाधिकाऱ्याने काय कार्यवाही केली अशी माहिती मागितली आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी, धुळे यांनी आज सुनावणीच्या वेळी महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे दिनांक ०७-०२-२००० चे 'बोगस वैद्यकीय व्यवसायिकांवर आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई करण्याकरिता जिल्हा दंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय पुनर्विलोकन समितीची स्थापना' या विषयाचे संदर्भित परिपत्रक आयोगास सादर केले आहे. या परिपत्रकाचे अवलोकन केले असता असे आढळून येते की, जिल्ह्यातील बोगस वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांना आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एकूण आठ सदस्यांची समिती नेमली गेली असून या समितीचे जिल्हाधिकारी अध्यक्ष व उप जिल्हा पोलीस अधीक्षक (मुख्यालय) हे सदस्य सचिव आहेत. या आधारे अपिलार्थी ज्या प्रश्नाकरिता जिल्हाधिकारी, आरोग्य अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा करत आहेत त्या प्रश्नाची तड लावण्यासाठी जिल्हा दंडाधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने दिनांक १०-०३-२००८ पर्यंत धुळे जिल्ह्यातील विविध शासकीय प्राधिकरणाकडे याच विषयावर केलेल्या तक्रारी अर्जासंदर्भात नेमकी काय कारवाई करावयाची याचा निर्णय या समितीने हे आदेश निर्गमित होताच

तीस दिवसाच्या आत घ्यावा आणि झालेला निर्णय त्यानंतर अपिलार्थीस कळवावा.  अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ज्या स्वरुपाची माहिती जिल्हाधिकारी धुळे यांना मागितलेली आहे आणि ती माहिती धुळे येथे कोणाकडे उपलब्ध असणे गरजेचे आहे याचा विचार केला असता, या समितीच्या कामकाजाचे व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने प्रथमतः जिल्हाधिकाऱ्या-ने जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका करणे गरजेचे आहे. सबब जिल्हाधिकारी, धुळे यांना असे आदेशित करण्यात येत आहे की,  या समितीची माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जनसामान्यांना  उपलब्ध होण्याच्या दृष्टीने त्यांनी त्यांच्या समितीच्या जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नियुक्त्या हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत कराव्यात व समितीच्या जन माहिती अधिकाऱ्याकडून या समितीचे कामकाजाशी संबंधित माहिती जनसामान्यांना अधिनियमातील तरतुदीनुसार उपलब्ध होईल असे पहावे व या प्रकरणी अपिलार्थीने वेळोवेळी केलेल्या तक्रार अर्जाचा विचार या समितीने याच कालावधीमध्ये करावा व त्यावरील कार्यवाही अपिलार्थीस अवगत करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी धुळे यांनी शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या दिनांक ०७-०२-२००० रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरीय समितीमध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत कराव्यात.

३. या समितीने अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक १०-०३-२००८ पर्यंत केलेल्या तक्रारींची व इतर अर्जांची दखल घेऊन त्यांच्या तक्रार अर्जांवर केलेली कार्यवाही त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य कळवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती रत्नमाला सुरेश बोरसे, स्मृती हौसिंग सोसायटी, बाबु गेनू मार्ग, आगरकर (मळा), स्टेशन रोड, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८९२

निर्णय दिनांक १६-११-२००९

१ श्री. बापुसाहेब उत्तमराव पालवे, : अपिलार्थी
प्लॉट नंबर ५८, गुरुकुल सोसायटी, पाईप लाईन रोड,
सावेडी, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),
पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), औरंगाबाद शहर,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०५-२००९ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर निर्णय दिला नाही. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या माहे मे व जून २००७ च्या मासिक वेतनाबाबत दिनांक ०१-०५-२००७ ते १२-०७-२००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - माझ्या विनंती अर्जानुसार मे व जून २००७ चा पगार काढण्यात आला आहे का, असल्यास तो किती तारखेला काढण्यात आला, माझा पगार काढण्यात आला नसेल तर तो का काढण्यात आला नाही, माझा पगार न काढण्यास कोण जबाबदार आहे, संबंधितांवर हलगर्जीपणाबाबत काय कार्यवाही करण्यात आली, माझा पगार निश्चित कधी काढणार - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), औरंगाबाद यांच्याकडे दिनांक ०९-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने आणि परिणामी अपिलार्थी अपेक्षित माहितीपासून वंचित राहिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-११-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही हवी आहे. ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते स्वतः पोलीस मुख्यालयात चार वेळेस जाऊन आले परंतु त्यांना पोलीस आयुक्त कार्यालयाने कोणतीही माहिती न दिल्याने त्यांनी आयोगाकडे अपील केले. या प्रकरणी पोलीस आयुक्त कार्यालयात हजर राहण्यासाठी त्यांना दर वेळेस रुपये २५० याप्रमाणे एकूण १००० रुपये इतका खर्च आला. त्यांनी माहिती

अधिकार कायद्याखाली अर्ज करुनही ज्या जन माहिती अधिका-याने त्यांना माहिती दिली नाही त्यामुळे त्यांना अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शास्ती लावावी अशी त्यांनी आयोगास त्यांच्या युक्तिवादाच्या अखेरीस विनंती केली.

अपिलार्थी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २६-०४-२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण चार मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. या चार मुद्दयांपैकी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ मधील त्यांचा पगार किती तारखेला काढण्यात आला व मुद्दा क्रमांक ३ मधील संबंधितांच्या हलगर्जीपणाबाबत त्यांच्यावर काय कार्यवाही करण्यात आली, या २ मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देय आहे. उर्वरित दोन मुद्दयांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे मत, अभिप्राय व त्यांच्या कृतीबाबत कारणे विचारणारी माहिती जन माहिती अधिकारी यांना मागितली आहे. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) च्या तरतुदीशी सुसंगत नाही व भविष्यकाळातील आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केल्यानंतर त्यांच्याकडे उपलब्ध माहिती ज्या स्वरुपात आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे अभिप्रेत आहे. अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे त्यांचा पगार निश्चित कधी काढणार अशी माहिती जन माहिती अधिकारी यांना विचारली आहे. ही माहिती भविष्यकाळातील असल्यामुळे त्यावेळी निश्चित तारीख जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे संभवत नाही त्यामुळे या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या मुद्दयांचे वरील पृथःकरण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मधील अपिलार्थीचा पगार किती तारखेला काढण्यात आला व मुद्दा क्रमांक ३ मधील संबंधितांच्या हलगर्जीपणाबाबत त्यांच्यावर काय कार्यवाही करण्यात आली या दोन मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केली असल्याने अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे, अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांचा अर्ज प्राप्त झाल्यापासून तीस दिवसाच्या आत माहिती देणे अथवा नाकारणे अशा प्रकारचा प्रतिसाद त्यांना देणे भाग होते. तथापि या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची जन माहिती अधिकारी यांनी उपेक्षा तर केलीच परंतु संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या दिनांक ०९-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेऊन बेजबाबदारपणाचा कळसच केल्याचे आयोगास आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील अंतर्गत तरतुदींची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद न देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी आणि त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार माहिती अधिकार म्हणून समजावे, अशी तरतूद आहे, त्या सर्वांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (गृह) यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे मुद्दा क्रमांक १ अंशतः व ३ अंशतः शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने पुरवावी.

३. सचिव (गृह) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बापुसाहेब उत्तमराव पालवे, प्लॉट नंबर ५८, गुरुकुल सोसायटी, पाईप लाईन रोड, सावेडी, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), औरंगाबाद शहर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (गृह), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८९४

निर्णय दिनांक १६-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. हस्तीमल मुळचंद लोढा, | : | अपिलार्थी |
| | ४२५९, आनंदीबाजार, गौरी घुमटाजवळ, अहमदनगर | | |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी | : | प्रतिवादी |
| | तथा सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : सेक्रेटरी, श्री. बडीसाजन ओसवाल श्री. संघ अहमदनगर

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-११-२००८ रोजी निर्णय देऊनही सेक्रेटरी, श्री बडीसाजन ओसवाल श्री. संघ यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांच्या नकला व सर्वसाधारण सभा घेतली नाही त्याची कारणे लिहिण्यासंबंधी स्पष्ट आदेश करुनही अपिलार्थीने व्दितीय अपील आयोगाकडे करेपर्यंत नकला पाठविल्या नाहीत. अशा प्रकारे मा. अपिलीय अधिकारी, माहितीचा अधिकार व मा. धर्मादाय

आयुक्त यांच्या आदेशाचा उपमर्द केल्यामुळे व कोर्टाचे आदेश न पाळल्यामुळे अवमानकर्त्याला शासन व्हावे याकरिता विचाराधीन अपील सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. बडी साजन ओसवाल श्री. संघ, अहमदनगर या संस्थेच्या संदर्भात सन २००५-०६ ते २००७-०८ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीशी संबंधित बॅलन्सशीट व त्यात दाखविलेल्या जमाखर्चाचा तपशील, या काळामध्ये सर्वसाधारण सभा घेण्यात आल्या आहेत, दिनांक ०१-०१-२००६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेनंतर पुन्हा वार्षिक सर्वसाधारण सभा केव्हा झाली याची तारीख व झाली नसल्यास त्याची कारणे - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला. जन माहिती अधिकारी यांचे सदर दिनांक १८-०९-२००८ रोजीचे पत्र म्हणजे सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर यांनी श्री. बडीसाजन ओसवाल श्री. संघ, अहमदनगर यांना दिलेले पत्र असून या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्यासाठी संबंधित संस्थेच्या सचिवांना सूचित केले आहे व त्याची एक प्रत अपिलार्थीस अग्रेषित केली आहे. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-११-२००८ रोजी आदेश पारीत करुन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत नियमाप्रमाणे माहिती देण्याचे संबंधित संस्थेच्या सचिवांना आदेशित केले. परंतु यानंतरही अपेक्षित

माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-११-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्षाचे प्रतिनिधी हजर आणि जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले.

संबंधित संस्थेच्या व्यवस्थापकांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी दिनांक ०४-१२-२००८ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली असून ती अपिलार्थीस प्राप्त झाल्याची, अपिलार्थीची सही असलेली रजिस्टर पोस्टाची पोच आयोगास सादर केली.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस, आयोगाचे ज्याप्रमाणे आदेश मिळतील त्याप्रमाणे तीस दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे आयोगास आश्वासित केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांचा माहितीसाठीचा अर्ज सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्या कार्यालयास केला त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे होते. तथापि त्यांनी त्यांचे हे कर्तव्य योग्य प्रकारे पार पाडल्याचे आयोगास आढळून येत नाही. मूळात अपिलर्थीच्या दिनांक ०४-०९-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जास सहायक धर्मादाय आयुक्त यांनी प्रतिसाद देण्याऐवजी त्यांनी त्यांच्या अर्जावर दिनांक १८-०९-२००८ रोजी श्री. बडीसाजन ओसवाल श्री. संघ यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाने परस्पर सदर माहिती दयावी असे त्रयस्थ पक्षाच्या सचिवाला जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे. तसेच अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) नुसार

सहायक धर्मादाय आयुक्त यांना केलेले अपील पाहता, या अपिलामध्ये अपिलार्थीने माहितीशी संबंधित कार्यालय, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर असे नमूद केले असून या अपिलामध्ये अपिलार्थी हे वादी व सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालयातील अधीक्षक ज्यांची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली आहे, ते प्रतिवादी होत आहेत. या प्रकरणी सहायक धर्मदाय आयुक्त यांनी अपिलार्थीस निर्णय देतांना संबंधित संस्थेच्या सचिवांना प्रतिवादी केले आहे, ही त्यांची कृती चुकीची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रथम अपील अर्जावर निर्णय देत असतांना या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी विरुध्द अर्जदार असे असते. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत जरी सदर निर्णय दिला असला तरी त्यांचे संबंधित संस्थेच्या सचिवांना दिलेले आदेश चुकीचे आहेत. अपिलार्थीने मागणी केलेल्या दोनही मुद्दयांचे अवलोकन करता अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांना आवश्यक असलेली माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. परंतु मुद्दा क्रमांक २ मध्ये उपरोक्त कालावधीमध्ये "सर्वसाधारण सभा घेण्यात आल्या आहेत काय" व "घेतल्या नसल्यास त्याची कारणे काय " या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण या मुद्दयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची कारणे व अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय असलेली माहिती आता जन माहिती अधिकारी यांना संबंधित संस्थेकडून घेऊन ती अपिलार्थीस पुरवावी लागेल. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या संस्थेचा सन २००५-०६ ते २००७-०८ चा जमा खर्चाचा तपशील मागितला आहे, हे पाहता, या संस्थेच्या या कालावधीमधील कॅशबुकाच्या झेरॉक्स प्रती प्राप्त करुन जन माहिती अधिकारी यांनी नंतर त्या अपिलार्थीस पुरवाव्यात जेणेकरुन अपिलार्थीचे समाधान होईल, असे आयोगास वाटते. अपिलार्थीस संबंधित संस्थेने दिनांक ०४-१२-२००८ रोजी माहिती दिली असून अपिलार्थीस ही

माहिती मिळाल्याची पोचही संबंधित संस्थेच्या व्यवस्थापकाने आयोगास दाखविली आहे. परंतु ही माहिती खोटी असल्याचे अपिलार्थीचे म्हणणे आहे. अपिलार्थीच्या या मुद्दयावर असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांचे या संस्थेसंदर्भात, संस्थेच्या व्यवस्थापनासंदर्भात काही आक्षेप असतील तर या आक्षेपाचे निराकरण त्यांनी मुंबई न्यास कायदा १९६० नुसार धर्मादाय आयुक्तांकडून सार्वजनिक न्यास व विश्वस्त कायद्यांअंतर्गत करुन घ्यावे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने ही माहिती संबंधित संस्थेकडून घेऊन ती तीस दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्याचे मान्य केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

आज रोजीच्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थीने श्री. बडीसाजन ओसवाल श्री. संघ या संस्थेमधील संबंधितांवर शासन करण्याची विनंती आयोगास केली आहे, परंतु या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, या संस्थेस माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदी लागू होत नाहीत, असा निर्णय मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी त्यांच्याकडील रिट याचिका क्रमांक ५२९४/२००८ च्या संदर्भात मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्‌गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या संदर्भात दि.२८-०४-२००९ रोजी दिला आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या या विनंतीवर राज्य माहिती आयोग कोणतेही आदेश देऊ शकत नाहीत, असे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. हस्तीमल मुळचंद लोढा, ४२५९, आनंदीबाजार, गौरी घुमटाजवळ, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८९५

निर्णय दिनांक १६-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. बाळासाहेब भिवसेन काटे,<br>मु. पो. आखेगांव डोंगर, तालुका शेवगांव,<br>जिल्हा अहमदनगर | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, शेवगांव,<br>तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी दिनांक २६-०५२००८ रोजी प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केले. या अपिलाच्या सुनावणीच्या वेळी त्यांनी ३८ पानांचे त्यांचे म्हणणे सादर केले असून या म्हणण्याचा काहीही विचार न करता जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०७-२००८ रोजी निर्णय दिला. हा निर्णय त्यांना मान्य नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे आखेगांव डोंगर येथील गट नंबर २०५ च्या मोजणीसंदर्भात एकूण १४ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०७-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अमान्य केले. अपील अमान्य करतांना त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती बरोबर असल्याचे त्यांना वाटल्यावरुन अपिलार्थीचे अपील अमान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-११-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आवश्यक असल्याचे आयोगास अवगत केले आणि आयोगास असेही अवगत केले की, एकच भूखंडाची वेगवेगळया दिवशी मोजणी केली असता त्याचे क्षेत्रफळ बदलले (कमी ) असल्याचे आढळून आल्याने त्यांनी प्रथम अपील सादर केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने त्यांचे समाधान झाले नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे

जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १४ मुद्दयाव्दारे माहिती मागितली असून या १४ मुद्दयापैकी मुद्दा क्रमांक १, २, ३, ४, १३ व १४ या मुद्दयासंदर्भातील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण या मुद्दयांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबाबतची कारणे व त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. अशा प्रकारची अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. परिणामी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या सहा मुद्दयावरील कोणतीही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र उर्वरित आठ मुद्दयावरील अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत असल्याने ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस भूखंडाच्या प्रमाणित नकलांच्या सत्यप्रती पुरविल्या आहेत. परंतु यावरुन अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्यांशी संबंधित माहिती कोणती याचा बोध होत नाही. या मुद्दयाचे स्पष्टीकरण करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने अपिलार्थीचे समाधान झालेले नाही, हे पाहता, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत त्यांच्या कार्यालयात बोलावून त्यांच्या शंकांचे निरासन करावे म्हणजे अपिलार्थीचे समाधान होऊ शकेल. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी असद्‌हेतुने टाळले असल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे ज्या क्षेत्रफळाच्या भूखंडाची मागणी केली आहे ते भूखंड क्षेत्र ज्या अभिलेख्यावर उपलब्ध आहे असे सर्व अभिलेखे त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. भूमी अभिलेख कार्यालयाच्या नियमित कार्यप्रणालीमध्ये अशाप्रकारे नकाशावरुन क्षेत्रफळाचा आकडा अर्जदारास पुरवण्याची पध्दत

नसल्यास पुरवलेल्या नकाशावरुन  आवश्यक ते क्षेत्रफळ अपिलार्थीस स्वतः काढून घ्यावे लागेल, असे अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ ते १२ शी संबंधित  माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाळासाहेब भिवसेन काटे, मु. पो. आखेगांव डोंगर, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८९७

निर्णय दिनांक १६-११-२००९

१ श्री. चंगेडे शशिकान्त पेमराज, : अपिलार्थी
३४६०, खिस्त गल्ली,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
शिरुर पोलीस स्टेशन, जिल्हा पुणे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय पोलीस अधिकारी, हवेली विभाग, हवेली, पुणे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या पुणे येथील कार्यालयात दिनांक ०८-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केली ,त्यांचा माहितीसाठीचा अर्ज फेटाळला, त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक स्वरुपाची कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडून पुणे शिरुर रस्त्यावरील अपघात, मोटार वाहन कायद्यानुसार ठेकेदाराने दाखल केलेले गुन्हे, याविषयासंदर्भात सन २००५ ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून साधारण टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने हा अर्ज शिरुर पोलीस स्टेशन मु. पो. शिरुर यांना उद्देशून केला होता. अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक १८-११-२००८ रोजी पारीत केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-११-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि श्री. सी. पी. कांबळे, वरिष्ठ श्रेणी लिपिक दौंड कार्यालय हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर असून त्यांनी आपला लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, माहिती अधिका-याने त्यांना पूर्ण माहिती दिली नाही. अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारीत करुनही माहिती दिली नाही. त्यांनी माहिती अधिकार कायद्याची बुज राखली नाही, सेवाशर्तीचा भंग केला आहे आणि दप्तर दिरंगाई केली आहे, या युक्तिवादामध्ये त्यांनी पुढे, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करावी आणि त्यांचे झालेले नुकसान आणि मानसिक त्रासाबद्दल भरपाई रुपये १०,००० इतकी आदेशित करावी. अशी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांचा दिनांक २८-०८-२००८ रोजीचा या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्ज हा शिरुर पोलीस स्टेशनला केला होता. सदरचा अर्ज त्यांना प्राप्त झालेला नाही. अपिलार्थीच्या दिनांक २८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांना आयोगाकडील व्दितीय अपील सुनावणीच्या वेळी प्रथम प्राप्त झाली. त्यानुसार त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-०८-२००८ रोजीच्या अर्जातील संपूर्ण माहिती तयार केली असून ते ही माहिती अपिलार्थीस कधीही विनामूल्य देण्यास तयार आहेत .

उपविभागीय पोलीस अधिकारी, दौंड यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दिनांक २८-०८-२००८ रोजीचा मूळ अर्ज शिरुर पोलीस स्टेशनला प्राप्त झाल्याचे त्यांना आढळून आले नाही.

वरील घटनाक्रम, संबंधित उपस्थितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित संपूर्ण माहिती व मुद्दा क्रमांक ४ मधील " त्या पत्रव्यवहाराची सत्यप्रत " ही मुद्दा क्रमांक ४ मधील माहिती, अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही. कारण या मुद्दयांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन अपिलार्थीच्या दिनांक २८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जावर प्रथम सुनावणी घेतली आहे परंतु निर्णय देतांना अपिलार्थीच्या दिनांक २८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जातील एकूण सहापैकी पाच मुद्दे विचारासाठी घेतले आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय दिल्यानंतरही अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय अपिलार्थीच्या दिनांक २-०८-२००८ रोजीच्या मूळ

अर्जासंदर्भात असल्याचे वाटल्यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दयावर काही माहिती पुरविली. आज रोजी अपिलार्थी यांच्या दिनांक २८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही याचे स्पष्टीकरण त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये दिलेले आहे. आज रोजी अपिलार्थीस देण्यासाठीची त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती त्यांनी आयोगास दाखविली आहे. ही माहिती अपिलार्थीच्या दिनांक २८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाची जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत उपलब्ध होऊ शकली नाही त्यामुळे ते अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत, असे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची व त्यांना नुकसानभरपाई देण्याची केलेली विनंती आयोग अमान्य करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी दि. २८-०८-२००८ च्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. चंगेडे शशिकान्त पेमराज, ३४६०, खिस्त गल्ली, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, हवेली विभाग, हवेली, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८९८

निर्णय दिनांक १६-११-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. अविनाश प्रभाकर पानगव्हाणे,<br>व्दारा- दिलीप एन. थोरात,<br>मु. पो. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर | : प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षात | : जन माहिती अधिकारी | : शाखा अभियंता, जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे उपविभाग, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर |
| | जन अपिलीय अधिकारी | : उप अभियंता, जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे उपविभाग, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे माहेगांव मढी

या रस्त्याच्या हद्दीत अतिक्रमण  केलेल्या विहिरीच्या कार्यवाही संदर्भात एकूण तीन मुद्दयाव्दारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे माहिती मागितली होती.  तथापि अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडे दिनांक १२-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले.  जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडील दिनांक २४-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे पाठविला.  तथापि या अर्जावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-११-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळी  अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीचा मूळ अर्ज प्राप्त झाला असून, अशाच प्रकारची माहिती दुस-या माहिती अर्जाच्या संदर्भात, अपिलार्थी यांनी त्यांना आपल्याला माहितीची आवश्यकता नाही असे लिहून दिले आहे, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळण्याची आयोगास विनंती केली.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर, या टप्प्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर अथवा त्यांचे नियुक्त केलेले या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १२-०९-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते.  सबब, असे आदेशित करण्यात येत आहे की, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी नेमलेले या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १२-०९-

२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी नेमलेले, या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक १२-०९-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अविनाश प्रभाकर पानगव्हाणे, व्दारा- दिलीप एन. थोरात, मु. पो. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे उपविभाग, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे उपविभाग, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८९९

निर्णय दिनांक १६-११-२००९

१ श्री. संजय यशवंतराव भंडारे, : अपिलार्थी
११, शिवश्री, बुरुडगांव रोड, वैभव हॉटेलजवळ,
अहमदनगर - ४१४ ००१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा प्राचार्य, न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप प्राचार्य, न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर त्यांनी सदर अपील नामंजूर केल्याने व्यथित होऊन त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य, न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या कॉलेजच्या प्राचार्याच्या संदर्भात एकूण दहा मुद्दयाव्दारे दिनांक ०१-०४-२००४ ते १८-१२-२००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - प्राचार्याच्या नेमणूक पत्राची सत्य आणि प्रमाणित प्रत, प्राचार्यांच्या नेमणुकीसंदर्भात पुणे विद्यापीठ आणि महाराष्ट्र शासन यांच्या मान्यता पत्राच्या प्रमाणित सत्यप्रती, विद्यमान प्राचार्यांना त्यांच्या वेतनाव्यतिरिक्त महाविद्यालयाच्या लेखा विभागामार्फत अथवा पुणे विद्यापीठ अथवा महाविद्यालय आणि शासनाच्या निधीतून देण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या रकमांचा तपशील, रजा, अध्यापन जबाबदारीनुसार कोणत्या विषयाचा आणि किती कार्यभार आहे त्याचा व शैक्षणिक वर्षानुसार काम केलेल्या तासिकांचा तपशील - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पूर्णतः व्यक्तीगत स्वरुपाची असल्याचे त्यांना वाटल्यावरुन त्यांनी अपिलार्थीस माहिती नाकारली. जन माहिती अधिकारी दिलेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी ०७-१०-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील नामंजूर केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-११-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आवश्यक असल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची आहे त्यामुळे अपिलार्थीचे कोणतेही जनहित साध्य होणार नाही, असा युक्तीवाद केला.

जन माहिती अधिकारी यांच्या वकिलाने असा युक्तिवाद केला की, त्यांच्या संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू नाहीत. यासंदर्भात त्यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांच्या, नगर शिक्षण संस्था वनडोंगरी, नागपूर विरुध्द राज्य माहिती आयोग, नागपूर यांच्या रिट याचिका क्रमांक ५१३२/२००८ च्या संदर्भात दिनांक २०-०८-२००९ रोजीच्या आदेशाकडे आयोगाचे लक्ष वेधले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठीचा अर्ज संबंधित कॉलेजने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार नेमणूक केलेल्या माहिती अधिका-याकडे केला होता. अपिलार्थीने हा अर्ज मूळात संबंधित संस्थेकडे माहितीसाठीचा अर्ज केला नव्हता. या न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स, अहमदनगर, या महाविद्यालयास शासनाकडून निधी प्राप्त होत असतो. या कॉलेजवर शासनाच्या शिक्षण विभागाचे नियंत्रण आहे. त्यामुळे हे कॉलेज एक स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहे. यामुळेच त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती अधिकाऱ्याची नेमणूक केलेली आहे. त्यामुळे या महाविद्यालयास अपिलार्थीने विचाराधीन अपील प्रकरणी मागणी केलेल्या संपूर्ण माहिती त्यांना देणे आवश्यक आहे. अपिलार्थीने जरी न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर यांच्या प्राचार्यांशी संबंधित माहिती मागितली असली तरी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप हे सार्वजनिक आहे. ही वैयक्तीक माहिती नाही कारण ही माहिती वेगवेगळ्या अभिलेख्यांमध्ये उपलब्ध होत असते. तसेच ही माहिती उघड केल्याने संबंधितांच्या खाजगीबाबीत आगंतूक हस्तक्षेप होईल, असे आयोगास वाटत नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सार्वजनिक असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार उपलब्ध करुन देणे भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी तथा उपप्राचार्य, न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा उपप्राचार्य, न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-११-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संजय यशवंतराव भंडारे, ११, शिवश्री, बुरुडगांव रोड, वैभव हॉटेल जवळ, अहमदनगर - ४१४ ००१.

२ जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य, न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, न्यू आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.